
# वृषाली जोशी



# निष्काळजी मांजर



# निष्काळजी मांजर

## लेखक- अर्ल स्टॅनले गार्डनर

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

# निष्काळजी मांजर

लेखक - अर्ल स्टॅनले गार्डनर

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २३ जुलै २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे एक्कावन्न पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५

# अर्ल स्टॅनले गार्डनर



हा १८८९ मध्ये जन्मलेला अमेरिकन लेखक व वकील असून, तो वकील पेरी मेसन मालीकेसाठी प्रसिद्ध आहे. त्याने इतरही असंख्य कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

# निष्काळजी मांजर

# प्रकरण १

खुर्चीच्या हातावर हेलन केंडर उडवीत असलेल्या चुरगळलेल्या कागदाच्या बोळयावर मांजराच्या पिल्लाचे डोळे पुढेमागे फिरत होते. त्याच्या पिवळया डोळयांमुळे त्या पिल्लाचे नाव अंबर होते. हेलनला त्याचे निरीक्षण करायला आवडत असे. त्याची काळी बुबुळे नेहमी फिरत असत. त्याच्या बारीक होणाऱ्या फटी काही अशुभ घडण्याचे सुचवत तर मोठे होतांना त्यात रंगीत अपारदर्शक पापुद्रे दिसत. त्या काळया आणि पिवळया डोळयांचा हेलनवर भारून गेल्यासारखा परिणाम होत असे. त्यांचे थोडा वेळ निरीक्षण केले, की तिचे विचार भटकू लागत. आजचा दिवस, ती खोली, मांजराचे पिल्लू ती विसरत असे एवढेच नव्हे, तर जेरी टेम्पिअर व माटील्डा काकूची विचित्र अरेरावीदेखील ती विसरून जात असे आणि अचानक खूप पूर्वीच्या जुन्या काळातील गोष्टींचा ती विचार करू लागे.

आताच्या मानाने ती खूपच जुनी गोष्ट होती. खूप खूप वर्षांपूर्वीची, जेव्हा हेलन फक्त दहा वर्षांची होती व त्यांचे दुसरे करडे, पांढरे मांजराचे पिल्लू घराच्या छपरावर होते. ते छप्पर इतके उंच होते, की तिथून खाली उडी मारायला ते पिल्लू घाबरत होते. करड्या डोळयांच्या उंच माणसाने शिडी आणली होती आणि तो त्या शिडीच्या वरच्या हलणाऱ्या टोकावर उभा होता. तो शांतपणे त्याच्या पसरलेल्या हाताजवळ पिल्लाला बोलावत होता.

फ्रॅंकलीन काकांबद्दल हेलन पूर्वी जसा विचार करत होती तसा आता करू लागली. त्यांच्याबद्दल नंतर ती इतर लोकांप्रमाणे माटील्डा काकूचा पळपुटा पती म्हणून जसा विचार करायला शिकली, तसा नव्हे. फ्रॅंकलीन शोअर हा बॅंकेत काम करणारा माणूस बेपत्ता झाल्याचे मोठ्या अक्षरात छापून आले होते तसा नव्हे, किंवा

तो माणूस ज्या प्रकारे संपत्ती, यश, सत्ता, कुटुंब व आयुष्यभराचे मित्र, स्पष्टीकरण न देता येण्यासारख्या पद्धतीने सोडून गेला व पैशांअभावी विचित्र लोकांमध्ये राहू लागला, तसे नव्हे; तर फक्त घाबरलेल्या मांजराच्या पिल्लाची सोडवणूक करण्यासाठी व लहानशा, दुःखी मुलीला दिलासा देण्यासाठी धोका घ्यायला तयार झालेल्या, फ्रॅकलीन काकांचा विचार करत होती. तो परतल्यापासूनचे अनेक जरतरचे पुरावे सोडून, केवळ सभ्य, समजुतदार व मैत्रीपूर्ण व वडीलांसारखा प्रेमळ पिता म्हणूनच तो तिला गेली अनेक वर्षे आठवत होता व यापुढेही आठवत राहील.

अचानकपणे ते ज्ञान तिला परत झाले. त्यामुळे हेलन केंडरची पूर्ण खात्री पटली, की फ्रॅकलीन काकांचे नक्की निधन झाले आहे. त्यांचे नक्की बऱ्याच काळापूर्वी निधन झाले आहे. ते घरातून पळून गेल्यावर लगेचच. त्याने तिच्यावर प्रेम केले होते. नक्कीच केले होते. नाहीतर नाहीसे झाल्यावर लगेच त्याने फ्लोरीडाहून तिला चित्र असलेले पोस्टकार्ड पाठवण्याचा धोका घेतला नसता. तेव्हा माटील्डा काकू त्याचा कसून शोध घेत होती व तो तिला तसा प्रयत्न करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत होता. त्यानंतरही तो बराच काळ जगला असावा कारण त्याच्याकडून हेलनला निरोप मिळाला होता. ती त्याची वाट बघत असणार, हे त्याला माहिती होते. त्याने तिला नाराज केले नसते. पण आता तो मेला, त्यालाही जवळजवळ दहा वर्षे झाली असतील. तो मेला होता आणि त्याने इच्छापत्रात हेलनसाठी वीस हजार डॉलर ठेवले होते आणि आता आठवडाभर घरी रजेवर असलेला जेरी टेम्पिअर --- पुन्हा हेलनचे विचार घसरू लागले. सैन्याने जेरीमध्ये बदल घडवून आणला होता. त्याचे निळे डोळे स्थिर होते व तोंड फार गंभीर होते. पण त्याच्यातील बदलामुळे हेलनची उलट खात्री पटली, की ती त्याच्यावर प्रेम करत होती आणि या विषयावर त्याची ओठ घट्ट बंद केलेली शांतता असे सुचवत होती की त्याचेही तिच्यावर प्रेम

आहे. तरीही याचा अर्थ तो तिच्याशी लग्न करणार होता, असा नव्हता. त्याचा अर्थ असाही होऊ शकला असता, की माटील्डा काकूने तिला त्याच्या सैन्यातील तुटपुंज्या पगारावर जगायला घराबाहेर घालवून दिले नसते. पण तिच्याकडे तिचा स्वतःचा पैसा असता, तर जेरीला निश्चितपणे असे वाटले असते, की काहीही झाले, तरी ती उपाशी व घराशिवाय रहाणार नाही ---

या विचार करण्याचा काही उपयोग नव्हता. माटील्डा काकूचे मन काही बदलणार नव्हते. ते त्याप्रकारचे मन नव्हते. एकदा तिने ठरवले, की ती स्वतःसुद्धा ते बदलू शकली नसती. हा कायमचा विश्वास होता, की फ्रॅकलीन शोअरने कधीही व अगदी ठामपणे तो मेला आहे असे ठरवण्यासाठी कायद्याची वाट चोखाळली नसती व त्याचे इच्छापत्र वैध ठरवले जाण्याची तरतूद केली नसती. माटील्डा काकूला संपत्तीतील तिचा वाटा नकोच होता. फ्रॅकलीन शोअरची बायको म्हणून, ती संपत्तीची देखभाल करत होती. त्याला दूर सारून, त्याची विधवा व इच्छापत्र अंमलात आणणारी म्हणून, तिने कायदेशीर दृष्ट्या त्याला मृत ठरवले होते. हेलनला तिने कायदेशीर रीत्या वीस हजार डॉलर्स न देऊन, कफल्लक रीत्या तिला, तिच्या ताब्यात व तिच्यावर अवलंबून ठेवले होते.

माटील्डा काकूला लोकांवर अंमल गाजवणे आवडे. विशेषतः जेरी टेम्पलर इथे असतांना, तिने कधीच स्वखुशीने हेलनवरील पैशांचा हक्क सोडून दिला नसता. माटील्डा काकूला जेरी कधीच आवडत नव्हता व हेलनला तो आवडतो, हेही तिला आवडत नसे. सैन्याने त्याच्यात बदल घडवून आणला होता, तो तिला मुळीच आवडत नसल्याचे, तिने अगदी स्पष्टपणे सांगितले होते. जर जेरीची रजा संपायच्या आत, तो उच्च पदावर असता, तरी तिने इच्छापत्रातील तिला मिळणाऱ्या रकमेवर कधीच हक्क सोडला नसता. तिने ते केव्हाच सांगितले नसते. जेराल्ड काकांनी असे

केले नसते तर --- हेलनचे विचार पुन्हा दुसरीकडे गेले. तीन दिवसांपूर्वी, जेराल्डकाका तिला सांगत होते, की ते माटील्डा काकूचा हात पिरगळणार आहेत कारण त्यांच्या भावाने त्यांच्यासाठी हेलनइतकीच रक्कम इच्छापत्रात नमूद केली होती. तो बासष्ठ वर्षांचा असला, तरी अजून स्वतःच्या उपजीविकेसाठी कायद्याची प्रॅक्टीस करत होता. त्याला तो पैसा वापरता आला असता. त्यासाठी त्याने बरीच वाट पाहिली होती.

तो म्हणाला, "मी माटील्डाला ते करायला लावू शकेन आणि मी ते करेन. आपल्याला सगळ्यांना माहिती आहे की कायदेशीर रीत्या फ्रॅकलीन तीन वर्षांपूर्वीच मेलेला आहे. त्याने त्याच्या इच्छापत्रात लिहिल्याप्रमाणे मला व तुला आपापला वाटा मिळायलाच हवा."

तिच्याकडे बघतांना त्याची नजर निवळली व उबदार झाली. हेलनला आठवले, की त्याचा आवाजदेखील जरा नरम झाला होता.

"हेलन, मी प्रत्येक वेळी तुला बघतो, तेव्हा तू तुझ्या आईसारखीच जास्त दिसतेस. लहानपणी तुझे डोळे अगदी तिच्यासारखे जांभळी झाक असलेले होते व केसही तिच्यासारखेच लालसर सोनेरी होते. आता मोठेपणीही तू तिच्यासारखीच उंच, बारीक, सुंदर शरीराची व तिच्यासारखेच लांब, छान हात असलेली व तिच्यासारख्याच चांगल्या, शांत आवाजाची आहेस. मला तुझे वडील आवडत होते पण त्यांनी तिला आमच्यापासून दूर केल्याबद्दल, मी त्यांना कधीच क्षमा करू शकलो नाही."

तो थांबला. मग पुढे बोलतांना, त्याचा आवाज बदलला. “हेलन, तुलाही लवकरच तुझ्या वाट्याच्या वीस हजार डॉलर्सची गरज पडणार आहे. हेलन बोलली, “मला आताच त्याची गरज आहे.”

“जेरी टेम्पिअर?” हे बोलतांना तिचा चेहरा काही उत्तर देणारे भाव दर्शवणारा झाला असणार, कारण तो तिने पुढे बोलण्यासाठी थांबला नाही. त्याने हळू मान हलवली. “ठीक आहे. मी तुला ते पैसे मिळतील, असे बघतो.” हे ऐकून असे वाटत होते, की तो नुसते प्रयत्न करण्यापेक्षा अधिक काही करणार आहे आणि तीन दिवसांपूर्वी असे झाले. कदाचित --- खूप वेळ अंबर त्याच्या जांभळी झाक असलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे बघत राहीला. दात व नखे चावत, वेडे करणाऱ्या कागदाच्या चेंडूकडे त्याने उडी मारली. तो पडू लागला. गालीचा घातलेल्या जमिनीवर पडू नये, म्हणून त्याने अचानक धारदार नखांच्या पंजाने हेलनचे मनगट धरले.

या आक्रमकतेने चक्रावून जाऊन, हेलन किंचाळली.

माटील्डा काकूने तिच्या खोलीतून खणखणीत आवाजात हाक मारली. “हेलन, काय झाले?”

उदासीनतेने हसत व तिच्या मोकळ्या हाताने मांजराच्या पिल्लाचा पंजा पकडत, त्या पिल्लाच्या नख्यांपासून सुटका करून घेऊ लागली. “एवढेच झाले, की अंबरने मला खरचटवले.”

“अंबरने काय केले?”

“काही नाही. आम्ही खेळत होतो.”

“त्या पिल्लाबरोबर खेळणे थांबव. तू त्याला बिघडवते आहेस.”

हेलन कर्तव्यतत्परतेने बोलली, “होय माटील्डा काकू .” तिच्या हाताच्या मागील बाजूस दिसणाऱ्या ओरखड्यांकडे बघत तिने अंबरला एक चापटी मारली, व ससाण्याच्या घरावर हल्ला करायचा सराव करणाऱ्या] अंबरला ती म्हणाली, “मला वाटते, तुझ्या लहानशा पंजाची नखे किती टोचतात, हे तुला बहुधा माहिती नाही. मला आता त्या ओरखड्यांवर काही औषध लावायला हवे.”

जेव्हा तिने बाथरुम उघडल्याचा व माटील्डा काकूच्या काठीचा, आवाज ऐकला आणि तिच्या नापसंतीदर्शक भुवया वर गेलेल्या पाहिल्या, तेव्हा ती बाथरुममधील औषधाच्या कपाटाकडे गेली.

चौसष्ठ वर्षांची माटील्डा शोअर नवरा नाहीसा झाल्याची शिक्षा पूर्ण दहा वर्षे भोगत होती. पाठीच्या खालील बाजूच्या मणक्यातील वेदना तिच्या जन्मजात स्वभावात काही सुधारणा करू शकली नव्हती. ती हाडपेर मोठे असलेली बाई होती. तिच्या तारुण्यात ती लढवय्या स्त्रीसारखी सुंदर दिसत असणार. पण आता ते वैयक्तिक दिसणे तिने गमावले होते. तिच्या शरीराच्या सांगाड्यावरून मास ओघळले होते. खांदे खाली झुकले होते. सवयीने ती तिचे डोके पुढे मागे करू शके. तिच्या डोळयांखाली पोटऱ्यांसारखा मासल भाग तयार झाला होता. ओठांचे कोपरे खाली वळले होते. तिचा वयातीतपणा तिच्या ठाम इच्छा दाबून टाकू शकणार नाही, असा निश्चित उद्देश मनात वागवणारी, एकटी पण निश्चयाची अशी ती बाई होती.

तो बोलली, “तुला अंबरने कुठे ओरबाडले आहे, बघू.”

“माटील्डा काकू , त्यात अंबरचा दोष नव्हता. मी त्याच्याबरोबर खेळत होते. कागदाचा एक बोळास मी पुढेमागे करत होते व त्यावर तो उड्या मारत होता. माझ्या

हे लक्षात आले नाही, की मी तो जमिनीपासून फार उंचावर धरला होता. अंबरचे डोळे त्यावर स्थिर होण्याचा प्रयत्न करत होते, एवढेच.”

माटील्डाकाकूने खरचटलेल्या हातावर नजर स्थिर केली. “मी काही वेळापूर्वी कुणाला तरी बोलतांना ऐकले. ते कोण होते?”

खचलेल्या आवाजात न बोलण्याचा आटोकाट प्रयत्न करत हेलन बोलली, पण माटील्डाकाकूच्या वटारलेल्या डोळ्यांपुढे, ती नरमली. “जेरी. तो फक्त काही मिनिटे आला होता.”

“मला ते समजले.” अशा शूरपणाच्या भेटीचा माटील्डा काकूला गंभीर रीत्या आनंद झालेला दिसल्याचे स्पष्ट होते. “हेलन, तू देखील मनातून असे ठरवू शकतेस. त्याने त्याचे मन यासाठी तयार केल्याचे दिसतेच आहे. शक्यतोवर तो तुझ्याशी लग्न करू शकणार नाही, इतकी अक्कल त्याला असेल आणि तुझ्यासाठी ते चांगलेच ठरेल. त्याने तुला तसे विचारले व तू हो म्हणालीस, तर तुझ्यासारखी मूर्ख तूच ठरशील.”

हेलन म्हणाली, “अगदी नक्कीच मूर्ख ठरेन.”

जोराने श्वास आत घेत, माटील्डाकाकू बोलली, “म्हणजे तू मूर्ख नाहीस तर! मूर्खांना नेहमी असेच वाटते. पण तू काय विचार करतेस, याचे फारसे काही नाही. तुझ्यासारख्या मुलीसाठी तो टोकाचा, वाईट प्रकारचा माणूस आहे. तो पुरुषांमध्ये जास्त प्रसिध्द आहे. तो कुठल्याही बाईसाठी चांगला नाही. तो मूकस्तंभ सुरक्षितपणे तुझ्यावर सक्ती करत असेल, तर तू वेडी होशील. तुझ्या स्वतःसाठी तू जेरी टेम्पिअर व जॉर्ज अल्बर दोघांशी खेळू नकोस. मी दोनदा लग्न केलेले असल्याने, मी काय

बोलते आहे, ते मला चांगले कळते आहे. फक्त जॉर्ज अल्बरसारख्या माणसाबरोबर लग्न करूनच तू आनंदी होऊ शकशील, जो ---

हेलन बोलली, "जो मला थंड पाडतो." "जर तू त्याच्याकडे जास्त वेळ पाहिलेस, तर असे होणार नाही." माटील्डाकाकू बोलली "जेरी टेम्पलरवर तुझे प्रेम असल्याच्या मूर्खपणाच्या कल्पनेतून तू तुला बाहेर काढले नाहीस व इतर कुणाही माणसाशी साधेपणाने वागली नाहीस, तर --- त्याच्या खासगी पगारावर तो तुझ्याशी लग्न करू शकत नाही, हे तुला न समजण्याइतकी तू मूर्ख नसावीस. जेव्हा --- "

हेलन म्हणाली, "जेरी फार काळ खासगी नोकरी करणार नाही. ते त्याला ऑफिसरच्या प्रशिक्षणासाठी पाठवत आहेत."

"त्यात काय मोठे? जेव्हा त्याला तो हुद्दा मिळेल --- जर मिळालाच तर --- त्याला जगाच्या कुठल्या तरी टोकावर जावे लागेल आणि --- "

नंतर काय होईल, याबद्दल माटील्डाकाकू काही बोलायच्या आत, हेलन घाईने म्हणाली, "आधी त्याला प्रशिक्षण तर घेऊ दे. हेलन स्वतःला त्याबद्दल विचार करू देत नव्हती. "तो तिथे अनेक महिने असेल आणि मीदेखील तिथे किंवा कुठेतरी जवळपास असेन. कधीतरी आम्हाला एकमेकांना भेटता येईल."

माटील्डाकाकूचा आवाज विरोधभासात्मक रित्या जड झालेला वाटत होता. "अस्स! तू त्याबद्दल विचार केला आहेस तर, नाही का? अर्थात फक्त महत्वाची गोष्ट ही आहे की, हे घडतांना तू कुठल्या पैशांवर जगशील? किंवा --- " ती थांबली. "म्हणजे जेराल्ड तुझ्याशी याबाबत बोलला आहे का? फ्रॅंकलीनने तुझ्यासाठी ठेवलेला पैसा तो मला तुला दयायला लावेल, असे त्याला वाटत असल्याचे, त्याने तुला सांगितलेले दिसते. पण तो विचार तू डोक्यातून काढून टाक. फ्रॅंकलीन मरेपर्यंत

तो पैसा तुला मिळणार नाही आहे आणि तो माझ्याप्रमाणेच अजून जिवंत आहे. जगतो आहे. त्याला मी माफ करावे, म्हणून टाचा घासून माझी क्षमा मागत, तो एक ना एक दिवस परत येणार आहे.''

काही विनोदी बोलल्यासारखी, ती हसली. हेलनला पहिल्यांदाच अचानक समजले, की इतक्या भयंकर पद्धतीने माटील्डाकाकूने फ्रॅकलीन जिवंत असल्याची समजूत करून घेतली आहे. ती फारच कडवटपणे त्याचा द्वेष करत असे. तो द्वेष करण्याच्या पलीकडे गेला आहे, हा विचार तिच्यासाठी असह्य होता. तिचे एकच स्वप्न होते व त्यावरच ती जगत होती. त्यातच गुंग होती ---तो परत येण्याचे स्वप्न! फक्त एकाच कारणासाठी परत येणे, की ती त्याला परत हाकलून देऊ शकेल. म्हातारा, एकटा, मार खाल्लेला व गरजवंत असलेला. त्याने तिला जे केले, त्याबद्दल त्याच्याकडून दयेने पूर्ण पैसे वसूल करण्यासाठी तो येणार!

घरचा कामवाला पोऱ्या, कोमो शांतपणे कुठून तरी अवतीर्ण झाला व दारात उभा राहिला. तो बोलला, ''कृपया मला माफ करा.''

माटील्डा बोलली, ''कोमो, आता काय आहे? दार उघडे आहे. आत ये आणि चालतांना इतक्या सावधानतेने मूर्खासारखा येऊ नकोस.''

त्याचे चकाकणारे डोळे बघून माटील्डा शोअरला काही धोका जाणवला. तो बोलला, ''महत्वाचा फोन आहे. कृपया तो घ्या.''

''ठीक आहे. मी तिथे मिनिटाभरात येते.''

कोमोने जाहीर केले, ''फोन तुमच्या झोपायच्या खोलीत बदली केला आहे.''

एवढे बोलून, तो पॅसेजमधून भरभर हलकी पाऊले टाकत निघाला.

हेलन बोलली, “माटील्डाकाकू , तू त्या मुलाला काढून का टाकत नाहीस? माझा त्याच्यावर विश्वास नाही.”

“कदाचित तुझा नसेल. पण माझा आहे.”

“तो जपानी आहे.”

“काही काय? तो कोरियन आहे. तो जपान्यांचा द्वेष करतो.”

“तो कोरियन असल्याचे म्हणत असेल, तो ते फक्त --- “

“तो असे गेली बारा वर्षे म्हणतो आहे.”

“असेल. पण मला तरी तो कोरियन असल्यासारखा दिसत नाही. तो जपानी दिसतो व त्याचे हावभावही तसेच आहेत --- “

माटील्डाकाकू मध्येच बोलली, “तुला कोणी कोरीयन्स माहिती आहेत का?”

“खरे तर नाही. पण --- “

माटील्डा ठामपणे म्हणाली, “कोमो कोरियन आहे.” आणि पाठ वळवून परत तिच्या झोपायच्या खोलीकडे चालत गेली. तिच्यामागे तिने दार लावले.

हेलन हॉलमध्ये आली. ओरखड्यांमुळे तिचा हात दुखत होता व औषध लावल्यामुळे झोंबत होता. पिल्लू अंबर कुठे दिसत नव्हते. हेलनने बसून वाचायचा प्रयत्न केला, पण छापलेल्या पानाकडे तिचे लक्ष लागेना.

सुमारे पंधरा मिनिटांनी तिने मासिक एकीकडे फेकून दिले व बसून डोळे मिटले. कुठून तरी पिल्लू अंबर अवतीर्ण झाले. ते क्षमा मागायच्या पावित्र्यात दिसत होते. तिच्या घोट्याशी घासत, ते काही आवाज करत होते. काही वेळाने त्याने खुर्चीच्या हातावर उडी मारली. तिचा हात त्याच्या खरबरीत जिभेने ते चाटू लागले.

हेलनने फोनची घंटी वाजलेली ऐकली. तो फोन घ्यायला गेला, तेव्हा तिने कोमोचा हलका पायरव ऐकला.. एकदम हवेतून आल्यासारखा तो तिच्या खुर्चीजवळ गुपचूप उभा होता.

“मला माफ करा. या वेळेस मिसीसला [छोट्या बाईसाहेबांना] बोलवा.”

हेलन हॉलच्या फोन असलेल्या भागात गेली. तिने तो उचलला. हा फोन जेरीचा तर नसेल, असा विचार तिने आश्चर्यचकित होऊन केला. तिने अधीरतेने “हॅलो” म्हटले.

पलीकडून येणारा आवाज काही भावनेने थरथरत होता.” हेलन केंडल बोलते आहे का?”

“अर्थात हो.”

“तू मला ओळखले नाहीस का?”

हेलन धक्का बसत बोलली, “नाही.” फोन करायचा आणि कोण बोलते आहे, हे न सांगता आवाज ओळखत नाही का असे विचारायचे, यामुळे ती वैतागली. कुणी आपला आवाज ऐकणार नाही, याची काळजी घे. फ्रॅकलीन काकांना ओळखलेस का? अचानक हेलनचे तोंड कोरडे पडले. “हो, हो, पण --- “

“तुझा फ्रॅकलीन काका बोलतोय.”

“माझा विश्वास बसत नाही. तो तर --- “

“नाही हेलन, मी मेलेलो नाही.” आवाज भावनामय होऊ थरथरू लागला.

“मी चांगला जिवंत आहे.”

“पण --- “

“तुझा विश्वास बसत नसल्याबद्दल, मी तुला दोष देणार नाही. जर तू मला परत पाहिले असतेस, तर तू मला ओळखले असतेस, नाही का?”

“का? मी --- का, हो --- अर्थात.”

आता तो आवाज जास्त ठामपणे येऊ लागला. “कुत्र्याने मांजराच्या पिल्लाचा घराच्या छपरापर्यंत पाठलाग केला होता, ते आठवते का? तू त्या पिल्लाला सुखरूप खाली आणायची विनवणी मला केली होतीस. मग मी शिडी आणून त्यावर चढलो होतो. नववर्षाची मेजवानी आठवते का, जेव्हा तुला एक फळांच्या रसाचे पेय प्यायचे होते आणि माटील्डा तुला ते पिऊ देत नव्हती. मग तरी तू छोट्याशा स्वयंपाकघरात जाऊन, त्याची चव पाहिलीस. मी तुझ्यापाठोपाठ कसा तुझ्या खोलीपर्यंत आलो व तुझ्याशी इतके बोललो, की तू पोट फुटेपर्यंत हसलीस --- आणि कसे मी कुणाला काही सांगितले नाही --- तुझ्या माटील्डाकाकूलाही त्याबद्दल काही --- बोललो नाही?”

हेलनला तिच्या मानेवरील केसातून काहीतरी भुळभुळल्यासारखे वाटले. ती जवळजवळ कुजबुजत्या आवाजात म्हणाली, “हो.”

“हेलन, आता तुझा माझ्यावर विश्वास बसतो आहे का?”

“फ्रँककाका --- “

“काळजी घे. माझे नाव कुणाला सांगू नकोस. तुझी काकू घरी आहे का?”

“हो.”

“मी तुला फोन केला होता, हे तिला कळता कामा नये. कुणालाच कळता कामा नये. समजले का?”

“का, --- मी --- का --- नाही, मला समजत नाही.”

“गोष्टी सरळ करायचा एकच उपाय आहे. तुला मला मदत करायला लागेल.”

“मी?”

“हो.”

“मी काय करू शकते?”

“इतर कोणीही जे करू शकणार नाही, ते तू करू शकतेस. तू पेरी मेसन नावाच्या वकिलाचे नाव कधी ऐकले आहेस का?”

“हो, ऐकले आहे.”

“आज दुपारी तू त्याला भेटावेस. त्याला सगळी गोष्ट सांग म्हणजे त्याला महत्वाचे मुद्दे समजतील. आज रात्री नऊ आजता, तू त्याला कॅसल गेट हॉटेलमध्ये आण. ते कुठे आहे, ते तुला माहिती आहे का?”

“नाही.”

“तुला ते शोधता येईल. ते एक स्वस्त हॉटेल आहे. घाबरू नकोस.”

“मेसनला त्या हॉटेलमध्ये आण. त्याला हेन्री लीचबद्दल विचार. तो तुला माझ्याकडे आणेल. हे आपले बोलणे किंवा काय काय होते आहे, ते कुणालाही सांगू नकोस. कुणी तुझा पाठलाग करत नाही ना, याची खात्री कर. मेसनला सगळे सांग पण त्याला त्याबद्दल शपथपूर्वक गुप्तता पाळायला सांग. मी --- “

तिने जलद गतीने धापा टाकत घेतलेला श्वास ऐकला. अचानक दुसऱ्या टोकाचा फोन किणकिणला व तोच आवाज येत राहिला. तिने बरेच वेळा फोन हलवून व ऑपरेटरला हाका मारून पाहिले.

थोड्याशा उघड्या दारातून हेलनने अगदी नक्की माटील्डाकाकूला येत असतांना ऐकले. सावकाश कशीबशी टाकलेली पाऊले, काठीचा धप धप असा आवाज व थोडे अडखळणारे उजवे पाऊल!

घाईने तिने फोन बंद केला.

माटील्डाकाकूने हॉलमध्ये शिरत विचारले, “कोण आहे? हेलन फोनपासून लांब झाली व नेहमीच्या आवाजात बोलली, “मला वाटते मला कुणीतरी डेटवर बोलावते आहे.”

माटील्डाकाकूने तिचे डोळे खाली वळवून, हेलनच्या उजव्या हाताकडे बघितले. “त्या पिल्लाने तुला कसे काय ओरबाडले? तू ते न सांगून त्या पिल्लाचा कैवार घ्यायला बघते आहेस. ते असे दुष्टपणा करत असल्यास, मी त्याला हाकलून देईन.”

हेलन बोलली, “असे काही करू नकोस. मी कागदाच्या बोळ्याने त्याला चिडवत होते.”

“तरी त्याने तुला ओरबाडायचे काही कारण नव्हते. फोनवर तुझा तो सैनिक मित्र होता का?”

हेलन काही स्पष्ट न करता हसली.

“तू इतकी उद्दीपित का झाली आहेस? तू खूप लाजते आहेस.” अगदी नगण्य गोष्ट असल्यासारखे, तिने तिचे रुंद खांदे शहारवले. हे त्या मूर्खासारखे, जेरी टेम्पलरसारखे, मुलीला फोनवर लग्नासाठी विचारणे झाले. हेलन, मला याचे आश्चर्य वाटणार नाही, की --- खरोखर मांजराच्या पिल्लाबरोबर काय झाले असेल!

अती दमल्यामुळे हेलनने एक सुस्कारा टाकला. “मी तुला सांगितले, की ती माझी चूक होती. मी --- “

“नाही. नाही. त्याच्याकडे बघ!”

तिच्या काकूच्या टक लाऊन बघण्याने, हेलन वळली.

“ते नुसते खेळते तर आहे. पिल्ले अशीच खेळतात.”

“ते माझ्याबरोबर खेळते आहे, असे मला वाटत नाही.”

“ते शरीर ताणत असतांना तसे करतात. त्यांना त्यांचे लहानसे स्नायू वाकवून त्यांची हालचाल करायची असते. ते --- “ हेलनला वाटले की तिच्या तोंडून शब्द फुटत नाही आहेत. पिल्लाची विशेष, वेगळ्या प्रकारची हालचाल सुरु होती. त्याचे अपरीपक्व स्नायू नीट वाढण्यासाठी बहुधा ते हे करत होते. त्याचा लहानसा कणा मागील बाजूने वक्राकार झाला. पंजे अगदी जास्तीत जास्त ताणले गेले. नकळत त्याच्या शरीरातून लहानशी उबळ आली. पण हेलनचे लक्ष कशाने वेधून घेतले असेल, तर अंबरच्या डोळ्यातील भीतीने. ज्या प्रकारे त्याचा जबडा त्याने घट्ट आवळून धरला होता, त्यामुळे त्याच्या फिक्या वाकड्या जबड्यातून छोटे बुडबुडे बाहेर येत होते. ती उद्गारली, “अरे माझ्या लाडक्या, काय झाले? अंबर आजारी वाटत आहे!”

माटील्डा शोअर बोलली, “त्याच्याजवळ जाऊ नकोस. ते वेडे झाले आहे. मांजरे कुत्र्यांसारखेच करतात. तू तुझ्या हातावरील ओरखड्यांसाठी ताबडतोब डॉक्टरकडे जावेस.”

हेलन म्हणाली, “काहीतरी काय? अंबर आजारी आहे --- ती बिचाऱ्या अंबरला उद्देशून म्हणाली, “ तुला काय झाले आहे? काही कारणाने तुला लागले आहे का?”

हेलन त्याच्या कडक शरीराकडे वळली. तिने त्याच्या अंगाला हात लावताच, त्या पिल्लाला घेरी आली. ती म्हणाली, “मी त्याला प्राण्यांच्या डॉक्टरकडे घेऊन जाते.”

माटील्डाकाकूने तंबी दिली, “बघ हं. तुला काही जखम होईल.”

हेलनने वचन दिले, “तसे होऊ नये म्हणून मी काळजी घेईन.” एवढे बोलून ती कपाटाकडे जाऊन, अंगात घालण्यासाठी तिचा कोट काढू लागली.

माटील्डाकाकू म्हणाली, “अंबरला पण काही गुंडाळ. म्हणजे ते तुला ओरबाडू शकणार नाही --- कोमो --- अरे कोमो”

तो काळा लहानसा माणूस लगेच येऊन दारात उभा राहिला. “काय बाईसाहेब?”

हेलन बोलली, “मांजराच्या पिल्लाला गुंडाळण्यासाठी कपाटातून जुनी गोधडी किंवा रग बाहेर काढ.”

त्याच्या मोठ्या डोळयात विशेष भाव आणून कोमो अंबरकडे बघत राहीला. त्याने विचारले, “ते आजारी आहे का?”

माटील्डा अधीरपणे त्याला रागे भरत बोलली, “मूर्खासारखे प्रश्न विचारत तिथे उभा राहू नकोस. “अर्थात ते आजारी आहे. हेलनने तुला जे सांगितले, ते कर. रग आण.”

“हो, बाईसाहेब.”

हेलनने घाईने आरशात बघून तिची टोपी ठीकठाक केली व मग अंबरवर खाली वाकली.

माटील्डाने ताकीद दिली, “त्याच्यापासून लांब रहा. ते करत असलेले चाळे मला आवडत नाही आहेत.”

शांत परिणाम करणाऱ्या आवाजात हेलनने विचारले, “त्याचे डोळे पिवळे दिसत आहेत का?”

मांजराचे डोळे एकटक कुठेतरी बघत होते, पण हेलनचा आवाज ऐकून, त्याने डोके वळवण्यासाठी, थोडी हालचाल केली. त्यामुळे त्याला आधीच्यापेक्षा अजून जोरदार उबळ आली.

कोमोने रग आणल्यावर, हेलनला बाहेरून काही आवाज ऐकू आला. दार उघडून तिचे काका जेराल्ड शोअर हॉलमधून आत आले. टोपी व हलकासा कोट काढत, ते आनंदाने बोलले,

“सगळ्यांना नमस्कार.”

त्यांच्या सांत्वनपर खर्जातील आवाजात त्यांनी विचारले, “काय झाले आहे?” हॉल मोठा असला, तरी तो स्पष्ट ऐकू आला.

“अंबरबद्दल चालले आहे. तो आजारी आहे.”

“त्याला काय झाले आहे?”

हेलन बोलली, “आम्हाला माहिती नाही. त्याला उबळ येते आहे. मी त्याला प्राण्यांच्या डॉक्टरकडे घेऊन जाते आहे. कोमो, इकडे ये. मला रग त्याच्याभोवती गुंडाळायला मदत कर. तो चावणार नाही याची काळजी घे.”

त्यांनी पिल्लाभोवती रग गुंडाळला. हेलनने ताण आलेल्या त्याला जवळ धरले. ती दाराकडे निघाली, तेव्हा तिला त्याचे स्नायू आखडलेले वाटले.

जेराल्ड शोअर म्हणाला, “चल. मी गाडी चालवतो. तू त्याला धरून ठेव.”

माटील्डा बोलली, “हेलनला आधीच त्या पिल्लाने ओरबाडले आहे.”

हेलनने स्पष्टीकरण दिले, “मी ते अल्कोहोलने धुतले आहे.”

माटील्डा ठामपणे बोलली, “कुत्रे जसे वेडे होतात, तशी मांजरेदेखील वेडी होतात.”

कोमो हसत, मान हलवत बोलला, “घेरी? माफ करा, पण सगळ्या मांजरांना घेरी येते. ही मांजरांची विशेषता आहे.”

हेलन तिच्या जेराल्ड्काकांकडे वळली. “चला, कृपया आपण निघू.”

माटील्डा शोअर कोमोला म्हणाली, “तू परत असह्य होत चालला आहेस. तू आता वरच्या बाजारात जाऊन मला बिअरच्या सहा बाटल्या आणून दे. परत आल्यावर मला त्रास देऊ नको. मी जेवायची वेळ होईपर्यंत लवंडते आहे. हेलन, त्या पिल्लाचे फार लाड करू नकोस. तुझ्या प्रेमाला काही दुसरी वाट करून दे. आत सर्वांनी चालू पडा.”

ती तिच्या झोपायच्या खोलीत शिरली व तिच्यामागे जोराने दार बंद केले.

जेराल्ड्काका सहानुभूतीपूर्वक म्हणाले, “हेलन, चल.”

अचानक हेलनला आलेला फोन आठवला. अंबरच्या नादात, चौकसपणे ती तो पूर्णपणे विसरून गेली होती. असे पूर्वी कधीच झाले नसल्याने, एक प्रकारे तो खोटाच वाटत होता. फ्रॅकलीन काका! अंबरची काळजी घेऊन झाल्यावर, तिने पेरी मेसनकडे वळायचा प्रयत्न केला.

## प्रकरण २

जेराल्ड शोअरकडे त्याच्या भावासारखी पैसे मिळवण्याची किंबहुना, ते राखण्याची हातोटी नव्हती. नाही कसे म्हणायचे हे माहिती नसलेला, ओठ घट्ट बंद केलेला फ्रॅकलीन त्याची भविष्यातील चांगली होत जाणारी परिस्थिती बघत असे. त्याला नाही कसे म्हणायचे हे माहिती होते. तर जेराल्ड काही विचार न करता, 'होईल तसे होईल' अशा विचाराने पैसे उडवत असे. १९२९ पूर्वी, जेराल्ड स्वतःला श्रीमंत समजत असे. पण काही आठवड्यातच त्याची संपत्ती संपली. पण त्याच्या कायद्याच्या प्रॅक्टीसवर अवलंबून तो उदरनिर्वाह करू शकत असे.

परीस्थितीतील हा बदल लाजीरवाणा होता. लहानसहान केसेस घेऊन स्वतःचा वेळ तो फुकट घालवणार नाही, असे त्याने ठरवले होते. तो त्याच्या अशीलांना फक्त आधी वेळ ठरवूनच भेटत असे आणि त्याला रुची वाटेल अशाच केसेस घेत असे. सर्वसाधारण मान असलेली व चांगला पगार असलेली नोकरी शोधण्यासाठी, जेराल्ड अचानक उत्सुक बनला.

अंबरच्या लहानशा शरीराला येणारी घेरी हेलनला जाणवत होती कारण तिने त्याला अगदी जवळ धरले होते. तिला माहिती असलेल्या इतर माणसांपेक्षा, जेराल्ड्काका जास्त संवेदनाशील व समजून घेणारे होते.

ते नेहमीच असे असतात का, याचे तिला आश्चर्य वाटत होते. नक्कीच त्यांचे त्रास व अडचणी यांनी त्यांना कठोर बनवले नव्हते. त्याना पैशांचा प्रश्न यायला लागल्यापासून, ते पूर्वीपेक्षा अधिक हळूवार व जास्त सहनशील झाले होते. माटील्डाकाकू कोमोला अंबरला हाकलून द्यायला सांगत होती. जेराल्ड काकांना झटपट काही करण्याची वेळ आलेली समजत असल्याने, ते रहदारीचे नियम पाळण्याचे फारसे मनावर घेत नव्हते. काही मिनिटातच अंबरला एक निष्णात डॉक्टर तपासत होता. डॉक्टर ब्लॅकली पटपट निष्कर्षाप्रत येत, अंबरला एक इंजेक्शन देऊ लागले होते.

हेलनने विचारले, “हा रेबीज रोग आहे का? नाही ना?”

डॉक्टर म्हणाले बहुधा विषबाधा. जरा मांजराचे डोके धरा. मान आणि खांदे घट्ट धरा. नीट धरून ठेवा. तो काही आक्रस्ताळेपणा करायला लागला तरी त्याला सोडू नका.”

त्यांनी एक इंजेक्शन टोचले. त्यामुळे आत जाणारा द्राव काळजीपूर्वक नियंत्रित केला. व सुई बाहेर काढली. ते म्हणाले, “त्याच्या पोटात गेलेले अन्न ते

पिल्लू बाहेर काढेल. त्यामुळे काही राहिलेल्या विषबाधेचा निचरा होईल. तुम्हाला त्याची वेगळी लक्षणे कधी दिसली?”

हेलन बोलली, ''पाच दहा मिनिटेच दिसली पण लगेचच आम्ही इथे आलो. त्याला आता --- दहा मिनिटे झाली असतील.'' म्हणाले,.

डॉक्टर ब्लॅकली म्हणाले, "छानसे छोटे पिल्लू! मी अशी आशा करतो, की आपण त्याला वाचवू शकू."

"तुम्हाला ती विषबाधा वाटते का?"

"हो, मला असे वाटते. उपाययोजना फारशी सुखावह नाही. तुम्हाला असे वाटेल, की त्याला होतो आहे त्यापेक्षा जास्त त्रास आहे. तुम्ही दोघांनी बाहेर थांबावे, ते बरे. जर काही मदत लागली, तर मी तुम्हाला बोलावेन."

त्याने चामड्याचे मोजे चढवले.

हेलनने विचारले, "आम्ही काही करू शकणार नसल्याची, तुमची खात्री आहे का?"

त्याने मान हलवली. "अजून थोड्या वेळाने मी तुम्हाला अधिक काही सांगू शकेन. ते पिल्लू बाहेर अंगणात खेळत होते का?"

"नाही . मला असे नाही वाटत. मला नक्की आठवत नाही, पण मला वाटते, ते सर्व वेळ हॉलमध्येच होते."

"ठीक आहे आम्हाला लवकरच काही सापडेल. जा, बाहेर जाऊन बसा."

जेराल्ड शोअर एका खुर्चीत बसला व कोटाच्या खिशातून सिगरेट बाहेर काढून तिचे टोक पेटवण्यासाठी काडेपेटीतील काडी ओढली. हाताच्या आडोशाआडील ज्योत प्रखरपणे पेटली व त्या उजेडात जेराल्ड्ची विचारात बुडालेल्या उंच कपाळाची बाह्यरेषा, दयाळू/सोशिक डोळे, विनोदी स्वभाव

दाखवणारी, वयामुळे पडलेली सुरकुती व निमूटपणे काही ऐकून न घेणारे पण अती ताठर नसलेले तोंड दिसू लागले.

“हेलन आता शांतपणे बसून रहाण्याशिवाय, अजून काहीही आपण करू शकत नाही. आपण करू शकत होतो, तेवढे केले आहे.”

ते अनेक मिनिटे स्तब्ध राहिले. हेलनच्या मनात विचित्र फोनचे, अंबरच्या विषाचे व फ्रॅकलीन काकांचे काय करावे याचे विचार तरंगत होते. ते जरी म्हणाले होते की या फोनबद्दल कुणाला काही सांगू नको, तरी जेराल्डकाकांना ते सांगावे का असे वाटतानाच, तिने नाही असे ठरवले. जेराल्ड शोअर नक्कीच विचारात हरवला होता. तो ज्या समस्येत अडकला होता, त्याबद्दल मन लाऊन विचार करायला हवा होता.

अचानक तो म्हणाला, “हेलन, तुला काही दिवसांपूर्वी मी जे सांगितले, की फ्रॅकलीनच्या इच्छापत्राविषयी आपण लवकरच काही करणार आहोत. पण माटील्डा खूप काळ आपला वाटा आपल्याला देण्याची टंगळमंगळ करते आहे.”

खात्री नसतांना हेलन पुटपुटली, “कदाचित आपण थांबायला हवे ---थोडा वेळ.”

“आपण पुरेसा काळ थांबलो आहोत.”

त्याने पाहिले, की हेलन हो नाही करते आहे. बोलावे की नाही असे तिचे मन द्विधा अवस्थेत असल्याचे त्याने पाहिले.

त्याने विचारले, “तुझ्या मनात काय आहे?”

हेलनने अचानक घाई केली. ती काळजीपूर्वक बोलली, “मला --- आज एक विचित्र अनुभव आला.”

“काय?”

“एका माणसाने मला फोन केला.”

जेराल्ड गालातल्या गालात हसला. “मला वाटते, तुझा नंबर माहिती असून, एखाद्या माणसाने तुला फोन केला नाही, तर ते विचित्र असेल. जर मी तुझा काका नसतो आणि --- “

“काहीही बोलू नकोस. हा मनुष्य बोलला --- ओहो, हे योग्य वाटत नाही. हे खरे नसणार!”

जेराल्ड प्रोत्साहन देत पुटपुटला, “तू जरा जास्त स्पष्ट सांगितलेस, तर – -- “

हेलनचा आवाज कुजबुजणारा झाला. “तो म्हणाला की तो फ्रॅकलीन शोअर आहे. त्याला माझा आवाज ओळखता येत होता व मी त्याचा आवाज ओळखला का, असे मला विचारत होता.”

जेराल्ड्च्या चेहऱ्यावर भयभित झाल्याचे व विश्वास न बसल्याचे भाव दिसले. तो उद्गारला, “तू काहीही सांगते आहेस.”

“हे खरे आहे.”

“हेलन, तू पिल्लामुळे उद्दीपित झाली आहेस.”

जेराल्ड्काका, मी हे शपथेवर सांगते.”

तिथे खूप वेळ शांतता पसरली.

शेवटी जेराल्डने विचारले, “फोन केव्हा आला होता?”

“तुम्ही घरी यायच्या काही मिनिटे आधी.”

“कुणीतरी फसव्या माणूस असावा. काही थापा मारत --- “

“नाही. ते फ्रॅकलीनकाकाच होते.”

“इकडे बघ हेलन, असे सांग, की तो आवाज तुला ओळखीचा वाटला का?”

“मला माहिती नाही. मला तो त्यांचाच आवाज होता --- याची खात्री नाही. पण तो त्यांचाच आवाज होता.”

जेराल्डने सिगरेटचा शेवटचा तुकडा ओढत, नापसंतीदर्शक भुवया उचलत, म्हटले, “हे अशक्य आहे. तो काय बोलला?”

“त्याना मला कॅसल गेट हॉटेलला भेटायचे आहे --- म्हणजे मी हेन्री लीच नावाच्या माणसाला तिथे भेटायचे आणि तो मला फ्रॅकलीनकाकांना भेटवेल.”

जेराल्ड शोअर थोडा मोकळा होत बोलला, “झाले तर मग. कुणी फसव्या माणूस पैशांच्या मागे दिसतो आहे. आपण पोलीसांकडे जाऊ व त्याला सापळ्यात पकडू.”

हेलनने डोके हलवले. “फ्रॅकलीनकाकांनी मला प्रसिध्द वकील पेरी मेसन याला भेटून सर्व हकीगत सांगायला सांगितली आहे व आज रात्री त्याला भेटायला घेऊन यायला सांगितले आहे.”

जेराल्ड शोअर निर्विकारपणे तिच्याकडे बघतच राहिला. ही मी ऐकलेली सर्वात फालतू गोष्ट आहे. त्याचे पेरी मेसनकडे काय काम आहे?”

“मला माहिती नाही.”

जेराल्ड ठामपणे बोलला, “इकडे बघ. हेलन, तुला माहिती नाही, की तो फ्रॅकलीन होता , नाही का?”

“अं --- खरे तर --- “

“म्हणजे —”

मग त्या व्यक्तीला फ्रॅकलीन म्हणायचे बंद कर. त्यामुळे कायदेशीर परिस्थिती बिघडू शकते. तुला एवढेच माहिती आहे, की तू फोनवर एका माणसाचा आवाज ऐकलास व त्या माणसाने तुला तो फ्रॅकलीन शोअर असल्याचे सांगितले.”

“पण त्याने ज्या इतर गोष्टी सांगितल्या, त्यावरून, तो तोच असल्याचे सिध्द झाले.

“काय गोष्टी?”

फक्त फ्रॅकलीनकाकांनच माहिती असलेल्या माझ्या लहानपणीच्या खूप गोष्टी. मांजराचे पिल्लू घराच्या छपरावर चढले होते आणि त्याला खाली येता येत नव्हते. तेव्हा काकांनी त्याची सुटका केली. मी तेरा वर्षांची असतानाच्या नववर्षाच्या मेजवानीत फळाच्या रसाची पण वाईट प्रकारची बाटली अपराधीपणे पिऊन थोडी झिंगल्यासारखी झाले होते, त्याबद्दल फ्रॅकलीनकाका सोडून कुणालाही काही माहिती नव्हते. ते माझ्या झोपायच्या खोलीपर्यंत माझ्याबरोबर आले आणि मी व्यवस्थित झोपी जाते आहे ना, हे बघितले. मी हर्षवायू झाल्यासारखी वागत असतांना, ते माझ्याशेजारी बसून, मी काही चुकीचे वागते आहे असे मला जाणवू न देता, माझ्याशी बोलत राहिले. मला कसे वाढवायचे याबद्दल माटील्डा बरोबर त्यांचे मतभेद असल्याचे त्यांनी मला सांगितले होते. मी

मोठी होत होते व मला कसे वाढवायचे, याबद्दल ते व माटील्डाकाकू यांच्यात मतभेद होते. मी प्यायले तसे पेय पिणे, हे किती धोकादायक असू शकते, असे त्यांना वाटत होते व ते बेतात म्हणजे किती प्रमाणात प्यावे, हे मी माझ्या अनुभवातून शिकावे, असे त्यांना वाटत होते. काही वर्षे मी तसे पेय अजिबात प्यायले नसते, तरी ते चांगले ठरले असते. इत्यादी गोष्टी माझ्याबरोबर बोलून मग त्यानंतर तिथून बाहेर गेले."

जेराल्ड्च्या भुवया आता हे ऐकून पूर्ववत झाल्या. "आणि त्या माणसाने हे सर्व तुला फोनवर सांगितले?"

हेलनने मान हलवली.

जेराल्ड शोअर खुर्चीतून उठला, खिडकीशी चालत गेला व खिशात हात घालून, तिथे उभा राहिला. वरवर तो शांत व विचारी दिसत होता. फक्त सिगरेटमधून, त्याच्या तोंडातून निघणारे लहानसे धुराचे ढग, तो मनातून उदास असल्याचे सुचवत होते.

त्याने विचारले, "त्यानंतर काय झाले?"

"मग फ्रॅंकलीनकाका --- तो जो कोणी माणूस होता तो, त्याने मला पेरी मेसनला आणायला सांगितले आणि कॅसल गेट हॉटेलला नऊ वाजता येऊन हेन्री लीचला भेटायला सांगितले."

"पण हेलन, बरे झाले की फोनवर फ्रॅंकलीन बोलत होता. पण तो घरी का येत नाही आणि --- "मलाही त्याचेच आश्चर्य वाटते. मग मी विचार केला की कदाचित --- तुम्हाला माहिती आहे, जर तो कुण्या बाईबरोबर गेलेला असता --- तर मला वाटते, तो परत यायला तयार झाला नसता. बहुधा त्याला असे वाटत असावे, की कुणीतरी त्याला हे सांगावे, की माटील्डाने हे कसे घेतले आहे."

पण त्याने मला का फोन केला नाही? मी त्याचा भाऊ आहे. मी वकील आहे. त्याने तुला का फोन केला?"

"मला माहिती नाही. ते म्हणाले की फक्त मीच त्यांना मदत करू शकते. कदाचित त्यांनी तुमच्यापर्यंत पोचायचा प्रयत्न केला असेल, पण तो फलद्रूप झाला नसेल."

"आणि त्यानंतर काय झाले? कुठल्या विषयाने तुमच्यातील संभाषण संपले?"

"त्यांनी असे भासवले, की त्यांना कसले तरी नवल वाटते आहे, जसे काही कोणीतरी खोलीत आले आहे किंवा तत्सम काही. त्यांनी एक झटपट उद्गार काढला आणि मध्येच फोन ठेऊन दिला."

"त्याने तुमच्यातील संभाषण कुणाला न सांगण्याबद्दल सांगितले का?"

"हो, पण मी --- म्हणजे मला असे वाटले की --- अशा परिस्थितीत तुम्हाला ते सांगावे."

तू माटील्डाला हे सांगितले नाहीस का?"

"नाही."

"तिला नक्की काही संशय आलेला नाही?"

"नाही. माझी खात्री आहे, तिला वाटले असेल की मी जेरीबरोबर बोलते आहे. आणि त्यानंतर लगेच तिच्या लक्षात आले की अंबरला घेरी येते आहे. ते बिचाऱ्या पिल्लाला विषबाधा कशी काय झाली असेल?"

जेराल्ड थोडक्यात बोलला, "मला माहिती नाही. आपण आता त्याचा विचार करायला नको. त्यापेक्षा फ्रॅंकलीनचा विचार करु. याला काही अर्थ नाही. दहा वर्षांचे

मौन आणि मग ही वेगळ्याच रीतीने परतायची तयारी! व्यक्तिशः मला असे वाटायचे की त्याने त्या बाईपासून पळ काढला आहे. मला वाटते, त्याने माटील्डाला एखादी चिठ्ठी ठेवली असणार, जी तिने आपल्यापासून दडवून ठेवली आहे. मियामीहून पाठवलेल्या त्या कार्डा शिवाय इतक्या वर्षांचा काळ काही संपर्काशिवाय लोटला, त्याअर्थी त्याचे काही बरे चाललेले नसावे. मला नेहमी असे वाटायचे, की त्याने आत्महत्या केली असावी. लाजीरवाण्या रीतीने परतण्यापेक्षा त्याने तो मार्ग चोखाळला असावा.''

जेराल्डने त्याचे हात अधिक जोराने खिशात खुपसले. खिडकीबाहेर बघितले. काही वेळाने, तो वळला व हेलनला बोलला, ''जेव्हा फ्रॅंकलीन निघून गेला, तेव्हा माटील्डाच्या नावावर भरपूर संपत्ती होती. फ्रॅंकलीनने असे दाखवयला हवे होते, की स्वतःसाठी फारसे काही ठेवलेले नाही. तुला आणि मला काहीच मिळणार नाही. फ्रॅंकलीन माझा भाऊ आहे. तुझा काका आहे. आपण दोघांनी अशी आशा करू की, तो जिवंत आहे. पण त्याने ते सिध्द करायला हवे.''

डॉक्टर ब्लॅकली ऑपरेशनच्या खोलीतून बाहेर आले व हेलनला म्हणाले, ''तुमच्या पिल्लाला विषबाधा झाली आहे.''

''तुमची खात्री आहे?''

डॉक्टर बोलले, ''अगदी नक्की.''

डॉक्टरला धन्यवाद देण्यासाठी जेराल्ड खिडकीपासून वळला. ''तुम्हाला काय सापडले?''

''पिल्लाला इथे आणण्यापूर्वी अगदी थोडा वेळ काही विषबाधित मांस दिले गेले होते. मांसामध्ये बहुधा एकापेक्षा जास्त विषारी गोळ्या होत्या.

एका पूर्णपणे न विरघळलेल्या गोळीचा काही भाग मी काढून टाकू शकलो. बहुतेक ती मासामध्ये आत रुतवलेली असावी. पिल्लाचे पचनाचे रस तिचे पूर्णपणे पचन करू शकले नाहीत.”

हेलनने विचारले, “ते पिल्लू जगेल का?”

“हो. आता ते बरे होईल. सुमारे तासा दोन तासात तुम्ही येऊन, त्याला घेऊन जाऊ शकता.

पण काही दिवस त्याला इथे ठेवलेत, किंवा कुणी मित्राने त्याला ठेऊन घेतले, तर बरे होईल.कोणीतरी त्याला मुद्दाम विष देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. तुमच्या कुण्या शेजाऱ्यांना कुत्री आवडत नसतील. किंवा कुणी काही कारणाने तुमचा राग राग करत असेल.”

हेलन बोलली, “अशा गोष्टी मला शक्य वाटत नाहीत.”

डॉक्टर ब्लॅकलींनी त्यांचे खांदे शहारवले. “विषाच्या गोळया मासाच्या तुकड्यातून देणे, हे अगदी मुद्दाम ठरवून केलेले दुष्कृत्य असणार. असे विष देणारे लोक शहराच्या विविध भागात आढळतात. सहसा ते कुत्र्यांच्या मागे असतात. ते मासाचे लहानलहान गोळे तयार करतात आणि ते इतस्ततः फेकतात. कुत्रे ते मटकावतात. इतक्या लहानशा मांजरावर असा मोठा विषप्रयोग करणे, सहसा न घडणारी गोष्ट आहे.” जेराल्ड मध्येच बोलला, “डॉक्टर, तुम्हाला त्या पिल्लाने काही दिवस घरापासून दूर रहावे, असे वाटते आहे का?”

“हो.”

“तो आता धोक्यातून बाहेर पडला आहे का?”

“हो. पण मला त्याच्यावर अजून पुढेही सुमारे तासभर उपचार करायचे आहेत.”

जेराल्ड्काका, मग आपण जेवणानंतर त्याला घेऊन, इथे परत येऊ. नंतर आपण त्याला टॉम लंककडे --- माळ्याकडे नेऊ. त्याच्यासारख्या अविवाहिताकडे मोडकीतोडकी झोपडी आहे आणि आजूबाजूला कोणी रहात नाही. अंबर त्याच्यावर प्रेम करतो आणि तिथे तो सुखी राहील.”

डॉक्टर ब्लॅकली बोलले, “हा चांगला बेत आहे.”

जेराल्ड शोअरने मान डोलावली. “ठीक आहे. हेलन, चल. तुला बरेच काही करायचे आहे.

तिथून चार पाच चौक पुढे, एका औषधाच्या दुकानासमोर जेराल्डने गाडी उभी केली.

त्याने स्पष्टीकरण दिले, “पेरी मेसनबरोबर वेळ ठरवणे. मी त्याला थोडेफार ओळखतो. त्यामुळे तुझ्यासाठी मी फोन करतो. आता तो आपल्याला भेटला, तर तो चमत्कारच ठरेल. कार्यालयाच्या वेळात, तो स्वतःच एक कायदा आहे आणि --- इतर बऱ्याच गोष्टी.”

काही मिनिटात जेराल्ड परत आला.”तासाभरात, त्याच्या कार्यालयात. हे ठीक आहे का?”

हेलन म्हणाली, “तुम्ही माझ्याबरोबर आलेले बरे राहील, नाही का?”

“नाही. मी तिथे नसतांना, तू त्याला तुझ्या पद्धतीने सर्व काही सांगशील. ते

चांगले राहील. जर त्याचे मत माझ्यासारखेच झाले, तर त्याची काय प्रतिक्रिया होते, हे माझ्यासाठी रुचीपूर्ण असेल. मी त्याला सांगितले आहे, की मी तुला कॅसल गेट हॉटेलसमोर नऊ वाजता भेटेन."

"जेराल्ड्काका, तुमचे काय मत आहे?

तो प्रेमाने हसला, पण त्याने डोके हलवले. त्याने क्षणभर गाडी चालवण्या कडे लक्ष दिले. मग तो हेलनकडे वळला.

"अंबर दुपारी उशीरापर्यंत बाहेर होता का, हे तुला माहिती नाही?"

"जेराल्ड्काका. मी आठवायचा प्रयत्न करते आहे. मला आठवते आहे, दुपारी साधारण तीनच्या सुमारास तो मागील अंगणात होता. पण त्यानंतर तो बाहेर होता का, ते मला आठवत नाही."

"त्या दुपारी घरी कोण कोण होते?

"कोमो, माटील्डा काकू आणि स्वयंपाकीण."

"आणि कोणी?

त्याच्या डोळयांच्या प्रभावाखाली तिला स्वतःला रंगीत वाटू लागले. "जेरी टेम्पलर"

"अंबरला घेरी यायला लागण्याअगोदर किती वेळ?"

"फार आधी नाही."

"जॉर्ज अल्बर तिथे होता का?"

"हो, फक्त काही मिनिटे. तो माटील्डाकाकूला भेटायला आला होता व नंतर

जेरी येईपर्यंत --- तिथे असाच वेळ घालवत होता --- मग मी त्याला घाईने टाळले. का?"

जेराल्ड्चा जबडा घट्ट बसल्यासारखा, त्याच्या गालाचा स्नायू हलला. "तुला याबद्दल किती माहिती आहे? जॉर्ज अल्बरविषयी माटील्डा काकूला किती ममत्व होते!

हेलन बोलली, "मला माहिती आहे, तो तिला आवडत होता. ती नेहमी -- "

"म्हणजे तुला, त्यामागे काय होते, ते माहिती नाही. तुला हे माहिती नाही, की तिने त्याच्या वडिलांशी जवळजवळ लग्न केले होते."

"मला हे कधीच माहिती नव्हते. ते --- अशी कल्पना केली जात असे, की माटील्डाकाकू नेहमीच --- "

"तेव्हा ती साधारण चाळीशीची असेल. ती एक आकर्षक विधवा होती आणि स्टीफन अल्बर दिसायला चांगला विधुर होता. जॉर्ज बराचसा त्याच्यासारखा आहे. आमच्यासाठी हे काही नवल नव्हते, की ते दोघे एकमेकांवर प्रेम करू लागले. पण आमच्यासाठी ही मोठी बातमी होती, की त्यांचे भांडण झाले व माटील्डाने फ्रॅंकलीनशी लग्न केले. मला वाटते ते तिने मुख्यत्वे स्टीफनला दुखवण्यासाठी केले. त्यामुळे तो व्यथितही झाला, पण त्याने त्यावर मात केली. नंतर दोन तीन वर्षांनी त्यानेही लग्न केले. १९३०च्या सुमारास त्याने घटस्फोट घेतला."

हेलनने मान हलवली. माटील्डाकाकूवर कुणी प्रेम केले असेल, यावर विश्वास ठेवणे, अवघड आहे. आणि त्याहून जास्त अवघड हे आहे की तिने कुणावर तरी प्रेम केले होते."

“पण तिने ते केले होते. एवढे प्रेम केले होते, की मला नाही वाटत, ती ते विसरू शकली असेल. मला वाटते, ती अजूनही स्टीफन अल्बरवर प्रेम करत असावी. मला वाटते, तिने फ्रॅंकलीनचा द्वेष करायचे मुख्य कारण तो तिला सोडून गेला हे नसून, तिला माहिती होते, की तो नेहमीच स्टीफन अल्बरचा द्वेष करत असे. माझी खात्रीच आहे, की त्याने स्टीफनला जे केले, त्यामुळे ती त्याला क्षमा करू शकली नाही.”

हेलनने विचारले, “त्याने काय केले?”

“खरे तर काही नाही. फ्रॅंकलीन नाहीसा झाल्यावर बॅंकेने ते केले. पण तो निघून जाण्यापूर्वी ते करण्यासाठी तो तयार झाला असता, तरी मला काही नवल वाटले नसते. इतर सर्वांबरोबर २९ चा मोठा दणका अल्बरसाठी मोठा आघात होता. पण काही भाग तो बचावू शकला. फ्रॅंकलीन नाहीसा झाल्यावर ३२ पर्यंत तो त्यावर कसाबसा जगला. नंतर बॅंकेने जबरदस्तीने कारवाई केली. फ्रॅंकलीनला स्वतःलाही तेच करायचे असते, तरी मला काही आश्चर्य वाटले नसते. त्याला नक्कीच अल्बर आवडत नव्हता. तसेही अल्बर गाळात गेला आणि पुन्हा कधीच वर आला नाही. कदाचित त्यामुळे तो मेला नसावा, पण त्याचा परिणाम झालाच. आणि माटील्डा --- “ तो थांबला. ते घराच्या जवळ आले होते. “आज रात्री मी तुझ्याबरोबर असणार आहे. नऊ वाजता कॅसल गेटशी.”

हेलनने हो नाही केले. फ्रॅंकलीनकाकांनी सांगितले आहे, की मिस्टर मेसन सोडून कुणालाही बरोबर आणू नको. ते त्याबद्दल ठाम असल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होते.”

जेराल्ड म्हणाला, “असू दे. मी तुझ्याबरोबर येणार आहे.” घरासमोर थांबल्यावर त्याच्या आवाजाची पट्टी खाली आली. “तिथे जॉर्ज अल्बर आहे, बोलतांना काळजी घे.”

## प्रकरण ३

जॉर्ज अल्बर पायऱ्या उतरून खाली येत होता. जेराल्ड्काका म्हणत असल्याप्रमाणे तो बराचसा त्याच्या वडीलासारखा दिसत असला, तरी यावर विश्वास ठेवणे सोपे होते, की वीस वर्षांपूर्वी माटील्डा काकू --- आणि खूपशा इतर बायका बहुधा स्टीफन अल्बरसाठी जीव टाकत असतील.

गतिमान सिनेमांमधील नायकांच्या फोटोवरून जीव ओवाळून टाकणाऱ्या बायकांच्या जातीच्या त्या असतील. हेलनने स्वतःला सांगितले, की त्या एका फोटोवरून त्या विविध प्रकारचे बदल असलेले फोटो तयार करत असतील. जॉर्ज अल्बरच्या देखणेपणात तसे काही कृत्रिम गुण असावेत. जणू काही पेन्सिल काळजीपूर्वक चालवून, ग्रीकांसारखे सरळ नाक, कोरल्यासारख्या सरळ भुवया आणि चकाकीत काळ्या केसांवर एक जास्त दाटपणाची लहर उठवली होती.

पण फोटोंमध्ये थोडेफार बदल करणाऱ्याने तोंडाच्या बाबतीत फार कष्ट घेतल्याचे जाणवत नव्हते. त्यात ओठ जास्त प्रकर्षाने जाड जाणवत होते. त्यामुळे फोटोच्या सुंदरतेला बाधा येत होती. नको इतका गर्व, आणि एक प्रकारचा दुसऱ्याची काही पर्वा नसल्याचा दुष्ट गुण त्यात दिसत होता.

"त्याचा मांजराचे पिल्लू वेडे होण्याशी काय संबंध?" हेलन स्वतःशी बोलली. काही वेळेस त्याचा आवाज त्याच्या चेहऱ्यासारखा परत भिडतो. तो पूर्णपणे खरा असण्यापेक्षा तो थोडासा खरा असल्यासारखा वाटतो."

"स्वयंपाकीण म्हणते आहे, त्याने तुला ओरबाडले. तो हात बघू." तो हातापर्यंत पोचला. त्याची बोटे लांब व मजबूत होती व ती सुंदर रीत्या राखली गेली होती. पण हेलनला तो स्पर्श आवडला नाही. तिने हात एकदम मागे घेतला.

"माझा हात ठीक आहे आणि अंबर वेड्यासारखे करत नव्हता. तो --- "

तो डोके हलवत बोलला, "तू असे गृहीत धरु शकत नाहीस. स्वयंपाकीण म्हणते त्यावरून --- "

हेलन मध्येच बोलली, "स्वयपाकीणीची माहिती तिने माटील्डा काकूकडून मिळवलेली आहे. त्या पिल्लावर विषप्रयोग झाला होता."

अल्बर उद्गारला, "विषप्रयोग!"

"बरोबर."

"तुझी खात्री आहे?"

"शंभर टक्के."

"पण मला हे समजत नाही."

घसपटत बाहेर आला व कोरडेपणे बोलला, "तुला हे न समजण्याचे विशेष काही कारण नाही. मासाच्या खूपशा तुकड्यांमधून विषारी गोळ्या भरलेल्या होत्या. आणि कोणीतरी त्या प्राण्याला तिथपर्यंत नेले कारण त्याला अंबरला ठार मारायचे होते. मी अजून काय स्पष्टीकरण देऊन, तुला हे सांगू?"विरोधभासात्मक रीत्या,

फसवून राग आल्याचे न दाखवणे, हे जॉर्ज अल्बरच्या लक्षात येत नव्हते. तो हसत बोलला, “काय झाले, हे मला कळत नसल्याचे मला म्हणायचे नाही आहे. पण असे का झाले, ते मला समजत नाही आहे.

जेराल्ड बोलला, “खरे तर उत्तर अगदी सोपे आहे. कुणाला तरी त्या पिल्लाला त्याच्या वाटेतून दूर करायचे होते.”

जॉर्ज अल्बर परत तेच म्हणाला, “पण का?”

या प्रश्नाने हेलनवर प्रभाव पडला. भुवया चढवत व कपाळाला आठ्या घालत, ती तिच्या काकांकडे वळली. “जेराल्ड्काका, कुणालातरी अंबरला विष का द्यायचे असेल?”

हेलनला वाटले जेराल्ड शोअर उध्दटपणे विषय बदलततो आहे. “तुम्ही मुक्या प्राण्याला विष देणाऱ्या माणसाच्या मनाचा विचार करू शकत नाही. लोक मासाच्या तुकड्यात विष घालून. अंगणात मोकळ्या जागी फेकतात. प्राण्यांचे डॉक्टर म्हणतात, की शहराच्या काही भागांमध्ये असे लोक असतात.”

हेलनने पाहिले की जॉर्ज अल्बरचे डोळे काकांच्या डोळयांशी मिळाले. तिला जाणवले, की भांडणाची काही अंतर्गत खुमखुमी त्या तरूण माणसाला माघार घेण्यापेक्षा भडकवते आहे. तो म्हणाला, “अशा तऱ्हेने अंबरला विष घालण्यात आले असेल, असे मला मुळीच वाटत नाही. एखादा असा तुकडा --- कदाचित ठीक आहे. पण असे खूप तुकडे --- मला शंका आहे.”

जेराल्ड शोअर बचावात्मक पवित्रा घेत, व स्वतः अशा परिस्थितीत सापडल्याने चिडत, बोलला, “विषबाधित मासाचे अनेक तुकडे इकडे तिकडे

फूटभर अंतरावर फेकले गेले असतील. ते मांजराच्या पिल्लाने न खायचे काही कारण नाही.”

जॉर्ज अल्बरने हेलनकडे पाठ केली. “शेवटी ते पिल्लू केव्हा बाहेर गेले होते?”

ती म्हणाली, “जॉर्ज, मला ते माहिती नाही. ते तीननंतर बाहेर गेल्याचे

मला तरी आठवत नाही.”

“तेव्हा त्याला विषबाधा झाली असावी का?”

“त्याला पहिली घेरी यायच्या आधी काही मिनिटे त्याने ते खाल्ले

असणार, असे डॉक्टर म्हणाले. आम्ही त्याला दवाखान्यात न्यायच्या फार आधी नव्हे. नशीब, की त्या पिल्लाचा जीव वाचला.”

सर्व वेळ त्याच्या मनात जी कल्पना होती, ती नक्की झाल्याने, अल्बरने हळूहळू मान हलवली व अचानक बोलला, “ठीक आहे, मी निघतो. नंतर भेटू. अंबरबद्दल मला वाईट वाटते आहे. त्याची चांगली काळजी घ्या.”

हेलन म्हणाली, “नक्कीच घेऊ. आम्ही काही दिवस त्याला टॉम लंककडे ठेवणार आहोत.”

जॉर्ज अल्बर त्याची मोटार लावलेल्या ठिकाणी चालत गेला. उडी मारून आत बसला व ती चालवत दूर गेला.

जेराल्ड शोअर त्याच्या पुतणीशी नवल वाटून बोलला, “मला हा मनुष्य

मुळीच आवडत नाही.”

“जेराल्ड्काकाका, का आवडत नाही?”

“मला माहिती नाही. त्याच्यात काही --- अजिबातच आत्मविश्वास नाही. एखाद्या वयाने मोठ्या माणसातदेखील तो असतो. त्या मूर्खाचा आत्मविश्वास उद्दामपणाचा वाटतो. तो सैन्यात कसा काय नाही?”

हेलनने स्पष्ट केले, “त्याला डाव्या कानाने कमी ऐकू येते. तुमच्या लक्षात आले नाही का, की तो ऐकताना नेहमी त्याची उजवी बाजू तिकडे वळवतो?”

जेराल्डने नाकातून जोराने हवा सोडली. “हा त्याचा कडेने घेतलेला फोटो.”

आहे. एखाद्या बुद्दू माणसासारखे त्याने त्याचे डोके कलते ठेवले आहे.”

“नाही, जेराल्डकाका, असे बोलणे बरोबर नाही. त्याच्या श्रवणदोषामुळे ते असे दिसते आहे. मला ते माहिती आहे. त्याने सैन्यात जायचा प्रयत्न केला होता.”

जेराल्ड शोअरने मध्येच विचारले, “जेरी कँपला परत केव्हा गेला?”

सोमवार किती जवळ आहे याचा विचार न करता, हेलन बोलली, “सोमवारी .”

“त्याला कुठे पाठवले जाते आहे, हे त्याला माहिती आहे का?”

“त्याला माहिती असेल, तरी तो सांगत नाही आहे.”

ते घराच्या दाराशी आले. जेराल्डने तिच्यासाठी दार उघडून धरले पण तिच्यामागोमाग तो आत गेला नाही.

“मला गावात जाऊन, काही गोष्टी बघायच्या आहेत. तुला मेसनच्या कार्यालयात एकटीलाच जावे लागेल. त्याने त्याच्या घड्याळाकडे पाहिले. “तुला

वेळेवर पोचण्यासाठी लवकर निघावे लागेल. तू जेवायला वेळेवर येऊ शकणार नाहीस. त्यामुळे ते तू माझ्याबरोबर घेत असल्याचे सांगावेस. त्यामुळे माटील्डाचे समाधान होईल. मेसनला हवा तितका वेळ तू दे. त्याला तो खूप हवा असेल व हा माझा अंदाज चुकणार नाही. मी कॅसल गेटशी नऊ वाजता, तुझ्यासाठी थांबलेला असेन.”

फ्रॅंकलीनकाकांनी तिला अगदी स्पष्टपणे सांगितले होते, की तिने पेरी मेसन सोडून अजून कुणालाही, आणू नये. हेलनने त्याला त्याची आठवण करण्यापूर्वी, त्याने दार लावले.

## प्रकरण ४

उंच माणसांकडे सहसा असणारी स्फूर्तीदायक आकर्षणशक्ती व विशेष आत्मविश्वास पेरी मेसनकडे होता. डुलकी काढतांना किंवा विश्रांती घेतानाही वाऱ्यावादळाला सह्नशीलपणे तोंड देणाऱ्या कडक अशा ग्रॅनाईट खडकासारखे त्याचे गुण व स्वभाव होता. ताणाच्या काळात त्याचे दबले न जाणारे व्यक्तिमत्व, उलट उफाळून येत असे. उदाहरणार्थ, ज्युरींसमोर, तो एखाद्या कसलेल्या नटाप्रमाणे, डौलदारपणे केस पेश करे. त्याचा आवाज पटापट उत्तरे देणाऱ्या, योग्य त्या शब्दांवर जोर देणाऱ्या यंत्रासारखा असे. वाईट, लाजीरवाण्या, चुकीच्या निगरगट्ट व खोटारड्या लोकांना तो त्याच्या धारदार प्रश्नांने कापून काढत असे. केसची उलट सुलट चिरफाड करणाऱ्या कोर्टात, तो क्षणार्धात विचार करून, भरभर बोलणारा, लोकांना त्यांचे मन बदलायला लावणारा, त्यांच्या भावनांशी हार न मानता

नाटकीपणे खेळणारा, सहजपणे व वेगाने शब्दांशी भिडणारा; पण तरीही त्याच्या मरणप्राय तर्कशुद्ध विधानांने सर्वांचा विरोध डावलून भक्कम केस उभी करणारा होता. त्याची सचिव असलेल्या डेला स्ट्रीटने वकिलाच्या खासगी कार्यालयाचे दार उघडले. आत मेसन त्याच्या बाकामागे असलेल्या गोल फिरणाऱ्या खुर्चीवर, त्याचे लांब पाय वर घेऊन बसलेला होता. मोठ्या बाकाच्या कोपऱ्याशी त्याचे घोटे छेद देत होते.

तिने हातमोजे, टोपी व कोट काढत जाहीर केले, “मी आले आहे.” ती ते ठेऊन बाहेर येईपर्यंत, मेसन काहीच बोलला नाही. मग तो म्हणाला, “डेला, गुणांची कदर झाली आहे. मी तुला आज सकाळी सांगितले, की त्या शेअरच्या केसमध्ये पैसे मिळणार असले, तरी आपण आपली मने त्या केसच्या विचारांनी कलुषित करायला नकोत. आठ तासांनी आपल्याला हवी तशी केस मिळाली आहे.”

डेला थंडपणे बोलली, “त्या केसची आपली फी दहा हजार होती.”

मेसन मोठे हसू हसला. “हे साहस तुला दहा वर्षांनी तरूण वाटायला लावेल.”

“ तुझ्या बऱ्याच केसेस मला दहा वर्षांनी म्हातारे झाल्यासारखे वाटायला लावतात!”

मेसनने तिच्याकडे दुर्लक्ष केले. “मला घ्यायला लागणाऱ्या नीरस, नेहमीच्या केसेसपैकी ही नाही. ही विचित्र, नेहमीपेक्षा वेगळे गूढ असलेली, अद्भुतरम्य,

झगमगती केस आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, ही वेगळी, विचित्र व

काहीच अर्थ न लागणारी केस आहे --- एक कमालीची आकर्षक केस आहे.”

आतून उद्दीपित झाल्याने त्याच्या डोळयात येणारी विशेष चमक जाणवत, बाकाच्या विरुद्ध बाजूच्या कोपऱ्यात बसत, तिने विचार मांडला, “तू फोन केलास, तेव्हा मी मनाशी हाच अंदाज केला होता.”

व्यवसायिक लोकांमध्ये अभावानेच आढळणारी, त्याच्या कामातून आनंद मिळवण्याची क्षमता पेरी मेसनमध्ये होती. काही काळाने, डॉक्टरने मानवी आजारांबद्दल पूर्ण अनुभव मिळवल्यावर, त्याला व्यक्तिनिरपेक्ष तज्ञता प्राप्त होते. ते रुग्णाला, काही लक्षणे असणारी व्यक्ती म्हणून, किंवा काही प्रकारची शारिरीक वैशिष्ट्ये असलेली व्यक्ती म्हणून न तपासता, एकंदर तब्येतीच्या दृष्टीने बघतात. तसेच वकील खूप अनुभवानंतर, केस चालवण्यासाठी करायच्या कृतीच्या तयारीत माहीर होतात. पण पेरी मेसनचे मन तांत्रिक दृष्ट्या मोठा फेरा घेतल्याशिवाय व कायद्याच्या चौकटीत केस बसवल्याशिवाय, समाधानी होत नसे. तो प्रत्येक केसकडे केवळ एक साहस करणे व उद्दीपता मिळवणे या दृष्टीने बघत नसे, तर केसच्या तारखा पडायला उशीर झाल्यास, अस्वस्थ होत असे. जसजशी त्याची प्रॅक्टीस वाढू लागली, तसतशी त्याची व्यक्तिगत बाबतीतली रुची वाढू लागली. त्याच्या पद्धती जास्त झगमगत्या, बुद्धीप्रवण, जास्त धोकादायक व खूप आधुनिक होऊ लागल्या. डेला स्ट्रीट जाणून होती की, त्याच्या डोळयातील विशिष्ट चमक म्हणजे नवीन आव्हानात्मक कोडे असलेली केस त्याला मिळाली आहे. पेरी तिच्याकडे एकटक बघत होता आणि आपोआप डेला स्वतःकडे त्याच्या दृष्टीने बघू लागली. तिचे मखमली चामड्याचे बूट चांगले होते. तिचे पाय प्रमाणबद्ध होते. जर फिकट पिवळसर पांढऱ्या रंगाचे कपडे तिला ठीक बसत नसले, तर ते तिचा शिंपी खास नसल्याने होते. तिचा चेहरा आल्हादक होता आणि ती नवीन छटा असलेली

लिपस्टिक वापरत असे. तिची टोपी वेगळ्याच प्रकारची होती. तिला आशा होती की तिच्या बाबतीत तो समाधानी होता.

मेसन सुस्कारत बोलला, ‘डेला, कधी कधी मला वाटते, तू स्वतच्या दिसण्याच्या बाबतीत फार निष्काळजी झाली आहेस.”

“हो का?” ती काही वाईट होणार असल्यासारखी हळू आवाजात बोलली, “त्याबद्दल मला सांग.”

“तू सनातनी होत चालली आहेस. नैतिकतेची चाड तुला उरली नसून, पैशाची काळजी करणारी झाली आहेस. प्रश्नांपेक्षा वेळाचा विचार करणारी झाली आहेस.”

डेला आरामशीर होऊन म्हणाली. “या कार्यालयातले कुणीतरी व्यावहारिक असले पाहिजे. जर मी लहान तोंडी मोठा घास घेत नसेन, तर हे उद्दीपित होणे कशाबद्दलचे आहे? चांगले जेवण अर्धवट टाकून उठणे व घाईने चालू पडणे, हे मी एक वेळ समजू शकते. पण कुठल्या नरभक्षकाने मिशनरीला खाल्ले आहे, हे जाणून घ्यायला मला आवडेल.”

तो बोलला, “हे तू कार्यालय सोडल्यावर झाले. मी निघायच्या तयारीत होतो --- जॉन्सनच्या केसचे थोडे काम करत होतो. मला ओळखणाऱ्या एका वकिलाचा फोन आला. त्याला त्याच्या पुतणीसाठी माझा वेळ हवा होता. थोड्या वेळाने ती येऊन, माझ्याशी बोलली.”

डेला स्ट्रीट बाकावरून एक वही घेत उठली. तिने एक खुर्ची ओढली व सचिवाच्या नेहमीच्या चटपटीतपणे विचारले, “त्यांची नावे काय होती?”

जेराल्ड शोअर हा वकील असून त्याचे कार्यालय डिबेंचर गुंतवणूक इमारतीत आहे. माझ्या माहितीप्रमाणे, तो विशेष प्रकारची प्रॅक्टीस करतो. खाणींच्या

कंपन्यांबरोबर काम करतो. मला वाटते तो एक प्रकारचा जुगारी आहे. फी कॅशमध्ये घेतो व साधारणपणे विकासकांसाठी काम करतो आणि तो काम करत असलेल्या कंपनीत पैसे गुंतवतो."

"यात त्याला काही फायदा होतो का?"

जोराने हसत मेसन म्हणाला, "पैशाचा इतका विचार करू नकोस. मला वाटते त्याला त्यातून पैशांपेक्षा अधिक काही मिळते."

"हा अंदाज तू कशावरून बांधलास?"

तो नेहमी मृगजळाच्या मागे असतो. आमचे खरेखुरे तत्वज्ञ त्याला दरिद्री अर्थकारण म्हणतात. कारण मृगजळ हा ठराविक पदार्थ नसतो. ते ते करतात, कारण ते पाठलाग करायला एक छान कारण असते. ते इतर बाबींकडे दुर्लक्ष करतात, कारण मृगजळाच्या पाठलागात, त्यांना आयुष्याचा खूप आनंद मिळतो. इतर बऱ्याचशा व्यावहारिक उद्दिष्टे ठेवणाऱ्या लोकांपेक्षा, तो कसला पाठलाग करतो आहे, त्यात त्याला रुची असते. आयुष्यातील आनंद हा एक प्रकारची उत्तम संपत्ती असते."

"त्याला काम करण्यासाठी कुणी आधी फी देते का?"

"अजून नाही.'

"अस्स! पुतणीचे नाव?

"हेलन किंडल."

"वय?"

"साधारण चोवीस. खूप छान जांभळे डोळे, सोनेरी केस, सुंदर बांधा व एकंदरीत मस्त रेखीव अवयव --- खूपच सुंदर."

डेला स्ट्रीट पुटपुटली, “आणि विसार रक्कम नाही”.

“ती जेराल्ड शोअरची पुतणी असल्याचे तू म्हणालास?”

“हो, मी तुला थोडक्यात कुटुंबाची माहिती सांगतो. त्याने टिपण केलेले काही कागद काढले व डिक्टेशन देऊ लागला. भरभर पण थोडक्यात सर्व गोष्टी डेला स्ट्रीटच्या वहीत गेल्या.

१९३२ मधील जानेवारी महिन्यात, सत्तावन्न वर्षांचा, दणकट तब्येतीचा फ्रँकलीन शोअर त्याच्या बायकोबरोबर जेवण करून त्याच्या अभ्यासिकेत गेला. नंतर त्यानेच बोलावलेला, त्याच्या ओळखीचा एक माणूस आला. नोकराने नव्हे, तर त्यानेच दार उघडले. एका नोकराणीने कुणाला तरी आत येतांना पाहिले व विचार केला व त्याला जेराल्ड शोअर म्हणून ओळखले. माटील्डा शोअरनेही अभ्यासिकेतून जो आवाज ऐकला, तो जेराल्ड्चा आहे, असे तिला वाटले. पण तिने तो खात्री वाटेल, इतक्या स्पष्टपणे ऐकला नव्हता. जेराल्ड्ने स्वतः तो तिथे गेला नसल्याचे सांगितले.

ती आलेली व्यक्ती कुणी का असेना, पण तिला पैसे पाहिजे होते. माटील्डा शोअरने तिच्या नवऱ्याचा चढलेला व पैसे देणार नसल्याचा आवाज स्पष्टपणे ऐकला. नवऱ्याला तिने असेही म्हणतांना ऐकले की, ज्यांना श्रीमंतीच्या रस्त्यावर परत जाण्यासाठी, काही हजार पैशांची गरज आहे, अशा मूर्ख लोकांनी जग भरलेले आहे. पण मूर्खालाही हे माहिती पाहिजे, की असा कुठला रस्ता नाहीच आहे.

एवढेच माटील्डा शोअरच्या कानावर पडले. झोपून वाचण्यासाठी, ती वरच्या मजल्यावर गेली. तिने त्या पाहुण्याला परत जातांना पाहिले नाही. दुसऱ्या दिवशी फ्रँकलीन शोअरदेखील निघून गेलेला होता. तो काही दिवस बेपत्ता असेपर्यंत

त्याच्या बायकोने किंवा व्यवसायातील बरोबरच्या लोकांनी पोलिसांना विश्वासात घेतले नाही कारण, ते असे दिवस होते, की नुसती कुजबुजीमुळेही बँक गाळात जाऊ शकली असती. प्रत्येक प्रयत्न, खासगी वा, अधिकृत, त्यानंतर त्याला शोधण्यासाठी केला गेला, पण त्याचा काही पत्ता लागला नाही. बँकेतील पैसे व इतर गोष्टी सुखरूप होत्या. वर्तमानपत्रात ठळक बातमी छापून आली तरी, तो अध्यक्ष असलेल्या संस्थेचेही काही नुकसान झाले नाही. त्याचे असे नाहीसे होणे, जरी गूढ असले तरी सवयीप्रमाणे त्याच्याजवळ असलेल्या काही शे डॉलर्स व्यतिरिक्त त्याच्याकडे काहीही पैसे नव्हते. त्याचे चेकचे पुस्तक त्याच्या टेबलावर होते. त्यातील एका चेकवर तारीख टाकून ज्याला पैसे द्यायचे त्याचे नाव लिहिणे सुरु केलेले दिसले. पण नंतर त्याने विचार बदलला असावा किंवा काही अडथळा आला असावा. त्याच्या पासबुकानुसार त्याच्या व त्याच्या बायकोच्या जोडखात्यात ५८,९४१.१३ डॉलर्स असल्याचे दिसत होते आणि १०००० डॉलर्सचा कुणाला तरी द्यायची जागा कोरी असलेला, दुसऱ्या चेकबुकमधील चेक सोडता, ही रक्कम खरी असल्याचे आढळून आले आहे. त्याबद्दल फ्रँकलीन शोअरने नाहीसे होण्यापूर्वी त्याच्या सचिवाला फोन केला होता.

तिथे नेहमीच्या अफवा उठल्या. तो नाहीसा होण्यापूर्वी, म्हणजे काही महिन्यांपूर्वी त्याला एका बाईबरोबर पाहिले गेले होते. पण ती कोण बाई होती, ते बघणाऱ्यांपैकी कुणालाच माहिती नव्हते.

पण ती दिसायला चांगली, चांगले कपडे केलेली, साधारण तिशीची बाई होती. पण तिने त्याला सोडल्याचे सुचवणारे, मियामी, फ्लोरिडाहून ५ जून १९३२ मध्ये त्याच्या नाहीसे होण्यानंतर सहा महिन्यांनीआलेले पत्र व त्याच्या पुतणीला आलेले एक चित्र असलेले पोस्टकार्ड याव्यतिरीक्त, काहीही नव्हते. तो हाताने

लिहिलेला मजकूर तज्ञ मंडळींनी पारखून, तो नक्की फ्रँकलीन शोअरचाच असल्याचे सांगितले होते. त्याने लिहिले होते, की इथे आम्ही मजेत आहोत. यावर विश्वास ठेवा अगर ठेऊ नका, पण येथील सौम्य हवा व पोहणे, याचा आम्ही छानपैकी आनंद लुटत आहोत. खूप साऱ्या प्रेमासकट. तुझा फ्रँकलीनकाका.

अनेकवचनी सर्वनामे वापरलेला मजकूर सोनेरी केसांच्या बाईबद्दल कुजबुज करायला लावत होता. पण शोध घेणारे त्वरेने मियामीला पोचल्यावर, तिथे त्यांना फ्रँकलीन शोअरचा काही थांगपत्ता लागला नाही. त्याला ओळखणारे तिथे खूपजण होते, पण तो तिथे बरेच दिवस राहील्याचे, कुणीच सांगत नव्हते.

त्याचे इच्छापत्र मिळाले. त्यानुसार बरीचशी रक्कम त्याच्या बायकोला देण्यात आलेली होती. प्रत्येकी वीस हजार डॉलर्स त्याच्या पुतणीला व भावाला देण्यात आल्याचे लिहिले होते.

डेला स्ट्रीटने तिच्या वहीतून, आशापूर्णतेने वर पाहिले व विचारले, "पण त्याच्याबद्दल काय?"

"त्यांला काही दिले गेले नव्हते. पुतणी खूप वर्षे तिच्या काका/काकू बरोबर रहात होती. मला वाटते, जेराल्ड शोअरला काही फायदे या ना त्या मार्गाने मिळाले. पण ते ठरलेले पौड अजून दिले गेले नव्हते --- म्हणजे ते फ्रँकलीन शोअर मेल्याचे सिध्द झाले, तरच मिळाले असते."

"पण त्याच्याकडून काहीच समजले नव्हते --- कैक वर्षात --- "मेसन बोलला, "तो एक मुद्दा आहे. काहीतरी आहे. त्याने त्याच्या पुतणीला आज फोन केला. ती आज त्याला भेटणार आहे. त्याने आग्रह धरला आहे, की मीदेखील तिथे हजर रहावे. मी तुला बरोबर घेऊन जाणार आहे."

डेला स्ट्रीटने विचारले, "मी माझी वही बरोबर घेऊ का?"

मेसन म्हणाला, "अर्थात, घे. आपण टिपणे घेऊ, म्हणजे आपल्याला सर्व काही नीट माहिती होईल व आपण न बोलल्या गेलेल्या गोष्टींविषयी चर्चा करू शकू."

"पण तो त्याच्या बायकोशी संपर्क साधून घरी का येत नाही?"

"तो एक मुद्दा आहेच. एका तरूण स्त्रीबरोबर त्याच्या नाहीसे होण्यासंबंधी काही गूढ होते. त्याची बायको त्याचे कसे स्वागत करेल, याची त्याला खात्री नसावी."

"आता तो इथे असल्याचे तिला काहीच माहिती नाही का?"

"नाही. फ्रँकलीनने त्याच्या पुतणीला अशा सक्त सूचना दिल्या आहेत, की तिने हे कुणालाही सांगू नये. तिचा तिच्या जेराल्ड्काकांवर विश्वास असल्याने, तिने त्यांना सर्व काही सांगितले आहे. त्यांनीच मला फोन केला होता."

डेला स्ट्रीटने विचारले, "माटील्डा शोअर क्षमा करेल, अशी आहे का?"

मेसन मोठ्याने हसला. "अर्थातच नाही आणि हेलन केंडरच्या गोष्टीचा अर्थ काढता तर ती हरकत घेणारी विशिष्ट प्रकारची व्यक्ती आहे. अजून म्हणजे त्यात एक जुने प्रेमप्रकरणदेखील आहे.

त्यातील प्रियकर मेला. पण त्याचा अगदी त्याच्यासारखा दिसणारा मुलगा, जॉर्ज अल्बर हा माटील्डाला अगदीच जवळचा आहे. मला वाटते, जेराल्ड शोअर त्या संबंधाबद्दल नाराज आहे."

"का?"

“त्या तरुण अल्बरमध्ये तिने एके काळी प्रेम केलेल्या माणसाला ती पहाते. तिचे जिवंत नातेवाईक फक्त जेराल्ड शोअर व हेलन केंडल असल्याने, तिच्या इच्छापत्रात तेच फायदेशीर असणारे असायला हवेत. काही काळापूर्वी, तरुण अल्बरने गालीच्यावर सुस्वागतम असे वाचण्यापूर्वी, तिने तिचे वारस फक्त तेच नसणार असल्याचे बोलून दाखवले होते.”

“हे चांगले नशीब आहे का?”

“हो.”

“इथे जॉर्ज अल्बर या केसमध्ये घुसलेला आहे!”

मेसन तोंडभरून हसला. “त्यामुळे जेराल्ड शोअरला वाटते आहे, त्याचा सगळा करिश्मा निघून जातो आहे आणि तरुण अल्बर वारंवार घरी येऊ लागला आहे.”

”नशीब! तू असे म्हणत नाही आहेस, की ही चौसष्ट वर्षांची बाई या अल्बर बरोबर लग्न करायला निघाली आहे --- “

मेसन बोलला, “बहुधा नाही. पण तिला तिच्या पुतणीने त्याच्याशी लग्न

करायला हवे आहे ---

आणि अल्बरला बहुधा ती कल्पना पसंत आहे. माटील्डा शोअर हुकुमशहा झाली आहे. तिच्या हातात सगळया दोऱ्या आहेत. तरीही तुम्ही अजून या केसचे नकोसे परिणाम ऐकलेले नाहीत. तिथे फक्त हा विचित्र फोन आलेला नव्हता, तर आज दुपारी मांजराच्या पिल्लाला विषबाधा झाली होती.”

डेलाने तिच्या भुवया उंचावल्या. “फ्रँकलीनच्या परतण्याशी विषबाधित पिल्लाचा काय संबंध आहे?”

“कदाचित खूप आहे. कदाचित काही नाही.”

“कुठल्या प्रकारे?”

“तो एक अंतर्गत प्रकार आहे.”

“का? अंतर्गत का?”

“कारण दुपारी तीननंतर ते पिल्लू बाहेर होते, असे वाटत नाही. काय घडले असेल, ते ते शोधत आहेत. विषबाधेची लक्षणे साधारण पाचच्या सुमारास दिसू लागली. डॉक्टर म्हणाले की पिल्लाला इथे आणण्यापूर्वी पंधरा ते वीस मिनिटांपेक्षा जास्त आधी ते दिले गेले नसेल. म्हणजे सव्वापाच वाजता.”

डेला स्ट्रीटने विचारले, “कुठल्या प्रकारचे विष? माणसाला दिले जाते, त्या प्रकारचे का?”

मेसनने कबूल केले, “वरवर पाहता ही स्ट्रायचीनची विषबाधा होती. स्ट्रायचीनची चव कडू असते. मासाच्या लहान गोळ्यात ते हुशारीने घातले, तर ते प्राणी खातात, कारण प्राणी सहसा चर्वण करत नाहीत, गिळतात. पण मनुष्यप्राण्याला, विशेषतः जर शिजवलेल्या मासात ते घातले तर ती कडू चव तो ओळखतो.”

“आणि तुझी इच्छा आहे की रात्री मी तुझ्याबरोबर यावे.”

“लीच नावाचा माणूस आपल्याला फ्रँकलीन लपून बसलेली जागा दाखवणार आहे.”

“तो का लपला आहे?”

मेसन हसला.

“प्रथमतः तो नाहीसा का झाला? डेला, मला याचे नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे. पुरेसा वास्तववादी असलेला, एकोणतीसच्या आपटीनंतर जो खोऱ्याने पैसा ओढत होता असा, आयुष्यात जे जे पाहिजे, ते सर्व मिळवलेला मनुष्य, अचानक एकही पैसा न घेता नाहीसा व्हावा!”

डेला स्ट्रीट म्हणाली, “कदाचित तो लांब कुठेतरी ठेवलेले पैसे राखून असेल.”

“मेसनने निदर्शनाला आणले, “हल्लीच्या संपत्तीकर भरायच्या दिवसात नव्हे.”

“त्याने काही कागदपत्रे दडवली असतील.”

“कमी उत्पन्न असलेल्या माणसाने असे केलेही असते, पण फ्रँकलीन शोअरचे व्यवहार खूप गुंतागुंतीचे होते. नाही, डेला, आपण एक जुनाट समस्या सोडवायच्या मागे आहोत. याची सोडवणूक रुचीपूर्ण व खूप उद्दीपित करणारी असेल. तुला हेलनने रंगवलेले माटील्डा शोअरचे चित्र बघायचे आहे का? जिच्या

हावरट हातात लक्षावधी डॉलर्स आहेत, अशी एक वाईट स्वभावाची, जीवनाच्या शेवटाकडे आलेली, ठाम निर्धाराची पण दातावर साचलेल्या किटाणासारखी त्रासदायक, चिवचिवाट करणाऱ्या लव्हबर्डसचा छंद असलेली, स्वतःला कोरियन म्हणवणाऱ्या पण जपान्यांप्रमाणे वागणारा, दिसणारा व बोलणारा नोकर असलेली अशी ती बाई आहे. ती एकाच गोष्टीकरता थांबलेली आहे --- शेवटी तिचा नवरा जेव्हा परतेल, तेव्हा ती तिथे असेल अशी इच्छा बाळगणारी. चल डेला, गुन्हा शोधण्यामधील नवीन साहस करण्यासाठी तयार हो!”

चेहऱ्यावर नकोसे भाव दाखवत, ती बोलली, “अजून गुन्हा घडलेला नाही.” टोपी ठेवलेल्या जागी जात व कोटावर छडी मारत, मेसन बोलला, “ठीक आहे. निदान आपल्याकडे केलेला एक गुन्हा तरी आहे.”

“तो कुठला?”

“मांजराचे पिल्लू.”

तिने विचारले, “विष घातलेल्या पिल्लाची केस?”

तिने तिची वही व अर्धा डझन पेन्सिली तिच्या पर्स मध्ये ठेवल्या आणि कसली तरी काळजी वाटत असल्यासारखी बाकाच्या कडेला उभी राहिली.

पेरीने अधीरपणे विचारले, “चलतेस?”

“मेसन, तू कधी “मांजराच्या पिल्लाला खातांना पाहिले आहेस का?”

“तू बदकाला पोहताना पाहिले आहेस का?”

“मांजर सहसा त्याचे अन्न निवडून खाते. ते विषबाधित मासाचे तुकडे खाण्यासाठी, पिल्लू खूप भुकेलेले असले पाहिजे.”

“मला वाटते ते पिल्लू निष्काळजी असले पाहिजे, एवढेच. चल लवकर.”

डेला मान हलवत बोलली, “फार निष्काळजी! मला वाटते, मी जेव्हा ही फाईल उघडेन, तेव्हा या केसला मी ‘निष्काळजी पिल्लाची केस’ असे म्हणेन.”

## प्रकरण ५

कॅसल गेट हॉटेलकडे निघालेल्या मेसनच्या गाडीत बसलेल्या डेलाने विचारले, “फ्रँकलीन शोअरने त्याची सगळी संपत्ती त्याच्या बायकोच्या नावावर केली होती का?”

“मला वाटते, हो. जवळजवळ सगळी. त्यांचे बँकेतील खाते एकत्र नावाने होते.”

“तो घरातून नाहीसा झाला, त्याच्या किती आधी?”

“मला वाटते, तीन ते चार वर्षे आधी असेल.”

“मग जर तिला त्याला घरी परतून द्यायचे नसेल, तर ती तसे करू शकते –“

मेसन मध्येच बोलला, “त्याला शारीरिक दृष्ट्या ती तसे करू शकत नाही. पण पैशांच्या बाबतीत त्याला लज्जित करून, ती तसे करू शकते. समजा, तो आल्याच्या क्षणापासून, तिने त्याला घटस्फोटाची नोटीस दिली व संपत्ती तिच्या नावे बक्षीसपात्र करण्याबद्दल विचारले आणि सर्व संपत्तीपैकी अगदी थोडी त्याच्या सांगेल.”

“ती असा बेत आखत असावी, असे तुला वाटते का?”

मेसन बोलला, “तो मला भेटण्यासाठी थांबणार आहे, याचे काही कारण असले पाहिजे. मला नाही वाटत, की त्याला मी डोळे मिचकावण्याचा खेळ खेळायला हवा आहे.”

नंतर खूप चौक ओलांडतांना ते गप्प होते. मग डेलाने विचारले, “आपण इतरांना कुठे भेटायचे आहे?”

“कॅसल गेट हॉटेलपासून एक चौक अलीकडे.”

“ती कशा प्रकारची जागा आहे?”

”ही दुसऱ्या दर्जाची हॉटेलच्या तळाशी, त्याच्या पुढ्यातील मोकळया जागी, लाकडी सजावट केलेली जागा आहे.”

“आणि हेन्री लीचला तुम्ही व हेलन किंडलने एकटे यायला हवे आहे?”

“हो.”

“आपण चौघे दिसलो, तर तो हरकत घेईल?”

‘मला माहिती नाही. याला काही विशिष्ट दृष्टीकोन आहेत. मला तू टिपणे घ्यायला हवी आहेस, म्हणजे तो काय म्हणाला, व काय म्हणाला नाही, हे मला नीट कळेल. पुढील कोपऱ्याशी आपण दुसऱ्या सर्वांना भेटणार आहोत. इथे गाडी लावायला चांगली जागा आहे.”

मेसनने गाडी त्यावर अंकुश राहील, अशी लावली. दिवे मालवले व गाडी बंद केली. डेलाला उतरायला मदत केली आणि दरवाजे कुलुपबंद केले. दाराच्या सावलीतून दोन आकृत्या बाजूला झाल्या. जेराल्ड शोअर हस्तांदोलनासाठी पुढे आला. हळू आवाजात ओळखी करून घेतल्या गेल्या.

मेसनने विचारले, “सर्व काही ठीकठाक?”

“मला वाटते, हो.”

“तुझ्या मागावर कुणी नाही ना?”

“आमच्या माहितीप्रमाणे नाही.”

हेलन केंडल म्हणाली, “माझी खात्री आहे, की कुणीही आमचा पाठलाग करत नव्हते.”

जिथे जवळच्या, 'कॅसल गेट हॉटेल, एक खोली, एक डॉलर व वरती. महिन्याचे भाडे, फक्त काही काळासाठी' अशी मोठ्या शहरातील, पुसट, मलीन पाटी असलेल्या घराच्या वरील टोकाच्याही वर गेलेली एक रिकामी भिंत होती, अशा पुढील चौकातील इमारतीकडे बघून, मेसनने मान हलवली.

मेसनने हेलन केंडलचा हात धरला. "तू आणि मी आधी जाऊ." तो म्हणाला. "शोअर तू व डेला स्ट्रीट नंतर वीस, तीस सेकंदाने या. आम्ही लिफ्टमधून वर जाईपर्यंत, तुम्ही आमच्याबरोबर असल्याचे भासवू देऊ नका."

जेराल्ड शोअर चलबिचल करू लागला.तो म्हणाला, "शेवटी मला माझ्या भावाला, फ्रँकलीनला, भेटायचे आहे. या लीच नावाच्या माणसाची मी काही पर्वा करत नाही. जर माझ्या आस्तित्वामुळे तो घाबरणार असेल, तर मी गाडीत बसून रहायला तयार आहे."

"मिस स्ट्रीट माझ्याबरोबर येईल. म्हणजे आम्ही तिघे होऊ. तू येणार असलास, तर आपण चार होऊ."

शोअरने अचानक काही निर्णय घेतला. "नको, मी इथे गाडीत थांबतो. पण तुम्ही माझ्या भावाला भेटाल, त्या क्षणी त्याला मी इथे असल्याचे सांगा. आणि त्याने कुणाशी बोलण्यापूर्वी मला त्याला नुसते बघायचे आहे. समजले का? तो कुणाशी बोलण्यापूर्वी."

मेसनने या माणसाकडे प्रश्नार्थक नजरेने बघितले. "तो माझ्याशी बोलण्यापूर्वी?"

"कोणाशीही."

मेसनने मान हलवली. जर तुला असे काही सांगायचे असेल, तर तू स्वतःच ते सांग. त्याने मला बोलावले आहे. मला वाटते, त्याला माझा व्यवसायिक सल्ला घ्यायचा असावा.”

शोअरची भुवई नम्र झाली. ”माझी चूक झाली, सल्लागार. मला माफ करा. पण मी इथे थांबून रहातो. माझा भाऊ त्या हॉटेलमध्ये आहे की नाही, याबद्दल मला शंका आहे. जेव्हा तुम्ही लीचबरोबर बाहेर याल, तेव्हा मी तुम्हाला येऊन मिळेन.”

तो मागे एका कोपऱ्याशी जाऊन थांबला. तिथे त्याने त्याची गाडी उघडली आणि आत जाऊन बसला.

मेसन हेलनकडे बघून, परत खात्री देत हसला. तो बोलला, “आपण आता जाऊ या.”

सुनसान पॅसेजमधून, ते प्रतिध्वनी काढत जुन्या हॉटेलच्या प्रवेशदाराकडे चालू पडले. दोन तरुण स्त्रियांसाठी मेसनने दार उघडून धरले व त्यांच्या मागून आत गेला. तो पॅसेज साधारणपणे वीस फूट रुंद होता. त्याच्या शेवटी एक अर्धगोलाकार बाक होते व त्यामागे स्विचबोर्ड होता. तिथे एक कंटाळलेला कारकून, एक खूप भडक रंगाचे, खरेखुरे गुप्तहेरकथांचे मासिक वाचत बसला होता. त्याच्या विरुद्ध बाजूंनी दोन लिफ्ट होत्या. तिथे लॉबीमध्ये पंधरा वीस खुर्च्या होत्या. त्यातील बहुतेक ओळीने भिंतीशी मांडलेल्या होत्या. या खुर्च्यात बसलेल्या अर्धा डझन मरगळलेल्या लोकांनी प्रथम सहज व नंतर मोठा रस घेऊन, बारीक कंबरेच्या त्या दोन कृश स्त्रियांकडे व त्यांच्यामागून येणाऱ्या उंच वकीलाकडे पाहिले.

बाकावरील कारकूनाने मासिकातून डोके काढून, वर बघितले व त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी त्यांना मान दिला.

मेसनने विचारले, “इथे हेन्री लीच नावाच्या माणसाने नोंदणी केली आहे का?”

“हो.”

मेसनने विचारले, “तो इथे बरेच दिवस आहे का?”

“सुमारे एक वर्ष.”

“खरे की काय? त्याचा खोली क्रमांक काय?”

“तीनशे अठरा.”

“कृपया, तुम्ही त्याला फोन कराल का?”

टेलिफोन ऑपरेटरचेही काम करणाऱ्या कारकुनाने स्विचबोर्डकडे वळून, एक लाईन जोडली. एक बटण बरेच वेळा दाबले व डाव्या कानाला फोन लाऊन ठेवला. त्याचे डोळे डेला स्ट्रीटचा व हेलन केंडरचा वेध घेत होते. ते त्याने चालूच ठेवले.

“मला माफ करा. तो खोलीत नाही आहे.”

मेसनने त्याच्या घड्याळाकडे पाहिले. तो मला इथे यावेळी भेटणार होता.”

कारकून बोलला, “मला नाही वाटत, तो इथे होता. दोन तीन तासांपूर्वी एक माणूस त्याला भेटायला आला. मग तो बाहेर गेला. मी त्याला परत आलेले पाहिले नाही --- “ एक कुणी विशेष निरोप्या तिथे आल्यामुळे, तो बोलायचा थांबला.

तो निरोप्या बोलला, “कॅसल गेटच्या कारकुनाकडे विशेष काही द्यायचे आहे.” कारकुनाने ते घेऊन सही केली. ते पत्र उघडून वाचले. मग मेसनकडे बघत तो म्हणाला, “तुम्ही पेरी मेसन आहात का?”

“हो, बरोबर.”

“मला वाटते, लीच तुम्हाला भेटणार होता. हे खरे तर तुमच्यासाठी आहे --- पण त्याने ते माझ्याकडे द्यायला सांगितले आहे.”

कारकुनाने ते मेसनच्या हवाली केले. त्यावर निरोप टंकलिखित केलेला होता.

*‘कॅसल गेटच्या कारकुनासाठी,*

*आज रात्री एक पेरी मेसन नावाचा वकील असलेला गृहस्थ माझी विचारणा करेल. त्याला कृपया सांगा, की मी ठरवलेल्या वेळी येऊ शकत नाही. पण त्याने खाली उल्लेखलेल्या ठिकाणी ताबडतोब यावे. दुर्दैवाने परिस्थितीमुळे मला बेत बदलावा लागतो आहे. त्याला हॉलीवूडच्या मागे उंच रस्त्यावर असलेल्या तळ्याशी यावे. इथे नकाशा काढून दाखवला आहे. पुन्हा एकदा बेत बदलल्याबद्दल माफी मागतो, पण तो अंमलात आणणे शक्य नव्हते.*

*हेन्री लीच*

सही व निरोप टंकलिखित केलेला होता. त्यातील नकाशा हा हॉलीवूड व त्याच्या जवळपासचा खास तयार केलेला नकाशा होता. त्यातील हॉलीवूडचे रस्ते शाईने दाखवले होते. ते उजवीकडे आयव्हर रस्त्याला मिळत होते. नंतर ते पाणी साठवणुकीची जागा असा एक भाग दाखवत होते.

कारकून बोलला, “मला वाटले, तो काही तासांपूर्वी बाहेर गेला व मी त्याला परत आलेले पाहिले नाही.”

मेसनने त्या पत्राचा अभ्यास केला.पत्र व नकाशा कसातरी गुंडाळला व कोटाच्या बाजूच्या खिशात ठेऊन दिला.

तो म्हणाला, “आपण जाऊ या, चला.”

# प्रकरण ६

दोन मोटारींचे पुढचे दिवे परत परत हलत होते व वळत होते. झगमगीत गोलांच्या कडा कापत व अंधारमय खोलगट दऱ्यांवर समांतर कोनांचे हलते प्रकाशकिरण टाकत, मोटारी जात होत्या. डोंगरातील वळणदार चढ चढत, गाड्या चालल्या होत्या. मेसनबरोबर डेला असलेली गाडी पुढे होती. जेराल्ड शोअर व त्याची पुतणी असलेली गाडी त्यांच्या मागून जात होती.

सफाईदारपणे रस्त्यातील वळणे घेत, मेसनने डेलाला विचारले, "त्या सूचना देणाऱ्या पत्रात तुला काही विचित्र वाटले का?"

तिचे डोळे नकाशा व रस्ता यावरून फिरवत, डेला उत्तरली, "मी ते लिहिणाऱ्या माणसाला ओळखत असल्यासारखा, त्यात पुसटसा ओळखीचा सूर भासत होता. लिहिण्याची पद्धत --- असे तू म्हणू शकतोस."

मेसन हसला. जर तू ते योग्य स्वरात वाचताना ऐकले असतेस, तर तू क्षणार्धात तो आवाज ओळखला असतास."

"तुला काय म्हणायचे आहे, मला समजले नाही."

मेसन बोलला, "मोठ्याने वाचतांना, वाकायचा व हसायचा प्रयत्न कर. त्यात भाव न आणता एकसुरी आवाजात वाच आणि तुला काय सापडते, ते बघ."

डेलाने पत्र पाकिटातून काढून,वाचायला सुरवात केली. चौथ्या ओळीच्या शेवटी, ती म्हणाली, अरे देवा असे तर जपानी लोक लिहितात."

मेसन बोलला, “जरी तुम्ही मुद्दाम तसे करायला गेलात तरी, ते पत्र जास्त जपानी वाटले नसते. सहीदेखील टंकलिखित आहे --- आणि पत्र केवळ ‘कॅसल गेट हॉटेलच्या कारकुनाला पाठवले आहे. लीच तिथे एक वर्ष रहातो आहे. त्याला कारकुनाचे नाव नक्कीच माहिती आहे आणि तो त्या नावाने पत्र पाठवू शकला असता.”

“मग तुला असे वाटते आहे का, की आपल्याला लीचला शोधता येणार

नाही. हे उगीच वेळ फुकट घालवणे आहे का?”

“मला माहिती नाही. मला ती विचार करण्याची फक्त विशिष्ट लकब जाणवली व नवल वाटले की तुलाही ती तशीच जाणवली का हे विचारावे.”

“आधी मला हे जाणवले नाही. जर मी ते मोठ्याने वाचलेले ऐकले असते, तर कदाचित जाणवले असते. आता तू ते दाखवून दिल्याने ते अगदी स्वच्छ जाणवते आहे.”

मेसनने सेकंदात गाडी वळवून, दुसऱ्या गिअरमध्ये टाकली. खूप वेळ त्याचे हात व दंड कामात होते. गाडी आता सरळ रस्त्यावर होती. पण त्यांच्या आजूबाजूला डोंगररांग होती. त्यावरती अचल तारे होते. खाली व मागे चमचमणाऱ्या प्रकाशात मोठी चंद्रकोर दिसत होती. मैलोनमैल दूरवर लॉस एंजल्स, हॉलीवूड आणि उपनगरे दिसत होती. सलग टोकेरी प्रकाशकिरणे निऑन साइन्सच्या विविध रंगातून, इकडे तिकडे पसरत होती. ते ज्यावरून चढून आले, त्या जणु चमकत्या सागरात डोंगरांच्या कडांच्या रेषा शांतपणे उठून दिसत होत्या.

मेसनने गाडी मागे घेतली. गाडीच्या मशीनमध्ये जाणाऱ्या पेट्रोलचा दाब कमी केला आणि त्या मोठ्या गाडीच्या शक्तिशाली इंजिनातून, अगदी बारीकसा आवाज

येत राहिला. खिडक्यांमधून, डोंगरांवरील शांतता आत येत होती. फक्त टायर्सच्या रस्त्याबरोबरील घर्षणामुळे तो आवाज फाटत होता. घुबड व्हू व्हू व्हू ओरडत होते. क्षणभराने, मेसनच्या गाडीच्या आरशातून मागून येणाऱ्या जेराल्ड शोअरअच्या गाडीचे दिवे दिसू लागले. त्यांची प्रभावित प्रकाशकिरणे पडून, मेसन आंधळयासारखा झाला. पण नंतर त्याला ती गाडी दिसल्यामुळे, तिथे उभ्या केलेल्या अनेक गाड्यांच्या गर्दीत, त्याने त्याची गाडी झरकन उजवीकडे घेतली.

काही यार्ड अंतरावर, रस्ता कसाही वळला होता आणि युकॅलिप्टसच्या झाडांची गोलाकार सीमा तयार झाली होती.

डेला बोलली, "हीच ती जागा."

मेसनने गाडी रस्त्याच्या कडेला दाबून लावली. जेराल्ड शोअरने त्याची गाडी मेसनच्या गाडीच्या मागे लावली. दोन्ही चालकांनी गाडीचे दिवे मालवून इंजिन बंद केले.

लगेचच डोंगरांची शांतता तिथे पसरली. मेसनच्या गाडीच्या छपराखालील एका थंड गाडीने कडकड असा आवाज केला आणि लवकरच तो कडेच्या शांततेत मोठ्या स्फोटाच्या आवाजात बदलला. मागून येणारा जेराल्ड शोअरचा पायरव नेहमीपेक्षा मोठा वाटत होता.

सभोवतालच्या शांततेप्रमाणे, आवाज शांत करत, जेराल्ड शोअर बोलला, "ती मागे असलेली गाडी, तीच ती असली पाहिजे. पण त्यात मला कोणी दिसत नाही."

डेलाच्या हसण्याचा आवाज एक विशिष्ट सूर होता. “ही जागा काही खास वाटत नाही.” ती हे गंभीरपणे न बोलता अनिश्चित सुरात बोलली. “मंगळवारी रात्रीच भेटायचे ठरले होते, हे नक्की का?”

जेराल्ड शोअरच्या मागून हेलनचा आवाज काळजीचा असून वरचा होता. “त्या गाडीत चालवायच्या चक्रामागे कुणीतरी बसले आहे. तो हलत नाही आहे. नुसता बसून, थांबून राहिला आहे.”

शोअरने विचारले तुमच्याकडे प्रकाशझोत टाकायला काही आहे का? मला या सर्व प्रकारामुळे बेचैन वाटते आहे. मला कळत नाही माझ्या भावाला भेटायला यायचे तर त्याने असा सापळा का रचला आहे,”

मेसन म्हणाला, “मी झोत टाकायला काहीतरी आणतो. त्याने गाडीची डिकी उघडून, एक तीन सेल असलेली विजेरी बाहेर काढली व बोलला, “चला, आपण जाऊ या.”

ते रस्त्याने मागे जाऊ लागल्यावर त्यांनी एक गट तयार केला. विजेरीच्या प्रकाशाचा एक पांढरा गोल जमिनीवर तयार केला.

मोटारी अंधारात शांतपणे काही हालचालीविना उभ्या होत्या. त्यांच्यात जिवंतपणाचे काही चिन्ह नव्हते.

एकाएकी मेसनने झोत वर टाकला. त्यामुळे खिडकीवर उजेड पडला. हेलन केंडलच्या ओठांवर आलेली भीतीची किंकाळी तिने अर्धी दाबून ठेवली.

गाडी चालवायच्या चक्रावर प्रेत कसेतरी लटकलेले होते. मुंडके एका बाजूला पिरगळून खांद्यावर पडलेले होते. काही भयानक घडलेले असल्याची ग्वाही देत, डाव्या कानशीलापासून, लाल ओघळ वहात होता. गालाच्या हाडामुळे तो

विभागला गेला होता. मेलेल्या मासाशी त्या रंगाचा विरोधाभास उठून दिसत होता. आतील प्रेतावर विजेरीचा झोत टाकत, मेसन स्तब्ध उभा राहिला. त्याने मागे वळून जेराल्ड्ला म्हटले, "हा मनुष्य लीच असल्याचे बहुधा तू ओळखणार नाहीस."

"नाही. मी त्याला कधीच भेटलो नाही. व जेराल्ड्ला गाडीतील दृष्य नीट दिसेल, अशा तऱ्हेने थोडे बाजूला सरकत मेसनने विचारले, "हा तुझा भाऊ नाही?"

"नाही."

"तुझी खात्री आहे?"

"हो."

क्षणभर मेसन ठाम राहीला व नंतर बोलला, "खुनाच्या केसेस बघणारा लेफ्टनंट ट्रॅग नेहमी म्हणतो, की मी प्रेते हलवून, कायद्याचा भंग करतो. पोलिसांनी ही केस ताब्यात घेण्यापूर्वी, पुरावर नष्ट करतो. या वेळेस मी माझ्यावर असा संशय येऊ देणार नाही. जर मिस केंडल इथे थांबायला घाबरत नसेल, तर मी तुम्हाला दोघांना प्रेताची राखण करायला सोडून, मी आणि मिस डेला घाईने जवळील एखाद्या फोन बूथवर जाणार आहोत आणि या खुनाची खबर देणार आहोत."

शोअरने मिनिटभर हो नाही केले पण शेवटी बोलला, "हे फक्त फोनवरून कळवणे होईल. मला इथे एकाहून जास्त साक्षीदार हवे आहेत."

मेसनने डेलाला विचारले, "तू इथे थांबायला तयार आहेस का?"

तिने त्याच्याकडे बघितले.

"ठीक आहे, मिस केंडल तुमच्या काकूचा फोन क्रमांक काय आहे?"

"रॉक्सवूड ३ – ३९८७ का? तुम्ही तिला कळवणार आहात का?"

मेसन म्हणाला, “नाही, पण मला वाटते मी घरी फोन करतो. मला घरच्या पोऱ्याला एक प्रश्न विचारायचा आहे.”

मेसन त्याच्या गाडीत उडी मारून बसला. घाईने दार लावले आणि दुसऱ्या गिअरमध्ये वाऱ्याच्या वेगाने निघाला. जिथे त्याला उजेड दिसला अशा पहिल्या घराशी तो थांबला व पायऱ्या चढून, घंटी वाजवली.

ते कॅलीफोर्नियात असतात, तसे डोंगराजवळील काहीसे भपकेबाज घर होते. रस्त्याच्या बाजूला एक मजला होता. मग अनेक मजले व गॅलऱ्या रस्त्याच्या विरुध्द खालील बाजूला होत्या.

मेसनने एक माणसाची आकृती पॅसेजमधून सावकाश हलतांना पाहिली. बाहेरचा दिवा लागला. त्याच्या डोळयावर लखलखत्या उजेडाची तिरीप पडली. दारातील एक लहानशी खिडकी उघडली. करडे डोळे वकीलाला न्याहाळत म्हणाले, “काय काम आहे?”

मेसन बोलला, “माझे नाव पेरी मेसन आहे. मला तुमचा फोन वापरून, टेकडीच्या माथ्यावर तलावाशेजारी असलेल्या गाडीतील खुनाची माहिती पोलिसांना द्यायची आहे.”

त्या माणसाने विचारले, “पेरी मेसन, वकील?”

“हो.”

“मी तुमचे नाव ऐकले आहे. आत या.”

दार उघडले. जाकीट व सपाता घातलेल्या त्या व्यक्तीने चौकसपणे मेसनकडे पाहिले.

मी तुमच्याविषयी वर्तमानपत्रात खूप वाचले आहे. मी अशा तऱ्हेने तुम्हाला भेटेन, असे वाटले नव्हते. त्या लहानशा टेबलावर फोन आहे.''

मेसनने त्याचे आभार मानले. पोलिसांना फोन केला व लेफ्टनंट ट्रॅग आहे का विचारले. काही क्षणांनी, झटपट लेफ्टनंट ट्रॅगचा चुरचुरीत आवाज फोनवर ऐकू आला.

तो वकील बोलला, ''मी पेरी मेसन. मला काही सांगायचे आहे.''

ट्रॅग म्हणाला, ''तू मला तुला दुसरे प्रेत सापडल्याचे सांगणार नाही आहेस, ना?''

मेसनने झटपट उत्तर दिले. ''नक्कीच नाही.''

''तर मग ठीक आहे. मग काय झाले आहे?''

मेसन म्हणाला, ''मी मृत व्यक्ती शोधायचे सोडले आहे. पण माझ्या बरोबर असलेल्या एका व्यक्तीला हॉलीवूडच्या डोंगरावर, तलावाशेजारील गाडीत एक मृत व्यक्ती सापडली आहे. जर तू लगेच निघणार असशील, तर मी तुला हॉलीवूड व आयव्हरच्या कोपऱ्यावर भेटतो आणि वरील रस्ता दाखवतो.'' लेफ्टनंट ट्रॅग काळजीपूर्वक पण नम्रपणे बोलला, ''ओहो, तुझ्याबरोबरील कुणाला तरी मृत व्यक्ती सापडली आहे.''

''हो, बरोबर.''

विरोधाभासात्मक रीत्या चिडवत, ट्रॅग बोलला, ''ज्याअर्थी तू तुझा वाटा पूर्ण केला आहेस, त्याअर्थी मी असे समजतो, की तुझी सर्वथा लायक सचिव याचे श्रेय घेणार का?

मेसन बोलला, “खुनाचा तपास करण्याऐवजी, तू फोनवर शहाणपणा करत बसणार असलास, तर वर्तमानपत्रात छापून आल्यावर कसे वाटेल पहा.”

“ठीक आहे. तू जिंकलास. मी बाहेर पडतो.”

मेसनने रॉक्सवूड ३ – ३९८७ हा क्रमांक फिरवला. बराच वेळ दुसऱ्या

बाजूला घंटी वाजत राहिली. नंतर एका बाईने फोन उचलला. तिने कडकपणे

उच्चरवात विचारले, “हं, बोला. काय झाले आहे?”

“तुमच्याकडे एक जपानी पोऱ्या कामाला आहे का? मला त्याच्याशी बोलायला --- “

“तो जपानी नाही आहे. तो कोरियन आहे!”

असो. कुणी का असेना, मला त्याच्याशी बोलायचे आहे.”

“तो इथे नाही आहे.”

“ओहो, तो नाही आहे?”

“नाही.”

मेसनने विचारले, “तो केव्हा गेला?”

“साधारण एक तासापूर्वी.”

“आपण कोण आहात?”

“मी स्वयंपाकीण व घर सांभाळणारी बोलते आहे. आज रात्री मला सुट्टी होती. पण तो नसल्याने मी इथे आले व मला फोन आले तर ते घ्यायचे काम करायला सांगितले आहे.”

“तो कोरियन नोकर पूर्ण संध्याकाळभर घरात होता का?”

“खरे तर मला --- तसे सांगता येणार नाही. मला वाटते, थोडा वेळ तो बाहेर गेला होता.”

“आणि आता तो कुठे आहे?”

“बाहेर.”

“याहून जास्त माहिती तुम्ही मला देऊ शकत नाही का?”

“नाही.”

“मी मिस्टर मेसन बोलतो आहे. मी जेराल्ड शोअरच्या वतीने बोलतो आहे. मला तो मुलगा आता कुठे आहे, ते हवे आहे.”

“तुम्ही शोअरच्या वतीने बोलत आहात?

‘बरोबर.”

“जर मी तुम्हाला कोमो कुठे आहे, ते सांगितले, तर --- काही त्रास उद्भवणार नाही ना?”

“नाही. मी त्याची काळजी घेईन.”

तो मिसेस शोअरना घेऊन, एक्झेटर दवाखान्यात गेला आहे.”

“एक्झेटर दवाखान्यात?” मेसन आश्चर्याने परत बोलला.

“हो. त्या अचानक आजारी पडल्या. असे वाटत होते, की आता त्या --- “

मेसनने विचारले, “आता त्या काय?”

“काही नाही.”

“हे कधी झाले?”

“मला वाटते, पावणेनऊला.”

“आता त्या काय?”

विषबाधा --- पण हे मी सांगितल्याचे कुणाला सांगू नका.” आणि फोन ठेऊन दिला.

## प्रकरण ७

हॉलिवूडच्या रस्त्यांच्या तुंबलेल्या गर्दीतून कशीबशी वाट काढत, खुनाच्या शोधपथकाची गाडी मोठ्याने आवाज करत चालली होती. रस्त्याने चालणारे लोक थबकून, लाल दिवा जाऊन वाहतूक परत सुरळीत सुरु होईपर्यंत, त्या जोराने आवाज करत जाणाऱ्या गाडीकडे बघत होते.

मेसन त्याने थांबवून ठेवलेल्या त्याच्या गाडीच्या पुढे आला. त्याच्या अंगावर पोलिसांच्या गाडीचा झोत पडत होता. तो मोठी गाडी थांबली. दार उघडून, लेफ्टनंट ट्रॅग बाहेर आला व थोडक्यात बोलला, “आत बस.”

मेसन गाडीत चढला. लेफ्टनंटच्या शेजारील मागील जागा त्याच्यासाठी रिकामी ठेवलेली असल्याचे त्याने पाहिले. लेफ्टनंट ट्रॅगने विचारले, “कुठे जायचे?”

मेसनने त्याच्या खिशातील घडी केलेला नकाशा काढला. “यावरून दिशा कळेल.”

“तू कसा आलास?”

“मी पत्रात सांगितल्याप्रमाणे आलो.”

“पत्र कुठे आहे?”

मेसनने पत्र दिले. ट्रॅगने ते घेऊन ठेवले. पण वाचले नाही.

गाडी चालवणाऱ्या ऑफिसरने सूचनेसाठी मागे ट्रॅगकडे पाहिले.

ट्रॅग बोलला, “फ्लोयड, मिनिटभर दमाने घे. गाडीतील माणूस मेला आहे. आपल्याला गोंधळवून टाकेल, अशी काही हालचाल तो करणार नाही आहे. मिस्टर मेसन मात्र जिवंत आहेत.”

मेसनने हसून विचारले, “म्हणजे मी काही गोंधळवून टाकणाऱ्या हालचाली करणार आहे?”

ट्रॅग बोलला, “असे बघ. शक्य असेल तेव्हा, मला तुझी मुलाखत घ्यायला नेहमीच आवडते. तू नुकत्याच केलेल्या साहसामुळे मला इथे येणे भाग पडले आहे. मला कधीकधी त्यामुळे गोष्ट सोपी जाते.”

“मी काही प्रेत शोधून काढले नाही.”

“नाही? मग कोणी काढले?”

“जेराल्ड शोअर नावाच्या वकिलाने.”

“मी हे नाव कधीच ऐकले नाही.”

“तो कोर्टात व गुन्हेगारीत फारसे काम करत नाही. मला वाटते तुला तो त्याच्या व्यवसायातील फार मान देण्यासारखा माणूस वाटेल.”

जेव्हा मेसनने त्याच्याकडे पाहिले, तेव्हा त्याला लेफ्टनंट ट्रॅगच्या डोळ्यात ओढून ताणून आणलेले कौतुक दिसले. लोकप्रिय पोलीस गुप्तहेर कसा असावा या संकल्पनेला तडा देणारा असा ट्रॅग होता.

मेसनइतका उंचही नव्हता, तो बारीक, शहरी मान्यताप्राप्त संस्कार असलेला, आत्मविश्वास असलेला व त्याच्या व्यवसायाची पुरेशी जाण व आस असलेला होता. जेव्हा लेफ्टनंट ट्रॅग माग काढू लागे तेव्हा सहजपणे त्याचे लक्ष विचलित होत नसे. त्याच्याकडे कल्पनाशक्ती व धाडस होते. जणू त्या पत्राचे पुरावा म्हणून असलेले वजन किती आहे, हे आजमावत, ट्रॅग ते हातात तोलत बोलला, “हे पत्र तुला कुठे मिळाले?”

“‘कॅसल गेट हॉटेलच्या कारकुनाकडून.”

“ओहो, हो. कॅसल गेट हॉटेल. बहुधा दुसऱ्या दर्जाचे, वाईट प्रकरण! आणि मेसन, जर तुला रुची असेल तर सांगतो, ते आमच्या फारशा चांगली कीर्ती नसलेल्या लोकांशी मित्रत्वाने वागणाऱ्यांच्या यादीमध्ये, आहे. तू त्याबद्दल कदाचित काही ऐकले नसशील.”

“नाही, मी काही ऐकलेले नाही.”

“काही झाले तरी, थांबायची जागा म्हणून तू ते निवडलेस खरे!

मेसनने कबूल केले, “ते बरोबर आहे. पण मी काही तिथे उतरलो नव्हतो.”

“त्यामुळे हे विचारणे तर्काला धरून होईल, की तू तिथे काय करत होतास? फ्लोयड, आता पुढे गाडी हळू चालव. इथ आपले बोलणे ऐकू जाईल असे बरेच लोक आहेत.”

पुढे बसलेला एक ऑफिसर बोलला, “मी त्यांना चालायला सुरवात करायला व चालत रहायला लावू शकतो.”

ट्रॅगने मेसनवरील दृष्टी न ढळवता अधीरपणे आज्ञा दिली, “नको. नको. गाडी चालवत रहा. गर्दी हटवायला वेळ लागतो. मिस्टर मेसनना त्यांच्या मनात त्यांची ती गोष्ट ताजी असेपर्यंत, सांगायची आहे, नाही का, मेसन?

तो वकील हसला.

ट्रॅगने बसायच्या पुढील जागी नकाशा उलगडला. “फ्लोयड, हा नकाशा घे.” यात दाखवल्यामाणे रस्ता घेत जा. मी तुला तसे सांगेपर्यंत तिला बंदूक देऊ नको. मेसन, आता तू मला सांगत होतास की तू कॅसल गेट हॉटेलमध्ये का गेलास?”

“मी तिथे एका माणसाला भेटायला गेलो. जर तू पत्र वाचलेस, तर तुझ्या लक्षात येईल.”

अजूनही पत्र हातात धरून, पण वकीलावरची नजर न हलवता, ट्रॅगने विचारले, “त्या माणसाचे नाव?”

“हेन्री लीच.”

“आणि तुला त्याला कशासाठी भेटायचे होते?”

हाताने काहीतरी लांब फेकल्याचा आविर्भाव करत, मेसन बोलला, “आता लेफ्टनंट, तिथे मी का गेलो, ते ऐक. मिस्टर लीचनी तसे सुचवल्यावरून, मी त्यांना भेटायला गेलो. त्यांना मला काही सांगायचे होते.”

“हे बोलावणे सरळ लीचकडून आले?”

“नाही.”

“कुणा पक्षकाराकडून?”

“हेलन केंडल आणि मला वाटते, ती माझ्याकडे जेराल्ड शोअर या वकीला मार्फत आली.”

“लीच तुम्हाला काय दाखवणार होता, यसंबंधी त्यांना माहिती होते का?”

“माझ्या माहितीप्रमाणे, मिस्टर लीच आम्हाला अजून एकाकडे घेऊन जाणार होता.”

“ओहो, गूढ पक्षकाराकडे तुला घेऊन जाणारा चमत्कारिक पक्षकार?”

“अगदी तसेच नाही. मी ज्याला भेटणार होतो, तो काही काळापूर्वी घरातून बेपत्ता झाला होता आणि --- “

ट्रॅगने त्याचा हात धरला. अर्धवट डोळे मिटले. दोनदा त्याची बोटे निसटली. तो बोलला, “एक मिनिट थांब --- एक मिनिट थांब. मला आता समजते आहे. त्याचे नाव काय होते?”

मेसन म्हणाला, “फ्रॅंकलीन शोअर.”

‘तेच ते. १९३२ चे मोठे अनाकलनीय बेपत्ता होणे. आता मला तुझा वकील, जेराल्ड शोअर लक्षात आला. लीचला त्या नाहीसे होण्यासंबंधी काही माहिती होते का?”

मेसन बोलला, “अर्थात. मी तुला फक्त मी काय ऐकले, ते खरे खरे सांगतो आहे. ज्यांना खरी पूर्वपीठिका माहिती आहे, अशा लोकांशी संपर्क साधून, तू अजून चांगले काही करू शकतोस.”

ट्रॅग बोलला, “हे प्रकरण गुंतागुंतीचे दिसते आहे. पण मला वाटते, मी प्रथम तुझी गोष्ट ऐकतो.”

मेसन बोलला, “माझ्या माहितीप्रमाणे खरे तर, लीच मिस केंडलला फ्रॅंकलीन शोअरला भेटायला घेऊन जाणार होता. लेफ्टनंट, मला वाटते, तू शहाणा असशील तर प्रयत्न करून लवकरात लवकर तिथे पोच. तिथे पोचल्यावर तुला जो दुवा मिळेल, तो महत्वाचा असेल.”

ट्रॅग बोलला, “हो, मला माहिती आहे. मी कुठल्यातरी निष्कर्षाला पोचणार असतो, तेव्हा तुला नेहमी काही मान्य होण्याजोगा चुकीचा रस्ता दाखवायचा असतो, आणि मला चिडवायचे असते. मी तिथे पोचणारच आहे. पण मेसन, आधी मला हे शोधून काढायचे आहे की --- फ्लोयड, गाडी हळू चालव. मेसन, लीच तुम्हाला फ्रॅंकलीन शोअरला भेटायला घेऊन जाणार होता, हे कसे घडले?”

अधीरतेने मेसनचा आवाज कठोर झाला. “मला माहिती नाही आणि मला वाटते, तू तुझा अमूल्य वेळ वाया घालवत आहेस. हा निरोप मला मिस केंडलतर्फे मिळाला.”

“पण तो नक्की तुला घेऊन जाणार होता का?”

“कोण?”

“अर्थात, लीच. वेळ वाया घालवू नकोस.”

मेसन उत्तरला, “नाही. मला माहिती आहे त्याप्रमाणे, लीच मिस केंडलशी बोलला नव्हता. ज्या लोकांनी तिला लीचकडे पाठवले होते, त्यांच्याशी फोनवर बोलणे झाले होते.”

ट्रॅग बोलला, “अस्स! म्हणजे दुसरे कुणी बोलले आणि मला वाटते, तू म्हणणार की ही कोण लोक होते ते तुला माहिती नाही?”

“नाही. मला ते लोक माहिती नाहीत.”

“अस्स! ते एक निनावी संभाषण होते?”

“लेफ्टनंट, असे मुळीच नाही. माणसाने त्याचे नाव सांगितले. शिवाय त्याला ओळखण्यासाठी, काही रुचीपूर्ण माहिती दिली

ट्रॅगने विचारले, “आणि नाव?”

आता हसण्याची पाळी मेसनची होती. “फ्रॅकलीन शोअर.”

ती माहिती ग्रहण करायला लागलेल्या सेकंदभराच्या वेळानंतर ट्रॅगच्या चेहऱ्यावरील भाव बदलले. मग त्याने चालकाला आज्ञा दिली, “फ्लोयड, गाडी चढव. जेवढ्या जोरात जाता येईल, तेवढे जा. तिथे लवकर जाऊन पोचू --- चल जोरात!”

मेसन मागे टेकून बसला. खिशातून सिगरेट केस काढली आणि एक सिगरेट ट्रॅगला देऊ केली. “मला वाटलेच की तुला तिकडे जायला आवडेल. लेफ्टनंट, घे सिगरेट ओढ.”

“ती बेकार गोष्ट पुन्हा तुझ्या खिशात ठेऊन दे आणि थांब. तुला फ्लोयड माहिती नाही.”

मेसन सिगरेट ओढणार, तोच तो त्याच्या जागेवरून फेकला गेला. अचानक गाडी डगमगत, एक वळण घेत पुढून येणाऱ्या दुसऱ्या गाडीला चुकवत पुढे गेली. ट्रॅगने आज्ञा दिली, “पोंगा वाजत राहू दे आणि गाडीला वेग दे.”

पोंगा विचित्र व भीतीदायक आवाजात वाजू लागला. ती मोठी गाडी चढ चढतांना, वेग वाढवू लागली. मेसनने स्वतःला सावरत, केसमधून सिगरेट बाहेर काढली व ओठांशी नेली. केस परत खिशात ठेऊन दिली. मग सिगरेट पेटवायला अवसर न मिळता, दोन्ही हातांनी तो गाडी घट्ट धरून बसला.

गाडी घाट भरभर चढली. पोंगा जोराने किंचाळत होता व भयानक उंच डोंगरांवर आपटून, त्याचा प्रतिध्वनी येऊन, तो दऱ्यांमध्ये घुमत होता. चालकाने कसब पणाला लाऊन, दोन लाल दिवे अशा कोनात लावले होते, की गाडी
कुठेही वळली, तरी प्रखर दिवे रस्त्यांवर बरोबर उजेड पडत होते.

शेवटी पोलिसांच्या गाडीचे दिवे दोन उभ्या केलेल्या गाड्यांवर पडले. तिथे डेला स्ट्रीट, हेलन केंडल व जेराल्ड शोअर एकत्र उभे असलेले दिसले. त्यांनी पोलिसांची गाडी येतांना पाहिल्यावर, त्यांचे चेहरे पांढरे पडले.

मेसन बोलला, “लेफ्टनंट, तुझ्या गाडीचे दिवे पहिल्या गाडीवर रोख.”

ट्रॅगने विचारले, “त्या लीचचे प्रेत असलेल्या?”

मेसन बोलला, “मला माहिती नाही. मला लीच माहिती नाही.”

ट्रॅगने त्याच्याकडे रोखून पाहिले. “म्हणजे तुला म्हणायचे आहे, की हे प्रेत लीचचे नाही?”

“मला माहिती नाही.”

“मग कुणाला माहिती आहे?”

मेसन म्हणाला, “मी सांगू शकणार नाही, याबद्दल माझी खात्री आहे. आणि माझ्या गटातील कोणी ओळखू शकत असेल, तर मला माहिती नाही.”

पोलिसांची गाडी पूर्णपणे थांबली.

ट्रॅग बोलला, “ठीक आहे आपण आसपास नजर टाकू. मेसन आणि पोलिसांनो, जाऊन, कुणी प्रेत ओळखते आहे का, बघा. जर लेफ्टनंट ट्रॅगच्या विनंतीला मान देऊन पोलीसांनी प्रेताच्या गाडीचे चालवलेले निरीक्षण मेसनने पाहीले असते तर --- पण मेसन फक्त त्याचा आवाज वाढवून ओरडला, “तुम्ही तिघांनी --- इकडे या.”

ट्रॅग रागाऊन बोलला, ”मी तसे सांगितले नाही.”

मेसन म्हणाला, “मला वाटले, तुला ते प्रेत ओळखतात का, हे बघायचे आहे.”

“मला ते हवे आहे, पण त्यांनी इकडे, वाटेत येण्याची काही गरज नाही.”

“ते वाटेत येणार नाहीत. जर त्यांनी प्रेत पाहीले नाही तर ते ते ओळखणार कसे?”

ट्रॅग बोलला, “आतापर्यंत त्यांनी ते बराच वेळ पाहीले असेल, याबद्दल माझा विश्वास आहे.”

मेसनने खात्री दिली, “उलट, यापैकी दोन लोक त्या गाडीजवळ गेलेदेखील नाहीत.”

“ते तुला कसे समजले?”

“कारण मी त्यांच्यासाठी तशा सूचना दिल्या होत्या.”

“पण त्यांनी त्या पाळल्या की नाही, हे तुला काय माहीत?”

“कारण डेला स्ट्रीट इथेच होती.”

ट्रॅग नापसंतीदर्शक भुवया उंचावत बोलला, "या केसमध्ये तू खूप काळजी घेतो आहेस, त्यावरून असे वाटते आहे, की तुझा पाय आधीच पाण्यात आहे आणि पाणी खूप गरम आहे."

मेसन दुखावला गेला. "ट्रॅग, तुझे मन संशयी व वाईट आहे." मग तो तोंडभरून हसला. "मी कबूल करेन, ज्याला रात्री पोहायला जायचे होते, आणि त्याने पोहायच्या तलावात, तो भरलेला आहे, की नाही हे न बघता सूर मारला, त्या माणसाची गोष्ट लक्षात ठेवण्याचा प्रयत्न केला."

या वेळेपर्यंत, पुढचे दिवे गाडीच्या आतील भागावर प्रकाशझोत टाकत होते. एका फोटो काढणाऱ्याने त्याचा कॅमेरा तीन पायांच्या स्टँडवर उभा केला होता आणि तो कॅमेऱ्याच्या प्रकाश टाकणाऱ्या भागामध्ये दिवा बसवत होता.

ट्रॅग बोलला, "या बाजूला हो. तिकडून त्या प्रेताचा चेहरा दिसतो आहे. तुमच्यापैकी कुणाला तो माहिती आहे का?"

प्रेताची नीट तपासणी करण्यासाठी, ते शिस्तशीरपणे ते गाडीभोवती जमले

शोअर बोलला, "मी या माणसाला पूर्वी कधीच पाहिलेले नाही."

हेलनने दुजोरा दिला, "मी पण नाही."

ट्रॅगने डेलाला विचारले, "तू?"

तिने नकारार्थी मान हलवली.

ट्रॅग बोलला, "तुमच्यापैकी कुणालाच लीच माहिती नव्हता का?"

तिथे दोन नाही अशी उत्तरे आली आणि एक मान होकारार्थी हलली. फोटोग्राफर म्हणाला, "ठीक आहे लेफ्टनंट, त्यांना बाजूला करा."

एका ऑफिसरने त्या सर्वांना बाजूला केले. आणि लगेच पडलेल्या दिव्याच्या प्रखर प्रकाशझोताने, रात्रीच्या अंधारात, झरकन प्रकाशाची सुरी फिरवली.

फोटोग्राफर म्हणाला, “थांबा. मी या बाजूने दुसरा फोटो घेतो. मग तुम्ही त्याला परत बघा.”

तो लहानसा गट गाडीपासून लांब गेला आणि मेसनने डेलाला व हेलनला बाजूला बोलावले. “जेव्हा लेफ्टनंट ट्रॅग तुम्हाला प्रश्न विचारेल, तेव्हा त्याला मोकळेपणे उत्तरे द्या. पण कुठलीही माहिती आपण होऊन देऊ नका. विशेषतः बिनमहत्वाची माहिती.”

डेलाने विचारले, “म्हणजे कशी?”

मेसन मुद्दम सहजतेने बोलला, “ओहो, कुठल्याही कौटुंबिक गप्पा किंवा त्या प्रकारचे काही. ट्रॅगला त्याला हवे ते तुम्हाला विचारेल. बिनमहत्वाच्या घटना सांगण्यात त्याचा फार वेळ घेऊ नका. जसे की आपण लीचला भेटायला हॉटेलात गेलो, तेव्हा जेराल्ड शोअर आपल्या बरोबर आला नव्हता, अशासारख्या गोष्टी.”

“म्हणजे कशा?”

“अर्थात जर त्याने अगदी त्यावर भर देऊन, एखादी गोष्ट विचारली, तर ते वेगळे. पण त्याला ज्यात रुची नाही अशा गोष्टी सांगण्यात वेळ घालवणे हितकर नाही. त्याला माहिती करून घ्यायच्या गोष्टींबद्दल तो तुम्हाला सर्व काही विचारेल.”

हेलनने निरागसपणे मान हलवली. पण डेला काळजीपूर्वक मेसनला घेऊन गाडीच्या मागील बाजूस गेली. “जेराल्ड शोअर आपल्याबरोबर हॉटेलमध्ये आला नव्हता, याची एवढी गुप्तता का बाळगायची?”

मेसन विचारात पडला. “मला माहिती असेल, तर काय? डेला, काही कारणाने त्याला हॉटेलमध्ये यायचे नव्हते.”

“तुला असे खरेच वाटते का की तो हेन्री लीचला ओळखत होता?”

“कदाचित. किंवा त्या दिवशी तो आधी तिथे आला असेल व तेथील कारकुनाने त्याला पाहून ओळखू नये, असे त्याला वाटत असेल.”

डेलाने तिचे ओठ बारीकशी शिट्टी वाजवण्यासारखे केले.

मेसनने दटावले, “तुला सांगतो, हा फक्त एक तर्क आहे. कदाचित तसे नसेलही, पण मला --- “

ट्रॅगला काही जाणून घ्यायचे होते. तो गाडीच्या दुसऱ्या बाजूने येत बोलला, “तुम्ही दोघे काय बोलत आहात?”

मेसन बोलला, “आम्हाला आश्चर्य वाटत आहे, की त्याला गाडीत बसलेल्या कुणी उजवीकडून मारले, की रस्त्यावरील लपलेल्या कुणी डावीकडून मारले.”

नाकातून चिडवल्यासारखा आवाज काढत, ट्रॅग बोलला, “असे का? मला वाटले, तुम्ही एकत्र जमून, गुप्तपणे काहीतरी महत्त्वाचे बोलत आहात. उदाहरणार्थ, जागतिक क्रिकेटची स्पर्धा कुणी जिंकली. गाडीच्या बाहेरून डाव्या बाजूने कुणीतरी त्याला गोळी घातली. गोळी डोक्याच्या डाव्या बाजूने आत शिरली आणि खुनी पुरेशा अंतरावर उभा असल्याने, त्याने शरीरावर पावडरने भाजल्याच्या खुणा राहील्या नाहीत. बहुधा ते स्वयंचलीत ३८ पिस्तुल होते. आम्ही पिस्तुलाचे रिकामे आवरण शोधणार आहोत. तुम्हाला अजून काही जाणून घ्यायचे आहे का?”

मेसन म्हणाला, “बरेच काही. खरे तर जवळजवळ सगळे काही.”

ट्रॅगने सहज विचारले, “तुमच्याकडे पाच सेंटचे नाणे आहे का?”

मेसनने खिशात हात घातला. “हो, आहे. का? तुम्हाला फोन करायचा आहे का?”

तोंडभर हसत, ट्रॅग बोलला, “नाही, तुझे नाणे ठेव. उद्या तुला त्या पैशात वर्तमानपत्र विकत घेता येईल व त्यात सर्व काही छापलेले असेल. आता मी तुला फक्त तेवढेच सांगणार आहे, जेवढे तुला माहिती असायला हवे.”

ट्रॅग त्यांच्या अंगावरून चालत, गाडीच्या कडेला गेला. आतापर्यंत उपनिरीक्षकाने त्याची तपासणी आटपली होती आणि माणसे प्रेतावरील काहीबाही शोधू लागली होती.

काही वेळाने, ट्रॅग चालत पोलिसांच्या गाडीकडे गेला व बोलला, “मेसन, मला तुम्ही चौघे इथे यायला हवे आहात. मी आता बोलणार आहे. मी तुम्हाला काही विशिष्ट प्रश्न विचारल्याशिवाय, तुम्ही काही बोलायचे नाही आहे.”

मेसनने मान हलवली.

इतरांकडे वळत, ट्रॅग बोलला, “तुम्हाला मेसनने मला काय सांगायला सांगितले?”

मेसन बोलला, “असे तुम्हाला का वाटते --- ?”

ट्रॅगने त्याचा हात धरत, त्याला शांत केले. त्याने त्याचे डोळे हेलन केंडलवर स्थिर केले. “ठीक आहे, मिस केंडल, मी तुम्हाला विचारतो, ते काय होते?”

डेला स्ट्रीटने मोठ्याने गुणगुणायला सुरवात केली. “कोळी माशीला बोलला, “तू माझ्या खोलीत येशील का --- “

ट्रॅगने रागाऊन म्हटले, “ते थांबव. मी मिस केंडलला विचारतो आहे. मिस केंडल, इकडे या.

मेसन तुम्हाला काय बोलला?”

हेलन केंडल क्षणभर विचारात पडली व मग सरळ लेफ्टनंट ट्रॅगकडे बघत म्हणाली, “मोकळेपणे व खरीखरी सर्व उत्तरे द्या, असे तो आम्हाला बोलला.”

“एवढेच?”

“तो म्हणाला, की खूप साऱ्या क्षुल्लक गोष्टी सांगून तुमचा वेळ फुकट घालवू नका.”

ट्रॅगने तिच्या कमकुवत उत्तरावर उलट तपासणीने झडप घालत, थोडक्यात पण आनंदाने विचारले, “म्हणजे कशा?”

“विचारल्या नसलेल्या गोष्टी. मिस्टर मेसन म्हणाले, की केसच्या प्रत्येक अंगावर प्रकाश पडेल, अशा फार कसबी तऱ्हेने तुम्ही प्रश्न विचारता व उत्तरे काढून घेता.”

ट्रॅगचा चेहरा रागीट दिसू लागला. गंभीरपणे तो बोलला, “आणि मी ते करणार नाही असे समजू नका.”

## प्रकरण ८

लेफ्टनंट ट्रॅगने त्याचे शोधक प्रश्न विचारून संपवायला सुमारे बराच म्हणजे चांगला एक तास घेतला. तोपर्यंत पोलिसांनी प्रेताची व गाडीची तपासणी पूर्ण केली होती.

खूप दमलेला ट्रॅग बोलला, "ठीक आहे. तुम्ही चौघे इथे या गाडीत बसून रहा. मला त्या दुसऱ्या गाडीशी जाऊन काही शोध घ्यायचा आहे."

तो गेल्यावर जेराल्ड शोअर बोलला, "मला वाटते, ही शोधक चौकशी चालली आहे. त्यात उलट तपासणीदेखील होती. तो जवळजवळ आपल्या उद्दिष्टांवर संशय घेतो आहे.

मेसन गंभीरपणे विचार करत म्हणाला, "ट्रॅगला बहुधा असे वाटते आहे, की यामागे काही वेगळे कारण आहे. त्यामुळे, ते वेगळे काय हे त्याला जाणून घ्यायचे आहे."

शोअर सहज बोलला, "तू मला असे तर सुचवत नाहीस ना की, काही क्षुल्लक माहिती मी लेफ्टनंट ट्रॅगपासून लपवून ठेवावी."

मेसनने कबूल केले, "ते खरे आहे."

"तुझ्या मनात नेमके काय आहे?"

"ओहो काही विशेष नाही. ज्या गोष्टी सामान्यपणे पार्श्वभूमीवर दिसतात पण केसशी खरेतर फारशा संबंधित नसतात."

शोअरने विचारले, "काही विशिष्ट बाबी तुझ्या मनात आहेत का?"

मेसन उत्तरला, "खूप लहानसहान बाबी, उदाहरणार्थ, विषबाधा झालेले मांजराचे पिल्लू."

हेलनच्या झटपट श्वास घेण्याने तिच्या नवल वाटण्याला फसवले. "मिस्टर मेसन, विषबाधा झालेल्या मांजराच्या पिल्लाचा या केसशी काही संबंध आहे असे तुम्हाला वाटते आहे का?" एवढे बोलून ती वेगळ्या बाजूला, प्रेत सापडलेल्या गाडीकडे चालत गेली.

दाखवून देण्यासाठी एक उदाहरण देऊन असे सांगत होतो, की अशा बाबतीत लेफ्टनंट ट्रॅगला काही रुची नसेल."

ती गोंधळून मध्येच बोलली, "पण मला वाटले, तू असे म्हणालास की, ती बाब आम्ही त्याला सांगू नये."

जेराल्ड शोअरने विचारले, "कोणती बाब?"

"ओहो, काही नाही."

शोअरने मेसनकडे संशयाने बघितले.

मेसन नम्र व आकर्षक पद्धतीने म्हणाला, "मला वाटते, मी विशेषत्वाने एक बाब उदाहरणादाखल मांडली --- जसे की मी आताच विषबाधा झालेल्या मांजराच्या पिल्लासंबंधी बोललो."

हेलन निष्काळजीपणे मध्येच बोलली, "आपण रात्री जिथे गाडी चालवत गेलो, त्या कॅसल गेट हॉटेलमध्ये जाण्याविषयी."

जेराल्ड शोअरचे शरीर अचल झाल्यासारखे दिसले. त्याचा सतत असा प्रयत्न चालू होता की, आपल्या भावना बाहेर कुणाला दिसून, आपले नुकसान करून घ्यायचे नाही. जगाला त्यांच्याशी काय करायचे आहे?"

मेसन म्हणाला, ‘हेच ते आहे. मी ती एक क्षुल्लक बाब म्हणून सांगितली, जेणेकरून, साक्षीदारांची तपासणी उगीचच लांबू नये आणि केसचा पसारा वाढू नये. पिल्लाला विषबाधा झाली, ह्या तशाच प्रकारचे हे आहे.”

शोअरने खाखरुन, घसा साफ केला व काही सांगायला लागला पण नंतर न बोललेले बरे असे म्हणून गप्प राहिला.

हातात पांढऱ्या कापडाचा मोठा रुमाल घेऊन, लेफ्टनंट ट्रॅग गाडीकडे परतला. तो मेसनला म्हणाला, “गाडीचे दार उघड. बाजूला सरक. म्हणजे मला हे आत ठेवता येईल. आता मला कुणी या सामानाला हात लावायला नको आहे. मला तुम्ही ते काळजीपूर्वक बघायला हवे आहे. पण नुसती नजर टाका.”

त्याने तो रुमाल उघडला. तो एक मोठा रुमाल असून, त्यावर एक सोनेरी घड्याळ, होते. चाकू असलेले पेन, चामड्याचे दुमडलेले बिल, कार्डे ठेवायची डबी, सोनेरी पेन्सिल आणि फाउन्टन पेन होते. त्याच्या वरील थरावर सोन्यात नावाची आद्याक्षरे लिहिलेले होती.

ट्रॅग बोलला, ‘या वस्तुंसंबंधी माझ्या काही उपपत्ती [theories ] आहेत. पण त्या काय आहेत, हे मी तुम्हाला सांगणार नाही. तुम्ही मला असे सांगा की, तुम्ही यापैकी काही तुम्ही पूर्वी पाहिले आहे का किवा ते तुमच्या ओळखीचे आहे का.”

त्यांनी मेसनच्या खांद्यावरून पुढे वाकून गाडीच्या पुढच्या सीटवर ठेवलेल्या त्या वस्तू बघितल्या. डेला आणि हेलन पुढील सीटच्या टेकायच्या ठिकाणावरून, मागे वाकल्या होत्या.

मेसन लगेच बोलला, “मला त्या काही ओळखीच्या वगैरे वाटत नाही आहेत.”

लेफ्टनंट ट्रॅगने विचारले, “शोअर, तुझे काय?”

शोअरने विचारपूर्वक त्याची मान वळवत, नापसंतीदर्शक भुवई उडवली.

मेसन बोलला, “तिकडून त्याला त्या वस्तू नीट दिसत नाही आहेत. लेफ्टनंट, जर मी बाहेर पडलो तर त्याला त्या जास्त जवळून दिसतील.” ट्रॅग म्हणाला, “ठीक आहे. पण कुठल्याही वस्तूला स्पर्श करू नका.”

असे मेसनने विचारले, “या वस्तू तुम्हाला, कुठे मिळाल्या मी विचारू शकतो का?”

“तुम्ही बघितलेत तशा, त्या या रुमालात पुरचुंडी करून बांधलेल्या होत्या आणि गाडीच्या सीटवर प्रेताशेजारी पडलेल्या होत्या.”

आरामशीरपणा न वाटल्याने शरीर घुसळत, कुठल्याही वस्तूला धक्का लागणार नाही, अशी काळजी घेत, मेसन बोलला, “खरे की काय?

लेफ्टनंट, मी रुमालाला हात लावला, तर चालेल का?”

“हो. त्यावर आम्हाला बोटांचे काही ठसे सापडले नाहीत.”

मेसनने रुमालाला बोटे लावली. “हे चांगल्या प्रकारचे लिनन आहे. हा पुरुषाचा रुमाल आहे.”

लेफ्टनंट, हा विशिष्ट रंगाचा स्पर्श आहे, नाही का?”

“असेल.”

जसा मेसन गाडीबाहेर पडला,तसा जेराल्ड शोअर पुढे वाकून उद्गारला, “हे माझ्या भावाचे घड्याळ आहे!”

लेफ्टनंट ट्रॅग ताण घेत बोलला, “म्हणजे फ्रॅंकलीन शोअरचे, असे तुम्हाला म्हणायचे आहे?”

“असू शकेल.”

जेराल्ड उद्दीपित आवाजात बोलला, “हो, हे त्याचे घड्याळ आहे, ते ठीक आहे आणि माझा विश्वास आहे की, ते त्याचे फाउन्टन पेन आहे!”

त्याच्यावर ‘FBS’ अशी अक्षरे कोरलेली आहेत.”

ट्रॅग कोरडेपणे बोलला, “आता मला असे वाटू लागले आहे, की ते पेन तुझ्या भावाचेच असावे.”

“हो, ते त्याचेच आहे.”

“पेन्सिलीचे काय?”

“पेन्सिलीबद्दल मला खात्री नाही.”

“कार्ड केस आणि बिलचे काय?”

“त्यात मी तुम्हाला काही मदत करू शकत नाही.”

“चाकू?”

जेराल्डने मान हलवली. “पण ते घड्याळ मात्र त्याचेच आहे.”

“ते चालू आहे का?”

“हो.”

मेसन बोलला, “कदाचित आपण रुमाल ओळखू शकू. मग आपल्याला घडाळाच्या डायलकडे बघता येईल.”

ट्रॅग बोलला, “हे साधे वेळ दर्शवणारे घड्याळ आहे. पण त्याच्या मागील बाजूस, FBS असे लिहिलेला एक कागदाचा कपटा आहे.”.

हे फारच रुचीपूर्ण आहे. आपण सुलट बाजूने ते घड्याळ नीट बघून, तिथे काही वेगळे दिसते आहे का, हे बघायला पाहिजे.''

त्या वकीलाने रुमाल उचलून, तो हलवला. त्यामुळे, ते घड्याळ हलू लागले.

मेसनने डेलाकडे लक्षपूर्वक पाहिले व एका झटक्यात, एक डोळा बंद केला. डेलाने लगेच तिची पर्स झेलण्यासाठी, तिचे हात खाली केले.

मेसन बोलला, ''हे रुचीपूर्ण आहे. वाल्थम घड्याळ. डायलवर काहीतरी

लिहिलेले आहे. ते काय आहे बरे? --- तो रुमालावर वाकला. लेफ्टनंट, जर तुम्हाला त्यावर प्रखर झोत पाडता आला, तर पाडा.''

ट्रॅग बोलला, ''ते व्यापाऱ्याचे नाव व घड्याळाचे वर्णन आहे.''

मेसन त्यावर वाकला. ''हं, अस्स! त्यावरील अक्षरे चांगली स्पष्ट आहेत.

'वाल्थम' हा शब्द सरळ रेषेत लिहिलेला आहे आणि त्याखाली गोलाकार रेषेत असे लिहिले आहे, 'व्हॅनगार्ड २३ ज्युवेल्स' लेफ्टनंट, याची खबर घ्या. वरती १२ च्या आकड्याजवळ किल्ली द्यायची खूण आहे, जी काट्याबरोबर हलते. साधारण ह्या खुणेच्या जागेवरून घड्याळाला किल्ली देऊन किती वेळ झाला ते समजते. ह्या घड्याळाच्या बाबतीत साधारण सहा तास. हे खरेच फार रुचीपूर्ण आहे, नाही का?''

ट्रॅग बोलला, ''हो. --- जरी मला या गोष्टीला काही विशेष महत्व असल्याचे वाटत नसले तरी --- हे असे दाखवते की, सहा तासांपूर्वी ह्या घड्याळाला किल्ली दिली गेली होती''

तुलनेसाठी मेसनने स्वतःचे घड्याळ पाहून, विचारपूर्वक मल्लीनाथी केली, “आता साडेदहा झाले आहेत. म्हणजे ते असे दाखवते आहे की, आज दुपारी साडेचार किंवा पाचला ह्या घड्याळाला किल्ली दिली गेली होती.”

ट्रॅग बोलला, “बरोबर! पण तुम्ही सगळ्यांनी ऐका. मेसन, यामुळे का कुणास ठाऊक, पण मी काही फार उद्दीपित झालेलो नाही. मला नेहमी असे जाणवले आहे की जेव्हा तुम्ही पुरावे दर्शवू लागता, ते तुम्ही आजूबाजूंच्या वस्तूंमुळे उद्दीपित झाल्याने होत नाही; तर दुसऱ्या काही वस्तू ज्याबद्दल तुम्ही काळजीपूर्वक रीत्या काही बोलत नाही, अशा बाबींमध्ये रुची वाटल्याने होते.

हेलनने डेलाच्या खांद्यावरून भुवई ताणून पाहिले व मोठ्याने कुजबुजत म्हणाली, “मला आनंद आहे, की मी लेफ्टनंट ट्रॅगची बायको नाही.”

मेसनने हेलनकडे कौतुकाने पाहीले. ती निष्कर्ष काढण्यात घाई करते आहे. तो तिला म्हणाला, “लेफ्टनंट विवाहित नाही.”

“मिस्टर मेसन, मला मुळीच आश्चर्य वाटले नाही, तुम्हाला वाटले का?”

मेसन थंडपणे उत्तरला, “नाही मिस केंडल, नाही. त्यांनी मला ते एकदा सांगितले --- ठीक आहे, ट्रॅग, ठीक आहे. चालू द्या.”

जेराल्ड शोअर बोलला, “ते त्याचे फाउन्टन पेन आहे, ठीक आहे. मला आता आठवले की ते त्याचे अत्यंत आवडते होते.”

लेफ्टनंट ट्रॅगने विचारले, “तो ते नेहमी खिशात ठेवत असे का?”

“हो.”

मेसन गाडीबाहेर पडला. डेलाने त्याने केलेली खूण नीट पाहिली आहे, की नाही हे त्याने मागच्या सीटकडे डोकावून, आजमावून पाहिले.

तिची भरभर लिहून घ्यायची वही तिच्या गुडघ्यांवर होती आणि ती संभाषण लिहून घेत होती. मेसनने पेन्सिल व वही त्याच्या खिशातून काढली आणि बऱ्याच आकृत्या काढल्या.

लेफ्टनंट ट्रॅग बोलला, “नक्कीच तसे झाले. ते प्रेत हेन्री लीचचे आहे. त्याच्या खिशात गाडी चालवायचा परवाना आहे. त्यावरून असे दिसते, की कॅसल गेट हॉटेलात रहात असतांना त्याला तो परवाना मिळाला होता. त्यावरून लक्षात येते, की तो तिथे कायम रहायला होता. पाकिटात अजूनही कार्डे आहेत. ती लीचचीच असणार.”

जेराल्ड शोअर उद्दीपित होऊन बोलला, “इकडे बघा. लेफ्टनंट, हा माणूस आम्हाला माझ्या भावाकडे घेऊन जाणार होता. हे गूढ उकलण्याचे महत्व तुम्हाला समजले असेल, असे मला वाटते.”

लेफ्टनंट ट्रॅगने मान डोलावली.

“जर माझा भाऊ जिवंत असून, ठीक असेल तर ते फार महत्वाचे आहे. त्यापुढे या माणसाचा मृत्यु काहीच नाही. मला वाटते, जराही वेळ फुकट न घालवता प्रत्येक पुरावा शोधून काढायला हवा.”

ट्रॅगचे डोळे बारीक झाले. “त्यामुळे या खुनाचे महत्व कमी का व्हावे?”

शोअर बोलला, “मी एक वकील म्हणून बोलतो आहे.”

ट्रॅगने अहवाल दिला, “तेच तर! मी एक गुप्तहेर म्हणून बोलतो आहे.”

शोअरने ट्रॅगकडे एक नजर टाकली व घाईने लांब निघून गेला.''माझा भाऊ एक महत्वाचा माणूस होता. हा दुसऱ्या दर्जाच्या, प्रश्न निर्माण करणाऱ्या हॉटेलात रहाणारा माणूस तसा नव्हता.''

ट्रॅग म्हणाला, ''बोलत रहा. अजून तर तू काहीच बोललेला नाहीस --- ''

शोअर भरभर बोलला, ''ठीक आहे. कायदेशीर दृष्ट्या त्यात खूप फरक असू शकेल. असे बघ --- मी समजतो, मी काय म्हणतो आहे ते तुला कळते आहे.''

ट्रॅगने क्षणभर विचार केला व मग एक प्रश्न फेकला, ''इच्छापत्र?''

''मी त्याबद्दल बोलत नव्हतो.''

''पण तुझ्या मनात ते होते?''

''खास असे नाही.''

''पण एका दृष्टीकोनाने?

शोअर मोठ्या मिनतवारीने बोलला, ''हो, तो एक दृष्टीकोन होता.''

मेसनने मध्येच काही सुचवले. ''लेफ्टनंट, असे बघा. अशा परिस्थितीत तुम्हाला असे वाटत नाही का, की आपण मृत मनुष्याच्या खिशातील सर्व वस्तु नीट बघायला पाहीजेत?''

ट्रॅग जोराने मान हलवत बोलला, ''मी हा तपास माझ्या पद्धतीने करतो आहे. मेसन, तुला त्यात नाक खुपसण्याचे काही कारण नाही.'' मेसन बोलला, ''निदान कॅसल गेट हॉटेलातील हेन्री लिचच्या खोलीत तुमच्याबरोबर यायला तरी आम्हाला परवानगी मिळायला हवी आणि तिथे तुम्हाला काय गोष्टी उलगडतात, हे आम्हाला

कळायला हवे. शेवटी तो आम्ही शोधत असलेला, जेराल्ड्चा भाऊ आहे. या प्रकरणात त्याला काही हक्क आहेत.”

जेराल्ड घाईने बोलला, “माझा जितका संबंध आहे, तितका मला लेफ्टनंट ट्रॅगच्या क्षमतेवर असीम विश्वास आहे. मला त्याच्या तपासकामात लुडबुड करायची नाही. पण जर माझी काही मदत होणार असेल, तर मी माझ्या परीने माझा वेळ देऊन व माझ्या क्षमतेप्रमाणे त्याला मदत करायला तयार आहे.”

ट्रॅगने नकळत मान डोलावली. “मला गरज असेल, तेव्हा मी तुला बोलावेन.”

मेसन बोलला, “ट्रॅग, मला तुझ्याबरोबर कॅसल गेट हॉटेलात यायचे आहे. या माणसाच्या खोलीत काय आहे, ते मला बघायचे आहे.”

निर्णय घेतल्यासारखी, लेफ्टनंट ट्रॅगने मान डोलावली. “नाही मेसन, मी माझ्या पद्धतीने हे तपासकाम करणार आहे. मला त्यात कुणाचा सल्ला वा लुडबुड नको आहे.”

पण मेसन त्याचे म्हणणे लाऊन धरत बोलला, “पण तू आता तिथे चालला आहेस. निदान आम्ही तुझ्याबरोबर येतो आणि --- “

ट्रॅग बोलला, “तू येऊ शकत नाहीस. मेसन, तुझी गाडी हॉलीवूड रस्त्यावर उभी कर. जा गाडीत बस आणि तुझ्या कामाला जा. जर मला काही पाहिजे असेल, तर मी तुला सांगेन. मी इथे प्रेताजवळ एका माणसाला ठेवतो. मला प्रेत असलेल्या गाडीच्या प्रत्येक इंचाचे ठसे घ्यायचे आहेत. ठीक आहे, फ्लोयड, चल आपण निघू. आणि लक्षात ठेव, मेसन तू माझ्यापाठोपाठ येऊ नको. मी माझा तपास संपवेपर्यंत, तू कॅसल गेट हॉटेलापासून दूर रहा. शुभ रात्र.”

लेफ्टनंट ट्रॅगने रुमालातील वस्तू गोळा करून, त्याचे कोपरे घट्ट बांधले व त्याचे एक गाठोडे तयार केले.

मेसन पुढील सीटवर बसला. त्याने शोअरला म्हटले, "ठीक आहे वकीलसाहेब, मला वाटते ट्रॅगला आपल्यापैकी कुणाचीच मदत नको आहे. मी माझी गाडी जिथे ठेवली आहे, तिथपर्यंत तू मला सोडू शकतोस का?"

तो खालच्या आवाजात बोलला, "लेफ्टनंट त्याचे मन बदलायच्या आत, गाडी सुरु कर."

शोअर गाडी सुरु करत विचारता झाला, "म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?"

मेसन खालच्या आवाजात म्हणाला, "जर मी कॅसल गेट हॉटेलात येण्याबद्दल इतकी उत्सुकता दाखवली नसती, तर कदाचित त्याने मला तिथे त्याच्याबरोबर येऊ दिले असते."

शोअरने मेसनकडे वळत, विरोध करत विचारले, "पण त्यात चूक काय आहे?"

"दुसरे काही घडले आहे. पोलिसांनी त्यात लक्ष घालण्यापूर्वी आपल्याला ते समजून घेण्याची गरज आहे. माटील्डा शोअर एक्झेटर रुग्णालयात आहे. तिला विषबाधा झाली आहे."

झरकन गाडी वळवत, शोअर उद्गारला, "अरे बापरे, "हेलन, तू हे ऐकलेस का?"

हेलन शांतपणे बोलला, "मी ऐकले."

मेसनने शोअरला बजावले, “असे भासवू नका, की तुम्ही इथून लवकर निघून जाण्यासाठी फार उत्सुक आहात. उलट गाडी हळू चालव. पोलिसांची गाडी तुझ्यापुढे निघून जाऊ दे आणि ते होईलच. तो फ्लोयड नावाचा प्राणी एखाद्या सैतानासारखी गाडी चालवतो.”

ते तीनशे यार्ड गेले असतील, तेव्हा त्यांनी पोलिसांच्या गाडीचे पुढचे दिवे लालभडक रंगात चमकतांना पाहीले. गिअर पडतानाचा आवाज आला मग ती मोठी गाडी घोंघावत त्यांच्या मागे आली.

मेसन बोलला, “आपली गाडी कडेला घे. चल, आपण अशी आशा करू, की त्याने त्याचा विचार बदलला नसावा.”

पोलिसांची गाडी थबकली सुद्धा नाही. ती जोरात पुढे निघून गेली. पुढील पहिल्या, लांब, मोठ्या वळणावर, गाडी जराशी डुगडुगली.

मेसन मागील सीटवर नीट टेकून बसला व बोलला, “जेराल्ड, गाडीचा दुसरा गिअर टाक आणि आणि ती जाऊ दे वेगात.”

## प्रकरण ९

माटील्डा शोअर दवाखान्यातील अंथरुणावर उठून बसली व रागाने तिला भेटायला आलेल्या लोकांकडे बघू लागली.

ती ओरडली, याचा अर्थ काय?”

जेराल्ड शोअरने स्पष्टीकरण दिले. “का? आम्ही तू आजारी असल्याचे ऐकले आणि साहजिकच आम्ही काही करू शकतो का, ते बघायला आलो.

“तुम्हाला हे कुणी सांगितले?”

“मिस्टर मेसनना हे समजले.”

ती मेसनकडे वळली. तिने विचारले, “तुम्हाला हे कसे कळले?”

मेसन नम्रपणे म्हणाला, “असेच सहज कळले.”

जेराल्ड शोअर घाईने बोलला, “माटील्डा, आम्हाला तुला भेटायचे होते. काही घडलेल्या गोष्टी तुला जाणून घ्यायला हव्यात.”

“मी आजारी आहे. मला कुणी भेटायला यायला नको आहे. मी कुठे आहे, हे तुम्हाला कसे समजले? तुम्ही या लोकांना का आणले आहे?”

जेराल्ड शोअर म्हणाला, “हा वकील पेरी मेसन व ही डेला स्ट्रीट, त्याची सचिव आहे. तुला महत्वाच्या असणाऱ्या काही बाबतीत त्यांना रस आहे.” माटील्डा शोअरने मानेवर तिचे मोठे डोके हलवले व पेरी मेसनचे निरीक्षण करत बोलली, “हं!”

काही वेळाने तिने विचारले, “मी इथे असल्याचे तुम्हाला कसे समजले?”

हेलन केंडल म्हणाली, “कोमोला तुझी फार काळजी वाटत होती. तो म्हणाला तुला विषबाधा झाली आहे आणि तुझी लक्षणे अगदी त्या मांजरासारखी आहेत. तू त्याला तुला रुग्णालयात न्यायला सांगितलेस.”

माटील्डा शोअर बोलली, “तो छोटा मिचमिच्या डोळ्यांचा बदमाश! त्याला मी त्याचे तोंड गप्प ठेवायला सांगितले होते.”

मेसन बोलला, “आम्हाला सर्व काही माहिती झाल्याचे त्याला समजेपर्यंत, त्याने ते तसे ठेवले होते. काय झाले, हे मी शोधून काढले. मी कोमोशी बोललो नाही. मी तुमच्या पुतणीला तुम्ही कुठे आहात, हे सांगितल्यावर, ती कोमोशी बोलली.

“तुम्ही कसे शोधून काढले?”

मेसन फक्त हसला. मला कुठून समजले, ते मला गुप्त ठेवायला हवे.”

अजून ताठ बसत, माटील्डा शोअर बोलली, “आणि कृपया मला हे सांगाल का, की मी कुठे आहे आणि माझी तब्येत कशी आहे, याचे तुम्हाला काय देणेघेणे होते?”

जेराल्ड मध्येच स्पष्टीकरण देऊ लागला, “पण माटील्डा, असे काही आहे, की ते तू जाणून घेतले पाहिजेस. त्यासाठी आम्ही तुझ्याकडे आलो आहोत.”

“ठीक आहे. ते काय आहे? मुद्द्यावर या.”

जेराल्ड म्हणाला, “फ्रॅंकलीन जिवंत आहे.”

“जेराल्ड शोअर, ही माझ्यासाठी बातमी नाही. अर्थात तो जिवंत आहे. मला हे नेहमीच माहिती आहे. तो भ्याडपणे पळून गेला आणि मला दुग्ध्यात टाकून गेला. याचा अर्थ, मला वाटते, ते तुम्हाला त्याच्याकडून समजले आहे.”

आवाजात जराही खात्री पटवायचा सूर न आणता, हेलन केंडल बोलली,

“माटील्डा काकू, इतक्या घाईने तू त्याला बाद करून टाकू नकोस.”

माटील्डा गुरगुरली, “त्या म्हातारड्यासारखा मूर्ख कोणी नसेल. जवळजवळ साठ वर्षांचा माणूस, त्याच्या अर्ध्या वयाच्या बाईबरोबर पळून जातो आहे.”

मेसन जेराल्ड शोअरकडे वळला. “तो अजून जिवंत असल्याचे तुला कसे समजले, हे तू तिला जास्त चांगले सांगू शकशील.”

“त्याने आज दुपारी आम्हाला --- खरे तर हेलनला फोन केला.”

माटील्डाने तिचे जड शरीर हलवल्यावर पलंगाच्या स्प्रिंगा जोराने वर उसळल्या. पलंगाजवळील टेबलाचा खण उघडून, तिने स्टीलची फ्रेम असलेला चष्मा बाहेर काढला. तो नाकावर चढवला आणि तिच्या पुतणीकडे सूक्ष्मदर्शक यंत्रातून ढेकणाकडे पहावे, तसे पाहीले.

“म्हणजे त्याने तुला फोन केला ---मला वाटते तो मला घाबरतो.”

दार उघडले. एक परिचारिका खोलीत आली. तिचा कडक स्टार्चचा गणवेष व्यावसायिक तोरा दाखवत होता. तिने ठणकावले, “तुम्ही रुग्णाला उद्दीपित करता कामा नये .खरे तर तिला कुणाला भेटायची परवानगी नाही. तुम्ही तिला फक्त काही मिनिटे तिला भेटू शकता.”

माटिल्डाने तिच्याकडे रोखून पाहीले. “मी ठीक आहे. आम्हाला कृपया एकटे सोडा.”

“पण डॉक्टर --- “

माटील्डा शोअरने उद्दामपणे दाराकडे निर्देश केला.

परिचारिकेने क्षणभर हो नाही केले. “मला डॉक्टरांना कळवावे लागेल.” ती असे पुटपुटून बाहेर गेली.

माटील्डा परत हेलनकडे वळली. “तर त्याने तुला फोन केला आणि तू त्याबद्दल एकही अक्षर बोलली नाहीस. ही तुझी कृतज्ञता. दहा वर्षे तुझ्यासाठी खस्ता खाल्ल्या --- “

जेराल्ड शोअर घाईने बोलला, “माटील्डा, असे बघ, तिने असा विचार केला की कदाचित तो कुणी तोतया असेल आणि तिची खात्री पटल्याशिवाय तुला उगीच त्रास देऊ नये.”

माटील्डाने लावून धरत विचारले, “पण त्याने तिला का फोन केला?”

जेराल्ड तिला रागापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत म्हणाला, “तेच तर! सर्व बाबींवरून असे वाटले की, फ्रॅंकलीनने आमच्याशी संपर्क साधलेला नाही, तर कुणी तोतया आपल्या कुटुंबात घुसायला बघतो आहे. आम्हाला वाटले की, तुला काही सांगण्यापूर्वी त्याच्याशी प्राथमिक संबंध जोडून पहावा.”

“मी काही दुधखुळी नाही.”

“माटील्डा, मला समजते आहे, पण आम्हाला असे करणे ठीक वाटले.”

“हं!”

हेलन बोलली, “त्याने मला असे सांगितले, की पत्रातील सूचनांबरहुकूम वागल्याशिवाय, मी त्याला भेटू शकत नाही.”

चष्म्यातून पुतणीकडे रोखून बघत, माटील्डाने विचारले, “तू त्याला भेटलीस का?”

“नाही, भेटले नाही. लीच नावाचा एक माणूस मला त्याला भेटवणार होता ---- आणि असे काही झाले की, लीच ते करू शकला नाही.”

“माटील्डा बोलली, “तो फ्रॅंकलीनच होता हे नक्की. असे दिसते आहे की, तो हेलनशी संपर्कात राहून, तो गुप्तपणे काही करतो आहे. तिला खेळवतो आहे. तिची सहानुभूती मिळवतो आहे आणि तिच्यामार्फत मला फसवतो आहे. त्याला सांग, एका बाईच्या स्कर्टमागे लपायचे थांब व उघडपणे मला भेट. मी त्याला एखादोन गोष्टी सुनावीन. त्याने त्याचा चेहरा दाखवल्याबरोबर मी घटस्फोटासाठी, अर्ज दाखल करीन. मी दहा वर्षे त्यासाठी थांबले आहे.”

मेसन बोलला, “माझा विश्वास आहे मिसेस शोअर, तुमचा हा राग काही खरा नाही.”.

तिने तिचे डोळे त्याच्याकडे फिरवले व बोलली, “माझा राग नेहमीच खरा असतो.”

जेराल्डने विचारले, “तुम्हाला विषबधा कशी झाली? असे कसे झाले?”

“चुकीची बाटली हातात आली, एवढेच. माझ्या औषधाच्या कपाटात, काही हृदयावरची औषधे होती व काही झोपेची औषधे होती. मी झोपण्यापूर्वी कडक बिअर घेतली. मग काही झोपेच्या गोळया घ्यायला गेले आणि चुकीची बाटली हाताला लागली.”

मेसनने विचारले, “ही चुकीची बाटली असल्याचा संशय तुम्हाला केव्हा आला?”

“मला एकदम थोडी चक्कर आल्यासारखे वाटू लागले. मग मी कोमोला फोन केला आणि त्याला डॉक्टरकडे दवाखान्यात जाण्यासाठी, गाडी बाहेर काढायला सांगितली. खूपसे मोहरीच्या चूर्णाचे पाणी पिण्याइतकी व बरेचसे बाहेर

काढण्याइतकी हुशारी मला होती. बिअर प्यायल्यानंतर, मी अंधारात झोपेच्या गोळया घेण्यासाठी औषधाच्या कपाटाशी कशी गेले, हे मी डॉक्टरना सांगितले.

मी चुकीची बाटली हाताला लागल्याचेही सांगितले. त्यांनी त्यावर विश्वास ठेवला, की नाही, कुणास ठाऊक! पण कामात असून त्यांनी मला काही औषध दिले. आता मी ठीक आहे. या विषबाधेबद्दल तुम्ही तुमचे तोंड गप्प ठेवावे, अशी माझी इच्छा आहे. यात मला पोलिसांनी नाक खुपसायला नको आहे. मग आता मला फ्रॅंकलीनला शोधायचे आहे. त्याला आपण उघड्यावर आणू या."

मेसनने विचारले, "मिसेस शोअर, असे तुम्हाला यापूर्वी कधी झाले होते का? म्हणजे तुमच्या नवऱ्याचे परत येणे आणि घरात विषबाधेच्या दोन केसेस घडणे या दोन्हीत काही संबंध असावा का?"

तिने विचारले, "दोन?"

"मांजराचे पिल्लू आणि तुम्ही."

माटील्डाने बरेच सेकंद त्याच्याकडे निरखून पाहीले आणि मग वैतागून बोलली, "काहीतरीच काय! मी फक्त चुकीची बाटली घेतली, एवढेच."

"मी तुम्हाला असे विचारतो आहे, की त्या बाटलीतील पेय विषबाधित असल्याचे तुम्हाला माहिती होते का?"

"छे छे! मी तुम्हाला फक्त चुकीची बाटली घेतल्याचे सांगितले."

"त्याबद्दल तुम्हाला काहीतरी केले पाहीजे, असे तुम्हाला वाटत नाही का?"

"मी काय करणार?"

मेसन बोलला, “निदान परत असे होऊ नये याची काळजी घेणे. जर कोणी तुमचा जीव घ्यायचा प्रयत्न केला असेल, तर त्याबद्दल तुम्हाला काहीतरी करणे भाग आहे.”

“म्हणजे तुम्हाला पोलीस असे म्हणायचे आहे का?”

“का नाही?”

ती रागाने बोलली, “पोलीस! त्यांना मी माझ्या आयुष्यात ढवळाढवळ करून देणार नाही व वर्तमानपत्रांना खाद्य पुरवणार नाही. असेच नेहमी होते. तुम्ही संरक्षणासाठी पोलिसांना बोलावता आणि आणि त्याचा फोटो वर्तमानपत्रात बघू इच्छिणारे कोणी मूर्ख बातमीदारांकडे धाव घेऊन त्याना ही सर्व हकीगत सांगतात. मी असले काही करणार नाही. शिवाय मी फक्त एक चूक केली आहे.”

मेसन म्हणाला, “मिसेस शोअर, दुर्दैवाने आज रात्री जे काही झाले, त्याचा मोठा गवगवा होणारच आहे.”

“आज रात्री काय झाले, असे तुम्हाला म्हणायचे आहे?”

“जो आम्हाला तुमच्या नवऱ्यापर्यंत घेऊन जाणार होता, तो लीच नावाचा मनुष्य, तसे करण्यात अयशस्वी झाला.”

“का?”

“कारण कोणीतरी त्याला थांबवले.”

“कसे?”

“तो गाडीत आमची वाट बघत बसलेला असतांना, ३८ कॅलीबरच्या पिस्तुलातील गोळी त्याच्या डाव्या बाजूच्या मेंदूत घुसवून.”

“तो मेला, असे तुम्हाला म्हणायचे आहे?”

“हो.”

“खून झाला?”

“बहुतेक.”

“हे केव्हा झाले?”

“नक्की कधी, ते आम्हाला माहिती नाही.”

“कुठे?”

“हॉलीवूडच्या डोंगरांमागील तलावाजवळ.”

“लीच कोण होता? तो यात कुठून उपटला?”

“असाच, तो तुमच्या नवऱ्याचा मित्र होता.”

“तुम्हाला असे का वाटते? मी तर कधी त्याचे नाव ऐकले नाही.”

लीचला भेटायला सांगितले. तो आम्हाला फ्रँकलिनकडे घेऊन जाणार होता.”

माटील्डा हेलनकडे सरकली. ”या माणसांना इथून बाहेर काढ. माझे कपडे त्या कपाटातून बाहेर काढ. मी कपडे करून घरी जाणार आहे. जर फ्रॅकलीन आसपास असेल, तर तो माझे मन वळवण्याच्या प्रयत्नात, दबकत घराबाहेर पडत असेल. मी यासाठी दहा वर्षे थांबले आहे आणि अशा वेळी मी कुठल्या दवाखान्यात अडकून पडणार नाही. मी त्याला दाखवून देईन की तो मला टाळू शकत नाही!”

मेसनने बाहेर जाणारी काही हालचाल केली नाही.

“मला भीती आहे, की तुम्हाला तुमच्या डॉक्टरची परवानगी घ्यावी लागेल. परिचारिका त्यांना फोन करायला गेली आहे.”

माटील्डा म्हणाली, “मला बाहेर पडण्यासाठी कुणाच्या परवानगीची आवश्यकता नाही. ओकारी होणारे जे औषध मी घेतले, त्याबद्दल मी स्वतःचे आभार मानते. मी विषबाधेच्या अगदी जवळ जाऊन पोचले होते. माझी तब्येत एखाद्या बैलासारखी आहे. मी माझे दुखणे पळवून लावले. आता मी ठीक आहे. मी माझ्या स्वतःच्या शक्तीच्या भरवशावर जात आहे.”

मेसन बोलला, “तुम्ही उठून, तुमच्या हृदयाला ताण द्यावा, असे मला वाटत नाही. आम्हाला तुमच्या नवऱ्याबद्दल सांगायचे होते आणि तुम्हाला भेटून या विषबाधेबद्दल तुम्ही काय पाऊले उचलली आहेत, ते पहायचे होते.”

“मी तुम्हाला सांगितले की, तो एक अपघात होता आणि मला यात पोलिसांना आणायचे नाही --- ”

दारावर थाप पडली.

जेराल्ड शोअर बोलला, “बहुधा हे डॉक्टर किंवा घोगऱ्या आवाजात बोलणारे, आपल्याला काही करून इथून हाकलायला आलेले दवाखान्याचे कर्मचारी असणार.”

माटील्डा शोअर जोरात बोलली, “आत या. आपण हे संपवून टाकू. मला इथून बाहेर जाऊ दे.”

दार उघडून, लेफ्टनंट ट्रॅग व एक गुप्तहेर आत आले.

मेसनने त्यांना झुकून अभिवादन केले. “मिसेस शोअर, मी तुमची ओळख लेफ्टनंट ट्रॅग व खुनाशी संबंधीत पथकाशी करून देतो. मला वाटते, त्यांना तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत.”

ट्रॅगने मिसेस शोअरला झुकून अभिवादन केले व वळून, परत मेसनलाही केले. “वकीलसाहेब, हे तुम्ही फार हुशारीने केले. जितके जास्त मी तुम्हाला बघतो, तेवढे जास्त मला तुमच्या झटपट व कसबी कार्यकुशलतेला दाद द्यायला भाग पडते.”

मेसन म्हणाला, “यावेळेस कशाच्या संदर्भात?”

“ज्या पद्धतीने तुम्ही कॅसल गेट हॉटेलमध्ये माझ्याबरोबर तुम्हाला व तुमच्या मित्रांना न्यायला परवानगी दिलीच पाहिजे, याचा आग्रह धरून मला माझ्या निर्धारापासून तात्पुरते परावृत्त केले, त्याबद्दल! मी तुम्हाला सोडून गेलो त्यानंतर मला असे उमजू लागले की तुम्ही मला राग आणला आणि तो लहानसा पुरावा मी ग्राह्य धरला.

मेसन बोलला, “ते तशा पद्धतीने मांडणे म्हणजे गुप्तपणे काही बेकायदेशीर केल्यासारखे होते.”

ट्रॅग बोलला, “तुमचे तुम्ही निष्कर्ष काढा. मी केसचे सर्व कंगोरे तपासतो आहे. तुमच्या कॅसल गेट हॉटेलमध्ये माझ्याबरोबर येण्याच्या ठामपणामुळे मला तुम्हाला उडवून लावणे भाग पडले. मिसेस शोअर आता, जर तुम्हाला चालणार असेल, तर मला विषबाधेबद्दल सांगा.”

मिसेस शोअर चिडून बोलल्या, “मला ते सांगायचे नाही.”

ट्रॅगने जाहीर केले, “हे दुर्दैव आहे.”

“मी काही नको ते खाल्ले, एवढेच.”

ट्रॅगने निर्देश करत बोलला, “दवाखान्यातील अहवाल सांगतो, की तुम्ही काही औषध चुकून घेतले.”

“ठीक आहे. मी औषधाच्या कपाटाशी गेले आणि चुकून एक औषध घेतले.”

ट्रॅग आल्हादकपणे रुची घेत बोलला, “हे दुर्दैवी होते. मिसेस शोअर, ती काय वेळ होती, असे मी विचारू शकतो का?”

“ओहो, मला वाटते नऊ वाजले असावेत, पण नक्की वेळ माहिती नाही.”

“आणि जसे मला समजले आहे, तसे तुम्ही झोपायच्या तयारीत होतात. तुमचा नेहमीचा बिअरचा पेला घेतला होतात. दिवा मालवून तुम्ही औषधाच्या कपाटाशी गेलात का?”

“हो, मला वाटले, मी झोपेची गोळी घेते आहे. पण मी चुकीची बाटली उघडली होती.”

ट्रॅग विशेष सहानुभूती दाखवत बोलला, “तुम्हाला चवीत काही फरक जाणवला नाही का?”

“नाही.”

“तुमचे झोपेचे औषध गोळयांच्या स्वरूपात आहे का?”

“हो.”

“ते औषधाच्या कपाटात ठेवलेले असते का?”

“हो.”

“तुम्ही घेतलेल्या गोळयांच्या चवीत तुम्हाला काहीही फरक जाणवला नाही?”

“नाही. मी त्या पाण्याबरोबर गिळल्या. माझ्या एका हातात पाण्याचा पेला होता व दुसऱ्या हाताने मी गोळया तोंडात ठेवल्या व गिळून टाकल्या.”

“अस्स! मग तुमच्या उजव्या हातात पाण्याचा पेला होता व डाव्या हाताने तुम्ही गोळया तोंडात ठेवल्यात?”

“बरोबर.”

आणि मग बाटलीला झाकण लाऊन तुम्ही पुन्हा औषधाच्या कपाटाशी गेलात?”

“हो.”

तेव्हा दोन्ही हात वापरले गेले?”

“त्याने काय फरक पडतो?”

“मी फक्त शोधायचा प्रयत्न करतो आहे, एवढेच. जर तो अपघात असेल, तर त्यात शोधण्यासारखे काही नाही .”

“हो, तो अपघातच होता.”

ट्रॅग शांतपणे बोलला, “अर्थात. मी काय घडले, हे फक्त जाणून घेतो आहे. म्हणजे मला तसा अहवाल तयार करायला बरे पडेल.”

राग शांत करत मिसेस शोअरने स्पष्ट केले, “असे झाले. मी बाटलीला झाकण लावले.”

ट्रॅगने विचारले, “आणि परत औषधाच्या कपाटात ठेऊन दिले?”

“हो.”

“तुमच्या उजव्या हातात पाण्याचा पेला होता व डाव्या हाताने तुम्ही गोळ्या तोंडात ठेवल्यात?”

“हो.”

“गोळ्या तोंडात टाकून लगेच तुम्ही पाणी प्यायलात?”

“हो.”

“तुम्हाला कडू चव लागली नाही?”

“नाही.”

मला वाटते, मिसेस शोअर, ते स्ट्रायचनाईन नावाचे विषारी औषध होते, नाही का?”

“मला माहिती नाही.”

ट्रॅग सहानुभूती दाखवत बोलला,”फार दुर्दैवाची गोष्ट आहे.” आणि मग सहज बोलला, “पण मिसेस शोअर, स्ट्रायचनाईनची बाटली तुमच्या औषधाच्या कपाटात कशी काय आली? मला वाटते, तुम्ही काही विशेष कारणाने ती वापरत होतात का?”

तिच्या डोळ्यांनी गुप्तहेराचा चेहरा न्याहाळला. “त्यामुळे हृदय उत्तेजित होते. मला कधी गरज पडली, तर म्हणून त्या बाटल्या तिथे असतात.”

ट्रॅगने विचारले, “तसा डॉक्टरांच्या शिफारसीचा कागद तुमच्याकडे आहे का?”

“हो, अर्थात.”

“हा कुठला डॉक्टर आहे?’

“तरुण माणसा, मला वाटते, त्याच्याशी तुझा काही संबंध नाही.”

“तुम्ही किती गोळया घेतल्या?”

“ओहो, मला माहिती नाही. दोन तीन असतील.”

“आणि मग बाटली तुम्ही परत औषधाच्या कपाटात ठेऊन दिली?”

“हो, ते मी तुम्हाला पूर्वी सांगितले.”

“झोपेच्या गोळयांच्या बरोबर शेजारी?”

“मला वाटते, हो. मी तुम्हाला सांगितले की तिथे अंधार होता. मी जवळपास गेले आणि मला वाटते, मी त्या झोपेच्या गोळयांशेजारी ठेवल्या.

ट्रॅग बोलला, “हे फार दुर्दैवी होते.”

“काय?”

“औषधाच्या कपाटाचा शोध हा झोपेच्या गोळयांसाठी नव्हता व स्ट्रायचनाईनच्या गोळयांसाठीही नव्हता, ही खरी वस्तुस्थिती आहे.”

मिसेस शोअर अजून ताठ बसल्या “म्हणजे तुम्ही माझ्या घरात येऊन माझे औषधाचे कपाट शोधले आहे?”

“हो.”

“हे करायचा तुम्हाला काय अधिकार होता?”

ट्रॅग आवाज न चढवता बोलला, “मिसेस शोअर, याऐवजी मी तुम्हाला एक प्रश्न विचारणे बरे ठरेल. तुमच्यावर विषप्रयोगाचा प्रयत्न झाल्याचे तुम्ही पोलिसांशी खोटे का बोललात?”

“असा काहीच प्रयत्न झाला नाही.”

“मला वाटते, आज दुपारी तुमच्या मांजराच्या पिल्लावर विषप्रयोग झाला आणि त्याला ब्लॅकली डॉक्टरांच्या दवाखान्यात नेले होते?”

“मला पिल्लासंबंधी काही माहिती नाही.”

ट्रॅग हसला. मिसेस शोअर, हे बघा, तुम्हाला यापेक्षा बरे काही करावे लागेल. खोटा पुरावा निर्माण करणे हा गुन्हा ठरतो. इथे दोन वकील आहेत आणि ते मला दुजोरा देतील की त्या बिअरच्या बाटलीत विष असेल, तर पोलिसांना त्याबद्दल जाणून घ्यायचे आहे आणि त्यांच्या तपासात तुम्ही बाधा आणलीत, तर ते शहाणपणाचे ठरणार नाही.”

खोलीचे दार ढकलले गेले. एक मनुष्य घाईघाईने आत शिरत बोलला, “इथे काय चालले आहे? मी या केसचा मुख्य डॉक्टर आहे. या रुग्णाला त्रास देऊ नका. तिला जोरदार धक्का बसलेला आहे. मी तुम्हाला सगळ्यांना बाहेर जायला सांगतो --- ताबडतोब.”

माटील्डा शोअर त्याच्याकडे बघून बोलली, “डॉक्टर, पण तुम्ही इथे पाच मिनिटे उशीरा आलात.”

# प्रकरण १०

राष्ट्रीय बँकेचा अध्यक्ष शोअर हवेत नाहीसा झाला, त्या रात्रीपासून जवळजवळ न बदललेल्या, मोठ्या, जुन्या धाटणीच्या घराशी, विचारात पडलेल्या आणि शांत झालेल्या जेराल्ड शोअरने त्याची गाडी चालवत आणली.

तो हेलनला बोलला, “तू इथे उतरलीस तर बरे आणि घरावर लक्ष ठेव. मी मिस्टर मेसन आणि त्यांच्या सचिव असलेल्या डेला यांना हॉलीवूडला त्यांच्या गाडीशी सोडून येतो.”

हेलन म्हणाली, “मी पण तुझ्याबरोबर येते म्हणजे येतांना तुला एकट्याला यायला नको.”

“मला वाटते, तू घरी रहावेस, ते बरे. येथील गोष्टी सुरळीत आहेत ना, हे बघण्यासाठी इथे कुणीतरी हवे.”

“माटील्डाकाकू केव्हा घरी येईल?”

जेराल्ड शोअरने मेसनकडे वळून तो प्रश्न त्याच्यावर टाकला.

मेसन जिवणी फाकवत हसला. “लेफ्टनंट ट्रॅगला तिला विचारायच्या

असलेल्या सर्व प्रश्नांची ती नीट उत्तरे देईपर्यंत नाही.”

“पण डॉक्टरांनी तर प्रश्न विचारायला फक्त पाच मिनिटे वेळ दिला आहे. ते म्हणाले की याहून जास्त वेळ त्यांच्या रुग्णाला सहन होणार नाही.”

मेसन बोलला, “तेच तर, आणि डॉक्टर ती असलेल्या दवाखान्यातील मुख्य आहेत. पण ट्रॅग काही माणसांना तिथे पहाऱ्यासाठी ठेवेल. डॉक्टरांनी ती पूर्ण बरी

झाल्याचे सांगेपर्यंत, ती तेथून जाणार नाही, असे तो बघेल. जेव्हा असे होईल, तेव्हा ट्रॅग तिला प्रश्न विचारून उत्तरे द्यायला लावेल --- तिथे दवाखान्यात किंवा घरी.”

जेराल्ड शोअर बोलला, “लेफ्टनंट ट्रॅग फार हुशार व निश्चयाचा तरुण माणूस दिसतो आहे.”

मेसन होकार देत म्हणाला, “तो तसा आहे. त्याला कमी लेखू नका. तो धोकादायक व आक्रमकपणे विरोध करणारा आहे.”

जेराल्ड शोअर शोधक नजरेने मेसनकडे बघत होता. पण मेसनच्या चेहऱ्यावर ट्रॅगबद्दल मारलेल्या शेऱ्यांचे काही पडसाद दिसत नव्हते.

हेलन गाडीतून उतरली व बोलली, “ठीक आहे. मी इथे थांबून किल्ला लढवते.”

तिचे काका म्हणाले, की त्यांना फार वेळ लागणार नाही.

ती थोडी शहारली. “आता यापुढे काय होणार आहे, याचे मला आश्चर्य वाटते. माझी इच्छा आहे की, जेरी टेम्पलर मला कुठेतरी भेटेल.”

डेला जोर देत बोलली, “मी तुझ्याबरोबर राहिलेले तुला आवडणार नाही का?”

हेलनने कबूल केले, “नक्कीच आवडेल.”

मेसन रुक्षपणे म्हणाला, “माफ करा, पण मला डेलाची गरज आहे.”

हेलनचा चेहरा पडला. “ठीक आहे एवढे काही नाही. मला वाटते --- मी ठीक असेन.”

हॉलीवूडच्या दिशेने गाडी चालवत, जेराल्ड शोअर त्याला काळजी वाटत, कुठेतरी परतला. मेसन, तू दोन तीन वेळा म्हणालास की, लेफ्टनंट ट्रॅग धोकादायक व आक्रमकपणे विरोध करणारा आहे.''

''हो.''

''तुझ्या या बोलण्याला काही विशेष अर्थ आहे, असे मी समजू का?''

''ते सर्व अवलंबून आहे.''

त्याच्या नम्र पण जोर देणाऱ्या व उलट तपासणी घेणाऱ्या पद्धतीने जेराल्ड शोअरने विचारले, ''ते कशावर अवलंबून आहे?''

''तुम्हाला जे काही लपवायचे आहे.''

''पण जर मला काहीच लपवायचे नसेल, तर?''

''तर मग लेफ्टनंट ट्रॅग धोकादायक आक्रमकपणे विरोध करणारा नसेल, पण धोकादायक असेल.''

शोअरने मिनिटभर कडेने मेसनकडे पाहीले व मग रस्त्याकडे डोळे वळवले.

मेसन सरळ गेला. ''या केसच्या खूप गोष्टी विशेष आहेत. सर्वप्रथम, जर तू आणि तुझा भाऊ काही अटींवर वेगळे झाला असाल, तर त्याने त्याच्या पुतणीला त्याच्या आवाजाने धक्का देऊन तो जिवंत असल्याचे सांगण्यापेक्षा, तुला फोन न करण्याचे काही कारण नव्हते.''

''तरीदेखील हा फारसा महत्वाचा मुद्दा नाही. पण मुख्य मुद्दा असा आहे की, त्याने विशेषकरून असे सुचवले, की हेलनने माझा सल्ला घ्यावा व मला घेऊन

लीचला भेटायला जावे आणि कुटुंबातील इतर कोणीही व्यक्ती तिथे हजर रहायला नको.”

जेराल्ड शोअर बोलला, “मेसन, तू एक तर फार बोललास किंवा फार कमी बोललास.”

मेसनने शांतपणे चालू ठेवले, “तरीही तू आमच्याबरोबर यायचा आग्रह धरलास.”

“मिस्टर मेसन, तुम्हाला काय म्हणायचे आहे, ते मला समजत नाही. मी माझ्या भावाला भेटायचा आग्रह धरणे, हे अगदी नैसर्गिक होते.”

“बरोबर आहे पण असे दिसते, की तू इतर कोणी त्याच्याशी बोलण्याआधी त्याला भेटायचा हट्ट केलास.”

“याचा काय अर्थ तुला अभिप्रेत आहे, ते तू सांगू शकतोस का?”

मेसन हसला. “अर्थात, सांगू शकतो. मी आता या समस्येचा एक व्यक्ती म्हणून लेफ्टनंट ट्रॅग कसा विचार करेल, हे बघतो. त्याची मानसिक अवस्था व स्वभाव यावर ते अवलंबून राहील.”

“पुढे जा.”

“ट्रॅग असा विचार करेल की, तू आमच्याबरोबर घर सोडल्यावर व सर्व वेळ आमच्याबरोबर असल्यावर, लीचला भेटायला हॉटेलात गेलो, तेव्हा तू आमच्याबरोबर नव्हतास.”

शोअर बोलला, “मला माझ्या भावात रस होता. लीचमध्ये नव्हे.”

“तेच तर. लेफ्टनंट ट्रॅग पण सहज कबूल करेल की लीच हा फक्त तू व तुझ्या भावामधील दुवा होता तरी तुला त्याच्यात रुची वाटायला हवी होती.”

“तरीही ट्रॅग हे मान्य करायला तयार असेल, --- जर इतर काही विवाद्य मुद्दे नसते तर.”

शोअरने विचारले, “म्हणजे उदाहरणार्थ?”

मेसन बोलला, “आपण सुरक्षित बाजू विचारात घेऊन, असे धरून चालू की, समजा ट्रॅगकडे तुझा एक फोटो असता, आणि त्याने तो कॅसल गेट हॉटेलातील कारकुनाला दाखवला असता आणि तू हेन्री लीचची चौकशी करत होतास का, असे त्याला विचारले असते किंवा त्यांनी तुला हॉटेलच्या आसपास पाहिलेले त्यांना आठवले असते तर -- तर पोलिसांनी तुला कदाचित चौकशीसाठी बोलावले असते --- “

जेराल्ड शोअर काही सेकंद गप्प राहीला. मग त्याने चौकशी केली, “त्यात आक्षेप घेण्यासारखे काय होते?”

मेसन बोलला, “मला सर्व काही माहिती नाही पण --- तरी मी ट्रॅगच्या दृष्टीकोनातून हे सर्व बघतो आहे --- काही विशेष गोष्टी अशा आहेत. तुझा भाऊ अचानक नाहीसा झाला. काही वेगळ्या कारणाने, तो नाहीसा झाला असणार. त्याच्या पलायनाच्या आधी कोणीतरी त्याच्याकडे पैशांची मागणी करत होते. ती व्यक्ती म्हणजे तू असल्याचे पुरावे आहेत. तरीही मला वाटते, या पुराव्यात काही शंका/गोंधळ असावा. मी असे धरून चालतो की तुला याबद्दल विचारले गेले होते. तू तुझ्यावरील हा आरोप नाकारत राहीलास. आता ट्रॅग असा तर्क करु शकेल की,

जर तुझा भाऊ इथे आला आणि त्याने याच्या विरुद्ध गोष्ट सांगितली आणि असे दाखवून दिले, की तू जे बोलत होतास, त्याचा त्याच्या नाहीसे होण्याशी संबंध होता.

असा विचार करुन लेफ्टनंट ट्रॅग नंतर स्वतःशी बोलला असेल की, फ्रॅंकलीन शोअर जिवंत आहे. काही कारणाने त्याला सर्वांसमोर प्रगट व्हायचे नसेल. स्वतःच्या घरी जाण्याइतकी त्याला हिंमत नसेल. त्याला त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधायचा असेल. म्हणून तो स्वतःच्या भावाला टाळून, त्याच्या पुतणीशी संपर्क साधतो.

ती नक्कीच एक आकर्षक तरुण बाई आहे, पण त्याने घर सोडले, तेव्हा फक्त तेरा चौदा वर्षांची असलेली! जेराल्ड शोअरकडे भावाने स्वतःच्या आगमनानंतर दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे तो तत्क्षणी पुतणीला फोन करायचा निर्णय घेतो. एकदम घरी यायला किंवा नातेवाईकांना भेटायला नाराज असलेल्या त्याचा हेन्री लीच हा मधला दुवा आहे. पण हेन्री सुनसान जागी जाऊन, मारला जातो. तो तिथे गेल्याचे त्याने स्वेच्छेने लिहिलेले टंकलिखित पत्र आहे. पण त्याने स्वतः ते लिहिल्याची खात्री नाही. खरे तर असा विश्वास ठेवण्यास वाव आहे की त्याने ते लिहिले नाही. अर्थात लेफ्टनंट ट्रॅग शवविच्छेदनानंतर मृत्यूच्या वेळेचा काय निष्कर्ष काढतो, त्यावर बरेचसे अवलंबून आहे पण मी गुन्ह्याच्या जागी असतांना, पाहिलेल्या पुराव्यांच्या काही तुकड्यांवरून, मला असा विश्वास वाटतो आहे, आम्ही तिथे पोचायच्या आधी चार तास खून झाला असावा. असा तर्क केल्यानंतर जर लेफ्टनंट ट्रॅगला असा काही पुरावा सापडला, की तू आदल्या दिवशी संध्याकाळी लीचला भेटायचा प्रयत्न केला होतास किंवा प्रत्यक्ष भेटलास, तर तो तुला नक्कीच संशयित म्हणून गृहीत धरणार.”

मेसनने बोलणे संपवले. त्याच्या सिगरेट केसमधून एक सिगरेट घेऊन, ती पेटवली व आरामात बसला.

जेराल्ड शोअरने काही वेळ, साधारणपणे दहा चौक शांतपणे गाडी चालवली. मग बोलला, "मला वाटते, मी तुला वकील म्हणून माझ्या वतीने केस लढवायला सांगायला पाहिजे ही ती वेळ आहे."

मेसनने तोंडातून सिगरेट काढली व खूप वेळ निरीक्षण करत म्हटले, "कदाचित असेलही."

गाडीत मागील बाजूला शांतपणे बसलेल्या डेलाकडे बघत जेराल्ड शोअरने विचारले, "तुझ्या सचिव बाईचे काय?"

मेसनने त्याला खात्री दिली, "ती विवेकाची पुतळी आहे. तू मोकळेपणे बोलू शकतोस --- आणि ही तुझ्यासाठी मोकळेपणे बोलायची बहुधा शेवटचीच संधी असेल."

"तू माझे वकीलपत्र घेशील का? "

मेसन बोलला, "ते अवलंबून राहील."

"कशावर?"

"परीस्थितीवर आणि मला तू निरपराध वाटत असशील, तर."

शोअर भावनातिरेकाने बोलला, "मी पूर्णपणे निरपराध आहे. अत्यंत

प्रतिकूल परिस्थितीचा मी बळी तरी आहे किंवा हेतुपुरस्सर रचलेल्या गुप्त कटात मी गोवला गेलो आहे."

मेसन शांतपणे सिगरेट ओढत राहीला.

शोअरने गाडी हळू केली. त्यामुळे त्याला गाडी चालवण्याकडे फारसे लक्ष द्यावे लागत नव्हते. तो म्हणाला, “माझ्या भाऊ नाहीसा झाला, त्या रात्री मी त्याला फोन केला होता.”

मेसनने म्हटले, “पण नंतर तू ते अमान्य केलेस.”

“हो.”

“का?”

“बऱ्याच कारणांसाठी. त्यातले एक म्हणजे माझे बरेचसे बोलणे ऐकले गेले होते व जगजाहीर केले गेले होते. तुम्हाला आठवत असेल, की फ्रॅंकलीन नाहीसा होण्यापूर्वी, त्याच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली होती.”

“हो”

“का?”

“पुष्कळ कारणांसाठी. त्यातील एक म्हणजे माझे बरेचसे संभाषण चोरून ऐकले गेले व त्याचा डंका पिटला गेला. तुम्हाला आठवत असेल, फ्रॅंकलीन नाहीसा होण्यापूर्वी, त्याला कुणीतरी पैसे मागत होते आणि तो सांगत होता, की त्याची आर्थिक स्थिती अडचणीची आहे.”

मेसनने मान हलवली.

“त्यावेळी मी काही खरेदी विक्रीचे व्यवहार करत होतो. ते मी पूर्ण केले असते, तर मला खूपच फायदा झाला असता आणि करू शकलो नसतो, तर मी धक्कादायकपणे खलास झालो असतो. पाण्यात डोके वर काढायचा माझ्याकडे

एकच उपाय होता. तो म्हणजे दुसऱ्या मंडळींना क्षणभरही असे वाटायला नको होते, की माझ्याकडे पुरेशा भांडवलाचे पाठबळ नाही.”

मेसनने विचारले, “तुझा भाऊ?”

“हो, तसे पाहीले तर कदाचित माझ्या भावाचे लागेबांधे काहीसे त्याच्याशी संबंधित होते. त्याना असे वाटले नाही, की त्याला यात प्रत्यक्ष रस आहे. त्याना वाटले, की माझ्याकडे भरपूर भांडवल आहे आणि जर काही झाले आणि मला अजून पैशांची गरज पडली, तर माझा भाऊ नक्की माझ्या पाठीशी उभा राहील.”

मेसन बोलला, “त्यामुळे, ते बरचसे संभाषण वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले तरी त्यावेळेस तू तुझ्या भावाबरोबर होतास, हे कबूल करायची तुझी छाती झाली नाही.”

“असेच झाले.”

“तुझ्या भावाच्या नाहीसे होण्याचा काही वाईट परिणाम तुझ्या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर झाला का?”

भावनातिरेकाने बोलला, “झाला, असे मी म्हणेन. पण मला गरजेइतके भांडवल देणाऱ्या एका माणसाला मी गाठू शकलो --- त्यामुळे नफ्यातील सिंहाचा वाटा मला मिळाला. शोअर राष्ट्रीय बँकचे व्यवहार इतक्या सखोलपणे तपासले गेले व माझ्या भावाने इतकी मोठी रक्कम कॅशमध्ये ठेवली होती --- की त्या सर्वाचा फायदा झाला.”

“तू मिसेस शोअरना यात तू फ्रँकलिनबरोबर असल्याचे काही सांगितले नाहीस?”

“मी कुणाला काही सांगितले नाही. त्यावेळी तसे करायची माझी छाती झाली नाही.”

मेसनने विचारले, “आणि नंतर काही गुप्तता ठेवायची गरज संपली?”

“मी माझ्या गोष्टीत चिकटून राहिलो. माझ्या परिस्थितीत स्वतःची कल्पना करून बघा आणि तुम्हाला कळेल, की मी असा का वागलो.”

‘पुढे सांग.”

आज रात्री मला हेलनने जेव्हा सांगितले, की फ्रॅंकलिनने तिला फोन केला आहे, तेव्हा मी काही नको ते आता होणार अशा काळजीने आजारी पडलो. मला वाटले, सगळ्यात पहिल्यांदा मला त्याला भेटायला पाहीजे.”

“म्हणून जेव्हा अंबर कसा आहे, हे बघायला हेलन दवाखान्यातून परत आली, तेव्हा तू तुझ्या भावाला भेटायच्या प्रयत्नात होतास. बरोबर ना?”

“हो, जेवणानंतर हेलन अंबरला आणायला परस्पर दवाखान्यात गेली. तिने त्याला नंतर माळ्याच्या लहानशा पत्रा ठोकलेल्या आश्रयस्थानी ठेवले आणि मग तुमची ठरलेली भेटीची वेळ साधायला ती आली.”

“आणि त्या मधल्या वेळात तू कॅसल गेट हॉटेलात गेलास?”

“हो. म्हणूनच मी हेलनबरोबर तुम्हाला भेटायला आलो नाही.”

“तू लीचला भेटायचा प्रयत्न केलास?”

“हो.”

“काही जमले का?

‘नाही. पहिल्यांदा मी फोनवर चौकशी केली. मला सांगण्यात आले, की

लीच एका माणसाबरोबर बाहेर गेला आहे पण लवकरच परत येईल. त्यामुळे मी तिथे थांबलो. मला वाटले कदाचित तोच माझा भाऊ फ्रॅंकलीन असेल. त्यामुळे मी हॉटेलात थांबून राहिलो. मला लीच कोण हे माहिती नव्हते. पण मला खात्री वाटत होती, की तो लीचबरोबर असणार व तासाभरात परत येईल.''

''तू थांबलास?''

''हो, मी तुम्हाला भेटायची वेळ होईपर्यंत थांबलो.''

''तो आला नाही?''

''नाही, काही झाले तरी तो आला नाही, असे मला वाटले. पण फ्रॅंकलिन आला नाही, एवढे मला कळले.''

''आणि कारकुनाने तुझी दखल घेतली?''

''हो, मी तिथे नेहमी येणारा नसल्याचे त्याला समजले. मी दाराशी बसलो होतो आणि तो माझ्याकडे सतत बघत होता. त्याला वाटले असेल, की मी गुप्तहेर आहे. लेफ्टनंट ट्रॅगच्या बोलण्याने मला असे वाटले, की इथे जरा संशयास्पद चारित्र्याची, तशा प्रकारची पूर्वपीठिका असणारी माणसे येतात. त्यामुळे ते नवीन लोकांकडे तशा नजरेने बघतात. आधी मी माझी गाडी दाराजवळ लावणार होतो व गाडीतच थांबणार होतो. पण मला तिथे गाडी उभी करायला जागा मिळाली नाही. म्हणून मी आत जाऊन थांबलो.''

''आणि तुला भीती वाटली, की तो कारकून तुला आधी संध्याकाळी येऊन थांबलेला म्हणूनओळखेल व त्यामुळे तू आमच्याबरोबर हॉटेलात आला नाहीस.''

''हो, अर्थात. हे सारे मी सांगतो आहे ते तुम्ही ते व्यावसायिक गुप्तता पाळाल

हे गृहीत धरून.”

“मला वाटते, हे सगळे ट्रॅग स्वतः शोधून काढेल.”

तिथे चढाच्या रस्त्यावर रिकामी जागा होती. शोअरने तिथे रस्त्याच्या कडेला गाडी लावली व इंजिन बंद केले. मी गाडी अजून चालवू शकत नाही. मला एक सिगरेट दे, देशील का?”

मेसनने त्याला सिगरेट दिली. शोअरचे हात थरथरत होते. त्यामुळे काडीच्या ज्योतीवर सिगरेटचे टोक त्याने कसेबसे ठेऊन ती पेटवली.

मेसन म्हणाला, “पुढे सांग.”

“तुला सांगण्यासारखे एवढेच होते.

मेसनने डेलाकडे पाहीले. मग तो जेराल्ड शोअरला बोलला, “उद्देश सोडून बाकी सगळे ठीक आहे.”

शोअर मेसनकडे वळला. “मला असे दिसते आहे की मला तुझ्याशी मोकळेपणे बोलले पाहिजे.”

मेसन कोरडेपणे बोलला, “ते नेहमीच फायदेशीर ठरते. एक प्रॅक्टीस करणारा वकील म्हणून तुला ते जाणवायला हवे. मला काय घडले ते हवे आहे. तू कारणे आणि सबबी नंतर सांग. सरळपणे बोल. तू मला जे काही यापूर्वी सांगितलेस, त्याचा तर्क मी आधीच केला होता. आता तू ज्या गोष्टीकडे येतो आहेस --- ते सत्य तू मला सांगितलेस --- तर मी तुझी वकिली करावी की नाही, हे ठरवेन.”

शोअरने उदासीनतेने तोंडातून सिगरेट काढली व खिडकीतून बाहेर

फुटपाथच्या कडेला फेकून दिली. त्याने टोपी काढली व लाटा असलेल्या

करड्या केसातून त्याचे हात फिरवले.

तो बोलला, “हे असे आहे, की ते कधीही बाहेर येऊ नये.”

मेसन म्हणाला, “बोल. बोल.”

जेराल्ड शोअर म्हणाला, “मी माझ्या भावाकडे भीक मागितली व याचना केली. मला दहा हजार डॉलर्स हवे होते. माझ्या भावाने शेवटी वचन दिले की, तो मला मदत करेल. तो म्हणाला, त्या रात्री त्याला दुसरे काही काम आहे पण झोपण्यापूर्वी तो दहा हजार डॉलर्सचा चेक लिहून पोस्टाने पाठवेल.”

मेसनने विचारले, “तो तुझ्या नावाने चेक काढणार होता?”

“नाही. परस्पर ज्याला द्यायचा होता त्याच्या नावाने काढणार होता. माझ्या खात्यात जमा होऊन त्याला देण्याइतका वेळ नव्हता.”

“तुझ्या भावाने ते केले का?”

“नाही. त्याने चेक भरला नाही. त्याआधीच तो पसार झाला.”

“मग आपण असे गृहीत धरू शकतो की, तू भेटल्यानंतर असे काही घडले की त्याला तातडीने पलायन करणे आवश्यक ठरले. तो तुला दिलेले वचन विसरून गेला.”

“मलाही असेच वाटते.”

“तुला त्याने घर सोडल्याचे केव्हा समजले?”

“दुसऱ्या दिवशीच्या सकाळपर्यंत नाही.”

“आणि तो दिवस पैसे देण्याचा शेवटचा दिवस होता?”

शोअरने मान हलवली.

मेसन चौकशीदाखल बोलला, “कदाचित तुझ्याबरोबर काम करणाऱ्या त्या माणसाला आधीच पैसे देणार असल्याचे सांगितले होतेस का?”

शोअर भावनामयतेने बोलला, “त्या दिवशी सकाळी साडे नऊला मी त्या पैसे देणार असलेल्या माणसाला फोन करून सांगितले की आजच्या दिवसात, बँक बंद होण्यापूर्वी त्याला त्या रकमेचा चेक मिळेल आणि त्यावर फ्रॅकलीन बी शोअर अशी सही असेल. मी फोन खाली ठेवल्यावर दहा मिनिटातच माटील्डाशी माझा संपर्क झाला आणि तिने मला तिच्याकडे ताबडतोप बोलावले. तिने मला काय झाले, ते सांगितले.”

मेसन म्हणाला, “मला आठवते त्याप्रमाणे, एक दोन दिवस फ्रॅकलीन घरातून नाहीसा झाल्याचे वृत्त लोकांपासून गुप्त ठेवले गेले.”

शोअरने मान हलवली.

मेसनने मोठ्या रुबाबाने त्याच्याकडे पाहीले. “त्या सुमाराला खूप मोठमोठ्या चेकच्या बदल्यात कॅश काढली गेली.”

शोअरने मान हलवली.

मेसनने विचारले, “काय म्हणतोस?”

शोअर बोलला, “त्यात रॉडने फ्रेंचला दिलेला दहा हजार डॉलर्सचा चेकही होता.”

“तू त्याला पैसे द्यायचे कबूल केले होतेस का?”

“हो.”

मेसनने विचारले, “आणि तो चेक?”

जेराल्ड शोअर बोलला, "तो चेक माझ्या सहीने मी दिला होता. मी माझ्या भावाची खोटी सही केली. माझ्या भावाने मला तो चेक देईल, असे सांगितले होते. मला वाटले --- मी जे करायला हवे होते, ते मी प्रामाणिकपणे केले."

"आणि माटील्डा शोअरला हे कधीच कळले नाही, की त्या चेकवरील सही खोटी होती?"

"सही चोरल्याचे कुणालाच माहिती नव्हते. मी --- ते काम सफाईने केले. त्या रात्री माझ्या भावाने त्याच्या हिशेबनीसाला उशीरा काही दुसऱ्या कामानिमित्त फोन केला होता. त्यावेळी त्याने असेही सांगितले, की तो रॉडने फ्रेंच या नावाने दहा हजार डॉलर्सचा चेक काढतो आहे.

दाटलेल्या घशाने शोअर बोलत राहीला, "मिस्टर मेसन, मला नाही वाटत, हे सर्व केल्याचे स्पष्टीकरण मी कुणाला देऊ शकेन. माझ्या व्यवसायिक आयुष्याला कलाटणी देणारा तो बदलबिंदू ठरला. त्याआधी झटपट श्रीमंत होण्याच्या खूप योजनांमध्ये मी अडकलो होतो --- त्या कायदेशीर होत्या ते ठीक होते. पण शेवटी तो जुगाराचाच एक भाग होता. मला काही करून पैसा मिळवायचा होता. मला वाटते, माझ्या भावाच्या प्रभावाने माझ्यात पैसे मिळवण्याची उर्जा निर्माण केली. मला त्याच्यासारखे व्हायचे होते. मला असे दाखवून द्यायचे होते की, मी देखील पैसे मिळवू शकतो. मला आर्थिक सुरक्षितता हवी होती. ही दहा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मिस्टर मेसन, त्यावेळी मला आलेल्या उन्मळून टाकणाऱ्या अनुभवांमुळे मी आमूलाग्र बदललो."

"चालू ठेव. मला रुची वाटते आहे."

"मुख्य म्हणजे मला जाणवले की आयुष्यात पैशांपेक्षा जास्त असे काहीतरी

आहे.”

मेसनने विचारले, “तुला शहाणपण मिळवणे, आयुष्याचे तत्वज्ञान हासील करणे, असे म्हणायचे आहे का?”

जेराल्ड म्हणाला, “नाही, तसे नाही. माणसामध्ये दुसऱ्याप्रती असलेल्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये याबाबत, असे मला म्हणायचे आहे.”

“कुठल्या पद्धतीने?”

“मला असे वाटे की, माणसाला त्याचे आयुष्य त्याला पाहिजे तसे जगता आले पाहिजे. आता मला समजले, की ते खरे नाही. मनुष्य सर्वस्वी स्वतंत्र नाही. त्याच्या चारित्र्याने --- तो जे काही बोलतो, तो जसा जगतो --- त्यायोगे तो सतत दुसऱ्यांवर परिणाम घडवत असतो.” शोअरचा गळा दाटून आला आणि तो गप्प झाला.

मेसन सिगरेट ओढत थांबला. काही सेकंदाने शोअरने परत सुरु केले, “उदाहरणार्थ, हेलन बघा. ती चौदा वर्षांची मुलगी होती. आयुष्याच्या काठावर मंदपणे उभी होती. ती माझ्याकडे नेहमी अभिमानाने पहात असे व मला मान देत असे. नैतिकतेला महत्व देण्याचा काळ तिच्या आयुष्यात जवळ येत होता. जर काही झाले व तिला त्याचा शोध लागला --- तर बरे. ठीक आहे, मिस्टर मेसन, त्या वेळेपासून, मी माझ्या जीवनाचे उद्दिष्ट बदलले. माझ्याकडे आशेने बघणाऱ्यांना निराश न करणे --- ओहो, नाहीतर आपल्या आयुष्याचा काय उपयोग?”

दयाळू आवाजात मेसन बोलला, “खूपच उपयोग आहे.”

शोअर थोडक्यात म्हणाला, “तर हे असे आहे. मी पैशामागे धावणे सोडले. मी लोकांमध्ये जास्त रुची घेऊ लागलो. ते माझ्यासाठी काही करू शकतील, म्हणून

नव्हे. तर मी त्यांच्यासाठी काही करू शकेन म्हणून! माझ्या लक्षात आले, निदान आपल्याहून लहान जणांसाठी मी काही प्रमाणात तरी विश्वासार्ह बनायला पाहीजे व स्वतःसाठीही.” त्याने कडवटपणे चालू ठेवले. “हे मी सांगतो आहे. ज्याने चेकवर खोटी सही केली अशी व्यक्ती”.

त्याच्या भावनांचा जोर कमी होईपर्यंत मेसन थांबला व मग विचारले, ”रोडने फ्रेंचचे काय? त्याने काही प्रश्न विचारले का?”

“नाही. त्याने फ्रॅकलीनच्या हिशेबनीसाला फोन करून विचारले की फ्रॅकलीनने चेक लिहितांना काही सांगितले का? तेव्हा सकाळच्या डाकेने त्याला चेक मिळाला नव्हता. फ्रॅकलीनने त्याच्या हिशेब ठेवणाऱ्या विभागाला चेक द्यायला सांगितले असल्याचे कळल्यावर तो गप्प राहीला.

मेसनने विचारले, “फ्रॅकलीन नाहीसा झाल्याचे समजल्यावर, फ्रेंचने कदाचित थोडेफार ब्लॅकमेल करून, त्रास दिला असता का?”

“मला माहिती नाही. मला वाटते, फ्रॅकलीन नाहीसा झाल्याचे, व त्या दिवशी मी भावाबरोबर नसल्याचे समजल्यावर, त्याने जरा संशय व्यक्त केला असावा.”

मेसनने विचारले, “पण का? तुझा भाऊ तुझ्यापासून दुरावला असता, असे तुला वाटले का?”

विषादपूर्ण आवाजात शोअर म्हणाला, “तुम्हाला कळत नाही का? वर्तमानपत्रांनी खूप काही खणून काढले. माझ्या भावाच्या आर्थिक व्यवहारांबद्दल खूपसे काही छापून आले. त्याच्या बँकेच्या खात्यात किती पैसे आहेत, चेकपुस्तिकेवरून गेल्या काही दिवसात त्याने काढलेले चेक --- आणि अर्थात हे देखील दाखवले गेले की दिलेला शेवटचा दहा हजार डॉलर्सचा चेक रॉडने

फ्रेंचला दिला गेला होता.”

मेसनने या प्रकरणावर विचार केला. “तुझ्या भावाने तुला --- त्या परिस्थितीत --- माफ केले, असे तुला वाटत नाही का?”

जेराल्ड बोलला, “मी अशी आशा करतो की त्याने मला माफ केले असेल. पण जेव्हा त्याला माझ्यापेक्षा हेलनला फोन करणे उचित वाटले, तेव्हा मग --- तुम्ही तुमची अटकळ बंधू शकता.”

मेसनने सिगरेटचे शेवटचे थोटूक बोटात नीट धरले. “जर लेफ्टनंट ट्रॅगला या सर्व गोष्टी समजल्या, तर तो तुला दोषी ठरवून तुला खून केल्याच्या आरोपाखाली अटक करेल.”

जेराल्ड उद्गारला, “ते मला माहिती नाही का? पण मी काही करू शकत नाही. मला हे जोरदार प्रवाहाबरोबर मरणप्राय भोवऱ्याकडे खेचले गेल्यासारखे वाटते. त्याविरुद्ध बचाव करणे शक्य नसते.”

मेसन बोलला, “तू एक गोष्ट करू शकतोस.”

“काय?”

तो म्हणाला, “तुझे तोंड बंद ठेवणे व मला बोलू देणे --- म्हणजे सर्व केस माझ्या हवाली करणे.”

## प्रकरण ११

हेलनने तिचा कोट, टोपी व मोजे काढले व एक पुस्तक वाचू लागली. तेव्हा तिने एक गाडी घरात शिरतानाचा आवाज ऐकला. तिने तिच्या मनगटावरील घड्याळाकडे पाहीले. नक्कीच यावेळेस कुणी येणे शक्य नाही, पण गाडी तर आत शिरत होती. जेव्हा चालकाने गाडी बंद करून  छपराखालून अनेक वेळा सतत दार ठोठावले व आरडाओरडा केला, तेव्हा ती अवाक होऊन, तिचे ह्रदय धडधडू लागले. तिला माहिती होते की जगात अशा नादुरुस्त अवस्थेतील पण तरी चालू शकणारी एकच गाडी होती.

ती घाईने दाराशी गेली.

जेरी टेम्पलर गाडीतून हळू बाहेर पडत होता. पण त्याचा रुबाब तर बरेच काही मिळवल्यासारखा होता. तो त्याच्या गणवेषात बारीक व ताठ दिसत होता. त्याला सैन्यातील प्रशिक्षणाने खात्रीपूर्वक काही ठामपणा आणि पूर्वी नव्हता असा, त्याच्या क्षमतांबद्दलचा आत्मविश्वास दिला आहे, असे हेलनला जाणवले. हा मनुष्य तिच्यासाठी काही बाबतीत परका होता. तो कुटुंबाचा मित्र होता. त्याने तिचे ह्रदय धडधडायला लावून, तिच्या आयुष्यावर परिणाम करायची नवीन शक्ती मिळवली होती. हेलनने न ठरवता त्याला कुटुंबातील गुंतागुंत वा खुनाची हकीगत सांगितली. आज रात्री तो न ठरवता तिला भेटायला आला होता. जेरीबरोबर बोलायच्या अजूनदेखील महत्वाच्या गोष्टी होत्या. कदाचित आज रात्री ---

ती उद्गारली, “ ओहो, जेरी! तुला बघून मला इतका आनंद झाला आहे!”

“हॅलो, प्रिये. मी आत उजेड पाहिला, व त्यामुळे मला वाटले तू अजून झोपली नसावीस. मी काही मिनिटांकरता आत येऊ शकतो का?”

तिने त्याचा हात हातात घेतला व त्याला हॉलकडे घेऊन जातांना दार लावले. ती उगीचच ‘कसं काय’ म्हणाली. बैठकीच्या खोलीत असलेल्या सोफ्यावर ती बसली. जेरी कुठे बसावे असे बघत होता. शेकोटीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या खुर्चीकडे तो चालला होता की तिच्याकडे सोफ्यावर येत होता? निर्लज्जपणे तिने त्याला सोफ्यावर तिच्याशेजारी बसण्यास सांगितले. पण तो खोलीच्या मध्यभागी नुसता उभा राहिला.

“जेरी, तू दमलेला दिसतोस.”

त्याला आश्चर्य वाटले. “दमलेला? नाही.”

“ओहो! माझी चूक झाली. सिगरेट?” तिने त्याच्यासमोर पाकीट धरले.

त्याने काम झाले. त्याने खोली ओलांडत सिगरेट घेतली आणि तिच्या शेजारी बसला.

त्याने विचारले, “तू सबंध संध्याकाळभर कुठे होतीस?

हेलनचे डोळे खाली वळले. ती म्हणाली, “बाहेर होते.”

“ते मला माहिती आहे. मी तुला चार वेळा फोन केला.”

“वीस सेंट! जेरी, तू पैसे असे उधळायला नको होतेस.”

जवळजवळ शिव्या देत त्याने विचारले, “तू कुठे होतीस?”

ती चाचरत बोलली, “अशीच इकडे तिकडे होते. कुठल्या विशिष्ट जागी नव्हे.”

“एकटी?”

हेलनने वर त्याच्याकडे पाहीले. तिचे डोळे चिडवत होते. ती लांबण लावत बोलली, “अरे सैनिका, तू बराच चौकस दिसतोस. तू कदाचित फोन करशील, म्हणून तुझ्या सगळ्या मैत्रिणी प्रत्येक रात्री घरी बसून असतात का?”

तो बेदरकार आवाजात बोलला, “माझ्या कुणी मैत्रिणी नाहीत. तू मला ओळखतेस.”

“चालू ठेव.”

बोलणे चालू ठेवण्याऐवजी जेरीने जमिनीवर धावणे व उड्या मारणे चालू केले.

अचानक त्याने विचारले, “तुझी काकू कुठे आहे? झोपली?”

“मी तिला मागील वेळी बघितले, तेव्हा ती --- ” मग अगदी सहज बोलला, “तसेच कोमो आणि नोकराणी देखील घरात नाहीत का? तुझ्या काकूला मी आवडत नाही.”

“जेरी, तुझा असा समज आहे! मला नवल वाटते.”

“ती माझ्याविरुद्ध का आहे?”

तिथे शांतता पसरली.

हेलन शेवटी ठरवून बोलली, “अं --- मला वाटते, मी याचे उत्तर देऊ नये.”

पुन्हा शांतता पसरली.

“आज रात्री तू जॉर्ज अल्बरबरोबर बाहेर होतीस का?”

“त्याच्याशी तुला काय करायचे आहे? अर्थात पण असे झाले, की मी पूर्ण संध्याकाळभर जेराल्ड्काकांबरोबर होते.”

“ओहो!”

जेरीने सुटकेचा निश्वास टाकला व परत सोफ्यावर तिच्याशेजारी बसला.

“जेरी, तू ऑफिसर्सच्या प्रशिक्षणाला कधी जाणार आहेस?”

“मला वाटते, पुढील आठवड्यात माझी तयारी पूर्ण झाली, की लगेच.”

हेलन पुटपुटली, “सोमवारी --- अजून सहा दिवसांनी, सध्या तू लढाई सोडून कुणाबद्दल वा कशाबद्दल विचार करत नाहीस, नाही का?”

“हो, पण ते माझे काम आहे.”

हेलन नरमाईच्या आवाजात, त्याच्या शांततेचे कवच भेदत बोलली, “हो, पण आपल्याला जगायचेदेखील असते.” त्याने पराकोटीचा सभ्यपणा, इतके शिस्तशीर असणे सोडले असते तर --- जाऊ दे..’ ती त्याच्याकडे वळली. मोठ्या घरात ते दोघेच होते. हॉलमधील आजोबांचे घड्याळ मोठ्याने टिकटिक करत होते.

जेरी तिच्याजवळ जाण्यासाठी मनाचा हिय्या करत होता. त्याने बोलायला सुरवात केली पण तो अडखळत होता. त्याचे शब्द भरभर व एकमेकात गुंतलेले येत होते. त्याचे करडे डोळे तिच्याकडे नाजूकपणे बघत होते. पण त्यात ती गेले काही दिवस बघत असलेला ठामपणा होता.

तो म्हणाला, “माझ्यापुढे काय वाढून ठेवलेले आहे, ते मला माहिती नाही. तिथे फार भीषण परिस्थिती आहे. त्यानंतर जगाचा चेहरामोहरा बदलणार आहे. अशा वेळी माणसाला व्यक्तिशः खूप काही वाटत असले, तरी त्याला ते करता येत नाही. उदाहरणार्थ, जर माणसाचे एका स्त्रीवर प्रेम असेल, तर --- “

माटील्डाच्या झोपायच्या खोलीतून त्याना काही फर्निचर जमिनीवर पडल्याचा आवाज आला. मग क्षणभराने, काठीचा ठक --- ठक --- ठक असा आवाज व

जमिनीवर जोराने चालल्याचा पदरव आला. पिंजऱ्यातील पक्षी उत्तेजित होऊन चिवचिवाट करू लागले.

जेरी पोकळ आवाजात बोलला, "तुझी काकू माटील्डा."

हेलनने बोलायचा प्रयत्न केला, पण काही वेळ तिच्या घशातून काही शब्द उमटेना.

जेरीने तिच्याकडे चौकसपणे पाहीले. "प्रिये, काय झाले? तू घाबरलेली दिसतेस."

"ती --- माटील्डा काकू नाही."

'काहीतरीच काय! असा पदरव --- तू चुकणार नाहीस. पाय घसपटत व काठी टेकत चालणे --- जेव्हा ती --- तिचा पाय ओढत चालण्याचा तो विशिष्ट आवाज तुलाही ऐकू आला असेल."

हेलनच्या बोटांनी त्याचा दंड पकडला. "जेरी, ही ती नाही. ती घरी नाही आहे. ती रूग्णालयात आहे."

क्षणभर तिचे शब्द व तिची भीती त्याच्या जाणीवेत रुतत गेली. मग ती त्याच्या दंडाला चिकटण्याचा प्रयत्न करत असली, तरी तो तिला एका बाजूने धरून उभा राहिला.

"ठीक आहे. आपण ते कोण आहे, हे बघू."

"नाही, नाही, जेरी! एकटा जाऊ नकोस. तिथे धोका आहे. आज रात्री काही भयंकर झाले आहे. मला तुला ते सांगायचे नाही पण --- "

त्याने तिचे बोलणे ऐकले किंवा ऐकले नाही. तिच्या बोलण्याचा काही परिणाम झाला नसल्याचे, तिला समजले. तोंड दाबून तो हळूहळू बंद दाराकडे माटील्डाच्या झोपायच्या खोलीकडे जाणाऱ्या पॅसेजमध्ये पुढे सरकला.

त्याने विचारले, "दिव्याचे बटण कुठे आहे?"

हेलन त्याच्या कडेने धावली. अचानक तिला कळले, की जेरी इथे परका आहे व अंधारात चालतो आहे.

तिने दिवा लावला. "जेरी, जिवलगा, कृपया काळजी घे --- "

माटील्डाकाकूच्या झोपायच्या खोलीच्या दारामागे शांतता होती. जणू काही जो कुणी होता, तो ---

जेरीने दार उघडल्यावर, त्याला आश्चर्याचा धक्का द्यायला कदाचित स्तब्ध उभा असावा किंवा गुपचूप आवाज न करता चालत असावा. लव्ह बर्डसचा चिवचिवाट वाढत वाढत, कळसाला पोचला होता.

ती कुजबुजली, "जेरी, कृपया, ते दार उघडू नकोस. जर तिथे कुणी असेल, आणि --- "

तो बोलला, "माझा दंड सोड."

तरी तिने त्याचा दंड सोडला नाही.

तिला बाजूला करत, तो परत बोलला, "माझा दंड सोड. मला कदाचित त्याची गरज लागेल. हे काय चालले आहे, बघू या."

तो दार उघडायला लागला, त्याने त्याचा एक पाय उचलला व एक लाथ मारुन दार उघडले. उघड्या खिडकीतून गार हवा, दारावाटे पॅसेजपर्यंत आली. हॉलमधून

येणारा उजेड सोडला, तर खोली अंधारी होती. जेरी टेम्पलरची सावली झोपायच्या खोलीच्या जमिनीवर पडली होती. पक्ष्यांचा चिवचिवाट अचानक थांबला.

हेलन ओरडली, “दिवे! ती जेरीच्या कडेने दिव्याच्या बटणाकडे गेली.

त्याने तिचा खांदा पकडला. “मूर्खपणा करू नकोस. बाजूला हो. मला सांग -- “

माटील्डाच्या पलंगाच्या जवळील अंधाऱ्या कोपऱ्याजवळ अचानक मोठ्या वेगाने येणारी सुरीसारखी निळसर लाल पण गोलाकाराच्या परिघाशी शेंदरी भासणारी ज्योत पुढे येतांना दिसू लागली. कुणाला तरी रोखण्यासाठी. खोलीत बंदुकीचा मोठा आवाज आला. तिने गोळी दाराच्या पृष्ठभागाला चाटून गेल्याचे ऐकले. तिच्या चेहऱ्याला हवेची कुजबुज स्पर्शून गेली. तिने पाहीले की बंदुकीच्या गोळीने बाहेरील जुन्या लाकडाचे तुटकेफुटके अंधःकारमय तुकडे होऊन पडले आहेत आणि तिच्या कातडीला भिंतीचा रंग चिकटला आहे. जेरीने तिच्या खांद्याला धरून, तिची पाठ हलवली व तिच्यासाठी स्वतःच्या शरीराचा आडोसा केला.

पुन्हा बंदुकीतून बार उडाला. धुराबरोबर दुसरी गोळी तिच्या बाजूला असलेल्या कुणाला तरी लागली. तिच्या शेजारी असलेला जेरी झटकन अर्धवर्तुळात फिरला. त्याचा हात कशाचा तरी आधार शोधत होता. नंतर ती जमेल तसे काही जड ओझे तोलायचा प्रयत्न करत होती. जेरीचे पाय लटपटले. नंतर तो तिला बरोबर घेऊन जमिनीवर कोसळला.

# प्रकरण १२

मेसनने स्वतःच्या गाडीत बसून, जेराल्डूला शुभ रात्र म्हटले. त्याच्या अशीलाच्या गाडीचे दिवे घालवलेले पाहिले आणि मग स्वतःची गाडी सुरु करून, जाऊ लागला.

डेला उद्गारली, “बाप रे! तू नक्कीच केसेस निवडून घेतोस. जर लेफ्टनंट ट्रॅगला या सर्व गोष्टी समजल्या तर? शुभ रात्र.”

मेसन तोंड भरून हसला. “त्याला या गोष्टी समजू न देण्याचा एकच उपाय आहे.”

“तो कुठला?”

“त्याला भरमसाठ इतर गोष्टी सांगून त्याची दिशाभूल करणे. म्हणजे मग त्याला या गोष्ट समजून घ्यायला वेळच मिळणार नाही.”

तिने म्हटले, “त्यामुळे फक्त काही काळ त्या लपून राहतील पण आपण आता सर्वात चांगले तेवढेच करू शकतो.”

मेसनने त्याची गाडी हॉलीवूड रस्त्यावर आणली. लॉस एंजल्सच्या अर्ध्या रस्त्यापर्यंत पोचला. “मला वाटते, पॉल ड्रेकला फोन करायची वेळ आली आहे.” तो म्हणाला.

डेलाने सुस्कारा टाकला. “अजून खर्च! तुला खासगी गुप्तहेराची काय जरूर आहे? मी ते करू शकत नाही का?

“नाही, तुला ते जमणार नाही.”

“ठीक आहे. तसेही पॉल बाहेरगावी आहे. तो हा आठवडा सुट्टी घेणार आहे. तो प्रेमासाठी किंवा पैशांसाठी कार्यालयात जाऊन नवीन काम घेणार नाही आहे.”

“भिकार माणूस! मी ते विसरलोच होतो.”

“तुला त्याच्या एखाद्या मदतनीसाला विचारावे लागेल. तो बेडलिंग्टन कुत्र्यासारखा दिसणारा छोटासा गोड माणूस ठीक आहे. त्याचे नाव काय बरं?”

मेसन ठरवल्यासारखा बोलला, “तो नको. मला पॉलचीच गरज आहे. तू त्याला बोलावल्यास, तो तुझ्यावर फिदा असल्याने यायचा विचार करेल. तुला पॉल माहिती आहे.”

“हो, तो मला माहिती आहे. मला वाटते, तुझे बरोबर आहे. तो मला धुडकावून लावेल.”

ते रस्त्यावर कारने पुढे जात होते. “पेरी, ते खरेच एवढे महत्वाचे आहे का?

“काय?”

“ड्रेकला बोलावणे.”

“हो.”

डेलाने नाराज होत सुस्कारा टाकला व बोलली, “ठीक आहे. पुढे रात्रभर चालू असणाऱ्या जेवणाच्या ठिकाणी फोन असेल, तर आपण थांबू. मला तुझ्यासाठी काय करता येते, ते मी बघते.

“तू? तुला असे का वाटते आहे, की तू पॉलला मध्यरात्री अंथरुणाबाहेर काढू शकशील? मलाही ते जमत नाही.”

डेलाने एक सुस्कारा टाकला. ती पुटपुटली, “पॉलच्या चढेल सहजप्रवृत्तीना

कशी विनवणी करायची, ते तुला जराही माहिती नाही. मी त्याला लगेच कामाला लाऊ शकेन, असे मला म्हणायचे नाही. पण मी त्याला त्याच्या कार्यालयापर्यंत आणू शकले, तर मग तू त्याच्याशी बोलू शकशील.”

पेरी मेसन जेवणाच्या जागेसमोर थांबला आणि डेलाच्या मागोमाग आत गेला. तिने हसतांना सभोवताली पाहीले.

मेसन बोलला, “जा आणि तुझे काम कर. मी आपल्याला खाण्यासाठी काही मागवतो.”

डेलाने मान हलवली. “इथे नको.”

“का? काय झाले? जागा चांगली स्वच्छ तर दिसते आहे.”

“पण इथे फोन नाही.”

“अग मूर्ख बये, तिथे भिंतीवर फोन आहे.”

डेला म्हणाली “मला पॉलला जे सांगायचे आहे त्यासाठी भिंतीवरचा फोन चालणार नाही. केबिन पाहिजे. चल, आपल्याला दुसरीकडे कुठेतरी जावे लागेल.”

काही चौक पुढे एका झगमगीत जेवणाच्या जागेजवळ मेसनने गाडी थांबवली. त्याने आतील चकाकणाऱ्या खिडक्या पाहून गाडी बंद केली.

“मला भूक लागली आहे. इथे फोन नसला तरी आपण खाणार आहोत.”

दाराच्या आत मेसनने एका फोनकडे निर्देश केला व तो खायचे काही मागवण्यासाठी हालचाल करू लागला.

ती बोलली, ‘मला डुकराचे मास, अंडी आणि कॉफी.”

मेसनने दोन डुकराचे मास व दोन अंडी मागवली. अंडी सरळ ठेऊन तळा.”

खूपशा फ्रेंच फ्राइज आणि बरीचशी कॉफी आणा. दोन चीज बर्गर सँडविच देखील कडेला असू

देत."

पाच मिनिटाने डेला देखील मेसनला येऊन मिळाली.

"तो सापडला का?"

'हो, सापडला."

"तो कार्यालयात येतो आहे का?"

"तो अर्ध्या तासात --- कार्यालयात येतो आहे."

"छान, तुझ्या चेहऱ्याला काय झाले? तुला ताप तर आला नाही ना?"

"मी लाजेने लालसर निळी झाले आहे! मी हे परत कधी करणार नाही. तुझ्यासाठीदेखील नाही. मला आताच्या आता माझी कॉफी हवी आहे."

पेरी मेसन मवाळपणे बोलला, "माझा धिक्कार असो."

वेटरने दोन कप वाफाळती सोनेरीसर चॉकलेटी कॉफी आणली. तो म्हणाला, "ही तुम्हाला आवडेल. सर्वात उत्तम अशी ती मी आणली आहे. मी ती कमी बनवतो व ताजी ठेवतो."

ते स्टुलावर बसले व टेबलावर कोपरे टेकवली. कॉफीचे घुटके घेतले व गॅसवर अन्न शिजतांना

पाहीले. डुकराचे मास भाजतानाचा वास त्यांची भूक चाळवून, त्यांच्या नाकात शिरला.

डेला म्हणाली, "आता मला सांग, तुला पॉल ड्रेकची का गरज आहे?"

मेसन बोलला, “अनेक अर्धसत्यांवर आधारित अशी ही केस असल्याचे गृहीत धरून ट्रॅगने ती बंद करण्यापूर्वी, मला खूपशा बाबी खणून काढायच्या आहेत.”

“शोअर तुला फक्त अर्धसत्य सांगत होता का?”

मेसनने विचारपूर्वक त्याच्या कॉफीच्या कपातील वाफाळत्या पृष्ठभागाकडे पाहीले. “त्याने त्याला जाणवलेले सत्य सांगितले, पण तो चित्राचा फक्त काही भागच बघत होता. अर्धसत्यांवर आधारित अशा प्रासंगिक पुराव्यावर रचलेली केस नेहमीच भयंकर असते.”

वेटरने डुकराच्या मासाचे काप, सोनेरीसर चॉकलेटी तळलेली अंडी व ताजे फ्रेंच फ्राइज आणले.

याचा सुरेख वास दरवळत होता. मेसन बोलला, “आपण आधी खाऊ व मग विचार करू.”

वेटर खात्रीपूर्वक म्हणाला, ‘तुमचे चीज बर्गर सँडविच येत आहेत. पाव भाजून, त्यात योग्य तो माल भरून, त्यात पांढरा कांदा कापून घालत ते तयार होत आहेत. तुम्हाला त्यावर मोहरीचे सॉस हवे आहे का?”

मेसन बोलला, ‘हो, खूपसे घाल.”

ते त्यांचे खाणे सावकाश, नीट लक्ष देऊन, खात होते.

डेलाने कॉफीचा कप पुढे सरकवत तो परत भरण्याची मागणी केली.

कोणीतरी तिच्यावर विषप्रयोग केल्याचे माटील्डा लेफ्टनंट ट्रॅगला सांगायला का तयार नव्हती?

“अगदी सोपे आहे. कारण मग त्याचे अंबरला तसेच झाल्याशी संधान जुळेल, म्हणून!”

“तिला जीवे मारायचा प्रयत्न झाला होता का?”

“ते तसे दिसते आहे खरे!”

डेलाने विचारले, “काही नवीन कल्पना?”

“ते ती वेळ काय होती, यावर ठरेल. साधारणपणे कडक बिअर बर्फात ठेवली जाते.”

“ती तशी असणार, असा विचार तू का करतो आहेस?”

बाटली उघडल्यापासून विष मिसळल्यावर लगेच इतक्या लवकर त्रास सुरु होणार नाही , बहुधा ती अनेक बाटल्या बर्फात ठेवत असणार.”

“जर तिथे खूप बाटल्या असतील, तर ती विषबाधित बाटलीच घेईल असे ती देणाऱ्याला कसे काय वाटले असेल?”

“बहुधा सर्वात जवळील बाटली विषबाधित करून --- किंवा बऱ्याच बाटल्या विषबाधित करून!”

मेसनने पाच डॉलर्सचे बिल भरले व त्याच्या हातातील घड्याळाकडे पाहीले. त्याला सुटे पैसे मिळाले. “अजून कॉफी हवी आहे?”

मेसन बोलला, “अर्धा कप.” त्याने सुट्या पैशातील पंचवीस सेंट परत दिले व उरलेले पैसे खिशात टाकले. “सर्व काही छान होते. आम्ही केव्हातरी परत येऊ.”

“घाईत आहात का?”

‘अं --- अं”

वेटरने चष्म्याच्या वरील भागातून त्यांच्याकडे बघितले. तो बोलला, “जर कुणी मला विचारले, तर सांगणार की तुम्ही दोघे युमा येथील लग्नाच्या मेजवानीसाठी चालले आहात.”

डेला हसत बोलली, ‘असे कोणीही विचारणार नाही आहे.”

मेसनने त्याच्या खिशातून अजून पंचवीस सेंट काढून वेटरला टीप दिली

“ते कशासाठी?” वेटरने विचारले.

मेसन रुंद हसू हसत बोलला, “चल डेला, आपण जाऊ या.”

ते रस्त्याने भरभर चालत मेसनचे कार्यालय असलेल्या इमारतीशी येऊन पोचले. पॉल ड्रेकची गुप्तहेर संस्था त्याच मजल्यावर पण लिफ्टच्या जवळ होती. मेसनने उजेड असलेले दार उघडले व रात्री तिथे असणाऱ्या माणसाकडे पाहीले. . “बॉस आहे का?”

“हॅलो, मिस्टर मेसन --- नाही, तो हा आठवडा रजेवर आहे. मला वाटले, तुम्हाला माहिती असेल.”

“जर तो इथे आला, तर मी येऊन गेल्याचे सांगू नको. तू मला पाहिल्याचे विसरून जा.”

ते लांब रिकाम्या पॅसेजने जात पायऱ्या उतरले..”

रिकाम्या भिंतीतून घुमणारा प्रतिध्वनी येत होता व दोन्ही बाजूंना व्यवसायिक दुकानांच्या पाट्या दिसत होत्या. त्या जणू निर्जीव व्यवसायिकांच्या शांत रखवालदारांसारख्या दिसत होत्या. तेथील हवा शिळी होती. मेसनने त्याच्या खासगी

कार्यालयाचे दार उघडून दिवे लावले. त्याने दार उघडून धरले, तेव्हा डेला थांबली व बोलली, ‘पुन्हा लिफ्ट वर येत आहे. मी पैज लावते, की तो पॉल ड्रेक असणार.”

मेसन कायद्याच्या वाचनालयात अदृष्य झाला व दार लावले. त्याला त्याच्या जवळ येणारा एकसारखा पदरव ऐकू आला.

डेला दाराच्या पलीकडून कुजबुजली, ‘तो पॉल आहे, ठीक आहे. त्याच्या चालण्यात जराही बदल नाही. तो त्याच्या कार्यालयाशी थांबत नाही आहे.”

दारावर हळू थाप पडली. डेलाने ते करकर आवाज करत, उघडले. ड्रेकने ते ढकलून उघडले. आत आला व त्याच्यामागे दार लावले. त्याने डेलाकडे डोळे मोठे करून पाहीले. पण त्यात काही भाव नव्हता. मग तो विनोदाने हसला. उंच, काहीसा वाकलेला तो पुरा व्यवसायिक लकबीचा वाटत होता. तो जणू मध्यरात्रीची प्रेतागाराची चक्कर मारत होता.

“तो म्हणाला, “हॅलो.”

डेलाने गुळमुळीत आवाजात म्हटले, “हॅलो, पॉल.”

“हे चांगले नाटक आहे. तू असे वागू शकतेस, हे मला माहिती नव्हते.” त्याने हळूच दार ओलांडून, पेरी मेसनला पाहिले आणि ते सताड उघडले.

“अरे पळपुट्या, बाहेर ये. मी माझ्याशी लबाड खेळ खेळणाऱ्या तुला चांगला धडा शिकवतो.”

तोंडभर हसू हसत, मेसन बाहेर आला.” मला वाटले, तू येणार नाहीस. पण मी काही बोललो नाही.”

डेला बाहेर थांबली होती. “तू खेळ खेळलास आणि ढोंग करून मला फसवंलस. तुला वाटले, मी गंभीर आहे आणि सर्व वेळ तू मला हसत होतास!”

“अग डेला, मी तुझी स्तुती करत होतो. मी काही तुला हसत नव्हतो.” त्याचे सावकाश बोलणे उग्र दर्प व्यक्त करणारे होते. “मी तुला चांगले ओळखून आहे.”

त्याच्याकडे बघत, ती बोलली, “मग तू का आलास?”

पॉल ड्रेकचे डोके कासवासारखे हलले आणि मग पुढे येऊन, त्याच्या चेहऱ्याच्या काही इंचांवर असलेल्या लाल ठिपकेवाल्या बोटाच्या नखावर येऊन आदळले. त्याने गालातल्या गालात हसत, त्याच्या खर्जातील घोगऱ्या आवाजात कबूल केले, “माझ्या तर्काप्रमाणे पेरीला माझी गरज आहे आणि मला वाटते, माझी भरपूर सुट्टी झाली आहे. मला कंटाळा आला आहे.”

“पेरी या बाईला माझ्यापासून दूर कर आणि आपण कामाला लागू.”

त्याने अंग घुसळत, चामड्याच्या मोठ्या, गुबगुबीत खुर्चीत अडवारत विचारले, ‘काय बातमी आहे?”

दहा मिनिटे मेसन भरभर बोलला. ड्रेकने डोळे मिटून ऐकले.

मेसन बोलला, “एकंदरीत असे झाले आहे.”

“ठीक आहे. मी काय करायचे आहे?”

“लीचबद्दल तुला जेवढी माहिती गोळा करता येईल, तेवढी कर. त्या कुटुंबातील लोकांबद्दल जेवढी माहिती गोळा करता येईल, तेवढी कर. विशेषतः फ्रॅंकलीन नाहीसा झाल्यापासून व सर्वजणांनी आरडाओरडा सुरु केल्यापासून, तो शमेपर्यंत त्यांनी काय काय केले, ते शोधून काढ.”

“आणखी काही?”

“हो. या माणसाने हेलनला फोन करून, तो नक्की फ्रॅकलीन असल्याचे सिद्ध केले आहे. पण अशा प्रकारच्या केसेसमध्ये कुणी तोतया असे करत असणेही शक्य असते. आता हा लीच नावाचा माणूस फ्रॅकलीन शोअरच्या संपर्कात तरी असला पाहीजे किंवा तो फसवत असला पाहिजे. हा एक क्रमांक आहे.” मेसनने खिशातून वही काढत व त्यातून एक कागद फाडत म्हटले.

ड्रेकने विचारले, “गाडीचे परवानापत्र?”

“नाही. ज्यात फ्रॅकलीन शोअरच्या काही वस्तू बांधलेल्या होत्या, त्या हातरुमालावर लॉन्ड्रीची खूण होती. तो लीचच्या प्रेताशेजारी सीटवर पडलेला होता. लीचने त्या असे दाखवायला आणल्या असणार की, तो फ्रॅकलीन शोअर व त्याच्या नातेवाईकांमधील दुवा आहे.”

“मी काय म्हणतो आहे, पण असा मधला दुवा कशासाठी?”

“मला काय म्हणायचे आहे, ते तुला समजले आहे., कदाचित असे असेल की शोअर तोपर्यंत घरी येऊ इच्छीत नाही जोपर्यंत, त्याला घरातील एकंदर परिस्थितीचा अंदाज येत नाही.”

“त्याला हाकलून दिले जाण्याची भीती आहे का?”

“ते अवघड आहे.”

ड्रेकने हळू आवाजात शिट्टी वाजवली. “असे आहे का?”

मेसनने मान हलवली.

ड्रेकने विचारले, “तुम्हाला ही हातरुमालावर लॉन्ड्रीची खूण सापडल्याचे ट्रॅगला माहिती आहे का?”

“मला नाही तसे वाटत. पॉल, ती लॉन्ड्रीची खूण विशेष असल्याने, मी गोंधळल्यासारखे दाखवत, तिथे आसपास घुटमळत राहीलो आणि मला घड्याळात खूप रुची असल्याचे ढोंग केले. रुमालावरील ती शाईची खूण मला प्रथम दिसली नाही. आता बहुतेक लॉन्ड्री अशी खूण करत नाहीत. आपण त्या खुणेवरून फ्रॅंकलीन शोअरचा माग काढू शकतो.”

“आणखी काही?”

“असे दिसते आहे की, कॅसल गेट हॉटेल --- “

ड्रेक मध्येच बोलला, “मला ते भिकार हॉटेल माहिती आहे. बरेचसे दिखाऊ बांधकाम करू बघणारे, गैरमार्गाने धंदा करू बघणारे, झटपट श्रीमंत करणारा व्यापार करणारे आणि तशाच प्रकारचे लोक तिथे फिरत असतात आणि कॅसल गेट हॉटेलची जागा ते त्यांच्या भानगडी करण्यासाठी नव्हे तर त्यांचे फसवेगिरीचे वाईट बेत आखण्यासाठी वापरतात. जर त्यांचे उखळ पांढरे झाले, तर मग ते चैनीच्या महागड्या हॉटेलात किंवा सदनिकेत जातात व भपकेबाजपणे वावरतात. जर पोलिसांना त्यांच्याकडून काही मिळाले, तर ते ते सॅन क्वेन्टीन तुरुंगात जातात. पण जेव्हा त्यांना भानगडीतून काही पैसा मिळत नाही व पोलिसांना देखील त्यांच्याकडे काही मिळत नाही, तेव्हा ते एकमेकाना संपर्क करण्यासाठी व पैसा मिळवण्यासाठी, परत कॅसल गेट हॉटेलमध्ये येतात.” मेसन बोलला, “ठीक आहे. आता एक वेगळा दृष्टीकोनही आहे. १९३२ मधील वर्तमानपत्रे पहा. त्यांनी शोअरच्या खात्यातून दिल्या गेलेल्या चेक्सची एक यादी प्रसिद्ध केली आहे. त्यातील एक चेक फ्रॅंकलीन

शोअर नाहीसा झाल्यापासून काही दिवसांनी त्याच्या खात्यातून दिला गेला आहे. या १९३२ च्या चेक्सच्या यादीतून पोलिसांनी बरेच काही खणून काढले आहे. मला तू आता म्हणजे १९४२ मध्ये ताजा शोध घ्यायला हवा आहेस."

चामड्याचे आवरण असलेल्या वहीत काही लिहून घेत, ड्रेकने विचारले, "आणखी काही?"

मेसन बोलला, "एक प्रासंगिक बाब म्हणजे म्हणून एका मांजराच्या पिल्लाला माटील्डा शोअरच्या घरात विषबाधा झाली होती. मला वाटते विष खरेदी कुणी केली हे शोधण्यासाठी, ट्रॅग सगळी औषधांची दुकाने पालथी घालेल. आणि आपल्याला पोलिसांच्या मागे लागून काही सापडणार नाही. त्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्था व अधिकार आहेत. ते आपल्यापेक्षा लवकर गोष्टी शोधून काढू शकतात. पण तुझ्या मनात हा विषबाधेचा दृष्टीकोन असू दे."

ड्रेकने विचारले, "मांजराच्या पिल्लाचा या सर्वांशी काय संबंध?"

"ते मला माहिती नाही. पण माटील्डा शोअरला कुठून तरी विष दिले गेले --- मांजराच्या पिल्लाला दिले गेले, तशाच प्रकारचे.! तिथे घरची कामे करणारा कोमो नावाचा एक नोकर आहे. तो जपानी आहे की कोरियन आहे, याबद्दल प्रश्न आहे. ट्रॅगकडे एक हॉलीवूडच्या पोस्टातून साधारण साडेसहा वाजता आलेले पत्र आणि नकाशा आहे. ते जपानी वाटते --- पूर्णपणे जपानी. पण त्यावरून एक गोष्ट कळत नाही की ते कोमोने की दुसऱ्या कुणी लिहिले आहे. त्याच्या राष्ट्रीयत्वामुळे तो पोलिसांना झडप घालायला आयताच सापडला आहे. तुला कदाचित त्या पत्राची मशीनने काढलेली प्रत मिळू शकेल. ते कुठल्या मशीनवर टंकलिखित केले गेले हे ट्रॅग शोधतो आहे आणि ते सापडल्यास एखाद्या तज्ञाकडून ते तपासता येईल. तुला

वर्तमानपत्रातून समजेल की तज्ञांचे काय मत पडले. कुठले मशीन याचा त्यात उल्लेख असेल. मला वाटते एखादे लहानसे, फारशा गंभीर कामासाठी न वापरले जाणारे असे ते असावे.”

ड्रेकने विचारले, “तुम्हाला ते तसे असल्याचे कशावरून वाटले?”

“अक्षरे ओळीबाहेर गेलेली, छापणारी, जुनी/सुकलेली रिबीन, e अक्षराच्या गोलाकारात मळ साचलेला, a ची सफाईदार नसलेली वळणे आणि कागदावरील अक्षरांमधील सगळीकडे सारखी नसलेली जागा! या सर्वांमुळे ते फार विचित्र दिसत होते. तरीही ट्रॅगला ते एका नजरेतच लक्षात आले असेल. त्यामुळे त्या पत्रावर फार वेळ घालवू नको. पोलिसांनी एकदा केलेले काम परत करण्यात फारसा अर्थ नाही आणि आपण त्यांच्याशी स्पर्धा करू शकत नाही.”

ड्रेक म्हणाला, “ठीक आहे. मी --- “

डेला बोलली, “बाहेरील कार्यालयातील फोन केव्हाचा वाजतो आहे. तो खालच्या पट्टीतील सतत येणारा विशिष्ट आवाज ऐका. मुख्य लाइनवरील कुणाचा तरी संपर्काच्या वायर्स तुटल्या असल्या की स्विचबोर्डचा असा आवाज येतो. गेले पाच मिनिटे थांबून, थांबून तो आवाज येतो आहे.”

मेसनने त्याच्या घड्याळाकडे बघून, म्हटले, “अरे बापरे, डेला, कोण आहे ते बघ.”

ती उठून बाहेरील कार्यालयातून दाराशी गेली व काही मिनिटात धावत परत आली.

मेसनने विचारले, ‘काय झाले?”

“हेलन केंडल. कोणीतरी घरात घुसून तिच्या सैन्यातून सुट्टीवर आलेल्या मित्राला बंदुकीची गोळी मारली. तिने पोलिसांना कळवले आहे. आता ती दवाखान्यात आहे. ते त्याच्यावर उपचार करत आहेत. तो वाईट रीत्या जखमी झाला आहे. उपचारानंतर तो ठीक होण्याची आशा कमी आहे. गेले पाच मिनिटे ती फोन करत आहे.”

मेसनने पॉल ड्रेकला खूण केली. “पॉल, चल, आपण जाऊ या.”

ड्रेकने मान हलवली. “तुम्ही जा. त्या वेळेपर्यंत, लेफ्टनंट ट्रॅगने गोष्टी इतक्या आवळत आणल्या असतील की तुम्हाला तिथे जायला प्रचंड गर्दी लागेल. तिथे ट्रॅगचे काम चालू असतांना, मी या इतर दृष्टीकोनांमधून विचार करून बघतो.”

मेसन बोलला, “असे असण्याचा एक फायदा आहे.”

ड्रेक बोलला, ‘हे नवे प्रकरण त्याला त्यात गुंतवून ठेवेल व त्यामुळे मला मोकळीक मिळेल.”

मेसन त्याचा मोठा कोट घालत होता. “डेला, तुला यायचे आहे का?”

“मला मागेच ठेवायचा प्रयत्न कर.”

ड्रेकने विशिष्ट रीतीने तिरपे हसून मेसनकडे पाहीले. त्याने विचारले, “शेवटचे पिस्तूल चालवले गेले, तेव्हा तुमचा अशील कुठे होता?”

मेसनने त्याच्या मनगटावरील घड्याळाकडे पाहीले. भरभर विचार करतांना तो करत असे, तसे त्याने डोळे बारीक केले व बोलला, “लेफ्टनंट ट्रॅग पहिल्यांदा ही गोष्ट विचारेल. मला वाटते आता विचारत असेल --- आणि उत्तर मिळवत असेल. मला वाटते, माझा अशील वेळेवर घरात घुसून बंदूक चालवू शकला असेल.”

# प्रकरण १३

जिथे फ्रॅकलीन शोअर आर्थिक दृष्ट्या संपन्न अशा अवस्थेत राहिला, ते मोठे, जुन्या पद्धतीचे घर पूर्णपणे सजवलेले होते. घरात यायच्या वाटेवर दोन पोलीस पहारा देत होते. सगळेजण उद्दीपित अवस्थेत होते. जवळपासच्या घरांच्या वरील मजल्यांवर रोषणाई केली होती. एरवी ही घरे अंधारात, झोपेत व संकटाच्या छायेत असत.

मेसन दोनदा घरावरून गेला. मग त्याने विरुद्ध बाजूच्या रस्त्यावर गाडी लावली व डेलाला म्हणाला,"मी प्राथमिक सर्वेक्षण करतो. तुला गाडीत बसायचे आहे का?"

"ठीक आहे."

"तुझे डोळे उघडे ठेव. जर तुला काही संशयास्पद वाटले तर, काडी ओढून सिगरेट पेटव. नाहीतर सिगरेट ओढू नको. जेव्हा तू काडी ओढशील, तेव्हा सेकंदभर ती खिडकीच्या काचेजवळ तशीच धरून ठेव. पहिली काडी विझेपर्यंत ठेव. त्यात काही धोका नाही. जर मला पहिली काडी दिसली नाही, तर मग दुसरी पेटव."

"तू घराकडे चालला आहेस का?"

"मला आधी घराचा परिसर तपासायचा आहे."

'तू घरात जाशील, तेव्हा तुला मी तुझ्याबरोबर यायला हवे आहे का?"

"मी तुला सांगतो. प्रथम मला तपास करू दे. घराच्या उत्तरेला असणारी,तळमजल्याची खिडकी बघ. ती सताड उघडी आहे व पडदेही ओढलेले

नाहीत. मी आता त्या खोलीत उजेड पाहीला. ते काही विशेष वाटते आहे." डेला गाडीत बसून राहिली. "मला वाटते ट्रॅग स्वतः आधीच कामाला लागलेला आहे."

"ओहो, नक्कीच."

"आणि तुझा अशील, जेराल्ड शोअर?

मेसन बोलला, "तो या सगळ्या गोष्टींमध्ये लुडबुड करत असेल. मला आशा आहे की, तो त्याच्याविरुद्धचा काही पुरावा त्यांच्या हाती लागू देणार नाही."

डेलाने विचारले, "त्याच्याविरुद्धचा पुरावा काय आहे?"

"तो आपल्याबरोबर होता --- मला आशा आहे." ती बोलली, "मला वाटत नाही की आपण आपल्या अशीलाविरुद्ध काही पुरावा सादर केला आहे. केला आहे का?"

"नाही .म्हणूनच मी म्हणतो आहे, की त्याने त्याचे तोंड गप्प ठेवावे."

"ट्रॅग तुझा शब्द खरा मानेल का?"

"ट्रॅग कदाचित मानेल. पण ज्युरीमधील लोकांच्या जागी तू स्वतःला कल्पून बघ. वकील कोर्टात खुनी माणसाच्या बचावासाठी येतो. त्याच्याशी दुसरा खून जोडला जातो. तो म्हणतो, 'त्या वेळी मी माझ्या वकीलाबरोबर होतो.' आणि त्याच्या बाजूने केस लढवणारा वकील व त्याची सचिव म्हणते की साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन, पुरावा देऊन, ते सिद्ध कर. हे फारसे बरोबर वाटत नाही, नाही का?"

तिने मान हलवून म्हटले, "ज्युरींना असे वाटणार नाही."

मेसन बोलला, “जेव्हा त्याना साक्षीदार बनावे लागते, तेव्हा चांगले वकील माघार घेतात.”

“म्हणजे जर तुम्हाला शोअरसाठी पुरावा सादर करायला सांगितला, तर तुम्ही ती केस सोडून द्याल?”

“मला केसमधील वकील व साक्षीदार दोन्ही व्हायचे नाही.”

” कदाचित साक्षीदार हो.”

मेसन त्याच्या लांब कोटाची बटणे लावत म्हणाला, “त्याबद्दल आपण नंतर बोलू.” ईशान्येकडून येणारा बोचरा वारा अंगावर घेत तो रस्त्याने उजेडाच्या इमारतीकडे कर्णाचे अंतर चालत गेला. गाडीच्या काचेतून डेलाने त्याचे निरीक्षण केले. तिचे डोळे झरझर हलत सावल्यांचा मागोवा घेत होते. जसा मेसन यार्डच्या जवळ आला आणि गवतातून चालू लागला, तेव्हा डेलाला कुंपणाजवळ एक सावली हलतांना दिसली.

मेसन उत्तरेला खिडकीच्या दिशेने वळला. सावली त्याच्याकडे सरकत होती. डेलाने घाईने काडी पेटवली. तिच्याकडे त्याची पाठ होती. त्याने खूण पाहीली नाही. डेला गाडी चालवायच्या चक्राच्या खाली असलेल्या भागाकडे वळली. तिने गाडीचे पुढचे दिवे दोनदा उघडमिट केले.

मग मेसन वळला पण तेव्हा --- फार उशीर झाला होता.

डेलाने खिडकीची काच खाली केली व तिला संभाषण ऐकू आले.

“मिस्टर मेसन?”

फक्त अगदी जवळचा व पेरी मेसनला खूप वर्षे ओळखत असलेल्या माणसालाच त्याच्या आवाजातील फरक लक्षात आला असता, जेव्हा तो बोलला, “हो, मी पेरी मेसन आहे. का?”

तो माणूस पुढे आला. “लेफ्टनंट ट्रॅगला तुम्हाला भेटायचे आहे.” तो म्हणाला की तुम्ही जवळपासच कुठेतरी असाल, म्हणून मी तुमचा शोध घेत होतो.”

मेसन मनापासून हसला. “लेफ्टनंट ट्रॅगला माझे अभिवादन सांगा. आपण त्याच्याकडे केव्हा जाऊ या?”

“आता लगेच.

“कुठे?”

“आतमध्ये.”

मेसनने त्या ऑफिसरचा हात हातात घेतला. “बाहेर थोडे गार आहे. सिगरेट हवी आहे?”

“चालेल.”

ते पायऱ्या चढून घरात गेले.

डेला गाडीत मागे टेकून बसली. हॉलमधील दिव्यांचा उजेड त्या वकिलाच्या डोळ्यात शिरला.

अचानक आलेल्या त्या तिरीपिमुळे त्याने डोळे किलकिले केले. साधे कपडे केलेला, दाराशी बसलेला ऑफिसर उठून उभा राहीला.

“ट्रॅगला सांग, मेसन आला आहे.”

त्याने चौकसपणे मेसनकडे पाहीले व म्हणाला, “ठीक आहे.” आणि अदृष्य झाला.

मेसनच्या बरोबर आलेल्याने सिगरेट पेटवली व परत डोक्यावर त्याची टोपी घातली. तो म्हणाला, “आपण इथे थांबू. तो तुमच्याशी बोलायला तयार होईपर्यंत, तुम्ही या घराच्या आसपास घुटमळत राहिलेले त्याला आवडेल, असे मला वाटत नाही.”

मेसनने भरभर चालल्याचा आवाज ऐकला. उठाबसायच्या खोलीच्या दारातून ट्रॅग आला. तोबोलला, “अरे वा, मेसन, तुला बघून छान वाटले. मला तुझ्याशी बोलायचे होते. मी तुझ्या कार्यालयात फोन केला पण तू तिथे नव्हतास.”

फसव्या अदबीने मेसन बोलला, “मी तुमची प्रत्येक इच्छा पूर्ण करण्यासाठी हजर आहे.”

“हा फार चांगला विचार आहे.”

लेफ्टनंट ट्रॅग वळला, त्याचे डोके दारात घातले व कुणाला तरी हाक मारली. “त्या झोपायच्या खोलीचे दार लावा.”

दार लावल्याचा आवाज येईपर्यंत, त्याची आज्ञा पाळली जाईपर्यंत तो थांबला.

“मेसन, आत ये.”

ट्रॅगने मेसनला उठाबसायच्या खोलीच्या दिशेने नेले. या वेळेपर्यंत मेसनचे डोळे उजेडाला सरावले होते. त्याने सर्व गोष्टी नीट पाहून घेतल्या.

शांत व स्थिर चित्त असलेला जेराल्ड शोअर एका आरामखुर्चीत पायांची फुली करून न हलता बसला होता व पाइप ओढत होता. साधे कपडे केलेला ऑफिसर

काही अडथळा न येता, त्याच्या टोपीची कडा खाली करून त्याचा चेहरा पूर्णपणे सावलीत जाईल असा उभा होता. तो सिगरेट ओढत होता, तसे पेटत्या सिगरेटचे लाल टोक मंदपणे कमीजास्त उजेड पाडत होते. मेसनला जो माणूस कोमो वाटत होता, त्याच्या चेहऱ्यावर पूर्व आशियाच्या खुणा होत्या व तो ऑफिसरपासून काही फुटांवर बसला होता.

त्या लांबट खोलीचे दुसरे टोक त्या मानाने थोड्या कमी उजेडाचे होते. पण माटील्डाच्या झोपायच्या खोलीकडे जाणारे हॉलचे टोक व हॉलही भरपूर उजेडाने झगमगत होता. हे दिवे नक्कीच फोटो काढण्यास योग्य असे लावलेले होते. उठाबसायच्या खोलीच्या वेगवेगळ्या भागातील वायर्स जमिनीवर वेड्यावाकड्या पसरलेल्या होत्या.

हॉलच्या शेवटाकडील वहिवाटीचा रस्ता असलेल्या दाराने पलीकडच्या खोलीतील आतील सजावट लपवली होती. दाराबाहेर झगमगीत दिवे होते. ते सरळ सांगत होते की लेफ्टनंट ट्रॅगला झोपायच्या खोलीचे व लाकडी जमिनीवर दाराशी पडलेल्या, घाबरवणाऱ्या लाल डागांचे फोटो का काढायचे होते.

ट्रॅग बोलला, “मेसन, बस. मला तुझा गैरफायदा घ्यायचा नाही. मागेही मी तुला मला माझ्याबरोबर मदत होईल असे काम करण्यास सांगितले होते. आता मी तसे सांगत नाही आहे. कारण मी तुझ्या शत्रुपक्षात आहे.”

मेसनने विचारले, “कसे काय?”

मिस्टर शोअर म्हणतात की तू त्यांचा वकील आहेस. तो काही बोलत नाही, हे मला आवडत नाही.”

मेसन बोलला, “मी तुला दोष देणार नाही.”

ट्रॅगने चालू ठेवले, “आणि मी हे खपवून घेणार नाही. जेव्हा खुनाच्या केसमध्ये माणूस माझ्यापासून काही लपवायचा प्रयत्न करतो, तेव्हा मला तो गुन्हा वाटू लागतो.”

मेसनने सहानुभूतीपूर्वक मान हलवली.

ट्रॅग बोलला, “मला अशी आशा आहे, की तू बोलशील. जर असे झाले नाही, तर तुझ्या अशीलासाठी ते दुर्दैवी ठरेल.”

मेसनने जेराल्ड शोअरला खूण केली व खुर्चीवर बसून बोलला, “ट्रॅग, मी अर्थात बोलेन. मी बोलायला नेहमीच तयार असतो.”

ट्रॅगने एक खुर्ची ओढली.

शोअरने त्याच्या तोंडातील पाइप काढला. “लेफ्टनंट ट्रॅग मला प्रश्न विचारत होता. “मी त्याला म्हटले, “माझा वकील तू आहेस.”

ट्रॅग बोलला, “त्यामुळे तू प्रश्नांची उत्तरे देणार नाहीस, याला काही अर्थ नाही. तुझी उत्तरे वेगळी असू शकतात.”

मेसनने विचारले, “ती वेगळी असू शकतात, हे तुला कसे माहित?

नक्कीच त्याने तुला त्याचा वकील म्हणून काम करायला सांगितल्यावर, असे झाले असेल.”

‘अस्स!”

शोअरने त्याच्या बोटाने, पाइपच्या बाउलमध्ये तंबाखू ओतली व बोलला, “लेफ्टनंट, ही व्यावसायिक शिस्त आहे. जो वकील स्वतःचा बचाव स्वतःच करायला बघतो, त्याचा पक्षकार मूर्ख ठरतो.”

ट्रॅग बोलला, "तुझा मुद्दा बरोबर आहे. गुन्हा घडला तेव्हा तू कुठे होतास, या प्रश्नाचे उत्तर देण्याचे तू टाळलेस.

मेसन बोलला, "ट्रॅग, समजा, आपण कुठल्या गुन्ह्याबद्दल बोलतो आहोत, ते तू मला सांगितलेस."

ट्रॅग बोलला, "ठीक आहे --- मी तुला ते सांगतो. हेलन केंडल त्या लिहिण्याच्या टेबलाशी बसून जेरी टेम्पलरशी बोलत होती --- तिचा मित्र, तिचे लग्न जरी त्याच्याशी ठरले नसले, तरी ते ठरायला हवे. त्यांना मिसेस शोअरच्या झोपायच्या खोलीतून काही आवाज आला."

मेसनने कुतूहलमिश्रित डोळ्यांनी विचारले, "कुठल्या प्रकारचा आवाज?"

"जणू पलंगाशेजारील स्टँड किंवा तसेच काही पडल्याचा आवाज."

मेसनने विचारले, "उत्तरेकडील खिडकीतून चढून, आत आलेल्या कुणा परक्या इसमाने केले का?"

ट्रॅगने क्षणभर हो नाही केले. मग म्हणाला, "हो. हो."

"पुढे सांग."

ट्रॅग बोलला, "अर्थात हेलन घाबरली, कारण तिला माहिती होते की तिची काकू झोपायच्या खोलीत नाही, तर दवाखान्यात आहे. त्यानंतर त्या दोघानाही माटील्डा शोअरचा पाय ओढत चालल्यासारखा पदरव आल्यासारखे वाटले. काठीचा ठक --- ठक --- ठक असा आवाज आला. मग त्यांनी शोध घ्यायला सुरवात केली."

मेसनने विचारले, "मिसेस शोअर दवाखान्यात होती?"

ट्रॅग बोलला, "हो ती दवाखान्यात होती. हे मी शपथेवर सांगू शकतो. टेम्पलरने दार उघडले. तो जेव्हा दिव्याचे बटण शोधत होता, तेव्हा खोलीतील कुणीतरी त्याला पिस्तुलातून गोळी मारली. दोनदा बंदूक उडवली गेली. पहिली गोळी चुकली. दुसरी त्याच्या डाव्या बाजूला लागली."

"मेसन घाईने म्हणाला, "तो मेला?"

"पहिले म्हणजे त्याची वाचायची संधी पन्नास पन्नास आहे. डॉक्टर तातडीने ऑपरेशन करत आहेत."

मेसन कोरडेपणे म्हणाला, "ट्रॅग, तुझी ही एक भयानक रात्र दिसते आहे."

ट्रॅगने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. जर त्यांना आधी ती मिळाली नसली, तर त्यांना लवकरच ती गोळी मिळेल. ती दाराजवळील लाकडाला लागली. ती एखाद दोन इंचाने हेलनच्या डोक्याला लागायची वाचली. ते .३८ कॅलीबरचे, आपोआप सज्ज होणारे, व अर्थातच जुन्या पद्धतीच्या दुहेरी कृतीने मारण्याचे पिस्तुल होते. हेन्री लीचला ज्या गोळीने मारण्यात आले, त्याच्याशी मी याची तुलना अजून केली नाही. पण तिन्ही फैरी एकाच बंदुकीतून झाडल्या गेल्या असाव्यात. याचा अर्थ त्या एकाच माणसाने मारल्या असाव्यात."

मेसनने हलकेच खुर्चीच्या हातावर ठेका धरला. त्याला तो प्रकार रुचीपूर्ण वाटल्याचे तो बोलला.

ट्रॅग दुष्टपणे बोलला, "असेच असावे, नाही का?"

मेसनने मान हलवली. पुढे जर आपण हे सिद्ध केले, की सगळ्या म्हणजे तिन्ही फैरी

एकाच बंदुकीतून झाडल्या गेल्या होत्या, तर मग त्या मारणाराही एकच असला पाहिजे. मग त्यातून लीच वगळला जाणार कारण तो तर मेला होता. माटील्डा शोअर नाही, कारण शेवटच्या गुन्ह्याच्या वेळी ती दवाखान्यात होती. जेराल्ड शोअर नाही कारण त्याच वेळी तो दुसरीकडे असल्याचा पुरावा त्याच्याकडे होता आणि जेरी व हेलन तर नाहीतच. शिवाय --- "

ट्रॅग मध्येच बोलला, "वगळण्याच्या बाबतीत मी माहीर आहे. पण मला गंमत कसली वाटली तर तू जे म्हणालास, की जेराल्डकडे दुसरीकडे असण्याचा पुरावा आहे."

मेसन बोलला, "मग तसे आहेच."

"ठीक आहे, तो काय आहे?"

मेसन हसून बोलला, "तू मला गुन्हा घडल्याची वेळ सांगितली नाहीस."

ट्रॅगने झटपट प्रतिप्रश्न केला, "मग तुला कसे माहिती, की त्याच्याकडे पुरावा आहे?"

मेसन हसत बोलला, "ते बरोबर आहे. मला माहिती नाही, आहे का? जी व्यक्ती खोलीत शिरली, तिला माहिती होते, की मिसेस शोअर घरी नाहीत. पण हेलनला ते माहिती असल्याचे तिला माहिती नव्हते."

ट्रॅगने उत्सुकतेने विचारले, "तू असा तर्क कसा काय केलास?"

मेसन बोलला, "कारण त्याने तो मिसेस शोअर असल्याचे भासवून, हेलनला फसवायचा प्रयत्न केला. तो मिसेस शोअरसारखा काठी घेऊन ठक --- ठक असा आवाज करत खोलीतून चालला. यावरुन तो जेराल्ड नव्हता, हे सिद्ध झाले कारण

मिसेस शोअर दवाखान्यात असल्याचे हेलनला माहिती असल्याचे जेराल्डला माहिती होते.”

ट्रॅगने रागाने भुवईवर चढवली. हे स्पष्ट होते की मेसनचे तर्क करून केलेले विधान त्याला आवडले. पण त्याचा स्वतः चा तर्क काहीसा वेगळा असल्याने तो थोडा उदास झाला.

अचानक खोलीच्या दुसऱ्या टोकाला असलेला पहारेकरी बोलला, “हा जपानी मनुष्य फार ऐकतो आहे. लेफ्टनंट, त्याचे कान जणु डोक्यापासून फूटभर अंतरावर बाहेर आले आहेत.”

ट्रॅग वळला, त्याचा चेहरा रागावलेला दिसत होता. “त्याला इथून हाकलून दे.”

कोमो अदबीने वाकून बोलला, “माफ करा. मी जपानी नाही. मी कोरियन आहे. जपान्यांशी माझे मैत्र नाही.”

ट्रॅग परत बोलला, “त्याला हाकलून दे.”

पहारेकऱ्याने कोमोच्या खांद्यावर हात टाकत म्हटले, “ए बारीकराव, बाहेर हो.”

कोमो खोलीतून बाहेर स्वयंपाकघराशी जाईपर्यंत ट्रॅग थांबला. मग तो मेसनकडे वळून बोलला,

“मेसन, मला तुझा व तुझ्या अशीलाचा दृष्टीकोन आवडला नाही.”

असू, तर मग आता माझी पाळी आहे. मी एखादा गोष्टी सांगणारा

मेसन मोठ्याने हसत म्हणाला, “लेफ्टनंट, जर आपण सत्याचा खेळ खेळत

असल्यासारखे, तू मला ज्या पद्धतीने इथे ओढून आणलेस, ते मला आवडले नाही.”

ट्रॅग बोलला, “आणि आता मी जे करणार आहे, तेदेखील तुला फारसे आवडणार नाही. जेव्हा माझ्या माणसांनी कॅसल गेट हॉटेलमध्ये तपासणी केली, तेव्हा तेथील कारकून बोलला, की जेव्हा पत्र मिळाले, तेव्हा तुम्ही चौघे डोंगरावर गेलात. आता तुमच्यापैकी एकजणाला हॉटेलमध्ये का जायचे होते? जरा एक मिनिट थांब.”

ट्रॅग उठून हॉलकडे जाणाऱ्या पॅसेजमधील फोनशी त्याच्यामागे दार उघडे टाकूनच गेला. त्याने एक क्रमांक फिरवला व क्षणभराने बोलला, “कॅसल गेट हॉटेल? रात्रीचा कारकून बोलतो आहे का? मी लेफ्टनंट ट्रॅग, गुप्तहेर बोलतो आहे. बरोबर. काल रात्री ती किती वाजता कामावर आलास? --- सहा वाजता? ठीक आहे. तुला जेराल्ड शोअर नावाचा माणूस माहिती आहे का? --- मी त्याचेवर्णन करतो. साधारण बासष्ट् वर्षांचा, दिसायला बऱ्यापैकी, उंच कपाळ, कडेने नीट दिसणारा, वजन एकशे पासष्ट् पौंड, कपाळासून निघालेले लाटावाले करडे केस, करडा चौकडीचा सूट घातलेला, फिकट निळा शर्ट, लाल/ निळा टाय व मोत्यांची स्कार्फ पिन --- असा तो होता! कधी? अस्स --- किती वेळ? मी पुढील अर्ध्या तासात तिथे येतो. मधील वेळात कुणाशीही याबद्दल बोलू नकोस.”

ट्रॅगने फोन ठेवला व तो परत अशा ठिकाणी येऊन उभा राहिला, की तो जेराल्ड्पासून पेरी मेसनकडे बघू शकेल. तो बोलला, “मला वाटते, मला खूप उजेड दिसू लागला आहे. मिस्टर शोअर, कदाचित तुम्ही मला सांगू शकाल, की तुम्ही कॅसल गेट हॉटेलमध्ये संध्याकाळी लवकर जाऊन, का थांबलात --- थांबलात --- आणि थांबलात?

जेराल्डने शांतपणे तोंडातून पाइप काढला व पेरी मेसनकडे बोट दाखवले. ”तो माझा वकील आहे.”

ट्रॅगने मान डोलवली व विजयी हास्य केले. त्याने “अरे जेरी” असे हॉलमधील शिपायाला बोलावून, म्हटले, मिस्टर मेसनने इथून जावे. तो इथे रेंगाळताना आढळला, तर त्याला आठवण करा की महाशय, आपण परत भेटेपर्यंत, त्याला दुसरीकडे कुठेतरी कुणाला तरी भेटायचे आहे --- ”

मग त्याने जेरीचे लक्ष जावे म्हणून त्याचा हात पकडला. “आणि मी इथे असलेल्या प्रत्येकाला सांगतो की फ्रॅंकलीन शोअर सापडल्याबरोबर मला त्याला मोठ्या ज्युरींसमोर साक्षीदार म्हणून उभे करायचे आहे --- आणि तुम्ही सगळेजण ते लक्षात ठेवा.”

मेसन एकही शब्द न बोलता, वळला आणि पुढील दाराशी जाऊन, ते उघडू लागला. ट्रॅग जेराल्ड शोअरला बोलला, “आता ही तुला बोलण्याची शेवटची संधी आहे.”

मेसन शोअरचे उत्तर ऐकण्यासाठी थांबायला बघत होता.

शोअरने शांतपणे विचारले, “तुमच्याकडे काडेपेटी आहे का?”

पहारेकऱ्याने मेसनला बाहेर काढले व दार लावले.

दुसरा ऑफिसर तो नीट जातो की नाही, हे बघण्यासाठी थांबला होता. तो त्याच्या शेजारी येऊन बोलला, “मी तुमच्या गाडीपर्यंत तुमच्या सोबत येतो.”

“तशी काही गरज नाही.”

“पण आलेले बरे. आज रात्री इथे काय काय होणार आहे ते सांगता येत नाही. मिस्टर मेसन, तुम्हाला काही झालेले मला नको आहे.”

पेरी घरातून बाहेर पडून गेटपर्यंत गेला. ऑफिसर त्याच्या शेजारून चालत होता. रस्ता ओलांडल्यावर त्याला फुटपाथची कडा रिकामी दिसली. तिथे त्याची गाडी नव्हती व डेलाही नव्हती. क्षणभर तो वकील गोंधळून गेला. त्याच्याबरोबर चालणाऱ्या ऑफिसरला परत जायला सांगावे की नाही, याबद्दल तो साशंक झाला.

ऑफिसरने विचारले, “काय झाले?”

कोपऱ्याकडे जात, मेसन बोलला, “माझा पाय थोडा मुरगळला.”

“बोला, मिस्टर मेसन, तुमची गाडी पलीकडील बाजूला आहे का? तिकडे गेलेले बरे. पण ती आहे तरी कुठे?”

“माझा गाडीचालक ती घेऊन कार्यालयात परत गेला. मला काही कामे होती.”

ऑफिसरने त्याच्याकडे संशयाने पाहीले. “आता तुम्ही कुठे जात आहात?”

“मी थोडे चालणार आहे --- मोठा राउंड घेणार आहे. जरा हवा खाणार आहे. तुम्हाला बरोबर यायचे आहे का?”

ऑफिसर भावनाप्रधानतेने बोलला, “नाही.!”

## प्रकरण १४

त्याच्या सदनिकेचे दार उघडतांना त्याने साठवून ठेवलेल्या क्रमांकपैकी नसणारा क्रमांक वाजत होता. त्याने दिवा लावला व खोली ओलांडून फोन घेतला. तो बोलला, “आपण कोण?”

ती डेला होती. तिच्याशी बोलायला सुरवात केल्यावर, ती उदास मनस्थितीत असल्याचे त्याच्या लक्षात आले, पण ती तसे दिसू न देण्याचा प्रयत्न करत होती. “ओहो, बॉस, तू आहेस का? ती भरभर काम करून कार्यालय आवरून/आटपून ठेवणारी डेला वाटत नव्हती. ‘मला वाटते, मी अशा केसेससाठी बनवलेल्या कायद्याच्या कलमांचे उल्लंघन करत आहे. बहुधा माझी कृत्ये कॅलिफोर्निया राज्याच्या लोकांच्या शांतीच्या व प्रतिष्ठेच्या विरुद्ध असावीत. मला वाटते मी पूर्णपणे गुन्हेगार असणार.”

मेसनने ग्वाही दिली, “ते म्हणतात की तुरुंग हा मोठा अनुभव आहे. तिथे तू खूप काही शिकशील.”

ती खूप जोराने हसली आणि तिथे मध्येच काही अडथळा आणला. “पॉल ड्रेकने मला ताकीद दिली होती, की जर मी तुझ्याबरोबर काम करणे सुरु ठेवले, तर मी तुरुंगात जाईन. पण त्याचा सल्ला ऐकून घेण्यासाठी, मी फारच हट्टी होते.”

“ठीक आहे. अजून तरी तू तुरुंगात गेलेली नाहीस. पण तू केले आहेस तरी काय?”

ती मोठ्या दुःखाने किंचाळत म्हणाली, “मी साक्षीदाराला --- पळवले आहे.”

“लेफ्टनंट ट्रॅगच्या हातावर तुरी देऊन, मी काही संभाषण न करता, लंकला पळवले.

“कुठे?”

“माझ्या गाडीत --- किंवा खरे तर तुझ्या गाडीत.”

“तू कुठे आहेस?”

“तुझ्या रहायच्या ठिकाणापासून चार चौक अंतरावरील एका गाडी दुरुस्तीच्या दुकानात.”

“साक्षीदार कोण आहे?”

“तो आता तो बाहेर गाडीत बसलेला आहे. त्याचे नाव लंक आहे आणि तो - “

मेसन मध्येच बोलला, “एक मिनिट थांब. नाव काय म्हणालीस?”

“लंक. तो शोअर घराच्या बाहेरील बागेतील माळी आहे आणि तात्पुरते त्याच्याकडे ते विषबाधा झाली होती, ते मांजराचे पिल्लू आहे.”

“तो त्याच्या नावाचे स्पेलिंग कसे करतो?”

“लं क --- थॉमस ब लंक. मी त्याच्या गाडी चालवायच्या परवानापत्रावरील ते नाव पाहिले आहे. ते एकदम वरती आहे,”

“त्याला काय माहिती आहे?”

“नेमके काय ते मला माहिती नाही पण मला वाटते, ते खूप महत्वाचे आहे.”

“का?”

“मला घरापासून दोन चौक पलीकडे एक गाडी दिसली. ती ज्या पहारेकऱ्याने तुला आत घेतले, त्याच्या मागावर होती. मी ती गाडी थांबतांना व त्यातून त्याला उतरतांना पाहिले. तो म्हातारा, सुरकुत्या पडलेला व बाहेर हिंडणाऱ्या प्रकारचा

माणूस आहे. प्रसंगापरत्वे, तो काही पाऊले धावू शकतो. तुला त्याला बघितल्यावर, तो खूप घाईत असल्याचे समजेल.”

“तू काय केलेस?”

‘मी त्या पोकाड्याच्या मागे गाडी चालवत गेले व एखादा चौक गेल्यावर त्याला भेटले. गाडीतून खाली उतरले व त्याला विचारले, की तो शोअरच्या घराच्या शोधात आहे का?”

ती का कू करत असतांना मेसनने विचारले, ‘मग काय झाले?”

“मी हे सर्व तुला फोनवर सांगणे बरे वाटत नाही.”

“तुला सांगावेच लागेल. निदान त्याने जो भाग ऐकू नये, तो तरी!”

“तो इतका उद्दीपित झाला होता, की तो चाचरत बोलत होता. आधी त्याला बोलताच येत नव्हते. तो नुसतीच मान हलवत होता. मग तो म्हणाला, की त्याला लगेच मिसेस शोअरना भेटायचे आहे. मी त्याला चांगल्या तऱ्हेने विचारले, की तो मिसेस शोअरना भेटला तेव्हा तो त्यांना ओळखत होता का? हे सर्व काय चालले आहे, हे समजण्यासाठी मी वेळ घालवत होते. मग तो म्हणाला, की तो तिच्यासाठी काम करतो. तो तिचा माळी असून गेली बारा तेरा वर्षे तिथे आहे.”

मेसनने विचारले, ‘पण तिथे रहात नाही?”

“नाही. त्याच्या गाडी चालवायच्या परवानापत्रावरील पत्ता असा होता, ६४२/२ दक्षिण, बिल्वेडरे. तो म्हणतो तो एका जेमतेम बांधलेल्या अविवाहित माणसाच्या झोपडीच्या मागील भागात रहातो. त्याआधी तो शोअर घराच्या गॅरेजवरील खोलीत रहात होता. मग तो आता रहातो तिथे राहू लागला.”

“त्याला काय माहिती आहे?”

“मला माहिती नाही. तो फार उद्दीपित झाल्याने बोलू शकत नव्हता. तो म्हणत होता, की त्याला मिसेस शोअरना लगेच भेटायला पाहीजे. मी त्याला सांगितले, की त्या घरी नाही आहेत. त्या कुठे आहेत, ते मला माहिती आहे व मी त्याला तिथे घेऊन जाऊ शकते. मी त्याला गाडीत घालून, तिथून निघाले व नंतर ढोंग केले, की मला गाडीत पेट्रोल व हवा भरणे आवश्यक आहे. मग त्या पंपावरील माणसाने मला गाडीचे स्पार्क प्लग बदलणे गरजेचे असल्याचे सांगितले. मी त्या माळ्याला सांगितले, की मिसेस शोअर जिथे आहे, तिथे तिला बोलून त्रास देण्यास परवानगी नाही. पण पंधरा/वीस मिनिटे आपण बोलू शकतो. हा सर्व वेळ मी तुला फोन करून, टॅक्सी करून घरी यायला सांगत होते. जेव्हा तुझा फोन लागेना, तेव्हा मी पंपावरील त्या माणसाने मन वळवून, गाडीच्या एका टायरमधील हवा सोडून देण्यास सांगितली, त्याला भोक पडले असल्याचे मला सांगायला सांगितले व ते काम आताच्या आता करणे गरजेचे असल्याचे सांगायला सांगितले. त्याने टायर काढला व मी सांगितल्या प्रमाणे तो ढोंग करत राहीला. आता तो माळी अस्वस्थ होऊ लागला व त्याला काहीतरी संशय येऊ लागला. मी तो टायर बसवून घेतला. तुला घाईने इथे आले पाहीजे.”

“तू जिथे आहेस, तेथील पत्ता काय आहे?”

“तुझ्या सदनिकेपासून चार चौक अलीकडे रस्त्याच्या कोपऱ्यावर!”

मेसन बोलला, ‘मी लगेच निघतो. तू तिथे थांब.”

“तू इथे आल्यावर मी काय करू?”

“ते मी आल्यावर बघतो. मला त्याच्यासंबंधी सांग”.

“त्याचे डोळे निळे व स्थिर आहेत. तो लांबच्या गोष्टी डोळे किलकिले करून बघतो. त्याचे तोंड सुरकुत्या पडलेले असून, गालाची हाडे उंच आलेली आहेत. खाली झुकलेल्या मिशांचा, सुमारे पंचावन्न ते साठ वर्षांचा, खडबडीत व वाकडेतिकडे हात असलेला, खांदे झुकलेला. लांब दंडांचा, सावकाश हालचालींचा व एकारलेल्या मनाचा आहे. साधा पण हट्टी आणि संशय आल्यास, वाईट स्वभावाचा आहे. मला वाटते, आपण काहीही सांगितले, तरी तो त्यावर विश्वास ठेवतो. आपण त्याला बरा म्हणू शकतो. पण मी इतकी उद्दीपित झाले होते आणि --- ठीक आहे. त्याला फार संशय येऊ लागलेला आहे. तू इथे लवकर ये नाहीतर तो माझ्यावर हल्ला करेल.”

मेसन बोलला, “मी वाटेतच आहे.” आणि फोन बंद केला.

त्याने दिवे बंद केले. लिफ्ट घेऊन खाली गेला, रस्ता ओलांडला आणि कुणी आपला पाठलाग करत नाही ना, हे बघण्यासाठी थांबला. त्याबद्दल खात्री झाल्यावर, तो भरभर चालत तीन चौक गेला आणि परत एकदा कुणी आपला पाठलाग करत नाही ना, हे बघण्यासाठी थांबला. नंतर त्याने पांढऱ्या गणवेषातील माणूस गाडीच्या मागील चाकाचे स्क्रू घट्ट करत असलेला पाहीला.

डेलाच्या शेजारी बसलेल्या पंचावन्नच्या पुढील माणसाच्या लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने तो डेलाच्या जवळ पोचला. डोक्यावरील टोपी काढत बोलला, “शुभ संध्याकाळ, मिस डेला. मला आशा आहे की मी तुला तिष्ठत ठेवले नाही.

डेलाने त्याच्या डोळ्यात काही खूण उमटते का, ते पाहीले आणि मग भावना दाखवत बोलली, “तू नक्कीच उशीर केला आहेस! जर टायरमध्ये खिळा गेला नसता, तर मी थांबले नसते.”

मेसन बोलला, “वाईट झाले. तुला माहिती आहे, मी लटकलो होतो. मी तुला म्हणालो होतो, की, मिसेस शोअरशी बोलायला मी व तू तुझ्या घरून जाऊ पण तू जाणतेस की ती – “ तिच्या शेजारील माणसाला प्रथमच बघत, तो बोलायचा थांबला.

डेला म्हणाली, “ठीक आहे. हे मिस्टर लंक आहेत. ते शोअर घरात माळी म्हणून काम करतात. त्याना पण मिसेस शोअरना भेटायचे आहे.”

मेसन बोलला, “मिसेस शोअर दवाखान्यात आहेत. त्यांना विषबाधा झाली होती. त्या म्हणतात की त्यांनी चुकून विष घेतले. पण पोलिसांना तसे वाटत नाही आणि ते तपास करत आहेत.”

लंक ओरडला, “विष!”

डेलाने दुःख व्यक्त केले. “आपण त्यांना भेटू शकत नाही का? मिस्टर लंक म्हणतात की त्यांचे फार महत्वाचे काम आहे.”

मेसन बोलला, “आपण प्रयत्न करून तर बघू. मला वाटते, सर्व काही नीट ठरवले गेले होते पण मध्येच काहीतरी झाले आणि --- “ त्याने त्याची जागा बदलली, जेणेकरून त्याला डोळयाच्या कोपऱ्यातून लंकवर लक्ष ठेवता येईल. त्याने पुढे चालू ठेवले, “असे बघा, आपण तिला भेटायचा प्रयत्न केल्यास तिथे पोलीस असल्यावर, ते प्रश्न विचारणे सुरु करतील.”

लंक उद्गारला, “मला पोलीस नकोत. मला मिसेस शोअरना खासगी भेटायचे आहे.”

मेसनने भुवया उंचावत विचारले, “तुम्ही म्हणता, तुम्ही त्यांच्या बागेत काम करता?”

"हो, मी माळी आहे."

"तिथेच रहाता का?"

"नाही. मी बसने कामाला येतो व तसाच परत जातो. मी तिथे काही काळ रहात होतो. ही अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्याना मी तिथे अजूनही रहायला हवा होतो. पण मला माझ्या आजूबाजूला भिकार पाळत ठेवलेली आवडत नाही. मला माझे खासगीपण आवडते."

मेसनने विचारले, "आशियामधील कुणी?"

"हो, तो घरी काम करणारा मुलगा. मला समजत नाही की तिने त्याला मागेच का काढून टाकले नाही. तुम्हाला खरे सांगतो, मला FBI ने इथे यायला हवे आहे आणि --- ठीक आहे. मला वाटते, मी अजून काही न बोललेले बरे."

मेसनने त्याला दाबले नाही. पण सहानुभूती दाखवत, मान हलवली.

"जसे मला समजते, तसे आपण मिसेस शोअरना पोलीस तिथे नसतांना भेटू. किंवा मग आपण थांबू. चालेल का?"

लंक म्हणाला, "मी थांबू शकत नाही."

"इतके महत्वाचे आहे?"

"हो."

मेसनने यावर विचार केला. ठीक आहे. आपण तिथे जाऊन सर्व आपल्याला हवे तसे आहे का, ते पाहू."

"ती कुठे आहे?"

मेसन बोलला, 'ती दवाखान्यात आहे."

“हो. मला माहिती आहे. पण कुठल्या दवाखान्यात?”

“मी तुला तिकडे घेऊन जातो.”

मेसनने गाडीने रस्ते पटापट ओलांडले. “अशा रात्रीच्या वेळी तुम्हाला सहसा कुणी भेटत नाही. पण जर कुणी भेटलेच, तर तो एखाद्या राक्षसासारखी गाडी चालवत असणार. अशा ठिकाणी तुम्ही कुणावर आदळणे शक्य असते.”

“अरे बापरे!”

‘तर तुम्ही मिसेस शोअरकडे गेली बारा वर्षे काम करत आहात?”

“हो, हे तेरावे वर्ष आहे.”

“मग तुला त्यांचा नवरा माहिती असेल?”

लंकने मेसनकडे कडकपणे पाहीले. त्याला कडेनी असे दिसले, की मेसनचे डोळे पूर्णपणे पुढील रस्त्याकडे लागलेले होते.

“हो, एक बागेत पाय ठेवणाऱ्यांपैकी चांगला माणूस.”

“मी पण असेच ऐकले आहे. त्याचे नाहीसे होणे फार विशेष वाटते, नाही का?”

“हं.”

“तुला त्याबद्दल काय वाटते?”

“कोणाला? मला?”

“हो.”

“मी कशाला त्याबद्दल विचार करेन?”

मेसन हसला. “तू नक्कीच विचार करणार, नाही का?”

“मला माळी कामाबद्दल पगार दिला जातो.”

मेसन म्हणाला, “हे रुचीपूर्ण कुटुंब आहे.”

लंक म्हणाला, “तुम्ही त्यांना ओळखता? त्या सगळ्यांना?”

“मी त्यातील काहीजणांना भेटलो आहे. मी जेराल्ड शोअरचे काही काम करतो आहे. तुला तो कसा वाटतो?”

‘तो ठीक आहे. मी त्याला ओळखतो. तो हिरवळ आणि फुलांच्या बाबतीत, त्याच्या भावासारखा नाही. त्याला त्यांचे फारसे काही पडलेले नाही. त्यामुळे मला तो फारसा भेटत नाही. मिसेस शोअर आज्ञा देते --- फक्त जेव्हा तो जपानी मध्ये नाक खुपसत नाही, तेव्हा. तो छोटारडा काही वेळापूर्वी काय करायला बघत होता, माहिती आहे का?”

“नाही.”

“तो तिला तिच्या तब्येतीसाठी हवापालट म्हणून कुठेतरी जाऊन रहायला सांगत होता. होता --- सर्व कुटुंबाला. म्हणजे त्याला एकट्याला त्याच्या ताब्यात अख्खे घर मिळेल. त्याला तीन चार महिने असे रहायचे होते. त्याला सर्वांनी फ्लोरिडाला पुतणीसकट जायला हवे होते. आणि मला असे समजले की तो जॉर्ज अल्बरशी याबाबतीत बोलला होता. कदाचित ती अल्बरचीच कल्पना असेल. तुम्हाला तो माहिती आहे का?”

“नाही.”

“तो एक छान केस असलेला मुलगा आहे. मालकीणबाईंना त्याचे वडील म्हणे आवडत असत ---किंवा त्याना ती आवडत असे. यापैकी काय खरे कुणास ठाऊक! मी आपले माझे काम करतो. आणि एकटा रहातो, एवढेच.”

“कोमो कसा आहे? चांगले काम करणारा आहे का?”

“तो काम ठीक करतो. पण नेहमी असे वाटत रहाते की तो त्याच्या भेदक डोळ्यांनी तुमच्या पाठीतून तुमच्याकडे आरपार बघतो आहे.”

“तू म्हणालास, की काही काळ तू शोअर घराच्या गॅरेजवरील खोलीत रहात होतास? कोमोमुळे तुला काही त्रास झाला का?”

“मारामारी नाही --- उघडउघड काही नाही. माझ्या भावाला त्याच्याकडून त्रास झाला.”

रस्त्यावर लांबवर बघून डेलाकडे एक झटपट दृष्टीक्षेप टाकत, मेसनने विचारले, “तुझा भाऊ? तुझा भाऊ तिथे तुझ्याबरोबर रहात होता का?”

“हो, साधारण सहा सात महीन्यांकरता.”

“त्याला काय झाले?”

“वारला.”

“तू तिथे रहात असतांना?”

“ --- “

“तू तिथून दुसरीकडे गेल्यावर? त्यानंतर किती काळाने?

“एखाद्या किंवा दुसऱ्या आठवड्याने.”

“आजारी होता?”

“नाही.”

“मला वाटते त्याला हृदयरोग असावा.”

“नाही, तो माझ्यापेक्षा लहान होता.”

डेला शांत रहात म्हणाली, “मला समजते, त्याला कसे वाटत असेल ते. मिस्टर लंक, तुम्हाला त्याबद्दल बोलायचे नाही आहे, बरोबर?

“नाही बोलायचे.”

डेला भरभर बोलली, ‘जवळचे कोणी जाते तेव्हा असेच होते. धक्का बसतो. मिस्टर लंक, तुमचा भाऊ चटपटीत असणार.”

“तुम्हाला असे का वाटते?”

“तुम्ही त्याच्याबद्दल सांगितलेल्या लहानसहान गोष्टींवरून. मला वाटते त्याचे कुणाशी फारसे लागेबांधे नव्हते. त्या जपानी मुलाने त्याला मूर्ख बनवले नसणार.”

“मी म्हणेन, नाही बनवले.

“त्यानंतर तुला एकट्याला बागकाम करणे अवघड गेले असणार.”

“तो मला मदत करत नसे. तो तिथे य़ेऊनजाऊन असे. तो अगदी थोडे दिवसच बरा होता. तो काही काम करू शकत नसे.”

“तशा प्रकारचे लोक दुखणे म्हणजे काय हे माहिती नसलेल्या बळकट लोकांपेक्षा कधीकधी जास्त जगतात.”

“खरे आहे.”

डेला बोलली, “मिस्टर शोअर खरोखर एक चांगला मनुष्य असणार.”

“हो, बाईसाहेब, तो नक्कीच तसा होता. माझ्याशी तो चांगला वागे”

“तुझ्या भावाला तुझ्या घरी राहून दिले त्यामुळे का? मला वाटत नाही की तो तुझ्या भावाकडून भाडे घेत असेल.”

लंक बोलला, “नाही. माझा भाऊ वारला, तेव्हा तो माझ्याशी कसा वागला, ते मी कधीच विसरू शकत नाही. मी माझे पैसे डॉक्टर आणि इतर गोष्टींवर खर्च करत होतो आणि --- तेव्हा शोअरने मला घरात बोलावून, म्हटले की तुला कसे वाटत असेल, ते मला समजते आहे आणि त्याने काय केले माहिती आहे?”

‘नाही. काय केले?”

“मला तीनशे पन्नास डॉलर्स दिले म्हणजे मी त्याला परत पूर्वेकडे पाठवू शकेन आणि मला कामावरून सुट्टी देऊन त्याच्याबरोबर रेल्वे गाडीने जायला सांगितले. माझी आई तेव्हा जिवंत होती, आणि याचे तिला अप्रूप वाटले. भावाला मृतावस्थेत मी तिच्याकडे नेले व तिकडे त्याचे अंतिम संस्कार केले.”

डेलाने विचारले, “त्यानंतर ती गेली का?”

“हो, पाच वर्षांपूर्वी. मिस्टर शोअर तेव्हा माझ्याशी ज्या उदारपणे वागले, ते मी कधीच विसरू शकत नाही. मी त्यांचे आभार मानले. मला त्यांचे अजूनही आभार मानायचे होते पण मी सर्व संस्कार आटपून परत आलो, तेव्हा त्यांनी घर सोडलेले होते.”

मेसनने डेलाला कोपरखळी देऊन असे सुचवले, की तिने त्या माळ्याला अजून बोलायला लाऊ नये आणि उद्दीपित करू नये. नंतर एक दोन क्षणांनी, मेसनने विचारले, “त्याच वेळी तो घरातून नाहीसा झाला का?”

‘हो, त्याच वेळी.”

“तो जाप नक्कीच हुशार होत त्यांना आपल्यापेक्षा जास्त औषधे माहिती होती.”

लंक पुढे वाकला, जेणेकरून त्याला वकिलाचा चेहरा दिसेल.”

“तुम्ही असे का म्हणता?”

मेसन बोलला, “ओहो, मला माहिती नाही. मी मोठ्याने विचार करत होतो, एवढेच. मला काही वेळेस गमतीच्या कल्पना सुचतात.”

“त्या कल्पनेत मजेशीर असे काय होते?”

मेसन बोलला, “ती खरे तर कल्पनाही नव्हती. मी फक्त विचार करत होतो.”

लंक मुद्दाम बोलला, “मी देखील खूप विचार करत असतो.”

मेसन काही सेकंद थांबला व मग निरीक्षण करत सहज बोलला, “जर माझ्या जवळपास जाप असता, तर मला तो आवडला नसता --- मला त्याच्याबरोबर एका घरात रहायला आवडले नसते –-- त्याने मला जेवण बनवून दिलेले मला आवडले नसते. माझा त्याच्यावर विश्वास नाही.”

लंक बोलला, “मलाही तसेच वाटते. मला तुम्हाला काही सांगायचे आहे. मिस्टर --- तुम्ही तुमचे नाव काय म्हणालात?

“मेसन.”

“तर मिस्टर मेसन, मी तुम्हाला काही सांगणार आहे. मी नंतर मिस्टर शोअर यांच्या घरातून निघून जाण्याबद्दल असे ऐकले, की जापचा यात काहीतरी हात असणार, यावर मी पैज लावली होती आणि मग, नंतर मी आश्चर्य करू लागलो, की

कदाचित जापने माझा भाऊ फीलच्या मरणाशी संबंधित काही केले असणार. असे काही असणार, असे मला वाटले खरे.”

मेसनने विचारले, “विष?”

“मी यावर काही बोलणार नाही. व्यक्तिशः मला वाकड्यात शिरून वा फसवणुकीच्या स्पर्धेमध्ये काही रस नाही. मला चांगले वागायचे आहे. मी त्याच्यावर आधीच एक अन्याय केला आहे.”

“ओहो, ते असे आहे का?”

लंक बोलला, “तुम्हाला खरे सांगायचे, तर मला त्याचा त्या प्रकारात हात असल्याचे वाटत होते. ठीक आहे --- तुम्हाला म्हणून सांगतो, मला एकदा असेही वाटले, की त्याला मिस्टर शोअरला वाटेतून दूर करायचे असेल आणि त्याचा सराव म्हणून त्याने माझ्या भावाला प्रथम विषाचा डोस देऊन किती द्यावा ते पाहीले असेल. मग मिस्टर शोअर घरातून निघून गेले व बाकी सगळे तुम्हाला माहिती आहे. फिलच्या मरणाबद्दल बोलतांना --- मी त्यावर इतका विचार केला नाही, पण नंतर तो करू लागलो.”

मेसनने परत डेलाला कोपराने ढोसले. त्याने दवाखान्याच्या कोपऱ्यावर गाडी वळवली. “खरे तर, त्यात जापने काही अन्याय केला, असे मला वाटत नाही.”

लंक आशापूर्वक बोलला, “त्याने ते नाही केले. पण काही तासांपूर्वी, तुम्ही सबंध रात्र जरी मला पटवायचा प्रयत्न केला असता, तरी ते मला पटले नसते. आपल्या डोक्यातून कशा कल्पना निघतात आणि तिथेच रुतून बसतात, हेच त्यावरून दिसते. मला त्या जागी, शोअर घराबाहेर रहायचे नव्हते, कारण जाप तिथे फिरत असे. फीलची तब्बेत अधिकाधिक खालावत चालली होती. मला काहीसे

आजारल्यासारखे वाटू लागल्याने, मी डॉक्टरकडे गेलो. पण त्यांना माझ्यात काही दोष आढळला नाही. त्यामुळे मी तेथून निघून आलो. पण मग मी ती जागा सोडलीच.”

तो पुढे बोलला, “आता माझी स्वतःची जागा आहे. मी स्वतःच सर्व स्वयंपाक करतो व माझ्याबरोबर माझा डबा घेऊन जातो. कोणी माझा डबा उघडून, त्यावर काही शिंपडू नये, म्हणून मी खूप काळजी घेतो!”

“मग तू लगेच बरा झालास का?”

“एक दोन आठवड्यात बरा झालो. पण फील आजारी पडला. त्याने तितकी काळजी घेतली नाही. तो बराच आजारी होता.”

“तू बाहेर रहायला गेल्यावर, कोमो काय म्हणाला?”

“तो खडूस जाप काही बोलला नाही. त्याने फक्त माझ्याकडे पाहीले, पण मला कळले, की त्याला मी काय विचार करतो आहे, ते कळले. पण मी काही पर्वा केली नाही.”

“कशामुळे तुझे मन बदलले? त्याने मिस्टर शोअरला विष दिले, असे तुला का वाटले नाही?”

त्याचे डोके आशापूर्णतेने हलवत, म्हणाला, “त्याने मालकांना विष दिले नाही. पण त्याने फिलला विष दिले, असे मला वाटते. त्याने मलाही विष देण्याचा प्रयत्न केला व मांजराच्या पिल्लाला विष दिले. जर माटील्डा शोअरला विष दिले गेले असले, तर ते कोमोने दिले नाही, हे तुम्ही मला पटवून देऊ शकणार नाही. तो मला फसवत नाही, असे नाही. तुम्ही माझे शब्द कोरून ठेवा. त्याला कुणाला तरी विष द्यायचे होते. पण ते कसा परिणाम करते ते त्याला आधी बघायचे होते. दहा

वर्षांपूर्वी बॉसला विष देण्यापूर्वी, त्याने त्याने फीलवर हा प्रयोग करून बघितला. काल रात्री मांजराच्या पिल्लाला विष दिले. नंतर त्याच्या यादीत बहुधा मी होतो. आता तो माझ्या मागे आहे."

"पण जर तुला वाटत होते, की तुझ्या भावाला विष दिले गेले आहे, तर तू पोलीसांकडे का गेला नाहीस --- "

"मला ते संशयाचे नाटक मला चालू रहायला नको होते. जेव्हा फील मेला, तेव्हा मी डॉक्टरांना विचारले. ते मला हसले व म्हणाले, "विषबाधा वगैरे काही नाही. तो गेली पाच वर्षे उसने आयुष्य जगत होता."

मेसन बोलला, "ठीक आहे. हा दवाखाना आला. तुला माझ्याबरोबर येऊन पोलीस ऑफिसर अजून तिथे आहे का, हे बघायचे आहे का?"

"मला कुणाही ऑफिसरला भेटायचे नाही."

मेसन बोलला, "अर्थात, पण मिसेस शोअरला भेटायची संधी कदाचित मिळू शकते."

डेलाने मेसनकडे आता काय होणार, अशा काळजीने पाहीले व बोलली,

, "बॉस, मी जाऊन ते बघू शकते आणि --- "

मेसन जोर देऊन बोलला, "नको. मला मिस्टर लंक यांना बरोबर घेऊन जायचे आहे." मग त्याने लंकला स्पष्टीकरण दिले, "मी आज संध्याकाळी तिला एकदा भेटलो होतो."

लंक बोलला, "ओहो, तुम्ही जेराल्ड शोअरसाठी काम करता ना?"

'हो, तो माझा अशील आहे. मी त्याचा वकील आहे."

मेसनने गाडीचे दार उघडले. “लंक, चल. आपण भरभर जाऊ. डेला, तू इथे थांबशील ना?”

तिने मान हलवली, पण तिच्या कपाळावर मध्यभागी काळजीने आठ्या उमटल्या होत्या.

मेसनने लंकचा दंड घरला व ते दोघे दवाखान्याच्या पायऱ्या चढू लागले. ते लांब पॅसेजमधून चालू लागले. मेसन लंकला म्हणाला, “तू मला तिच्याशी बोलून दे, पण आमचे संभाषण काळजीपूर्वक ऐक आणि मी कुठे चुकत असेन तर मला कोपराने ढोस.” लंक म्हणाला, “ठीक आहे.”

मेसनने लिफ्ट बोलावली व ते माटील्डा शोअरची खोली असलेल्या मजल्यावर गेले. खणातील वहीत बघून काही काम करत असलेल्या एका परिचारिकेने वर पाहिले. लांब पॅसेजच्या एका टोकाला असलेले दोघे खुर्च्यांमधून उठून, या दोघांकडे आले.

मेसनचा हात मिसेस शोअरची खोलीच्या दारावर असतांना त्यापैकी एकजण कडकपणे बोलला, “जरा थांबा.”

दुसरा मनुष्य बोलला, “तो मेसन आहे, वकील. लेफ्टनंट ट्रॅग त्याच्याशी बोलण्यापूर्वी, तो इथे होता.”

त्यातील मुख्य माणूस म्हणाला, “तुम्हाला काय हवे आहे?”

“मला मिसेस शोअरशी बोलायचे आहे.” माणसाने त्याचे डोके हलवले व तोंडभर हसत बोलला. “त्याना आत येऊ देऊ नका. त्यांना रोका.”

मेसन बोलला, “या माझ्याबरोबरील माणसाला तिच्याशी बोलायचे आहे.”

“ऑफिसर ओठ फाकवत हसला व एखादा विनोद असल्यासारखे, लंकचे निरीक्षण करत बोलला, “ठीक आहे. बोलायचे आहे का?”

“हो, बरोबर.”

त्या माणसाने त्याचा अंगठा खाली करत म्हटले, “लोकांनो, लिफ्टने खाली जा. मी दिलगीर आहे, पण तुम्हाला भेटता येणार नाही.”

मेसन त्याचा आवाज वाढवत बोलला, “जर हा मनुष्य मिसेस शोअरशी बोलला, तर कदाचित तो तुमचे काही चांगले करू शकेल. तो तिचा माळी आहे. मला वाटते, लेफ्टनंट ट्रॅगला देखील त्याच्याशी बोलायचे आहे.”

ऑफिसरने त्याच्याबरोबरील माणसाकडे बघून मान ह्लवली. मेसनच्या खांद्यावर थोपटले. दुसऱ्या ऑफिसरने त्याचे बोट लंकच्या कॉलरच्या मागील बाजूला घातले. “लोकहो, आता चला. इथून या आणि जास्त आरडाओरडा करू नका.”

मेसन बोलला, “आम्ही खरेच तिच्याशी महत्वाचे बोलणार आहोत.”

ऑफिसरने विचारले, “तुमच्याकडे पास आहे का?”

पाय न वाजवता परिचारिका आली व बोलली, “इथे इतर रुग्णदेखील आहेत आणि माझ्यावर त्यांची जबाबदारी आहे. मला इथे गडबड नको, वादावादी नको आणि तिला त्रास देऊ नका.”

एका ऑफिसरने लिफ्ट बोलवली. तो म्हणाला, ‘इथे रुग्णाला काहीही त्रास दिलेला चालणार नाही. “इथे माणसे जात येत आहेत., एवढेच.”

लिफ्ट थांबल्यावर, तिचे दार उघडले. मागून ढकलले गेल्यासारखे, मेसन आणि लंक लिफ्टमध्ये शिरले.

ऑफिसर बोलला, "आणि पासशिवाय परत यायचा प्रयत्न करू नका."

ते पॅसेजमधून जात असतांना व नंतर लिफ्टने तळमजल्याला पोचल्यावर, लंकने काहीतरी बोलायचा प्रयत्न केला, पण मेसनने त्याला गप्प बसवले. ते फुटपाथवर जाईपर्यंत मेसन काही बोलला नाही.

डेला थांबवलेल्या गाडीत बसलेली होती. तिने दार उघडले.

तिने चौकसपणे मेसनला विचारले, "तुला वाटले होते, तसेच घडले ना?"

मेसन हसत होता. "अगदी तसेच. तर मग आता आपण अशा एखाद्या ठिकाणी जाऊ, जिथे आपण बोलू शकू."

लंक हट्टीपणे बोलला, "मला मिसेस शोअरशी बोललेच पाहिजे. मला इतर कुणाशीही बोलायचे नाही."

मेसन म्हणाला, "मला माहिती आहे, आपण आपल्याला काय करता येईल, ते बघू."

लंक बोलला, "ऐका. मला रात्रभर यावर घालवायला वेळ नाही. घाई करा. आताच्या आताच हे करायला पाहीजे. मला फक्त तिला भेटायचे आहे."

मेसनने गाडी एका रुंद रस्त्याला वळवली. तिथे आता रात्रीच्या वेळी काही गर्दी नव्हती. त्याने सावधपणे गाडी स्थिर केली व बंद केली. तो लंककडे वळून बोलला, "तुला कसे माहिती, की फ्रॅंकलीन शोअर जिवंत आहे? चल पटापट बोल."

मेसनने त्याला जणू पिनेने टोचल्याप्रमाणे लंक बोलू लागला, “तुम्हाला असे का वाटले, की मला असे माहिती आहे?

“कारण तूच तसे म्हणालास.”. “लक्षात ठेव, फ्रॅकलीन शोअरच्या नाहीसे होण्यामागे, थोड्या वेळापूर्वीपर्यंत तू म्हणत होतास, की कोमोचा यात हात नाही, असे तुला कोणीही पटवू शकणार नाही. तू अनेक वर्षे असे धरून चालला आहेस. तू असे पक्के ठरवून टाकले आहेस आणि ते तुझ्या डोक्यात अगदी ठासून बसले आहे. आता मग एकच गोष्ट तुझे मन अचानक बदलू शकते. तू फ्रॅकलीन शोअरला पाहीले किंवा ऐकले आहेस.”

जणू त्याला ते विधान अमान्य करायचे असल्याप्रमाणे, क्षणभर लंक गोठला. मग विरोध मावळल्यासारखा, बसल्याबसल्या भानावर आला.

“ठीक आहे.” त्याने कबूल केले, “ठीक आहे, मी त्याला बघितले आहे.”

“तो कुठे आहे?”

“तो माझ्या घरी आहे.”

“तू मिसेस शोअरला भेटायला निघण्यापूर्वी काही वेळ आधी तो तिथे आला?”

“हो, बरोबर आहे.”

“आणि त्याला काय हवे आहे?”

“त्याला मी त्याच्यासाठी काही करायला हवे आहे. पण ते काय, हे मी तुम्हाला सांगू शकत नाही.”

“तुला मिसेस शोअरला भेटून असे विचारायचे आहे, की ती त्याला घरात घेईल का किंवा त्या प्रकारचे काही.”

लंकने क्षणभर हो नाही केले व मग बोलला, “तो मला काय म्हणाला, ते मी तुला सांगतो. मी त्याला असे वचन दिले आहे, की मी हे कुणाही जिवंत माणसाला सांगणार नाही.”

मेसनने विचारले, “फ्रॅंकलीन शोअर तुझ्या घरी आल्यापासून किती वेळाने तू बससाठी निघालास?”

“अगदी थोड्या वेळाने.”

“एवढा उशीर का?”

लंकने क्षणभर हो नाही केले व मग बोलला, “काही उशीर झाला नव्हता.”

मेसनने डेलाकडे नजर टाकली व नंतर लंकला विचारले, “फ्रॅंकलीन शोअर ने हेलनला फोन केल्यापासून तू झोपलास, की नाही?”

“नाही. मी बातम्या ऐकत असतांना त्याने दारावर टकटक केले. कोण आहे ते पाहील्यावर, मी दचकून मरायलाच आलो होतो.”

“तू त्याला काही अडचण न येता ओळखलेस?”

“नक्कीच. तो फार बदलला नव्हता --- ती, मिसेस शोअर, बदलली आहे तितका नाही. त्याने घर सोडले तेव्हा तो जसा दिसत होता, तसाच मला आताही दिसला. मेसनने मुद्दाम डेलाकडे पाहीले व बोलला, “तू आत अजून इथे थांबावेस, असे काही नाही. डेला, मी तुला काही चौक पलीकडे टॅक्सीस्टॅंड वर सोडतो. तू टॅक्सीने घरी जा.”

ती बोलली, “तू मला थांबायला सांगत नाही आहेस. माझी ही संधी चुकेल --- “

मेसन काळजी दाखवत बोलला, “माझ्या प्रिय, तुला झोपेची आवश्यकता आहे. लक्षात ठेव, सकाळी नऊला तू कार्यालयात हजर पाहिजेस.” “मलाही तसेच वाटते. मला घरी जायला बराच वेळ लागेल.”

मेसनने गाडी सुरु केली व घाईने जवळील एका हॉटेलमध्ये गेला. तिथे कोपऱ्यावर एक टॅक्सी उभी होती. डेलाने पटकन उडी मारून ती पकडली व बोलली, “शुभ रात्र. सकाळी भेटू.”

मेसनने काही चौक पुढे गाडी चालवली व नंतर ती थांबवून बंद केली. तो बोलला, ‘लंक, गाडी सरळ केलेली बरी नाही का? तू म्हणालास फ्रॅंकलीन शोअरने तुझ्या दारावर टकटक केले?”

माळी चपापला व संशयी बनला. “मी हे सगळे खरे सांगतो आहे. अर्थातच त्याने दारावर टकटक केले. दाराची घंटी मोडली होती.”

मेसनने डोके हलवले. ”तू सगळे सरळ/ बरोबर केलेस, याची मला खात्री नाही. मिसेस शोअर तुला त्रास देऊ शकेल --- तिच्या नवऱ्याच्या वतीने, ती तुझ्यावर तक्रार करू शकेल.”

लंक बोलला, “मी काय करतो आहे, हे मला कळते.”

मेसनने चालू ठेवले, “तुझ्यावर फ्रॅंकलीन शोअरचे ऋण आहे. तुला त्याला करता येईल तेवढी मदत करायची आहे, नाही का?”

“हो.”

“आणि तुला माहिती आहे, की मिसेस शोअर त्याचा द्वेष करते.”

“नाही.”

“तू मिसेस शोअरना भेटायला निघण्यापूर्वी फ्रॅंकलीन शोअरबरोबर काही तास बोलला असशील.”

“फार वेळ नाही.”

“कदाचित एखादा तास?”

“कदाचित.”

मेसनने मध्येच विचारले, “तो मनाने कसा वाटत होता?”

“म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“तो मनाने उत्सुक होता का?”

“हो, नक्कीच. तो चांगला खंबीर होता --- मी अनेक गोष्टी विसरायचो, पण त्यांच्या लक्षात असायच्या. ते घरातून निघून जाण्यापूर्वी त्यांनी मला मी नवीन लावलेल्या पोइनसेटीया झाडाबद्दल विचारले होते. तो हे विचारेपर्यंत, मी त्याबद्दल विसरूनच गेलो होतो. त्यामुळे माझा धिक्कार असो. ते फारसे चांगले वाढले नाही आणि मिसेस शोअरने त्यात फार रुची दाखवली नाही. आता त्या जागी मी काही गुलाबाची रोपे लावली आहेत.”

“मग त्याचे वय फार नसेल?”

“नाही, तो वयाने मोठा आहे, पण अजूनही तो तसाच दिसतो.”

मेसनने विचारले, “लंक, तू मला खरे का सांगत नाहीस?”

“म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

मेसन बोलला, “फ्रॅंकलीन शोअर बॅंकर होता. तीक्ष्ण मनाचा व व्यापारी वृत्तीचा होता. मला एवढे समजू शकले, की तो तर्कनिष्ठ व दक्ष होता व झटपट विचार करू शके. त्या प्रकारचा माणूस, त्याच्यातर्फे तुझ्याकडे मिसेस शोअरला रदबदली करायला सांगण्यास आला नसता.”

लंक मनात धुसफुसत, पण वरवर शांत राहीला.

मेसन म्हणाला, “तू त्याच्या ऋणात असल्याचे त्याला माहिती असल्याने, तो तुझ्याकडे आला असण्याची, खूपच शक्यता आहे आणि त्याला रात्र घालवायला अशी जागा हवी असणार जिथे तो गेला असेल, असे कुणाला वाटायची शक्यताच नव्हती. तू असे ढोंग केलेस, की तू त्याला लपायला जागा देतो आहेस आणि तो झोपल्यावर शांतपणे गुपचूप बाहेर पडून मिसेस शोअरच्या हे कानावर घालायचा तुझा इरादा होता.” लंकने त्याचे ओठ भावनामयतेने विरोध दाखवत आवळले.

मेसन म्हणाला, “तू खरेदेखील बोलू शकतोस.”

लंकने त्याचे डोके खंबीरपणे हलवले.

गुप्तहेर पथकाला फ्रॅंकलीन शोअरला काही प्रश्न विचारायचे आहेत. त्याना विचारायचे आहे, की हेन्री लीच नावाच्या माणसाबरोबर संधान बांधल्यावर पुढे काय झाले.”

“त्याचा इथे काय संबंध?”

“लीचचा खून झाला.”

“कधी?”

काल रात्री थोडा आधी.”

“अरेरे!

“तू असे बघ, जर तू साक्षीदाराला लपवलेस, तो साक्षीदार असल्याचे माहिती असून व तो हवा असून लपवलेस, तर तो गुन्हा आहे.”

तो साक्षीदार असल्याचे मला कसे माहिती असणार?

‘मी तुला सांगतो आहे. आता मग तू मला घडलेली प्रत्येक गोष्ट सांगितलेली बरी.”

लंकने काही मिनिटे विचार केला आणि मग बोलला, “ठीक आहे, मला वाटते, तेच बरे राहील.” फ्रॅकलीन शोअर माझ्या घरी आला. तो उद्दीपित झालेला व घाबरलेला होता. तो म्हणाला, की कुणीतरी त्याला ठार मारायचा प्रयत्न करतो आहे. त्याला लपण्यासाठी एका जागेची जरुरी आहे. त्याने मला आठवण करून दिली, की त्याने कसे मला व माझ्या भावाला घर दिले व इतर सर्व आणि त्यामुळे मी त्याला आता मदत करावी.”

“आणि तू त्याला विचारलेस, की तो घरी का जात नाही?”

लंक बोलला, “मी त्याला काही प्रश्न विचारले पण तो फारसे काही बोलला नाही. तो मालक आणि मी नोकर असल्यासारखेच तो वागत होता. तो म्हणाला की त्याच्या काही संपत्तीचे काय झाले हे त्याला कळल्याशिवाय त्याला तो इथे असल्याचे मिसेस शोअरला समजायला नको आहे. तो म्हणाला, की त्याची बायको त्याची प्रत्येक पेनी लुबाडायला बघते आहे आणि त्याला हे मान्य नाही.”

“मग काय?”

“मग मी त्याला म्हटले, तो माझ्याबरोबर राहू शकतो. अशा तऱ्हेनेच या समस्येतून मार्ग काढला जाऊ शकतो. माझ्याकडे मागील बाजूस एक जादा झोपायची खोली आहे, तिथे मी त्याला झोपवले. त्याला झोप लागल्यावर, मी मिसेस शोअरला हे सांगण्यासाठी बाहेर पडलो.”

“तू अजिबात झोपला नाहीस?”

“नाही.”

“झोपायला गेलाच नाहीस?”

‘नाही, मी त्याला सांगितले, की मला काही पत्रे लिहायची आहेत.”

“आणि तू बाहेर निघून गेल्याचे फ्रॅंकलीन शोअरला माहिती नाही?”

‘नाही, तो तोंड उघडे टाकून, त्याच्या पाठीवर झोपला होता व मी बाहेर पडलो, तेव्हा घोरत होता.”

“अशा तऱ्हेने तुला एके काळी मदत केलेल्या माणसाला फसवणे ---“ पेरी म्हणाला.

लंकचे डोळे अस्वस्थपणे फडफडले. मी त्याच्याकडून जे ऐकले ते व तो कुठे आहे --- ते, तिला सांगणार नव्हतो.”

मेसनने अचानक विचारले, “““तुला हेन्री लीच माहिती आहे का?

“हो, तो मला माहिती आहे. खूप काळापूर्वी.”

“तो कोण होता? त्याने काय केले?”

“तो प्लंबर आहे. तो काही कामानिमित्त कधीकधी घरी येत असे. फ्रॅंकलीन शोअरला तो आवडत असे. मिसेस शोअरचे त्याच्याशी फार जमत नसे. त्याचे आणि

माझा भाऊ फील यांचे चांगले पटत असे. पण मी त्याची फारशी पर्वा करत नसे. मला तो भडक डोक्याचा वाटे. कुठल्यातरी खाण उद्योगात तो कसा श्रीमंत होणार आहे, हे तो नेहमी सांगत असे. त्याने फील वारण्यापूर्वी काही काळ सांगितले होते, की त्यासाठी फ्रॅकलीन शोअर त्याला पैशांची मदत करणार आहे --- व काही महिन्यात तो श्रीमंतीच्या रस्त्यावर असणार आहे. फ्रॅकलीनने त्याच्याबरोबर भागीदारी केली कशी नाही, याचे मला नवल वाटत असे. घरातून निघून गेल्यावर, तो खाणीत काम करू लागला.''

“ती खाण कुठे होती?''

“नेवाडामध्ये कुठेतरी.''

“त्याने ते काम चालू ठेवले का?''

“नाही. त्याने ते चालू ठेवले नाही. मिसेस शोअर घरचे सर्व व्यवहार बघायला लागल्यावर, तिने त्याला काढून टाकले. घराच्या उत्तर टोकाला तो बरेच नवे प्लंबिंगचे काम करत होता आणि संधी मिळताच तो या खाणीच्या कामाबद्दल मिस्टर शोअरशी व माझ्या भावाशी बोलत असे. कुठल्या कारणाने कुणास ठाऊक, पण शोअरला तो आवडत असे. तो त्याच्याबरोबर, खाणीवरून तो कधी श्रीमंत होणार, अशी चेष्टा मस्करी देखील करत असे.''

मेसन बोलला, “जेव्हा फ्रॅकलीन शोअर तुझ्या घरी आला, तेव्हा तो कुठे होता, त्याने खाणीच्या कामात काही पैसे गुंतवले आहेत का इत्यादी प्रश्न तू त्याला विचारलेस. आता सुरू ठेव आणि मला सर्व खरे काय ते सांग.''

लंक उस्फूर्तपणे बोलू लागला, “माझा मालक एका बाईबरोबर फ्लोरिडाला पळून गेला. पण त्याला नेवाडाच्या खाणीत रुची होती. ती खाण लीचची होती का,

हे मला माहिती नाही. त्यात तो भलताच श्रीमंत झाला आणि शोअरच्या भागीदाराने त्याला काही हजार रक्कमेला बुडवले. त्याने ते काम चालू ठेवले असते, तर त्याला अजून पैसे मिळाले असते.''

मेसनने विचारले. ''आणि भागीदार लीच होता?''

लंकने मेसनकडे तोंड केले. त्याच्या डोळ्यात प्रामाणिकपणा स्थिरावलेला दिसत होता. ''मिस्टर मेसन, मी तुम्हाला सत्य काय, ते सांगणार आहे. तो भागीदार कोण होता, ते मला माहिती नाही. शोअर काही बोलला नाही. मी त्याचा पाठपुरावा केला तेव्हा तो एकदम गप्प झाला. तो लीच असेल किंवा नसेलही.''

''तू त्याला विचारले नाहीस का?''

''मी एकदम विचारले नाही पण वेगवेगळया शब्दात विचारले. मी त्याच्याशी बोलतंना लीचचे नाव विसरलो होतो. मी त्याला विचारले, की आपल्याकडे एक तुम्हाला खाणीत रुची घ्यायला लावणारा प्लंबर होता, त्याचे काय झाले, पण मालक एकदम शांत झाले.''

''तू ती चौकशी लावून धरली नाहीस?

लंक बोलला, ''मला वाटते, तुम्ही फ्रॅकलीन शोअरला चांगले ओळखत नाही, नाही का?''

''मी त्याला अजिबातच ओोळखत नाही.''

''जेव्हा फ्रॅकलीन शोअरला एखादी गोष्ट सांगायची नसे, तेव्हा तो ती मुळीच सांगत नसे. एवढेच! मला वाटते की, आता त्याच्याकडे अजिबात पैसे नाहीत. पण भासवतो, की अजूनही तो चांगला गब्बर लक्षाधीश आहे.

“आता मी येथे अजून थांबू शकत नाही. तो उठायच्या आत मला माझ्या घरी जाणे भाग आहे. जर तो उठला आणि मी तिथे नसल्याचे पाहिले, तर मोठा गहजबच होईल. आता तुम्ही मला माझ्या घरी सोडा. मी मिसेस शोअरशी संपर्क साधण्याचा काही मार्ग काढतो. दवाखान्यात मी तिला फोन करू शकत नाही का?”

मेसन बोलला, “मी त्या खोलीत काही वेळ होतो. मी तिच्या पलंगाजवळ फोन पाहीला आहे. पण सर्व उपाय थकल्याशिवाय मी तिला फोन करण्याचा प्रयत्न करणार नाही आणि केला तरी असे महत्वाचे काही मी फोनवर सांगणार नाही.”

“का?”

“कारण लेफ्टनंट ट्रॅगने सूचना देऊन ठेवल्या असतील, की बाहेरून कुणाचेही फोन इथे येऊ देऊ नका.”

“पण ती तर फोन करू शकते ना?”

“कदाचित करू शकेल.”

लंकने विचार करत त्याचे कपाळ खाजवले. “माझ्याकडे फोन आहे. आणि तिने मला फोन करावा,

यासाठी आपण काही उपाय शोधून काढू. मी तिला तसा निरोप देऊ शकेन.”

मेसन बोलला, “मी तुला घरी सोडतो आणि तिथे गेल्यावर, तिला तुला फोन करायला लावण्याचा काही उपाय आपण शोधून काढू. तू तिला तुझा फोन क्रमांक असलेल्या कार्डाबरोबर फुले पाठवू शकतोस. फुले तिच्या पर्यंत पोचतील. ऑफिसर्स ती अडवणार नाहीत. जेव्हा ती तुझा फोन क्रमांक असलेले कार्ड बघेल, तेव्हा तिला समजेल की तुला तिने फोन करायला हवा आहे. याने काम होईल.”

लंक बोलला, “आता तुम्ही काही शहाण्यासारखे बोललात. त्याने काम होईल. फुले बघितल्यावर पहिल्यांदा ती हा विचार करेल, की मी फुले का पाठवली आहेत पण त्यासाठी फुलांचा गुच्छ विकत आणावा लागेल. मी बागेतील फुले तिला पाठवली, तर ते सहज केल्यासारखे दिसेल. पण बाजारची फुले पाठवल्यास, त्यामागे काही कारण असल्याची तिला शंका येईल.”

मेसन बोलला, “मला रात्रभर उघडे असणारे एक फुलांचे दुकान माहिती आहे. आपण ताबडतोब परस्पर दवाखान्यात फुले पाठवू शकतो. तुझ्याकडे काही पैसे आहेत का?”

“फक्त दीड डॉलर आहे.”

“आपण महागडा व मोठा गुच्छ आणू. मी गाडीने तुझ्याबरोबर त्या दुकानात येतो व तुला परत घरी सोडतो. ते पैसे मी भरतो.”

“ते चांगले होईल.”

“असे नाही. मला ते करण्यात आनंद आहे. पण आता मला तुला एक प्रश्न विचारायचा आहे, त्याचे तू नीट विचारपूर्वक उत्तर दे.”

“तो प्रश्न काय आहे?”

“हेन्री लीचला खाणीमध्ये रुची होती. आता तुला हे माहिती आहे का, की त्याने कधी त्याच्या त्या कामाशी संबंधित त्याचा वकील म्हणून जेराल्ड शोअरला नेमले होते का?”

लंकने मिनिटभर विचार केला व मग बोलला, “मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगू शकत नाही, पण मला वाटते हो. मिस्टर मेसन, मी तुम्हाला काही सांगतो. मला

वाटते, फ्रॅंकलीन शोअरने घर सोडल्यावर त्याची फसवणूक झाली होती.''

''म्हणजे तुला काय म्हणायचे आहे?''

लंकने हातापायांची अधीर हालचाल केली व बोलला, ''मागच्या वेळी जेव्हा मालक फ्लोरिडाला गेले तेव्हा त्यांना अगदी त्यांच्यासारखाच दिसणारा एक मनुष्य भेटला. त्यांनी त्यांचे एकत्र फोटो काढले. हा इसम मालकांचा तोतया होता.''

''खरे तर मालक परत आल्यावर त्यासंबंधी विनोद करत राहीले. ते म्हणाले की जेव्हा मला माझ्या बायकोकडून काही गोष्टी काढून घ्यायच्या आहेत, तेव्हा मी माझा तोतया म्हणून त्याचा उपयोग करणार आहे. अशा वेळी मिसेस शोअर नक्कीच वेडी होईल.''

आता मला कल्पना येते आहे की मालक फ्लोरिडाला त्यांच्या त्या बाई बरोबर गेले आणि त्या तोतयाला पढवून घरी जाऊन रहायला सांगितले तोच खरा फ्रॅंकलीन शोअर असल्याचे भासवायला सांगितले. हा मनुष्य सुखात राहील व खऱ्या फ्रॅंकलीन शोअरला पैसे पाठवेल. त्यामुळे मालक त्या बाईबरोबर सुखी होतील. मला असे वाटते, की त्यांनी त्या तोतयाला शिकवल्यावर, नंतर त्या तोतयाचे अवसान व धीर गळून पडला व काही कारणाने तो मेला.

''समजले का? मला वाटते मालक असा बेत आखत होते, की या तोतयाला घरी पाठवून असे भासवायचे, की त्याला विस्मृतीचा आजार झाल्यामुळे हे सर्व झाले आहे. लोकांनी त्यावर विश्वास ठेवला असता. कारण मालकाने घरातून जाताना काहीही पैसे बरोबर घेतले नव्हते. तर काही कारणाने का होईना, पण ते होऊ शकले नाही. कदाचित त्या तोतयाला तो नीट पढवू शकला नसेल किंवा

काही. त्यामुळे मालकाचा घराशी असलेला दुवाच तुटून गेला. मेसनने त्याचे डोळे माळयाच्या डोळयांवर स्थिर ठेवले. “हे बरोबर उलटे असू शकणार नाही का?”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे? तुमच्या मनात काय आहे?”

“या तोतयाला एक कल्पना सुचली असेल. मग तो फ्रॅंकलीन शोअरपासून दूर झाला असेल आणि पुन्हा त्याची जागा घ्यायला परत आला असेल.”

“नाही. हा माझ्याकडे आलेला मनुष्य फ्रॅंकलीन शोअर आहे. त्याने जे सांगितले, त्यावरून ते मला कळले आहे --- एक मिनिट थांबा. तुम्ही फारच प्रश्न विचारत आहात. मला वाटते तुम्ही प्रश्न विचारायचे थांबवलेत तर आपले अधिक चांगले जमेल. त्याची सुरवात आताच करा. चला, आपण जिथे जात आहोत, तिथे जाऊ. --- नाहीतर तुम्ही मला इथे सोडून देऊ शकता. मी काय ते करेन.”

मेसन मनापासून हसला. “ओहो! लंक, मला तुझ्यात नाक खुपसायचे नाही.”

## प्रकरण १५

६४२१२ दक्षिण, बेल्व्हेडरे इथे गाडी थांबवल्यावर, मेसनला आजूबाजूची घरे अंधारी व शांत वाटली. पहाटेपूर्वीचा गारठा हवेत भरून राहिला होता. मेसनने गाडी बंद केली. तो व लंक कोपऱ्यावर गाडीतून उतरले.

मेसनने विचारले, “तू मागच्या बाजूला राहतोस का?”

“हं, काहीसा! मागे छोटेसे घर आहे तेच. तुम्ही गाडी आत आणायच्या रस्त्याने चालत आलात, की गॅरेजशेजारी माझे घर आहे.”

मेसनने विचारले, “तुझ्याकडे गाडी आहे का?”

तोंडभर हसत, लंक बोलला, “ती तुमच्यासारखी गाडी नव्हती. पण माझ्यासाठी ठीक होती.”

“ती तू गॅरेजमध्ये ठेवायचास का?”

“अं हो, आज शोअर यांच्या घरी जाण्यासाठी मी ती काढली असती पण मला गॅरेजचे दार उघडून, ती सुरु करायची भीती वाटत होती, कारण त्या आवाजाने फ्रॅंकलीन शोअर जागा झाला असता. त्यामुळे मी चोरपावलांनी बाहेर पडून बस गाठली.”

मेसनने मान डोलावली व गाडी घरात आणायच्या वाटेने चालू लागला.

लंकने बचाव करत म्हटले, ”तू आत येत नाही आहेस.”

“फक्त फ्रॅंकलीन शोअर आत नक्की आहे ना, हे बघण्यासाठी येतो.”

“तुला त्याला उठवायचे नाही आहे”

मेसन बोलला, “अर्थातच नाही. ती फुले कधीही देता येतील आणि मग मिसेस शोअर तुला कदाचित फोन करेल. तेव्हा तुला अशा रीतीने बोलावे लागेल, की तुझ्याकडे तिच्यासाठी काही निरोप आहे, पण तो काय ते मात्र तू सांगणार नाहीस.”

“मी तिला तो फोनवर का सांगू शकत नाही?”

“कारण फोनची घंटी वाजली, की फ्रॅंकलीन शोअर जागा होईल आणि तुमचे संभाषण ऐकेल.”

लंक बोलला, “कदाचित ऐकणारही नाही. फोन माझ्या पलंगाला चिकटून आहे.

एका उशीच्या कडेवर फोन दाबून, मी माझे संभाषण त्याला ऐकू जाणार नाही, असे करेन.”

मागील बाजूस असलेल्या लहानशा बंगल्याकडे चालत जात मेसन बोलला, “तू कदाचित असे करू शकशील. किंवा तू तिला फक्त एवढे सांगू शकशील की तू मला पाहिले आहेस आणि ती माझ्याशी संपर्क साधू शकते व तिला माझा फोन क्रमांक दे.”

“हं, असे करता येईल. तुमचा क्रमांक काय आहे?”

मेसन बोलला, “मी येऊन तुला तो लिहून देतो.”

लंक बोलला, “पण आवाज करू नका.”

“नाही करणार.”

“तुम्ही तो इथे लिहू शकत नाही का?”

“नीटपणे नाही.”

“ठीक आहे. मग आत या. पण आवाज करू नका.”

लंक चुपचाप दोन जिने चढून मोकळ्या लाकडी जागी गेला आणि हळूच कुलुपात किल्ली घालून, दार उघडले. त्याने दिवा लावल्याने थोडेसे फर्निचर असलेली व पुरुष माणसाचा वावर असल्याच्या खुणा दाखवणारी एक खोली उजळली. बाहेरील हवेपेक्षा खोलीत थंड होते. घर तकलादू होते व भिंतींमधून थंडी आत घुसत होती. ॲश ट्रे वर शिळ्या सिगरेटच्या गार धुराचा वास भरून राहिला होता.

मेसनने त्यावर वाकून बघितले व विचारले, “त्याची का?”

“हो, मला वाटते महागडी असावी. तो ती ओढतो, तेव्हा त्याचा छान वास येतो. मी पाइप आणि सिगरेट ओढतो.” ॲश ट्रे ठेवलेल्या लहानशा टेबलावर वाकणे मेसनने चालू ठेवले.

त्याच्याशेजारो ‘जॉर्ज अल्बर’ असे छापलेले कार्ड होते आणि कुण्या माणसाच्या हस्ताक्षरात संदेश. ‘मांजराच्या पिल्लाची चौकशी करायला आलो होतो. घंटी वाजवली पण उत्तर मिळाले नाही. सर्व काही ठीक आहे, असे समजतो. हेलन काळजी करते आहे.’

लंकने गॅसहिटर सुरु केला.

मेसन हळू आवाजात बोलला, “छान छोटीशी जागा आहे.”

“उं हूं. इथे माझी झोपायची खोली आहे. दुसरी मागील बाजूस आहे. असून दोन्ही खोल्यांच्या मध्ये बाथरूम आहे.”

मेसन बोलला, “झोपायच्या दोन खोल्यांमधील दार लावलेले बरे. त्यामुळे फ्रॅंकलीनला फोनची घंटी वाजलेली ऐकू येणार नाही.”

लंक म्हणाला, “ही चांगली कल्पना आहे. मला वाटते बाथरूम आणि मालकांची झोपायची खोली यातील दार उघडे होते. मी माझ्या खोलीचे बंद केले होते.

तो आवाज न करता झोपायच्या खोलीत गेला. मेसन त्याच्या मागून गेला.

सरळ पाठीची खुर्ची होती. एका लोखंडी पलंगावरती स्प्रिंग्ज मोडत आलेली गादी होती. झोपायची खोली लहानशी चौकोनी खोली होती. त्यात एक स्वस्त टेबल कपाट व

उठाबसायच्या खोलीतून येणाऱ्या गाळीव उजेडात मेसनने पाहिले, की बाथरूमचे दार उघडे आहे व अंथरूण तयार केलेले नाही आणि अंथरूणाच्या मध्यभागी खोलगट भागात एक मळकट व चुरगळलेल्या चादरीच्या बोळयात एक मांजराचे पिल्लू झोपले होते.

टेबलाचे खण उघडे होते. त्यातील सामान जमिनीवर पडले होते. कपड्यांचे कपाट उघडे होते व कपडे बाहेर ओढून, त्यांचे कसेही केलेले ढीग कपाटाच्या दाराजवळ पडले होते.

पलंग आणि दार त्यांच्या मध्ये उभा असलेला लंक त्याच्या सभोवताली घाबरटपणे व नवलपूर्णतेने पहात होता. तो बोलला, “बाप रे!?”

मेसन लंकच्या अंगावरून, उघड्या दारातून पुढे बाथरूममध्ये गेला आणि शेजारील झोपायच्या खोलीकडे पाहीले.

ती रिकामी होती.

ही झोपायची खोली दुसऱ्या खोलीपेक्षाही लहान होती. मागील घरांच्यापासून थोडीच लांब असलेली खिडकी सताड उघडी होती. रात्रीच्या झुळुकेने धुळकट पडद्यांची लेस दुमडली जात होती. स्प्रिंगच्या गादीवरील चादर उलटी होत होती. स्वच्छ चादरी कशाही हलत होत्या. माणसाचे डोके जिथे ठेवले जाते तिथे उशीवर खड्डा दिसत होता.

उदासीनतेने तोंड उघडे टाकून, लंक येऊन मेसनशेजारी उभा राहीला. “शोअरला भेटलो असतो तर, तिने --- “

तो कटूपणे खंत करत बोलला, “तो पळून गेला. तो इथे असतांना मी माटील्डा ---

तो फार बोलला असे वाटून घाबरल्याने, अचानक तो बोलायचा थांबला.

मेसनने खोलीचे घाईघाईने परीक्षण केले.त्याने चौकशी करत विचारले, “तू बाहेर पडलास, तेव्हा बाथरूमचे दार उघडे होते का?”

“मला वाटते, हे उघडे होते. पण माझ्या खोलीचे नव्हते. मी बाहेर पडताना काळजी घेत ते लावले होते.”

मेसनने दुसऱ्या दाराकडे निर्देश करत विचारले, “हे कुठे उघडते?”

“स्वयंपाकघरात आणि तिथून मग तुम्ही उठाबसायच्या खोलीत जाऊ शकता.”

“तुम्हाला बाथरूममध्ये जाण्यासाठी एका झोपायच्या खोलीतून जावे लागते का?”

“बरोबर. हे घर म्हणजे एक चौकोनी ठोकळा आहे. पुढील भागात स्वयंपाकघर आणि उठाबसायची खोली व मागल्या बाजूला दोन झोपायच्या खोल्या आहेत.”

मेसन बोलला, “माझ्या असे लक्षात येते आहे, की स्वयंपाकघराच्या दाराला --- एक दोन इंचाचा तडा गेलेला आहे.”

“उं हूं.”

मेसन बोलला, “मांजराचे पिल्लू त्या दारातून चालत गेलेले दिसते. त्याचे पांढरे पंजे जमिनीवर उमटले आहेत.”

“बरोबर.”

मेसनने वाकून जमिनीला हात लावत, त्या पांढऱ्या खुणांना चोळून बघितले. “हे काहीसे पिठासारखे वाटते आहे. पिल्लू कुठल्या पिठातून व दारातून आले व

पलंगाकडे गेले, ते बघितले पाहीजे. हो, इथे त्या पिल्लाच्या पंजाच्या चार खुणा दिसत आहेत. तिथे उभे राहून त्याने पलंगावर उडी मारली असणार.

“मग ते दुसऱ्या बाजूने खाली उतरले असणार. तुम्हाला इथेदेखील पांढऱ्या खुणा दिसतील.

“बरोबर. पण मला ते पीठ वाटत नाही.”

“का बरे?”

“कारण मी पीठ झाकणाच्या मोठ्या टीनच्या डब्यात ठेवतो आणि स्वयंपाकघराचे दार तर बंद होते.

मेसन स्वयंपाकघरात जात म्हणाला, “आपण एक चक्कर मारून बघू.”

लंकने स्वयंपाकघरातील लहानशा पॅन्ट्रीचे दार उघडले व बोलला, “अर्थात मी घराच्या आवराआवरीत फार वेळ घालवत नाही. मी माझा स्वयंपाक करतो आणि ते मला ठीक वाटते. ते कोणा नखरे असणाऱ्यांना कदाचित ते पसंत पडणार नाही. डब्यांवर व्यवस्थित झाकणे आहेत. पण स्वयंपाक करतांना येताजाता केव्हातरी चुकून, माझ्या हातून डब्याबाहेर पीठ सांडले असणार व तिथे आलेल्या उंदराला पकडतांना पिल्लाचे पाय पांढरे झाले असणार.माझ्या आयुष्यात मी इतके बेकार व निष्काळजी पिल्लू पाहीलेले नाही. त्याला कसलीच भीती वाटत नाही. ते कुणाचा पाठलाग करत असेल, तर भिंतीवर डोके आपटून घेईल किंवा खुर्चीच्या मागे डोक्यावर पडेल. ते फारच उपद्व्यापी आहे. त्याला घाबरायचे माहितीच नाही.”
मेसन जमिनीकडे बघत उभा राहीला. जर स्वयंपाकघरातील पॅन्ट्रीचे दार बंद होते, तर पिल्लू आत गेलेच कसे?”

लंकने त्यावर विचार केला. “त्यावर एकच उत्तर असू शकते. फ्रॅंकलीन तिथे काही शोधत असणार व इकडेतिकडे शोधतांना पिल्लू त्याच्या मागोमाग आले असणार.”

मेसन बोलला, “पुढील झोपायच्या खोलीतील खण उघडून, जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या सामानाचे काय?

लंक थोड्या दुःखाने बोलला, “मला वाटते, मी चुकलोच. मी बाहेर गेल्यावर शोअर उठला असणार. जेव्हा त्याने पाहीले, की मी घरी नाही, तेव्हा त्याच्या लक्षात आले असणार, की मी तो इथे असल्याचे सांगायला माटील्डा शोअरकडे गेलेला असणार. अरेरे! मी असे कसे त्याला मोकळे सोडले?”

मेसनने विचारले, “आणि मग त्याने इकडेतिकडे हिंडून काही शोधले असणार, असे तुला वाटते आहे का?

“नक्कीच वाटते आहे. नाहीतर स्वयंपाकघराचे दार उघडे कसे सापडेल आणि इतर पसारा?” “तो काय शोधत होता, कुणास ठाऊक!”

“तो काय शोधत असेल?”

“मला काय माहिती?”

“त्याला हवे असलेले काहीतरी तुझ्याकडे असणार.”

लंकने एक दोन मिनिटे विचार केला आणि मग बोलला, “माझी खात्री नाही, पण शोअरची परिस्थिती फारशी चांगली नसावी. कदाचित तो पैसे शोधत असावा.”

“तुझ्याकडे पैसे होते का?”

लंक हो नाही करू लागला. मग म्हणाला, “हो, मी थोडे शिल्लक टाकले होते.”

“कुठे?”

लंक आठ दहा सेकंद स्तब्ध राहीला. मेसन बोलला, “सांग, चल लवकर सांग. मी काही तुला त्रास देणार नाही.”

लंक बोलला, “मी माझ्या सर्वात चांगल्या सूटच्या मागील खिशात ते ठेवले आहेत.”

“ठीक आहे. आता ते तिथे आहेत का, ते आपण बघू.”

लंक पुढील खोलीत आला. पिल्लाने त्याचे झोपाळू डोळे उघडले. जांभई दिली व चार पायांवर उठून उभे राहीले. पाठ जेवढी कमानीसारखी उंच करता येईल तेवढी ताणली. मग त्याचे पुढचे पाय उचलून ओरडले, “म्याव.”

मेसन हसला. “मला वाटते, तुझ्या मांजराच्या पिल्लाला भूक लागली आहे. तुझ्या घरात थोडे दूध आहे का?”

लंक बोलला, “ताजे दूध नाही. पण खोक्यातले दूध आहे. परत त्याला विषबाधा होऊ नये, म्हणून हेलनने त्याला इथे आणून ठेवले. त्याने कपड्यांचा ढीग उचलला व खिसे चाचपू लागला. त्याच्या चेहऱ्यावर कळा पसरली. तो पुटपुटला, “सगळे गेले. भिकार माणूस! मी साठवलेले सगळे पैसे घेऊन गेला.”

“जवळजवळ तीनशे डॉलर्स होते. त्यावर तो खूप दिवस काढू शकेल.”

“तुला काय वाटते, त्याला इथून निघून जायचे होते?”

परत एकदा लंकचा चेहरा पडला. तो शांत होता.

मेसन बोलला, “तो परत येईल, असे तुला वाटते का?”

“मला माहिती नाही.”

“आता तुझ्याकडे काही पैसे शिल्लक आहेत का?”

“काही पैसे बँकेत आहेत पण माझ्याजवळ कॅश काही नाही.”

मेसनने आठवण केली, “आता माटील्डा शोअरचा कुठल्याही क्षणी फोन येईल. फ्रँकलीन शोअर इथे होता आणि तू त्याला बाहेर जाऊ दिलेस, असे तू तिला सांगणार आहेस का?”

“नाही रे देवा, नाही.”

“मग तू तिला काय सांगणार आहेस?”

‘मला माहिती नाही.”

“फुलांचे काय? तू तिला रात्री तीन वाजता फुले पाठवलीस --- ताबडतोब मिळतील, अशी पाठवलीस, त्याबद्दल काय सांगणार?”

रागाने भुवई चढवण्याचा प्रयत्न करत, पण नंतर ठामपणे शरण येत, लंकने म्हटले, “मला माहिती नाही, मी तिला काय सांगणार आहे --- आता नव्हे.”

“का म्हणून सांगायचे? त्यातून माघार का घ्यायची नाही?”

लंक भावनामयतेने बोलला, “वा वा, मला तसे करता आले, तर करायला आवडेल.”

“जमेल की, का नाही? मी तुला एका हॉटेलमध्ये घेऊन जातो. तिथे तू एका नावाने तुझी नावनोंदणी कर. मग तुला हवे तेव्हा मिसेस शोअरला फोन करू शकतोस

व काहीही स्पष्टीकरण देऊ शकतोस. अशा प्रकारे, तुला कुणाला काही सांगायची गरज नाही. तू माझ्याशी संपर्क ठेऊ शकतोस.”

लंक सावकाशीने मान हलवत होता. तो बोलला, “मी काही सामान बॅगेत भरून, एका चेकने पैसे काढू शकतो --- “

मेसनने पाकिटातून दहा डॉलर्सचेच्या दोन नोटा काढल्या.

तो म्हणाला, “तुला चेक देऊन कॅश काढायची काही गरज नाही. मी तुला काही पैसे देतो आणि जेव्हा अजून लागतील, तेव्हा मला फोन कर. मी तुला माझा फोन क्रमांक देतो. म्हणजे तू कधीही माझ्या संपर्कात राहू शकशील.”

लंकने त्या वकीलाच्या हाताभोवती हस्तांदोलनासाठी त्याची बळकट बोटे गुंफली. “तू माझ्यावर फारच उपकार करत आहेस. अशा तऱ्हेने आपण एकमेकांच्या जवळ आलो आहोत. आणि कदाचित पुढे मी तुम्हाला हे देखील सांगेन, की फ्रॅंकलीन शोअरला खरे काय हवे आहे. मला जरा विचार करू दे आणि मग मी तुम्हाला फोन करेन.”

“तू मला ते आता का सांगू शकत नाहीस?”

लंकच्या चेहऱ्यावर ते जुने दुःखी भाव आले. तो बोलला, “आता नाही. मला आधी कसली तरी खात्री पटवून घ्यायला हवी. पण मी तुम्हाला नंतर सांगेन --- कदाचित दुपारी. आता माझ्याकडून ते काढायचा प्रयत्न करू नका. तुम्हाला सांगण्यापूर्वी, मी कशासाठी तरी थांबलो आहे.”

मेसनने त्या माणसाचा अभ्यास केला. त्याने विचारले, “ते लीचच्या मृत्यूविषयी सकाळच्या वर्तमानपत्रात छापून आलेले काही आहे का?”

लंकने मान हलवली.

“किंवा तो माटील्डा शोअरला झालेल्या विषबाधेचा पोलिसी अहवाल आहे का?”

लंकने ताकीद दिली. “मला घाई करू नका. मी तुम्हाला सरळ सांगतो आहे.”

मेसन हसला. “ठीक आहे, मी तुला छान शांत हॉटेलात ठेवतो. समजा, तू थॉमस ट्रीमर अशा नावाने नोंदणी केलीस, तर? आणि मांजराचे पिल्लू मी माझ्याबरोबर घेऊन जाईन व त्याची काळजी घेईन.”

लंकने पिल्लाची गोष्ट थोडी दुःखाने घेतली. “त्याची चांगली काळजी घे, बरं का.”

मेसनने सांगितले, “नक्की घेईन.”

## प्रकरण १६

दवाखान्याच्या प्रतीक्षागृहात हेलन केंडल कोरड्या डोळ्यांनी बसली होती. ती तिथे खूप तास होती. ती इतकी उदास झाली होती, की शांत बसूही शकत नव्हती. शारीरिक दृष्ट्या एवढी थकली होती, की उठून फेऱ्या देखील मारू शकत नव्हती. तिने तिच्या मनगटावरील घड्याळाकडे पाहीले. तिने विचार केला आता अजून काही काळ असे चालणे, शक्य नाही.

तिला पॅसेजमधून, थोडा उदास असा भरभर चालण्याचा आवाज आला. तिच्या छळीक मनाला नवल वाटले, की कदाचित मरणाऱ्या माणसाशेजारी तिची

सोबत करायला कोणी येत असावे. अशा विचाराने, तिचा गळा दाटून आला. हे फक्त सर्व काही ठीक असल्याचे सांगायला कुणी येत असेल तर! मग तो निरोप्या अजूनच हळू चालणार. हा बेसूर पदरव फक्त एकच गोष्ट निर्देश करू शकतात, तो तिच्यासाठी होता आणि ते सेकंद अमूल्य होते.

पांढरे ओठ पडलेली ती पामच्या झाडाच्या, करकरणाऱ्या खुर्चीतून उठली व स्वागतकक्षाकडे धावू लागली.

ती पाऊले खोलीपर्यंत आली. ती मोठा कोट घातलेली आकृती तिला आश्वासन देत हसली. "कसे काय मिस केंडल. मला वाटते, तू मला ओळखले असणार."

तिने डोळे विस्फारले. "काय लेफ्टनंट ट्रॅग! मला सांगा तुम्ही काही --- ऐकले का?"

ट्रॅगने मान हलवली. "ते त्याचे ऑपरेशन करत आहेत. त्याना रक्तदान करणारी कोणी व्यक्ती मिळायला वेळ लागतो आहे. ट्रॅग बोलला, "आतापर्यंत ते संपायला हवे होते." मी परिचारिकेशी फोनवर बोललो."

"ओहो, मला सांगा, तो ते कसे काय सहन करतो आहे? तो कसा आहे? तो - -- "

ट्रॅगने तिच्या जोराने थरथरणाऱ्या खांद्यावर हात ठेवला. "शांत व्हा, सर्व काही ठीक होईल."

"त्याने काही सांगायची, ही शेवटची संधी असेल, म्हणून त्यांनी तुम्हाला पाठवलेले नाही ना?"

ट्रॅग बोलला, “आता ऐका. ही गोष्ट धीराने घ्या. आज रात्रभर तुम्ही इतक्या ताणाखालून जात आहात. त्याचे ऑपरेशन चालू आहे आणि तो ते ठीक प्रकारे घेतो आहे. मी इथे फक्त एकाच गोष्टीसाठी आलो आहे.”

“ते काय आहे?”

“ती गोळी आणि तो बोलू शकत असेल, तर त्याची जबानी.”

“म्हणजे ज्याला मरणाचा कबुलीजबाब म्हणतात, ते का?”

ट्रॅग जिवणी फाकवत हसला. ”तुम्ही कसाबसा धीर धरून, इथे एकट्याने सर्व गोष्टींना तोंड देत आहात आणि त्यामुळे अस्वस्थ आहात.”

“मी ते झेलू शकते. तो कसा आहे, हे मला जाणून घ्यायचे आहे. हे साहजिक आहे. मी घाबरले आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यात काही अर्थ नाही. पण मला त्यामुळे भीती वाटत नाही आहे. मला वाटते, आनंदी रहाणे हा आमचा हक्क आहे. आता महायुद्धात सर्व जगात लोक मरत आहेत --- आणि ते कसे घ्यायचे, हे मला आणि प्रत्येकालाच शिकायला हवे.”

ट्रॅगचे डोळे सहानुभूतीपूर्ण झाले. “तुम्ही रडत नव्हतात ना?”

“नाही --- आणि तुम्ही मला रडवू शकणारही नाही. माझ्याबद्दल सहानुभूती बाळगू नका.

माझ्याकडे कणव येऊन बघू नका. पण कृपया तो कसा आहे आणि त्याला जगण्याची संधी किती आहे, हे मला सांगा.” ट्रॅगने मध्येच विचारले, “तुमचे लग्न ठरले आहे का?”

हेलनचे डोळे खाली वळले आणि ती लाजली. "प्रामाणिकपणे सांगायचे तर मला माहिती नाही. त्याने कधीच --- मला विचारले नाही --- म्हणजे नाहीच. पण टॅक्सीने इथे येतांना, मी त्याला जाणवू दिले की, मी त्याची किती पर्वा करते. म्हणजे मला तसे दाखवायचे नव्हते, पण मी इतकी घाबरले होते, की मला काही सुचत नव्हते. तो मला काही सांगू इच्छित होता? तो शूर होता. आणि मी त्याच्याशी तसे वागायला नको होते का?"

"तसे म्हणजे कसे? तू त्याच्यावर प्रेम करतेस, हो ना?"

हेलनने तिचे डोके उचलून, त्याच्याकडे ठामपणे पाहिले. "हो, माझे त्याच्यावर प्रेम आहे आणि मी त्याला तसे सांगितले. मी त्याची आहे आणि काहीही झाले तरी त्याचीच राहीन. लेफ्टनंट ट्रॅग, मी ते पण त्याला सांगितले. मी त्याला सांगितले, की मला त्याच्याशी लग्न करायचे आहे."

"मग तो काय म्हणाला?"

हेलन बाजूला झाली. ती मलूलपणे बोलला, "तो काहीच बोलला नाही. त्याला चक्कर आली."

ट्रॅगचे थरथरणारे ओठ त्याने सावरले. "तुला माहिती आहे, जेरीच्या अंगातून खूप रक्त वाहून गेले आहे. मला त्याचे काही नवल वाटले नाही. मिस केंडल, काल रात्री जेरी येण्यापूर्वी किती वेळ तुम्ही घरी होतात?"

"मला माहिती नाही. पण फार वेळ नसावे."

"तो रात्री --- इतक्या उशीरा कसा आला?"

हेलन उदासीनतेने हसली. “तो बोलला, त्याने मला आधी फोन करायचा प्रयत्न केला. पण मी तेव्हा बाहेर होते. तो घरावरून जातांना त्याने घर उजळलेले पाहीले, त्यामुळे तो एका मिनिटाकरता आत आला. आम्ही बोलत असतांना माटील्डाकाकूच्या झोपायच्या खोलीतून आम्ही काही आवाज ऐकला --- “

“तुम्ही असे म्हणालात की तो आवाज कोणी काही पाडल्यासारखा होता. खोलीत अंधार होता का?”

“हो.”

“त्याबद्दल तुमची खात्री आहे?”

“हो, तो जो कोणी होता, त्याच्या हातात विजेरी नसेल तर! तसे असेलही, कारण लव्हबर्डस चिवचिवाट करू लागले.”

“पण तुम्ही दार उघडले, तेव्हा तर विजेरीचा काही पत्ता नव्हता.”

“नव्हता.”

“आणि हॉलमधील दिवे लागलेले होते. “

“हो, मी ते लावलेले तसेच ठेवण्याचा कधीच विचार केला नव्हता. मला वाटते आम्ही हॉलमध्ये अंधार ठेवला असता, व झोपायच्या खोलीतील दिवे लावले असते तर बरे झाले असते.”

“हे बरोबर आहे. पण ते सर्व आता होऊन गेले. त्याबद्दल आता बोलण्यात काही अर्थ नाही. तेव्हा मला समजले ते असे की हॉलमध्ये दिवे चालू होते आणि तुमच्या काकूच्या झोपायच्या खोलीत अंधार होता.”

“बरोबर.”

“आणि दार कुणी उघडले? तू की जेरीने?”

“जेरीने.”

“मग काय झाले?”

“आम्हाला अर्थात कळले, की तिथे कुणीतरी होते. जेरी दिव्याचे बटण शोधत होता. त्याला ते कुठे आहे, ते माहिती नव्हते. अचानक माझ्या लक्षात आले की तिथे उजेड असणे किती महत्वाचे आहे. म्हणून मी त्याच्या दंडाखालून जाऊन बटणाशी पोचले. नंतर मग ते झाले.”

“बंदुकीचे दोन आवाज?”

“हो.”

“तू दिवे लाऊ शकली नाहीसच का?”

नाही.”

“पहिल्या गोळीचा आवाज झाला, तेव्हा तुझा हात दिव्याच्या बटणावर होता का?”

“मला वाटते, होता. पण माझी खात्री नाही. पण गोळी माझ्या डोक्याच्या उजवीकडून गेली आणि दाराच्या बाजूला असलेल्या लाकडात घुसली. माझ्या चेहऱ्यावर त्याचे तुकडे उडाले. काही लहान तुकडे मला टोचले. मी मागे उडी मारली.”

“नंतर दुसरी गोळी लगेचच आली का?”

“लगेचच आली.”

“त्यानंतर काय झाले?”

तिचा चेहरा पांढरा पडला. तिने डोके हलवले. जे झाले, त्यातले बरेचसे मला आठवत नाही. मला गोळी सुटल्याचा व ती जेरीला लागल्याचा ---विशिष्ट आवाज आला.”

ट्रॅग बोलला, “तू शूर मुलगी आहेस. जेरीचा विचार करू नकोस. फक्त काय काय झाले, ते आठव. लक्षात ठेव आम्हाला सर्वांना त्यात रुची आहे. म्हणजे पहिल्या गोळीनंतर दुसरी गोळी लगेच आली. मध्ये फार वेळ गेला नाही व ती जेरीला लागली.”

“हो.”

“तो लगेच पडला का?’

“त्याला काही --- एखादा ठोसा लागल्यासारखे, तो गोल फिरला.”

“आणि मग पडला?”

“मला वाटते त्याचा गुडघे दुखावले व तो त्याचा सर्व भार माझ्या अंगावर देत पडला. मी त्याला जमिनीवरून उठवण्याचा प्रयत्न केला पण तो फारच जड होता. आम्ही दोघेही खाली पडलो.”

“खोलीतील माणसाचे काय झाले?”

“मला माहिती नाही. मला एवढेच दिसले, की जेरीचा चेहरा वेदनेने पिळवटून निघाला होता. मी त्याच्याखालून हात घातला आणि तो पूर्ण रक्ताळला. तो बेशुद्ध झाला. मला वाटले, तो मेला. त्यामुळे माझे इतर कुठे लक्ष नव्हते. मी त्याला बोलते करण्याचा प्रयत्न केला. काहीबाही बोलत राहीले --- काही सांगत राहीले. मग

त्याच्या डोळयांच्या पापण्या फडफडल्या --- थोड्या वेळाने तो माझ्याकडे बघून हसला व म्हणाला, "मला माझे पाय हलवता येतात का, ते बघू."

ट्रॅगने भुवई उंचावली. "तुला असे वाटले का, की खोलीतील त्या उभ्या असलेल्या मनुष्याने जेरीवर गोळी चालवली नसावी?"

'तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

ट्रॅग बोलला, "म्हणजे खरे तर तो तुमच्यावर पिस्तूल चालवत होता. पहिल्यांदा त्याने तुमच्या डोक्यावर गोळी चालवण्याचा प्रयत्न केला पण तुम्ही मागे झाल्याने तो नेम चुकला. तुम्ही गरकन वळल्याने तुमचे शरीर जेरीच्या मागे गेले. आणि जेव्हा त्याने दुसऱ्यांदा तुझ्यावर नेम साधला, तेव्हा त्यामुळे जेरी जायबंदी आला. लक्षात घे, खोलीतील त्या माणसाला तुम्ही अगदी स्पष्ट दिसत होतात."

तिचे डोळे मोठे झाले. ती चक्रावून गेली. "मी असा विचार नाही केला. मी एवढाच विचार केला, की कोणीतरी खोलीत आहे व त्याला तो तिथे असल्याचे आम्हाला कळू द्यायचे नाही आहे आणि --- "

"आणि तो कोण असू शकेल, याची तुम्हाला काही कल्पना आली नाही?"

"नाही."

"तुम्हाला वाटेतून दूर केल्याने ज्या कुणाचा फायदा होईल, असा कुणीतरी!

तिने मान हलवली.

"तुमची काकू सुद्धा मेली असती तर, असाही विचार मनात आला नाही?"

"तुम्ही असे का विचारत आहात?"

"कोणीतरी तुमच्या काकूला आधीच्या संध्याकाळी विष देण्याचा प्रयत्न

केला. तो यशस्वी होऊन ती मरेल किंवा मरायला टेकेल, असे त्याला वाटले असावे. तुम्हाला वाटेतून दूर करण्यासाठी तो घरी आला असावा.”

“नाही, मी असली काही कल्पना करू शकत नाही.”

“असे केल्याने कुणाचा फायदा होऊ शकेल, असा कुणी तुमच्या डोळ्यांपुढे नाही का?

“नाही.”

रबराच्या टाचांचा जोराचा आवाज दाराबाहेर आला. स्टार्च केलेल्या कडक गणवेषाच्या एका परिचारिकेला हसत हसत दाराशी आणले. “मिस केंडल, त्याला ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आणले आहे. तुम्हीच मिस केंडल आहात, हो ना?”

“हो, मीच ती आहे. तो जगेल का? तो शुध्दीवर आला आहे का? तो --- “

“अर्थात आणि तुम्हाला पाहिजे, तर तुम्ही त्यांना भेटू शकता.”

ट्रॅग तिच्या बाजूने चालू लागला. परिचारिकेने त्याच्याकडे चौकसपणे पाहीले.

ट्रॅगने स्पष्ट केले, “लेफ्टनंट ट्रॅग, पोलीस.”

“ओहो, हो.”

“मी ती गोळी नेण्यासाठी आलो आहे.”

“तुम्हाला डॉ रोझलीनशी बोलावे लागेल. ते ऑपरेशन थिएटरमधून लवकरच खाली येतील.”

ट्रॅग हेलनला म्हणाला, “मला हे बोलायला अगदी नको वाटते, पण डॉ रोझलीन यांना रुग्णाला उत्तरे देता येतील असे वाटत असेल, तर मला एक प्रश्न

विचारायचा आहे.”

परिचारिका बोलली, “तो शुद्धीवर आहे. त्यांनी पाठीच्या कण्यात भूल दिली होती.”

ते लिफ्टशी पोचले, तेव्हा हेलनने ट्रॅगकडे विनंतीवजा बघत विचारले, “लेफ्टनंट, तुम्हाला त्या गोळीत जास्त रुची आहे, नाही का? ती महत्वाची आहेच. तुम्ही जाणता की डॉक्टर्स कधीकधी निष्काळजी असतात. तुम्ही लवकर नाही गेलात ते ती कदाचित फेकून देतील किंवा --- हरवून टाकतील.”

ट्रॅग हसत सुटला. तो म्हणाला, “ठीक आहे, तुम्ही जिंकलात. तुम्ही एकट्याच आत जाऊन त्याला भेटा. पण त्याला दमवू नका. कारण मी मिनिटाभरात त्याच्याशी बोलायला येतोच आहे.”

परिचारीकेने भुवई वर केली. “तो इंजेक्शनच्या अंमलाखाली आहे, समजले का, लेफ्टनंट. तो अशक्त झाला आहे आणि तो काय बोलतो, यावर तुम्ही फारसे अवलंबून राहू नका.”

ट्रॅग बोलला, “मला माहिती आहे. मी त्याला बरेचसे साधे प्रश्न विचारणार आहे. आता आपण कितव्या मजल्यावर आहोत?”

“अकराव्या. मिस्टर टेम्पलर चौथ्या मजल्यावर आहेत. मी मिस केंडलला रस्ता दाखवते.”

जेव्हा लिफ्ट चौथ्या मजल्यावर थांबली, तेव्हा ट्रॅगने हेलनला हळूच एक कोपरखळी मारली. मग तो परिचारीकेकडे वळून बोलला, “तुम्ही मिस केंडलला एकटीला टेम्पलरची खोली शोधायला सोडणार आणि मला ऑपरेशन थिएटरमध्ये जायला मदत करणार, नाही का?”

“हो, त्याची खोली ४८१ क्रमांकाची आहे --- पॅसेजच्या जवळ.”

“ती तिला सापडेल.”

हेलनने ट्रॅगकडे एक उतराई झाल्यासारखा कटाक्ष टाकला. ती बोलली,

“आभारी आहे.” आणि निघून गेली.

लिफ्टचे दार बंद झाले व ती वर जाऊ लागली.

ट्रॅगने विचारले, “तो जगायची शक्यता किती आहे?”

परिचारीकेने डोके हलवत म्हटले, “मला माहिती नाही.”

अकराव्या मजल्यावर, तिने त्याला ऑपरेशन थिएटरकडे नेले. कंबरेपर्यंत उघडे असलेले डॉ रोझलीन त्यांचे हात टॉवेलने पुसत होते.

परिचारीकेने म्हटले, “लेफ्टनंट ट्रॅग.”

“अरे वा, लेफ्टनंट. तुमच्यासाठी ही गोळी. मी त्याचे काय करणार आहे? मिस दिवार, गोळी कुठे आहे?”

“तुम्ही ती ट्रेमध्ये ठेवलीत आणि म्हणालात की कुणी तिला हात लावू नका.”

डॉ रोझलीन बोलले, “ते जाऊ दे. मी काही बँडेज त्यावर ठेवली. इकडे, एक मिनिट --- इकडून या.”

ते शेजारील खोलीकडे निघाले. ट्रॅगच्या नाकात वाईट कडू वास शिरला.

परिचारीकेने ट्रेमधील रक्तात भिजलेली बँडेजे ट्रॅगच्या नव्हे तर डॉक्टरांच्या हातात दिली. त्यांनी चिमट्याने ती रक्ताने माखलेली गोळी त्यातून बाहेर काढली व बोलले, “लेफ्टनंट, ही घ्या.”

“तुम्हाला शपथेवर सांगावे लागेल की जेरी टेम्पलरच्या शरीरातून बाहेर काढलेली गोळी हीच आहे.”

“नक्की. हीच ती आहे.”

ट्रॅगने ती उलटसुलट करून पाहीली. “त्याच्या खालील बाजूला काही ओळखू येईल अशी खूण करा. म्हणजे ती परत ओळखता येईल.”

डॉक्टरांनी छोटा चाकू काढून त्याच्या खालील बाजूला फुल्या काढल्या.

ट्रॅगने ती त्याच्या खिशात टाकली. तो बरा होईल का?”

“हो, हो. चांगला बरा होईल. मी आधी माझ्या मते त्याला जगण्याची पन्नास टक्के संधी देत होतो. पण आता ऑपरेशननंतर मी त्याला दहा पैकी नऊ गुण देईन. काही गुंतागुंत सोडल्यास, तो ठीक होईल. चांगला बळकट व कणखर होईल. सैन्यातील प्रशिक्षणाने माणसात नवलपूर्ण फरक पडतो. लेफ्टनंट, त्या मुलामध्ये एखाद्या एडक्याइतकी शक्ती आहे. ऑपरेशन चांगले झाले आहे.”

“मी मिनिटभर त्याच्याशी बोलू शकतो का?”

“मला वाटते, हो. तो औषधांच्या अंमलाखाली आहे. त्याला गुंतागुंतीचे प्रश्न विचारून दमवू नका. त्याला झेपतील, असे साधे प्रश्न विचारा. जर तुम्ही त्याला सतत बोलते ठेवलेत, तर तो गोंधळून काहीही बोलेल. पण साध्या प्रश्नांना तो उत्तरे देऊ शकेल. पण त्याची उत्तरे लिहून घ्यायला कुणाला आणू नका. त्याची काही उत्तरे इकडेतिकडे होण्याची किंवा चुकण्याची शक्यता आहे.”

ट्रॅग बोलला, “ठीक आहे. जर यात काही बदल असेल, तर मला सांगा. जर तो अत्यवस्थ झालाच तर मला त्याचा मरणवेळेचा जबाब नोंदवावा लागेल.”

डॉ रोझलीन हसले. “तुम्हाला असे करायची पाळी येईल, असे मला वाटत नाही. त्या मुलाला जगायचे आहे. त्याचे कुणा मुलीवर प्रेम आहे. मी त्याला भूल

देण्यापूर्वी, तो गोंधळलेला होता. गोळी लागली, पण त्यामुळेच त्याला समजले की त्या मुलीचे त्याच्यावर किती प्रेम आहे. याहून अधिक काय हवे? त्याला फक्त एकाच गोष्टीचा त्रास होतो आहे, की त्याला गोळी लागली पण ती कुणी मारली त्या माणसाला तो पकडू शकला नाही. ठीक आहे, लेफ्टनंट, मला तुम्ही कळवा की मला हीच ती गोळी आहे असे सांगण्यासाठी साक्षीदार म्हणून केव्हा यावे लागेल.''

लेफ्टनंट ट्रॅग लिफ्टने चौथ्या मजल्यावर आला व चोरपावलांनी 481 क्रमांकाच्या खोलीमध्ये गेला व हळूच खोलीचे दार ढकलले.

खोलीच्या लांबच्या कोपऱ्यात परिचारीका उभी होती. पलंगाच्या पायाशी लाजरी हेलन बसली होती. लेफ्टनंट ट्रॅग आत शिरल्याबरोबर ती म्हणाली, ‘‘मी इतकी आनंदित झाले आहे.''

नवीन माणसाला दारात बघून जेरीची भुवई चढली.

ट्रॅगने त्याच्याकडे बघून स्मित केले. ‘‘तुला आता फारसे बोलावेसे वाटत नसेल. पण मला तुला बरेच प्रश्न विचारायचे आहेत. मी गुप्तहेर विभागाचा लेफ्टनंट ट्रॅग!''

जेरीने त्याचे डोळे बंद केले. पापण्यांची फडफड केली. त्याला काही त्रास होत असल्यासारखे, क्षणभर ट्रॅगकडे पाहीले व मग तोंडभर हसत बोलला, ‘प्रश्नांचा मारा सुरु करा.''

ट्रॅगने बचाव करत म्हटले, ‘‘एका रात्रीत दोनदा मारा नको. आता तू थोडक्यात उत्तरे दे, कारण अजून तुला फार बोलायची परवानगी नाही.''

जेरीने मान हलवली.

ट्रॅगने विचारले, "गोळी कुणी चालवली?"

"मला माहिती नाही."

"तुला काही दिसले का?"

"फक्त थोडीशी हालचाल --- एक पुसट आकृती हलतांना दिसली."

"उंच की बुटकी?"

"सांगता येत नाही --- खोलीचा कोपरा हलला व मग गोळी आली."

"ही व्यक्ती तुझ्याऐवजी हेलनवर गोळी झाडायच्या प्रयत्नात होती का?"

जेरीचे डोळे या विचाराने झिंकचा थर असलेल्या तप्त लोखंडासारखे लाल झाले. असे कसे काय? तो काय हेलनला मारायला निघाला होता?"

"असे असू शकेल."

"माहिती नाही. मी असा विचारदेखील करू शकत नाही. हो --- हो --- असेलही, मला असे कधीच --- "

कोपऱ्यातील परिचारिका खर्जात बोलली, "मला माफ करा, पण रुग्ण उद्दीपित होता कामा नये."

लेफ्टनंट ट्रॅग हेलनच्या कडक अभिमानी आकृतीकडे पहात राहीला. त्याने दार उघडले, तेव्हा त्याने टेंम्पलरच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहीले. तो परिचारिकेकडे बघून तोंडभर हसला व बोलला, "सिस्टर, मी डॉक्टरांशी बोललो. मी तुम्हाला आता सांगू शकतो, की तुम्ही जवळजवळ बरोबर आहात पण थोडेफार काही चुकते आहे. हा गोळीबार गूढ आहेच पण त्यापेक्षा महत्वाच्या गोष्टी एकदा आणि कायमच्या स्पष्ट करतो आहे. मला औषधांविषयी काही माहिती नसले, तरी,

मला मनुष्यस्वभावाबद्दल काहीतरी माहिती आहे. तुम्ही पाच मिनिटे इथून गेलात, जरा आराम केलात, जाऊन कपभर कॉफी प्यायलीत, आणि या दोघांना एकटे ठेवलेत तर, तुमच्या रुग्णाला जगातील कशाहीपेक्षा जास्त बरे वाटेल. ऑपरेशनच्या वेळी तो डॉक्टरांना हे सर्व सांगत होता. मग आता त्याला हे सर्व तिला सांगण्याची संधी का देऊ नये?"

परिचारिकेने टेम्पलरकडे एक कटाक्ष टाकला व तिच्या वस्त्रांची सळसळ करत, पलंगाच्या कडेने ती दाराकडे गेली.

लेफ्टनंट ट्रॅग बोलला, "ठीक आहे, मी तुला भेटतो."

परिचारिकेने हेलनला दटावले, "तुझ्याकडे फक्त एक मिनिट आहे."

ट्रॅगने परिचारिकेसाठी दार उघडून धरले. हेलनच्या डोळ्यातील चमक पाहीली आणि त्याच्यामागे दार लावले. तो परिचारिकेला म्हणाला, "तू त्यांना देता येईल, तेवढा वेळ दे."

ती त्याच्याबरोबर लिफ्टकडे गेली. "बोलायचे, ते तुम्ही बोलला आहात."

ट्रॅग हसला. "मला बोलावेच लागले. हेवा करण्यापेक्षा स्वाभिमानामुळे अधिक प्रेमिकांचा बळी गेला आहे. तो मुलगा सैन्यात असल्याने काही बोलला नाही. जेव्हा ती त्याला घेऊन हॉस्पिटलमध्ये जात होती, तेव्हा तिने तिच्या भावनांना वाट करून दिली. मग अचानक तो अर्धवट जागरूक झाला. त्याला वाटले, ती पुढारलेली आहे आणि पुढील खेळी त्याने खेळावी म्हणून थांबलेली

आहे. कदाचित तिने तिचे मन बदलले तर, म्हणून त्याला भीती वाटते आहे. त्यांच्यापैकी कुणीच बोलायला तयार नाही आणि तुम्ही तिथे उभ्या आहात --- "

“मी लांब कोपऱ्यात उभी होते.”

ट्रॅग तोंडभरून हसला व बोलला, “तर असो, मी आधीच काही सुरु केले आहे.”

शिट्टीवर एक धून वाजवत, ट्रॅगने लिफ्टचे बटण दाबले व खाली तळ मजल्याला गेला. मोठ्या पॅसेजमधून चालत रात्रीच्या बोचऱ्या, थंड हवेतून जात जात त्याच्या पोलिसांच्या गाडीत शिरला आणि वेगाने गाडी चालवत मुख्य चौकीवर निघाला. प्रयोगशाळेतील एक स्कॉटीश चिडखोर मनुष्य बोलला, “मला वाटते, नऊ वाजेपर्यंत वेळ लागू शकेल.”

ट्रॅग बोलला, “असे शक्य नाही. हेन्री लीचच्या शरीरातून काढलेली गोळी तुम्हाला सर्जनने दिली आहे?

“हो.”

ट्रॅगने त्याच्या खिशातून दोन गोळया काढून दिल्या. ज्याखाली तीन सरळ रेषा आहेत, ती जेरी टेम्पलरच्या ऑपरेशनच्या वेळी बाहेर काढलेली दुसरी आहे व तिसरी टेम्पलर व ती मुलगी उभ्या असलेल्या दाराच्या कडेच्या लाकडातून कोरून काढलेली आहे. आता या तिन्ही गोळया एकाच बंदुकीतून मारल्या गेल्या आहेत. हे सांगायला तुम्हाला किती वेळ लागेल?”

तो स्कॉटीश मनुष्य उल्लेखनीय निराशाजनक पद्धतीने बोलला, “ते सांगता येणार नाही. खूप वेळ लागेल किंवा कदाचित पटकनदेखील होईल.”

ट्रॅग बोलला, “ते पटकन करा. मी माझ्या कार्यालयात चाललो आहे. मला फोन

करा आणि त्या गोळ्या एकत्र करू नका. या केसच्या दुसऱ्या बाजूला पेरी मेसन आहे आणि उलट तपासणीच्या वेळी तो काय करेल, ते तुम्ही जाणू शकता.''

तुलना करायच्या सूक्ष्मदर्शक यंत्राखालील गोळ्यांचे नमुने हलवत, प्रयोगशाळेतील बाकावरील मनुष्य बोलला, ''तो उलट तपासणीच्या वेळी तो काही करू शकणार नाही. त्याला ती संधीच मिळणार नाही. मी सूक्ष्मदर्शक यंत्रातून फोटो घेईन आणि तेच माझ्या वतीने बोलतील. कॅमेरा त्याच्यासाठी बोलत असतांना स्वतःच्या जिभेने बोलणारा माणूस मूर्खच समजला पाहिजे.''

ट्रॅग हसला. मग दारात थांबून त्याने जाहीर केले, ''मी पेरी मेसनवर हल्ला करण्याची मुदत मागून घेणार आहे. मी त्याला त्याने घाई न करण्यासाठी व काळजी घेण्यासाठी धडा शिकवणार आहे.''

अँग्युस मॅक इंटोश त्याच्या कामाला सुरवात करतांना, गुरगुरत बोलला, ''तुम्ही त्यासाठी गजराचे घड्याळ आणणे श्रेयस्कर राहील. मिस्टर लेफ्टनंट, त्यामुळे तुम्ही सकाळी लवकर उठाल.''

ट्रॅग दार लावतांना हे बोलायला थांबला, ''माझ्याकडे ते आधीच आहे.''

मग त्याने हळूच दार लावले व त्याच्या कार्यालयात निघून गेला.

सिगरेटच्या शिळ्या धुराचा मृत वास त्याच्या नाकात शिरल्यावर, ट्रॅगने तोंड वेडेवाकडे केले. तो खिडकीशी गेला, त्या उघडल्या. पहाटेपूर्वीची गार झुळूक खोलीच्या आत आल्यावर, तो जरा शहारला. त्याने त्याच्या जबड्याच्या समोर शोधक बोटे आडवी धरली, तेव्हा त्याला त्याच्या त्वचेतील दाढीच्या केसातून आलेला तेलकट द्राव बोटांच्या टोकापर्यंत पोचलेला जाणवला. त्याला चिकट, घाणेरडे वाटले व दमणूक झालेली जाणवली.

त्याने कोट ठेवायचे कपाट ओलांडले. त्यात एक धुवायचा स्टँड होता. त्याने गरम पाणी सुरु केले, त्याचा चेहरा आणि हात धुतले आणि टॉवेलने कोरडे करू लागला, तेव्हा फोन वाजला.

ट्रॅगने चालत जाऊन फोन उचलला.

"कोण आहे?"

प्रयोगशाळेतील एक स्कॉटीश मनुष्य, स्कॉचमन बोलला, "मला ते अजून मोठ्या फायदेशीर अवस्थेत मिळालेले नाहीत, जेणेकरून मी सर्वात चांगले फोटो काढू शकेन. पण मी तुम्हाला एक गोष्ट सांगू शकतो. तिन्ही गोळ्या एकाच बंदुकीतून आल्या आहेत. आता तुम्हाला किती लवकर फोटो लागणार आहेत?"

ट्रॅग बोलला, "तुम्हाला जितक्या लवकर देता येतील, तितक्या लवकर मला हवे आहेत."

स्कॉचमन गुरगुरला, "तू नेहमीच फार अधीर असतोस."आणि फोन ठेऊन दिला.

ट्रॅग समाधानाने तोंडभर हसला.

पुन्हा एकदा फोन वाजला. फोन घेण्याच्या कामावर असलेला माणूस घाईने बोलला, "ही तुझ्यासाठी अनामिक टीप आहे. लेफ्टनंट, हे कुणाला बोलू नका. तो म्हणतो आहे की एका मिनिटात फोन बंद करणार आहे आणि आणि फोनचा माग काढायचा प्रयत्न करून काही उपयोग नाही."

ट्रॅग बोलला, "समजले. म्हणजे तुम्ही ऐकू शकाल?"

"हो."

“ठीक आहे. त्याला फोन लावा.”

लाईनवर एक क्लिक आली. ऑपरेटरने किल्ली घातली व बोलला, “इथे लाईनवर लेफ्टनंट ट्रॅग आहेत.”

मध्येच अडकणारा आवाज म्हणाला, “हॅलो. फोनवर बोलणाऱ्या माणसाने बहुधा त्याच्या तोंडाशी हाताची मूठ करून ठेवली असावी. “लेफ्टनंट ट्रॅग बोलत आहेत का?”

“मी ट्रॅग बोलतो आहे. कोण आहे?”

“ऐकून घ्या. मी तुम्हाला पेरी मेसन हा वकील आणि मध्यरात्रीनंतर त्याच्याबरोबर असलेल्या त्या मुलीबद्दल सांगतो आहे.”

ट्रॅग म्हणाला, “पुढे बोला. तुम्हाला त्यांच्याबद्दल काय माहिती आहे?”

“त्यांनी एका माणसाला घेतले. तो तुम्हाला हवा असलेला महत्वाचा साक्षीदार आहे. त्यांनी त्याला लांब नेऊन बंदिस्त केले.”

ट्रॅग अधीरतेने म्हणाला, “पुढे? तो कोण मनुष्य आहे? आणि आता तो कुठे आहे?”

“तो कोण आहे, मला माहिती नाही. पण तो कुठे आहे, ते मी सांगू शकतो.”

“कुठे आहे?”

आवाजाने अचानक त्याचा वेग वाढवला. जणू त्याला संभाषण संपवायची घाई झाली होती.

आज सकाळी पावणे पाचला थॉमस ट्रीमर या नावाने मॅपल लीफ हॉटेलमध्ये नोंदणी केली आहे. त्याचा खोली क्रमांक ३७६ आहे.”

ट्रॅग घाईने बोलला, "आता एक मिनिट थांबा. मला एक गोष्ट स्पष्ट करू दे. तुमची खात्री आहे का, की पेरी मेसन, वकील याने त्या माणसाला हॉटेलमध्ये ठेवले? तो यामागे आहे का?"

आवाज म्हणाला, "या मागे? जळो त्याचे लक्षण! कॅनव्हासने अवगुंठीत बॅग घेऊन, मेसनच त्याच्याबरोबर आला. तेव्हा ती मुलगी त्यांच्याबरोबर नव्हती.

दुसऱ्या बाजूने फोन बंद झाला.

लेफ्टनंट ट्रॅग बिल्ला हवेत झेलत राहीला. त्याने विचारले, "हा फोन कुणाचा होता, ते शोधून काढता येईल का?"

ऑपरेटर म्हणाला, "हॉटेलमधील पैसे भरायचा विभाग." मी फोनचा माग काढायचा प्रयत्न केला. दोन रेडीओ गाड्या तीन चौक अंतर जोराने जात प्रश्नातील जागा सूचनांबरहुकूम शोधत होत्या. त्याना काही सापडले, तर आम्हाला पंधरा मिनिटात कळेल."

ट्रॅगच्या डोळ्यात विजयाची चमक आली. "मी ही संधी घेण्यासाठी, पंधरा मिनिटे थांबतो."

वीस मिनिटांपूर्वी अहवाल मिळाला. दोन रेडीओ गाड्या त्या ठिकाणी पोचल्या. ते रात्रभर चालू असणारे हॉटेल होते. दाराजवळ फोनचे स्टेशन होते. तिथे कामावर एकच मनुष्य होता. तो कुणा गिऱ्हाईकासाठी थांबला होता. त्याने पुसटपणे एका माणसाला तिथे शिरतांना पाहीले. पण तो त्याचे वर्णन करू शकत नव्हता. त्या जागेपासून चार चौक अंतराच्या आतील दोन माणसांना त्या दोन गाड्यांनी आत बसवले. अशी शक्यता वाटत नव्हती, की त्या माणसांनी फोन केले होते. पण पोलिसांकडे त्यांचे नाव व पत्ते होते. मग मॅपल लीफ हॉटेलमधील ऑफिसर्सनी खात्री

केली की थॉमस ट्रीमर या नावाने एकाने चारच्या सुमाराला नाव रजिस्टर केले. तो साठीजवळ आलेला माणूस होता. साधारण साडेपाच फूट उंच व एकशे चाळीस पौंडाचा असावा. त्याने काहीसे ओंगळपण स्वच्छ कपडे घातले होते. त्याची गालफडे वर आलेली होती व उतरत्या, करड्या मिशा होत्या. त्याच्याकडे फक्त एका जुन्या पद्धतीच्या कॅन्व्हासच्या पिशवीत असलेले, बऱ्यापैकी जड दुर्बिणीचे खोके होते. ट्रीमरला एका झकपक कपडे केलेल्या उंच माणसाने इथे आणले.अहवाल ऐकून, लेफ्टनंट ट्रॅगच्या कपाळावरील शीर थाडथाड उडू लागली. त्याने आज्ञा दिली, “रेडीओ गाड्यांना कामाला लावा. ती जागा अशा तऱ्हेने वेढा की ट्रीमर बाहेर पडू शकला नाही पाहिजे. मी तिथे यायला निघालोच आहे.”

## प्रकरण १७

मेसन गाडी हळू चालवत होता. रात्रीच्या थंड हवेत त्याचे झोपेविना असलेले शरीर मरगळलेले होते. उब मिळवण्यासाठी, त्याच्या शेजारी मांजराचे पिल्लू मुटकुळे करून, चिकटून, झोपले होते. मधून मधून वकील गाडी चालवायचे चक्र डाव्या हातात घेत होता व उजव्या हाताने पिल्लाला कुरवाळत होता. झोपाळू पिल्लाच्या तोंडून समाधानाचा सतत येणारा आवाज ऐकेपर्यंत तो हात तसाच राहू देत होता. पूर्वेकडे चांदण्या मंद होत हळूहळू दिसेनाशा होत होत्या. गर्दीने उभ्या असलेल्या सदनिकांच्या इमारतींवर पुसट प्रकाश पडू लागला होता. डेलाच्या

घराशी आल्यावर मेसनने गाडी हळू केली. ती सर्व इमारत काळोखी होती.फक्त डेलाची एकच लंबवर्तुळाकार खिडकी थोडी उजळलेली दिसत होती.

मेसनने गाडी लावली. अडवारलेल्या पिल्लाला उचलून शरीराची उब देत कोटाखाली घेतले. पत्रपेट्यांच्या मोठ्या रांगेसमोर असलेल्या तिथे रहाणाऱ्याचो नावे असलेल्या पाटीपाशी तो थांबला आणि डेलाच्या सदनिकेची घंटी वाजवली. लगेचच डेलाच्या उत्तराचा सिग्नल आला. मेसनने लिफ्टचे बटण दाबले व त्यातून तो इष्ट मजल्यावर आला. दार ढकलले आणि पॅसेजमधील कोंदट, गरम हवेत तो आला. पिल्लू हुशारीने कोटाच्या आडून डोकावून बघू लागले. ते दोघे डेलाच्या दाराशी आल्यावर, मेसनने त्यांच्या ठरलेल्या खुणेने दारावर नखांनी टकटक केले. डेलाने दार उघडले. मेसनने तिला टॅक्सीशी सोडले, तेव्हा ती ज्या कपड्यात होती, तेच कपडे अजूनही तिच्या अंगावर होते.

ती अर्धवट कुजबुजत बोलली, "ओहो, तुला बघून मला इतका आनंद झाला. टॅक्सीमध्ये बसवून देताना तू ज्या खुणा केल्यास त्या मला बरोबर समजल्या ना?"

मेसन दारातून आत येत उबदार सदनिकेत स्थिर झाला.

"तुला समजल्या नसल्या तर माझा धिक्कार असो. मला काय हवे होते, असे तुला वाटते?"

"लंकच्या घरी जाणे."

"बरोबर. तू तिथे काय केलेस?"

ती बोलली, "तो तिथे नव्हता. ओहो, तुझ्याकडे मांजराचे पिल्लू आहे!"

मेसनने त्याची टोपी काढली. डेलाच्या पुढे पसरलेल्या हातांवर पिल्लू ठेवले आणि मोठा कोट न काढता बसला. गालीचा बघून तो विचारपूर्वक तोंडभर हसला. "पेय आहे का?"

“तुझ्यासाठी मी कॉफी गरम ठेवली आहे. ब्रँडीबरोबर ती घे म्हणजे क्षणार्धात तू हुशार होशील --- तिने पिल्लू टेबलावर ठेवले. “तू तिकडे बस. अंबर, माझ्या लाडक्या पिल्ला.”

मेसन म्हणाला, “डेला, एक मिनिट थांब. मला तुझ्याशी बोलायचे आहे --- “

“तुझी कॉफी झाल्याशिवाय नाही.” एवढे बोलून ती लहानशा स्वयंपाक घरात नाहीशी झाली.

गालीच्यावरील नक्षीकडे बघत, कोपरे गुडघ्यांवर टेकवून, हालचाल न करता, मेसन बसून राहीला.

पिल्लाने टेबलाचा धांडोळा घेतला. जमिनीवर उडी घेतली आणि वास घेत स्वयंपाकघराच्या दारात जोराने ‘मियाव’ करत उभे राहीले.

डेलाने हसून दार उघडले व बोलली, “मला वाटते, तुला थोडे गरम दूध हवे आहे.”

एका ट्रेमध्ये दोन कप वाफाळती कॉफी व नाकात वास जाणारी ब्रँडी घेऊन जेव्हा ती परत आली तेव्हाही मेसन तसाच बसलेला होता.

मेसनने कप उचलला व डेलाकडे बघू लागला.

तो म्हणाला, “तर आपण गुन्ह्याबद्दल बोलूया.”

ती टेबलावर बसली. कप तिच्या गुडघ्यावर तोल सांभाळत, ठेवला. “कधीकधी मला तुझे कर्तृत्व घाबरवते.”

मेसनने गरम कॉफीचा घुटका घेतला व विचारले, “काय झाले?”

ती बोलली, “तू लंकला खूप वेळ कामात गुंतवून ठेवशील, अशी मला खात्री नव्हती. मी टॅक्सीवाल्याला घाई केली.”

मेसनने विचारले, “त्याला बिल्व्हेडेरेचा पत्ता दिलास?”

“पत्ता नव्हे, मी त्याला कोपऱ्यावर थांबायला सांगितले. मग मी चौका चौकातून चालत गेले. कोपऱ्याशी वळले. मग क्रमांक मोजत मोजत, लंकच्या घराशी आले. ते गॅरेजवरील चौकोनी घर आहे आणि --- “

मेसन मध्येच बोलला, “मला माहिती आहे. मी तिथे आत होतो. तू काय केलेस?”

“मी पाहीले, घर अंधारी होते. म्हणून मी पायऱ्या चढून घराची भली मोठी घंटी वाजवली. कोणी उत्तर दिले नाही. मी दाराच्या घंटीला टेकून उभी राहिले. ती वाजतांना मला ऐकू येईना. मग मी दारावर थापा देऊ लागले. मग माझ्या लक्षात आले, की पुढील दार नीट लावलेले नव्हते. पण जरा वेळाने मी दार ढकलून उघडले व आत गेले.”

त्याने विचारले, “दिवे लावलेस का?”

“हो.”

“तुला काय सापडले?”

“घरात कुणी नव्हते. पुढच्या झोपायच्या खोलीतील पलंग तयार केलेला नव्हता. मागील झोपायच्या खोलीत --- “

“एक मिनिट थांब. तू मागील झोपायच्या खोलीत कशी गेलीस? स्वयंपाकघरातून की बाथरुममधून?”

“जोडणाऱ्या बाथरुममधून.”

“डेला, आता याबद्दल खात्रीपूर्वक उत्तर दे. दोन झोपायच्या खोल्यांमधील दार उघडे होते का?”

“हो, अर्धवट उघडे होते --- म्हणजे, पहिले दार अर्धे उघडे होते. दुसऱी झोपायच्या खोली व बाथरूम यातील दार सताड उघडे होते. मागील झोपायच्या खोलीला मागील इमारतींपासून अलग करणाऱ्या अरुंद जागेत उघडणारी एक खिडकी होती. खिडकी उंच असून, त्यातून वारा येत होता. त्यामुळे पडदे उडत होते.”

“झोपायच्या खोलीतून स्वयंपाकघराकडे जाणाऱ्या दाराचे काय?”

“ते एखादा दुसरा इंच उघडे होते.”

“तू त्यातून गेलीस का?”

“नाही. मी पुढील झोपायच्या खोलीतून व उठाबसायच्या खोलीतून स्वयंपाकघरात गेले. पण मला पुढील झोपायच्या खोलीबद्दल असे सांगायचे आहे, की तेथील कपाटाचे खण बाहेर ओढून काढलेले होते. कपड्यांचे ढीगदेखील जमिनीवर पडलेले होते.”

मेसन बोलला, “मला माहिती आहे. आपण स्वयंपाकघराकडे वळू. तिथे तू काही पाहीलेस का?

“हो.”

त्याचे दार उघडे होते, की बंद?”

“बंद.”

“तू तेथील दिवा लावलास का?”

“नाही. मी दार उघडले. तिथे उजेड होता व कुणी नव्हते. मला खात्री करायची होती --- मलावाटले कदाचित घंटीचा आवाज ऐकून, जर त्याला नको ते कुणी आले असेल तर, फ्रॅंकलीन शोअरने लपून बसण्याचा विचार केला असावा.”

“तुला स्वयंपाकघरातील पिठाच्या डब्याशेजारी व जमिनीवर पीठ सांडलेले दिसले का?”

“नाही --- पण थोडे जरी पीठ सांडलेले असले तरी माझ्या पाठीवर उजेड येत असल्याने व मी फक्त तिथे कुणी लपलेले नाही ना, हे पहात असल्याने, मला दिसले नसेल.

“तुला धक्का बसला का?”

“मी म्हणेन हो. माझ्या पाठीच्या कण्यातून थंडीची लहर दौडत होती. जर फ्रॅंकलीन शोअर दिसला असता, तर मी फारच घाबरून गेले असते.”

मेसनने कॉफी संपवली. उठून, कप टेबलावर ठेवला. त्याचे लांब हात ताणले व खिशात खोल घातले. त्या लहानशा स्वयंपाकघरात लगेच त्याच्याकडे लक्ष द्यावे, म्हणून पिल्लू ओरडत होते. डेलाने दार उघडले आणि पिल्लू दुधाने पोट भरल्याने खोलीत बिचकल्यासारखे चालू लागले. घशातून समाधानाचे आवाज काढू लागले. कपाटावर उड्या मारू लागले व त्याचे पुढचे पाय छातीखाली घेऊन, चूप बसले. थोड्या वेळाने, त्याच्या डोळ्यातील जागरूकता जाऊन, ते झोपाळू बनले व बघता बघता ते गुडूप झोपून गेले.

अजून उभ्या असलेल्या मेसनने त्याचे डोके पिल्लाकडे वळवले.

“तू घरात आलीस, तेव्हा अंबर कुठे होते?”

“पुढील झोपायच्या खोलीतील पलंगावर मध्यभागी मुटकुळे करून झोपले होते.”

“पलंगावर मध्यभागी?”

“हो, चादर थोडी चुरगळली होती आणि खोल गेली होती. ते गाढ झोपले होते.”

मेसनने त्याचे हात खिशाबाहेर काढले. अंगठे काखेत घातले व जमिनीवर भरभर चालू लागला.

डेलाने विचारले, “अजून कॉफी?”

त्याने ती बोललेले ऐकले नसावे. पण तो डोके पुढे झुकलेले व डोळे खाली वळलेले, असा तो गालीच्यावर चालत राहीला.

अचानक तो वळला. “तुला पिल्लू पिठाने माखलेले पाय घेऊन चालले असल्यासारख्या, फरशीवर काही खुणा दिसल्या का?”

डेलाने भुवईवर करत म्हटले, “मला विचार करू दे. मी माणसापेक्षा लहान कुणाचा विचार करत नव्हते. मी घाबरून गोठले होते पण --- मला वाटते तिथे मांजराच्या पायाच्या काही खुणा होत्या. मी असा विचार करत होते, की तो मनुष्य तिथे एकटाच रहात असणार आणि त्याला चांगलीच स्वच्छता करावी लागत असणार. पुढील झोपायच्या खोलीतील पलंगावरील चादरी मळल्या होत्या आणि उशीचा आभ्रा घाणेरडा झाला होता. ओहो, अशा छोट्या छोट्या अनेक गोष्टी! आणि स्वयंपाकघरातील सांडलेल्या पिठाचे फरांटे!”

“पण स्वयंपाकघरातील पँट्रीचे दार बंद असल्याची तुला खात्री आहे का?”

"हो."

मेसन बोलला, "जर दार बंद होते, तर पिल्लू स्वयंपाकघरात जाऊन पिठात कसे काय नाचले? तू दार उघडलेस तेव्हा तर ते गेले नाही?"

डेलाने त्यावर काही सेकंद विचार केला. मग डोके हलवत बोलली, "हे मला समजत नाही. मी तिथे असतांना पिल्लू हलले नव्हते."

मेसनने विचारपूर्वक, झोपलेल्या पिल्लाकडे पाहीले. अचानक त्याचा मोठा कोट उचलला. तो झटकला व टोपी उचलून दाराकडे चालू लागला.

डेला त्याच्याशेजारी उभी राहीली. "बॉस, कृपया थोडा वेळ झोप घे. तुला त्याची गरज आहे."

त्याने तिच्याकडे पाहीले आणि त्याच्या चेहऱ्यावरील कठोर खुणा मऊ झाल्या. "तूच झोप. तुला गरज आहे."

"ती इथे असतांना ॲश ट्रेवरील जॉर्ज अल्बरच्या नावाचे आमंत्रण कार्ड व त्यावर काही लिहिलेले तुला दिसले का?"

"तिथे कार्ड होते पण मला त्यावरील नाव दिसले नाही. का?"

"नाही, काही नाही. ते विसर."

त्याने हाताने तिची कंबर फिरवली व तिला जवळ ओढले. तिने अर्धे उघडे ओठ वर केले. त्याचा दुसरा हात तिच्या खांद्याकडे गेला. क्षणभर त्याने तिला जवळ धरले व बोलला, "तुझा वरील ओठ कडक ठेव. मला वाटते, आपण मूर्खासारखी चूक करत आहोत."

शांतपणे दार उघडून तो हॉलमधून बाहेर पडला.

## प्रकरण १८

डेलाने मोठ्या, गोंधळवणाऱ्या गजराच्या घड्याळाकडे रागाने पाहीले. त्या गजराविरुद्धचा, स्नायू आखडणे मोडून काढायचा तिचा पहिला प्रयत्न यशस्वी होऊन, गजर वाजायचा बंद झाला आणि दुसऱ्यांदा गजर होईपर्यंत डेला परत गाढ झोपली.

अजून डोळे बंद असतांना, ती एका कोपरावर भार देत उठली. हाताने चाचपडत परत गजर बंद करायला बघू लागली. परंतु घड्याळ तिला विरोध करू लागले व तिला डोळे उघडणे भाग पाडू लागले. घड्याळ त्याच्या नेहमीच्या जागी अंथरुणाशेजारी नव्हते. गजर बंद करून परत झोपता येऊ नये, म्हणून तिनेच ते मांडणीवर लांब ठेवले होते. उठायचे नसतांना तिने पांघरूण बाजूला करत, पाय बाहेर काढून, ते कुठे आहे, हे बघायला सुरवात केली.

अंथरुणावरून मियाव असा आवाज आला.

तो विचित्र आवाज कसला आहे ते कळायला तिला काही वेळ लागला. मग गजर बंद करत, तिने अंबरच्या डोळयांवर उडवलेले पांघरूण बाजूला केले.

पिल्लाने अंग गोल गोल हलवून उबदार करत, त्याची कृतज्ञता व्यक्त केली. उठून उभे राहीले. पाठीची कमान केली. पाय ताणून जांभई दिली. एक दोन वेड्यावाकड्या उड्या मारल्या. त्यामुळे ते डेलाच्या बोटांच्या जवळ आले.

पिल्लाला त्याच्या कानामागे डेलाची बोटे प्रेमाने फिरतांना जाणवली. गुंडाळलेल्या पांघरूणांवरून घसरत, समाधानाने गुरगुरत, त्याने डेलाच्या अंगाची उब मिळवण्याचा प्रयत्न केला.

डेलाने हसून त्याला लांब ढकलले. “अंबर, आता नाही. कडक आणि मोठा गजराचा आवाज मला कामावर जायला सांगतो आहे.”

तिला माहीत होते, की तिला वेळेवर कामाला जाण्याची गरज नव्हती. पण मेलमधील काही बाबींकडे लक्ष देणे आवश्यक होते. नवीन टंकलेखिका नवीन पत्र तयार करत होती आणि डेलाला माहिती होते, की ते मेसनने बघण्यापूर्वी तिला तपासणे गरजेचे होते.

शॉवरमधील गार पाण्याच्या धारा, साबणाचा सुवास व परत शेवटी घेतलेली गार पाण्याची धार, यामुळे ती पुन्हा आयुष्यात आली. तिने चोळून चोळून अंग पुसल्याने तिची कांती चमकू लागली. तिच्या आतील कपड्यात, ती आरशासमोर उभे राहून, चेहरा नीट करत होती, तेव्हा आतील दरवाज्याची घंटी जोराने वाजली.

क्षणभर तिने तिकडे दुर्लक्ष केले. मग थोडेसे दार उघडून, म्हणाली, “मी काम करणारी बाई आहे. मला काही विकत घ्यायचे नाही. मला कसलीही वर्गणी भरायची नाही. मला कार्यालयात जायला उशीर होतो आहे.”

लेफ्टनंट ट्रॅग बोलला, “मी तुला कार्यालयात सोडतो, म्हणजे उशीर होणार नाही.”

डेलाने मान हलवली. जेणेकरून तिला लेफ्टनंट ट्रॅगचा चेहरा दिसेल, अशा तऱ्हेने तिचे डोळे दरवाज्यातील फटीवर स्थिर झाले होते.

“रस्त्यातील दार तू कसे ओलांडलेस?”

“ते गुप्त गुपित आहे. तुम्ही झोपाळू दिसत आहात.”

“तू तर माझ्याहून अधिक झोपाळू दिसत आहेस.”

ट्रॅग तोंडभर हसला. “मला जेवढे माहिती आहे त्याप्रमाणे, मिसिसिपीच्या पश्चिमेकडील कुणालाही काल नीट झोप मिळालेली नाही.”

“मी कपडे करते आहे.”

“तुला किती वेळ लागेल?”

“पाच दहा मिनिटे.”

“न्याहारी?”

“इथे नाही. मी औषधाच्या दुकानात कॉफीचा कप घेते व गिळते.”

तो तिला म्हणाला, “हे प्रकृतीसाठी चांगले नाही.”

“याने जाडी वाढते.”

तो म्हणाला, “मी बाहेर थांबतो.”

“ते एवढे महत्वाचे आहे का?”

ट्रॅग बोलला, “हो, ते एवढे महत्वाचे आहे.”

डेलाने दार लावले. आरशातील तिच्या प्रतिबिंबाने तिला भुवई वर गेलेला तिचा चेहरा दाखवला. ती फोनजवळ गेली व मेसनला यादीबाहेरील, वेगळा फोन करू लागली. मग तिचा विचार बदलला व तिने फोन ठेऊन दिला. तिने बाहेर जायचे कपडे केले. झोपायच्या खोलीत स्लीपर काढल्या. बूट घातले आणि मग तिला पिल्लाने उभी केलेली समस्या लक्षात आली. तिने पिल्लाला हातात घेतले व

हळूवारपणे बोलली, "माझ्या प्रिय, ऐक. बाहेर उभा असलेला पोलीस मांजराच्या पिल्लाना खातो, जिवंतपणी खातो. शिवाय तुला नेले तर तो त्याचे स्पष्टीकरण मागेल आणि मोकळेपणे सांगायचे तर, हे कठीण आहे. तुझ्यासाठी स्वयंपाकघर आहे. मला आशा आहे, की खूपसे कोमट दूध तुला शांत ठेवेल."

अंबर समाधानाने गुरगुरले.

डेला लहानशा स्वयंपाकघरात शिरली. बाटलीतून थोडे दूध ओतले. योग्य तापमान होईपर्यंत, ते गरम केले व मग ते पिल्लाला पाजले.

तिने अंबरला म्हटले, "डॉक्टरांनी तुला काही घन पदार्थ द्यायला बंदी केली आहे. तू बरा होईपर्यंत तुला शहाण्या मांजरासारखे तुझे तोंड बंद ठेवले पाहिजे. दूध पिऊन पोट भरले, की तू बरा होशील. तेव्हा ते दूध संपव."

मोठ्या आनंदाने मियाव करत पिल्लाने दूध पिऊन टाकले आणि डेला हळूच स्वयंपाकघराबाहेर पडली व ट्रॅगला ऐकू जाणार नाही, अशा तऱ्हेने स्वयंपाकघराचे दार कुलुपबंद केले. उशा व अंथरूण घाईने आवरून वरच्या जागेवर ठेवले. बाहेर जायचा कोट घातला व टोपी नीट केली. दार उघडून, लेफ्टनंट ट्रॅगकडे हसून बघितले. ती बोलली, "मी तयार आहे. तुम्ही मला कार्यालयापर्यंत गाडीतून सोडत असल्याबद्दल धन्यवाद. तरीही मला वाटते, हे तुमचे उपकारच आहेत."

ट्रॅग बोलला, "तसे काही नाही."

"आकर्षक भेटी देणाऱ्या शत्रूपासून मला सावध राहिले पाहिजे, नाही का?"

"भेटी आणणारा ग्रीक?"

“तेच तर! तुला तिथे चांगली जागा आहे. तुला छान अग्नेय दिशेला जायला मिळेल.”

“दार नीट लागल्याची खात्री करत, डेला बोलली, “खरे की काय?”

“तुम्ही इथे एकट्याच आहात का?”

“अर्थात.”

ट्रॅग एक पाऊल पुढे आला. त्याने मिटणारे दार व्यापले गेले. “मिस डेला, मी तुला सांगतो, आपण इथे एक मिनिट बोलू शकतो.”

“मला वेळ नाही. मला आता कार्यालयात असले पाहीजे.”

ट्रॅग बोलला, “मला वाटते, कार्यालयात हजर असण्यापेक्षा, हे जास्त महत्वाचे आहे.”

“ठीक आहे. आपण गाडीत बोलू किंवा --- “

अगदी सहजतेने सदनिकेत शिरत व टेबलाशी जात, ट्रॅग बोलला, “गाडी चालवतांना बोलणे कठीण आहे.”

डेलाने एक सुस्कारा टाकला. ट्रॅगचे पोलिसी खाक्या दाखवणारे डोळे झेलत, ती दारात वाट अडवून उभी राहीली. “लेफ्टनंट, मला माफ करा. पण मला लगेच कामाला लागले पाहीजे. मला आता मुलाखत द्यायला किंवा त्यासंबंधी काही वाद घालायला जमणार नाही आणि मला तुम्हाला इथे सोडताही येणार नाही.”

ट्रॅगने तिचे काही न ऐकता, बोलणे चालू ठेवले, “ती नक्कीच छान जागा आहे. जर तुझा आग्रह असेल, तर मी तिथे येतो. पण मला इथे बोललेले जास्त आवडेल.”

आरशात बघत त्याचा टाय नीट करण्यासाठी तो थांबला. पण डेलाला कळून चुकले, की तो उभा आहे तिथून त्याला उघड्या दारातून, बाथरूमचे प्रतिबिंब दिसत होते.

“लेफ्टनंट, तुम्ही आत याल का?

“येतो. अरे देवा, मी रात्रभर जागा असल्यासारखा दिसतो आहे. मला वाटते, अशा नमुन्याबरोबर गाडीने जाणे तुला पसंत असेल का?”

डेला ठामपणे म्हणाली, “चला, निघूया.”

स्वयंपाकघराच्या दाराकडे निर्देश करत, ट्रॅगने विचारले, “हे काय आहे?”

ती रागाने बोलली, “ते दार आहे. तुम्ही यापूर्वी दारे नक्कीच पाहिली असतील. लेफ्टनंट, ती लाकडाची बनवलेली असून बिजागरीवर बसवलेली असतात आणि ती मागे पुढे होतात.”

ट्रॅग दारावर नजर रोखून बोलला, “खरे की काय?”

डेला रागाने परत सदनिकेत आली. ती कडकपणे म्हणाली, “आता तुम्ही इकडे बघा. तुमचे काय चालले आहे, ते मला कळत नाही. तुम्हाला आतही यायचे नाही. तुम्हाला इथे काही शोधायचे असल्याप्रमाणे तुम्ही इकडे तिकडे फिरत आहात. तुम्हाला इथे फिरून काही शोधायचे असेल, तर तसे वॉरन्ट आणा. जर तुम्हाला मला काही सांगायचे असेल, तर ते कार्यालयाच्या वाटेवर सांगा. मी आता निघाले आहे आणि तुम्ही बाहेर जात आहात!”

ट्रॅगने तिच्या रागीट व उद्धट डोळ्यांकडे कडकपणे हसत पाहीले. “मिस डेला, तुझ्या सदनिकेत माझ्या फिरण्याला तू मनाई करू शकत नाहीस.”

“नक्कीच करू शकते.”

“तू इथे कुणाला लपवले आहेस का?”

“मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगते, इथे माझ्याखेरीज कुणीही माणूस रहात नाही. आता याने तुमचे समाधान झाले आहे का?”

तिच्या डोळ्यातील सतत धुमसणारा अंगार त्याने पाहिला व म्हणाला, “हो.”

तिने त्याला प्रथम दारातून जाऊन दिले व मग त्याच्यापाठोपाठ ती गेली. यावेळेस तिने धाडकन दार लावले.

ट्रॅग दारातून नुकताच बाहेर पडत होता डेलाचा हात दाराच्या कडीवर होता, तेव्हा मांजराची एक कानांवर अत्याचार करणारी रागीट किंकाळी ऐकू आली. तिची जागा आणि जोरदारपणा झपाट्याने बदलत होता.

डेला ओरडली, “अरे देवा!” अचानक तिला आठवले की तिने स्वयंपाकघराच्या खिडकीला, हवेसाठी काही इंचाची फट ठेवली होती.

तो आवाज ऐकण्यात काही चूक झाली नव्हती. ती फक्त घाबरून अधीरपणे मारलेली किंकाळी नव्हती तर हृदयापासून उमटलेला आर्त करूण आवाज होता.

त्याने डेलामधील मातृप्रेम कळवळले. आता ती पिल्लाला त्याच्या नशीबावर सोडून देणार नव्हती. लेफ्टनंट ट्रॅगदेखील तिच्या मागोमाग सदनिकेच्या हॉलमधून लहानशा स्वयंपाकघरात धावला.

तिने स्वयंपाकघराची खिडकी उघडली, तेव्हा त्याचे डोके तिच्या खांद्याशी होते. जे काही झाले होते, ते तिला कळून चुकले. कपडे वाळत घालायची दोरी स्वयंपाकघराच्या खिडकीशेजारी बांधलेली होती. अंबर खिडकीत उभे राहून, बाहेर

डोकावत असतांना, दोरी खेचली गेली व ते त्यात फसले.त्याने त्याचा पंजा दोरीत घातला आणि तो सोडवायला बघतांना, त्याची नखे त्यात अडकून बसली. त्याचे वजन दोरीवर पडल्याने, ते दोरी बांधलेल्या तेलकट पुलीवरून घसरू लागले. ती दोरी फारशी घट्ट नव्हती, त्यामुळे अंबर तोल जाऊन, एका पायावर खिडकीबाहेर जमिनीपासून अनेक फुटांवर उलटे लोंबकळू लागले व दुसरा पाय दोरीत गुंडाळला गेला. ते भीतीने डोळे मोठे करून, शेपटी पुढे मागे हलवत, जोराने हलू लागले.

“डेला उद्गारली, “बिचारे!” व त्याला सोडवू लागली. “अरे पिल्ला, आता जरा थांब. तू आता सुटशील.”

ते पिल्लू पुढे मागे होत होते. त्याचे डोळे डेलाकडून खालील अंगणाकडे फिरत होते.

ट्रॅग तोंडभर हसला. मग गालातल्या गालात हसू लागला. डेलाने पिल्लाला सोडवून हातात घेतले. आता ट्रॅग जोरजोरात हसत सुटला. अंबर अती घाबरून गेल्याने अजून त्याच्या पायांची नखे ते दोरीपासून सोडवत नव्हते. डेलाला ते सोडवतांना नाकी नऊ आले.

तिने अंबरचे थरथरणारे शरीर तिच्याजवळ धरले व त्याचे रडू रोखत, त्याच्याशी आश्वासनात्मक रित्या बोलू लागली.

ती लेफ्टनंट ट्रॅगवर खवळून ओरडली, “अजून जोरात हसा. तुम्हाला हा सगळा खेळच वाटतो.”

आहे!”

खेळताना त्याने दोरीवर उडी मारली व अचानक ते हवेत अधांतरी स्वैरपणे लटकू लागल्याने,खूपच घाबरून गेले असावे.”

डेला रागाने बोलली, “तुम्हाला ती फक्त गंमत वाटल्याने मला आनंद झाला.”

ट्रॅग बोलला, “तुझ्याकडे मांजराचे पिल्लू असल्याचे मला माहिती नव्हते.”

“खरे का? मला वाटते मी पोलीस विभागाची परवानगी न घेता मांजराचे पिल्लू पाळल्याने, तुम्ही नाराज झाला असाल. समजा मी तुम्हाला असे सांगितले असते, की माझ्या काकूचा, रिबेकाचा, बर्फावरून घसरायचा खेळ खेळतांना घोटा दुखावल्याने, तुम्ही माझ्यावर टीका करत असणार, कारण मी तिला पोलिसांच्या परवानगीशिवाय जाऊ दिले. जर तुम्ही मला कार्यालयात जाऊ देण्याची कृपा केलीत, तर मी तुम्हाला एक पत्र लिहून सगळे काही कळवते. ‘प्रिय लेफ्टनंट ट्रॅग, माझ्याकडे एक मांजराचे पिल्लू आहे. ते पाळायला तुमची परवानगी आहे का?”

लेफ्टनंट ट्रॅग बोलला, “हा रागाचा फार परिणामकारक स्फोट आहे व विरोधभासात्मक चिडविणे आहे --- पण त्यामुळे मला पिल्लाबद्दल काहीच समजलेले नाही. माझे लक्ष त्यामुळे जराही विचलित होत नाही आहे.”

“ओहो, असे आहे का?”

“तुझ्याकडे किती काळ हे पिल्लू आहे?”

“फार काळ नाही.”

“म्हणजे काय?”

“म्हणजे ते फार जुने पिल्लू नाही.”

“ते जन्मल्यापासून तुझ्याकडे आहे का?”

“नाही.”

“मग कधीपासून आहे?”

“फार काळ नाही. पण त्याचा लळा लागण्यासाठी पुरेसा काळ आहे.

“तुम्हाला माहिती असेल, की काही आठवडे प्राणी तुमच्याबरोबर राहिला --- किंवा कधी कधी काही मिनिटे राहीला तरी तुम्ही प्राणीप्रेमी असाल, तर तुम्हाला त्याच्याबद्दल काही वाटू लागते --- “

“म्हणजे हे पिल्लू तुझ्याकडे काही आठवडे आहे का?”

“नाही, मला नाही वाटत.”

“मग काही दिवस?”

‘मला कळत नाही, की त्याने तुम्हाला काय फरक पडतो?”

ट्रॅग बोलला, “सामान्यपणे मी असे म्हणेन,की तुझे बरोबर आहे पण मिस डेला, काही परिस्थितीत केस अशा बारीकसारीक गोष्टींमुळे बदलू शकते.”

तिने जोर देत विचारले, “उदाहरणार्थ?” पण नंतर तिला वाटले, की तिने तोंड गप्प ठेवायला हवे होते. कारण त्यातून त्याला काही माहिती देण्याला तोंड फुटले असते.

ट्रॅग सहज बोलला, “कदाचित ते पिल्लू काल रात्री ज्याला विषबाधा झाली, ते, माटील्डा शोअरचे असू शकेल.”

“जरी असले, तर त्याने काय फरक पडतो?”

ट्रॅग बोलला, “ते तुझ्याकडे कसे आले, हे पोलिसांना रुचीपूर्ण वाटू शकते. पण त्याबद्दल आपण गाडीत बसून जातांना बोलू शकतो.’”

“हो, मला उशीर झाला आहे.”

ट्रॅग क्षमायाचनेच्या आविर्भावात हसून बोलला, “कदाचित मला जे कार्यालय अभिप्रेत आहे, त्याबद्दल तू बोलत नसशील.”

गुडघ्यातून येणारी कळ दाबत, त्याच्याकडे बघण्यासाठी तिने तोंड वळवले. ती बोलण्यात ठामपणा आणत म्हणाली, “मला कुठल्या कार्यालयात जायचे आहे, हे तुम्हाला चांगलेच माहिती आहे.”

लेफ्टनंट ट्रॅग तिच्या बोलण्याने जराही भारावून गेला नाही. त्याने जाहीर केले, “मी जिल्ह्याच्या वकिलाचे कार्यालय समजतो आहे आणि तू मांजराच्या पिल्लाला बरोबर घेऊ शकतेस. त्याला घरी एकट्याला ठेवणे म्हणजे अगदीच दुर्लक्ष केल्यासारखे होईल. पण तो अगदी ठळक पुरावा होऊ शकतो.”

## प्रकरण १९

दिवसाउजेडाची भगभग पेरी मेसनचा मेंदू कापत आत शिरली. तो अंथरुणात बराच वेळ उठून बसला व त्याच्या घड्याळात पाहिले. उशा आरामात उडवून वेगळ्या ठिकाणी ठेवल्या आणि जोर लावत, मागे टेकून आरामात बसला.

आजूबाजूला काय होते आहे, हे न कळता, मज्जातंतुंच्या सुखाची उब घेण्यात गुंग झाला --- दाराच्या घंटीच्या आवाजाने त्याला चिडायला लावून जागे केले.

पेरी मेसनने त्याकडे दुर्लक्ष केले. तो त्याच्या विचारात गर्क होऊन भुवई चढवत, वळला. “जळली मेली ती दाराची घंटी! बहुधा कोणीतरी विक्रेता असावा.

तो घंटी वाजवायचा बंद का होत नाही --- वैताग! जाऊ दे त्याला वाजवत राहू दे. मी त्याकडे लक्ष देणार नाही.”

परत परत घंटी वाजत राहीली. मेसनला असे जाणवले, की त्याची झोपायची मनापासूनची इच्छा जागे रहाण्यात बदलते आहे. त्याला पॅसेजमध्ये भरभर पाऊले वाजल्याचा व मग दारावर टकटक केल्याचा आवाज आला.

रागावून शिव्या देत मेसन अंथरुणाबाहेर पडला व दाराची कडी काढून, ते धक्का देऊन उघडले.

पॉल ड्रेक उंबरठयाशी जिवणी फाकवत उभा होता. त्याने विचारले, “मी आलेले तुला आवडले का?”

मेसन बोलला, “जाऊ दे, मला नाही आवडले. आत ये.”

ड्रेक मेसनच्या पाठोपाठ घरात आला. सर्वात आरामशीर खुर्ची निवडून, स्वतःला मोकळे करत, सिगरेट पेटवत बसला. “तुझी जागा छान आहे.”

मेसन विरोधाभासाने राग दर्शवित बोलला, “खरे का?”

ड्रेक म्हणाला, “थोडी थंड आहे. मी खिडकी लावतो. तिथून झुळूक येते आहे. दुसऱ्या खिडकीतून सूर्यप्रकाश येतो आहे. पेरी, साडेअकरा झाले आहेत.”

“मी वेळाची का म्हणून पर्वा करू?”

ड्रेक धुराची वलये सोडत राहीला. सूर्यकिरणांमध्ये ती विलीन होतांना पहात राहीला व बोलला, “जेव्हा तू आणि डेला आनंदाने भटकत असता, तेव्हा तू मला नेहमी मध्यरात्री उठवत असतोस. आता तुझ्या झोपेत मी व्यत्यय आणला आहे , तेव्हा तुला समजले असेल, की त्यामुळे कसे वाटते!”

मेसनने पांघरूण त्याच्या चवड्यावर उचलत, ड्रेकच्या काव्यात्मक न्यायावर मोठ्याने हसत, म्हटले, “ते नरकासारखे वाटते.” आणि सिगरेटकडे वळला.

“मला वाटले, जे काही चालले आहे, त्याचा अहवाल दिलेला तुला आवडेल.”

मेसनने सिगरेटचे टोक झटकले. जिभेने ते ओलसर केले व काडी ओढून, म्हणाला, “माझी ही सिगरेट संपेल, तेव्हा मी तुला इथून हाकलून देणार आहे व परत झोपणार आहे.” त्याने जळती काडी सिगरेटच्या टोकाशी धरली.

ड्रेक बोलला, ‘खूप गोष्टी घडत आहेत. त्या सगळ्या गोळ्या एकाच बंदुकीतून आलेल्या आहेत.”

“हे काही मला नवे नाही.”

“ट्रॅगने सर्व पोलीसदलाला कामाला जुंपले आहे. तो केसकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून बघतो आहे व झाडून सर्व माहिती मिळवतो आहे.”

“तो असे करतो आहे, ते चांगलेच आहे.”

डॉक्टरांनी जेरीला जगण्यासाठी दहापैकी नऊ गुण दिले आहेत. त्याचे ऑपरेशन चांगले झाले आहे.”

“हे चांगले आहे.”

“विषबाधा झालेल्या मांजराच्या पिल्लाला सुरक्षित म्हणून, थॉमस लंक नावाच्या माळ्याकडे ठेवले आहे.”

मेसन बोलला, “हं.”

“लंक नाहीसा झाला आहे व पिल्लूही.”

मेसन बोलला, “हे बघ पॉल, मी वर्तमानपत्र वाचून, चालू घडामोडींची दखल घेत असतो. मला तू इतरांनी ज्या दृष्टीकोनातून याकडे पाहिले नाही, अशा दृष्टीने बघायला हवे आहेस. पोलिसांच्या मागावर तू असलेले मला नको आहे.”

ड्रेकने काही न ऐकल्यासारखे पुढे चालू ठेवले. “जॉर्ज अल्बर नावाचा मनुष्य माटील्डा शोअरच्या खूप जवळचा झाला आहे. असे वाटते आहे, की तिला जॉर्ज अल्बर व हेलन केंडलचे सूत जुळावे, असे वाटते आहे. अल्बरलाही तसेच वाटते आहे. अल्बर काही मिळवण्यासाठी, जगभर हिंडतो आहे. तो देखणा व जादू करणारा आहे. हेलन अशा एका माणसाच्या प्रेमात पडली आहे, जो तिच्या योग्यतेचा नाही. जर हेलन शहाण्या मुलीसारखी वागली नाही, तर माटील्डाकाकू तिचा सगळा पैसा अल्बरला देऊ शकते.”

मेसनने मोठी जांभई दिली. “पॉल, तू माझा वेळ घेऊन, मला फार राग आणत आहेस.”

ड्रेकने त्याच्याकडे न हसणाऱ्या डोळ्यांनी पाहीले. “तुला मी असा वाटतो का?”

मेसन सिगरेटच्या टोकातील राख झटकतो व परत पांघरून लपेटून घेतो. “माटील्डा हॉस्पिटलमधून बाहेर पडून, घरी आली आहे. तिने तिचे इच्छापत्र केले आहे व त्याद्वारे ती हेलनवर अल्बरबरोबर लग्न करण्यासाठी दबाव आणते आहे. अल्बरला या ना त्या मार्गाने, शोअरच्या नशीबाचे मोठे घबाड मिळणार आहे. एक तर हेलनशी लग्न करून किंवा तिने त्याच्याशी लग्न नाही केले, तरी त्याची पुरेपूर काळजी घेतली जाणार आहे --- ओहो, हो, तुझा मित्र, लेफ्टनंट ट्रॅग फ्रॅंकलीन शोअरच्या खात्यातून दिल्या गेलेल्या चेक्सचा काळजीपूर्वक शोध घेतो आहे. रॉडने

फ्रेंच याला दिला गेलेल्या एका दहा हजार डॉलर्सच्या चेकचा पाठपुरावा तो करतो आहे. पोलीस रॉडने फ्रेंच याला शोधत आहेत. कालपासून तो सुट्टीवर गेला असल्याचा शोध लागला आहे. त्याने तो कुठे जातो आहे, हे कुणाला सांगितलेले नाही.

मेसन बोलला, "फ्रॅंकलीन शोअरने त्याचे हिशेब ठेवणाऱ्याला फोन करून सांगितले होते, की त्याने दहा हजार डॉलर्सचा चेक एका इसमाला देण्यासाठी ठेवलेला आहे."

ड्रेक मोठ्याने हसत म्हणाला, "ते बरोबर आहे."

मेसन विचारले, "छान?"

ट्रॅग काम करत असलेल्या उपपत्ती [Theory] वर कदाचित फ्रॅंकलीन चेक देऊ इच्छित असेल. पण त्यापूर्वीच त्याने घरातून पोबारा केला --- त्यामुळे रुचीपूर्ण परिस्थिती निर्माण झाली, नाही का, पेरी?" तुला अशा माणसाच्या परिस्थतीत ठेऊन बघ, जो दहा हजार डॉलर्सच्या चेकच्या खाली ज्याचे नाव आहे, अशा एका माणसावर अवलंबून आहे. म्हणजे जणू काही ते त्या देशाच्या राजाचेच नाव आहे. आणि नंतर तो मनुष्य अदृष्य होतो. त्याचा शोध लागत नाही तुम्ही तो चेक मिळणारच आहे असे गृहीत धरून, त्या रकमेचे वचन आधीच दिलेले आहे."

मेसन बोलला, "आणि काही?"

"हो. ट्रॅग १९३२ साली नाहीशा झालेल्या माणसांचा शोध घेत आहे. पण तो नाहीसा झाला, तेव्हा ट्रॅग नव्हे तर आमचा मित्र सार्जंट होलकोंब अधिकारपदावर होता. त्यावेळेस सापडलेली सगळ्या बेवारस प्रेताच्या जुन्या नोंदी ट्रॅग तपासत बसला आहे. त्याला एक प्रेत मिळाले. पण वर्णन मिळतेजुळते नव्हते. तो १९३२

मधील फ्लोरिडा मधील सर्व आत्महत्याही तपासत बसला आहे. आणि लीचला ज्यात रुची होती अशा खाणीदेखील शोधत बसला आहे. तो जेराल्ड शोअरच्या जानेवारी १९३२ मधील आर्थिक व्यवहारांवरदेखील लक्ष ठेऊन आहे. ट्रॅग हा फार उद्योगी माणूस आहे.”

मेसन बोलला, “छट्. तो लोकांपासून फटकून रहाणारा एक माणूस आहे.”

ड्रेकने चालू ठेवले, “अर्थात तो एकाच वेळी पुष्कळ बाबींवर नजर ठेवून असतो. मांजराच्या पिल्लाचीही यात महत्वाची भूमिका असल्याचे त्याचे म्हणणे आहे.”

मेसन उद्गारला, “पिल्लू?”

“हं. ट्रॅग हा फार भन्नाट मनुष्य आहे. तो ज्या गोष्टीच्या मागे लागतो, ती खरेच मिळवतो.”

मेसनने सहज विचारल्यासारखे केले. “उदाहरणार्थ, मांजराचे पिल्लू?”

“त्याने ते पिल्लू जिल्हा वकीलाच्या कार्यालयात नेऊन ठेवले आहे.

मेसन अंथरुणात ताठ बसला, “असे कसे काय?”

“कार्यालयात तो त्याच्याबरोबर काय करतो आहे, कुणास ठाऊक --- ?

“ते त्याला कुठे मिळाले?”

“ते त्याला कुठे मिळाले, ते मला माहिती नाही. मला बरीचशी पोलीसांकडून बाहेर पडलेली माहिती वर्तमानपत्रातील पोऱ्याकडून मिळाली. ट्रॅग तिथे बागकाम करणाऱ्या, लंक नावाच्या माणसाबद्दल प्रश्न विचारतो आहे. तो --- “

मेसन अचानक हलणाऱ्या हातापायांचे यंत्र बनला व स्वतःची सिगरेट ओरबाडून काढू लागला. पांघरुणे फेकू लागला. त्याने फोन हातात पकडला व तो डायल फिरवून एक क्रमांक लावू लागला व बोलला, “हॅलो --- हॅलो. तू जेर्टी आहेस का? आज सकाळी डेला कुठे आहे?”

“तिच्याकडून काही समजले नाही? --- मला जॅक्सनशी बोलू दे --- हॅलो,जॅक्सन. ही निर्वाणीची वेळ आहे. कार्यालयातील सर्व कामे सोडून इकडे लक्ष दे. कागद घेऊन,तुरुंगात डांबलेल्या कैद्याबद्दल, डेलाबद्दल, एक चांगला मोठा अर्ज तयार कर. तिला तिच्या इच्छेविरुद्ध डांबण्यात आले आहे. विशेष वार्तालापाबद्दल तिची झाडाझडती घेण्यात आलेली आहे. कुठलाही आरोप नसतांना तिला पकडण्यात आले आहे. तिला जामीन मिळण्यासाठी, योग्य ते पैसे भरून, ती प्रयत्न करू शकते. लैंगिक अत्याचारापासून ते आग लावायच्या गुन्ह्यापर्यंत सर्व काही त्यात लिही व तिची कायदेशीर तपासणी होण्याची मागणी कर. तोपर्यंत, म्हणजे कोर्टात सुनावणी होईपर्यंत तिला सोडण्यात यावे, असा अर्ज तयार कर. मी तो वाचून त्यावर सही करतो. हे लगेच कर!”

मेसनने फोन आदळला. त्याचा पायजमा ओढून काढला व घाईने शॉवर घेण्यास गेला. अंग पुसत बाहेर आला. टेबलाच्या खणातून स्वच्छ गंजीफ्रॉक बाहेर काढला. ड्रेक कोडे पडल्यासारखे भाव तोंडावर आणून व काळजी वाटत, खुर्चीत अवघडून बसला होता. तेव्हा मेसन कपडे घालत होता.

ड्रेक बोलला, “माझ्या गाडीमध्ये सहा व्होल्टचा इलेक्ट्रिक रेझर आहे. जर तुम्हाला माझ्याबरोबर शहरात यायचे असेल, तर तू गाडीत दाढी करू शकतोस.”

मेसनने कोटाच्या कपाटाचे दार उघडले. कसाबसा कोट अंगावर चढवला. टोपी ओढून घेतली व बोलला, ‘चल, पॉल, आता उशीर नको.”

गुंतागुंतीचे अनेक अंगविक्षेप करत ड्रेक म्हणाला, “चला. आपण निघालो. तुझे कार्यालय की जिल्हा वकीलाचे?” मेसन बोलला, “प्रथम माझे कार्यालय. मी जिल्हा वकीलाशी बोलतो. जर वेडेवाकडे वागून, त्या जिल्हा वकीलाने, टाळाटाळ केली तर कैद्याला समक्ष हजर करण्यासाठी मला हेबिअस कॉर्पस चा आधार घ्यावा लागेल.

ड्रेकने विचारले, “वातावरण तापत चालले आहे का?”

“हं. तो रेझर कुठे आहे?”

## प्रकरण २०

जिल्ह्याचा वकील, हॅमिल्टन बर्गर, हा रुंद छातीचा, जाड मानेचा व भारदस्त खांद्यांचा माणूस होता. त्याचाविषयी अशी वदंता होती, की तो अस्वलासारखा शक्तिशाली आहे. काळजीपूर्वक रीतीने सावकाश केलेल्या चर्चेनतर तो कृती करत असे व कुणी कल्पनाही करू शकणार नाही अशा हालचाली चपळतेने करत असे.

एकदा त्याची कामे सुरु झाली, की तो इतका झपाटल्यासारखे व लक्ष देऊन काम करी की परत त्या परीस्थितीची तपासणी करावी लागत नसे. त्याला ओळखणारे वकील म्हणत, हॅमिल्टन बर्गरने एकदा काम सुरु केले की फक्त विटांची भिंतच त्याला थांबवू शकते. एका वकिलाने असे म्हटले होते, एकदा बर्गरने हालचाल सुरु केली,

की तो ती करतच रहातो त्याला थांबवले तरच तो थांबतो आणि त्याला थांबवायला खूप कष्ट घ्यावे लागतात.”

मेसनला माहिती होते, की तो जिल्हा वकिलाच्या कार्यालयात शिरला की त्याचे जंगी स्वागत होणार. कुणी मदतनीस किंवा नवशिका वकील त्याची मुलाखत घेणार, नाही तर घड्याळाप्रमाणे काटेकोर व काळजीने विचारपूर्वक आखलेली अशी ती मोहीम असणार. तो स्वागतकक्षाशी पोचल्याबरोबर त्याला अचानक झटपट पॅसेजमधून नेत जिल्हा वकिलाच्या कार्यालयात नेले गेले.

हॅमिल्टन बर्गरने मेसनला स्थिर नजरेने न्याहाळत, म्हटले, “बसा.”

मेसन बर्गरच्या समोरील खुर्चीत बसला.त्याने विचारले, “मी तुमच्याशी बोलायचे आहे, की तुम्ही माझ्याशी बोलणार आहात?”

बर्गर म्हणाला, “मी तुमच्याशी बोलणार आहे.”

मेसन बोलला, “बोला. तुमचे बोलणे आधी होऊ दे. तुमचे झाल्यावर, मी बोलेन.”

हॅमिल्टन बर्गर बोलला, “तुम्ही काही बुरसटलेल्या विचारांचे नाही. तुमच्या पद्धती नाटकी, विचित्र व डोळ्यात भरणाऱ्या असतात.”

मेसन बोलला, “तुम्ही अजून एक शब्द त्यात मिळवू शकता.”

क्षणभर, जिल्हा वकिलाच्या डोळ्यात चमक आली.त्याने विचारले, “परिणामकारक?”

मेसनने मान डोलावली.

बर्गर म्हणाला, “तीच गोष्ट मला त्रास देते आहे.”

“हे तुम्ही कबूल केल्याने, मला आनंद झाला.”

बर्गरने चालू ठेवले, “तरीही तुम्ही ज्या पद्धतीने विचार करता, त्या पद्धतीने ती मला त्रास देत नाही. याचा सरळ अर्थ असा आहे, की जर तुमच्या विचारपूर्वक आखलेल्या, नाटकी व धीट पद्धती अशाच परिणामकारक राहिल्या, तर कोर्टातील आमच्यापैकी प्रत्येक वकील वेळ आणि पैसे वाचवत, कायद्यातील पळवाटा शोधून आमच्यावर मात करायला पाहतील. देवाला माहिती आहे, की, या देशात तुझ्यासारखा एकच असणे पुरेसे आहे.”

“जर मी गुन्ह्याची बरोबर उकल पोलिसांच्या आधी केली, तर ते पोलिसांना फसवणे ठरेल का?”

बर्गरने हरकत घेत, म्हटले, “माझ्या बोलण्याचा अर्थ असा नाही. निरपराध्याला पकडणे, हा आमचा खाक्या नाही. मेसन, समजून घे, मी फक्त तुम्ही काय करता ते सांगत नाही तर तुम्ही ते कसे करता, हेदेखील सांगतो.”

“माझ्या पद्धतीत काय चुकते?”

“तुम्ही तुमच्या केसेस कोर्टात चालवत नाही. तुम्ही तुमच्या कार्यालयात बसून अशिलांच्या मुलाखती घेत नाही. तुम्ही गावभर फिरत बसता. मिळतील तितके पुरावे गोळा करता. पोलिसांना विश्वासात घेत नाही आणि --- “

.मेसन म्हणाला, “एक मिनिट थांबा. “पोलीस मला विश्वासात घेतात का?”

बर्गरने प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. “काही वेळा मी तुमच्याशी सहकार्य केले आहे. पण नेहमीच तुम्ही नाटकी, आकर्षक, लक्षवेधक पद्धतीने व अजिबात कल्पना नसतांना अचानक काही करता.”

मेसन म्हणाला, “जर मी शोधत असलेला ससा जादूगाराच्या टोपीत असेल, तर त्याला का नाही पकडायचा? त्याला खेचलेच पाहिजे, नाही का?”

तुम्ही काही स्पष्ट करत नाही. कायदेशीरपणे फसवाफसवी करता. पण तुम्ही काही करून, येन केन प्रकारे, शेवटी मार्ग शोधून काढता. आता मी तुमच्याबद्दल सर्वसामान्य बोलणे थांबवतो. आपण ह्या केसशी संबंधित काही विशिष्ट बाबींबद्दल बोलूया.”

“ते चांगले ठरेल.”

बर्गर बोलला, “विशेषतः काल रात्री, या खुनाच्या केसमधील महत्वाच्या साक्षीदाराला लपवले. जर पोलिसांना त्या साक्षीदाराचा लेखी किंवा तोंडी जबाब मिळाला असता, तर एव्हाना त्यानी ती केस सोडवली असती. पण त्यांना ती संधीच दिली गेली नाही. पोलिसांच्या नाकावर टिच्चून तुम्ही व तुमच्या सचिवाने त्याला पळवले.”

मेसनने विचारले “तुम्हाला लंक म्हणायचे आहे का?

”हो, लंक.”

“पुढे काय?”

“तुम्ही त्याला गुप्तपणे हॉटेलात नेले, तुमच्या अधिकारात होते, तेवढे सगळे तुम्ही केले पण पोलिसांना याचा थांगपत्ता लागून दिला नाही. पण पोलिसांनी त्याला शोधले आहे.”

मेसनने विचारले, “ते त्याच्याबरोबर काय करणार आहेत? तो इतका महत्वाचा असेल तर तुम्ही पुढे जाऊन या केसचा निकाल लावा.”

बर्गर बोलला, “मला वाटते, ते एवढे सोपे नाही.”

“का नाही?”

“फ्रॅंकलीन शोअरच्या नाहीशा होण्याशी सबंधित, आम्ही काही नवा पुरावा शोधून काढला आहे.”

मेसन बोलला, “काय?”

“विशेष करून दहा हजाराचा रॉडने फ्रेंचला दिला गेलेला चेक हा खोटी सही केल्याबद्दल गुन्हा असलेले प्रकरण आहे.”

मेसन त्याच्या खुर्चीवर सावरून बसला. पाय काटकोनात ठेवले. “ठीक आहे. आपण त्यासंबंधी चर्चा करू.”

बर्गर मोठ्या ताठ्याने बोलला, “यावर तुझ्या कल्पना ऐकायला मला आवडतील.”

मेसन सहज उत्तरला, “सर्वप्रथम फ्रॅंकलीन शोअरने त्याच्या हिशेबनीसाला सांगितले होते, की त्याने असा असा चेक ठेवलेला आहे.”

त्याचे लिखित कागद बघत, बर्गर मध्येच बोलला, “मी तुला दुरुस्त करतो. हिशेबनीसाने कोर्टात दहा वर्षांपूर्वी फ्रॅंकलीन शोअरच्या वतीने सादर केलेल्या सनदशीर कागदांप्रमाणे असे म्हटलेले आहे की, तो असा असा चेक ठेवत आहे.”

मेसनने तो मुद्दा बाजूला टाकला. “ठीक आहे. जर त्याने तसे म्हटले असेल, तर ते खरे असणार. जर चेक खोट्या सहीचा असल्याने तो गुन्हा ठरत असेल, तरी त्याला सात वर्षे उलटून गेली असल्यामुळे त्या गुन्ह्यासंबंधीची कारवाई रद्दबातल ठरते. या घडीला त्या चेकच्या व्यवहाराला काही महत्व नाही.”

बर्गर बोलला, “पण चेक पुढील कारवाईचे कारण ठरू शकतो.”

‘कशासाठी?”

“खून करण्यासाठी.”

“पुढे बोला. मी ऐकतो आहे.”

“जर आम्ही काल रात्री लंकला बोलता करू शकलो असतो, तर आम्ही अमूल्य असा अधिकचा पुरावा मिळवू शकलो असतो.”

“तुम्हाला अधिक स्पष्ट करायचे आहे का?”

“हो, मला वाटते, आपण फ्रॅंकलीन शोअरला सापडवू शकलो असतो.”

“आणि मी तुम्हाला लंकपासून दूर ठेवल्याने तुम्ही मला दोष देत आहात.”

“बरोबर.”

“मी तुमची ही उपपत्ती [THEORY] आता खोडून काढतो. पहिले म्हणजे, मी लंकला घेऊन, त्याला जायचे असलेल्या माटील्डा शोअर असलेल्या हॉस्पिटलमध्ये गेलो. पण --- बर्गर, हा एकदम सरळ मुद्दा आहे, कारण तो कायदेशीर दृष्ट्या महत्वाचा आहे --- त्याला पोलिसांपासून दूर ठेवण्याऐवजी, मी माटील्डा शोअरला पोलीस संरक्षण देत आहेत हे माहिती असून, हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. मी पोलिसाला सांगितले की लंक कोण आहे. मी पोलिसाला सांगितले, की लंकला माटील्डा शोअरला भेटायचे आहे. त्याच्याकडे काही सबळ पुरावा असू शकतो आणि ट्रॅगला ही त्याला भेटायचे आहे. अजून काय करणे अपेक्षित होते?”

बर्गरने मान हलवली. “मेसन, हा तुझ्या जगावेगळ्या हुशारीचा नमुना आहे. लंकपुरते बोलायचे तर ही हुशारीची खेळी, खरे तर तुला गुन्ह्यापासून मुक्त करते. तू

हे ज्युरीसमोर सांगू शकतोस. तर तुला व मला ही माहिती आहे, की तू मुद्दाम ती संपूर्ण भेट नाटकी पद्धतीने पार पाडलीस, जेणेकरून पहारेकरी तुला व लंकला बाहेर हाकलून देतील. तू हे केवळ तुला कायदेशीर सुरक्षितता मिळावी, म्हणून केलेस."

मेसन तोंडभर हसला. "तुम्ही पोलीस खात्यात मूर्ख लोकांना भरती केले असेल, तर तो माझा दोष नाही. मी लंकला तिथे नेले होते आणि तो कोण आहे, हेदेखील सांगितले होते. त्यांनी त्याला परत लिफ्टमध्ये ढकलले आणि बाहेर निघून जाण्यास सांगितले. बर्गर शांतपणे बोलला, "मला समजते आहे. आता मी तुझे लक्ष दुसऱ्या गोष्टीकडे वळवतो. आमच्या कायद्याखाली कुणीही व्यक्ती आपण होऊन, साक्षीदार होऊ शकणाऱ्या व्यक्तीला रोखते, तेव्हा ती गुन्हेगार ठरते."

मेसनने मान डोलावली.

"आणि दुसऱ्या कायद्याप्रमाणे, एखादी व्यक्ती वचन देऊन, अशा अशा गुन्हेगाराचे मन लबाडीने वळवून, त्याला दूर ठेवते, तेव्हा तो जास्त मोठा गुन्हा मानला जातो.

मेसन बोलला, "पुढे सांगा. मला तुम्ही सांगत आहात, त्यात रस आहे."

बर्गर बोलला, "निर्णय घेतांना, हे गरजेचे नाही, की हा प्रयत्न यशस्वी

व्हायला हवा. साक्षीदाराला खरेच पळवून नेण्याचीही गरज नाही. देशातील दुसऱ्या एका राज्यातील कायद्याप्रमाणे, साक्षीदाराला दारू पाजणे किंवा मादक द्रव्य प्यायला लावणे, हा सुद्धा गुन्हा आहे. कारण त्यामुळे त्याला प्रश्न विचारता येत नाहीत."

मेसन म्हणाला, "पण मी काही अप्रामाणिकपणे फसवलेले नाही आणि कुणाला दारू वा मादक द्रव्यही पाजलेले नाही. मग माझ्यावर तुम्ही का बरसत आहात?"

बर्गर बोलला, “लंक पोलिसांविषयी वाईट, हट्टी दृष्टीकोन बाळगतो आहे आणि त्याला जे काही माहिती आहे, ते आम्हाला सांगत नाही. तरीही तो काही फारसा बुद्धिमान नाही. एकदा त्याचे विशेष मानसशास्त्र कळले आणि त्याच्याबरोबर काम केले, की त्याच्याकडून गोष्ट काढून घेता येईल. --- एका वेळेस थोडी थोडी.”

“मग?”

लंकने आम्हाला एवढे सांगितले, की फ्रॅकलीन शोअर त्याच्या घरी होता. तुमची सचिव तिथे गेली व त्याला गाडीत घालून आणले. ट्रॅगने तुम्हाला सांगितले आहे, की त्याला विशेष कारणाने फ्रॅकलीन शोअर साक्षीदार म्हणून ज्युरींसमोर यायला हवा आहे.”

मेसन बोलला, “मग तुम्हाला जे काही म्हणायचे आहे, ते पुरे करा. मग मला त्याबद्दल काय वाटते, ते मी सांगतो.”

“तुझा शब्द खरा ठरायला हवा आहे का?”

मेसनने मान हलवली.

बर्गर बोलला, “मेसन, तुला लागेल अशा ठिकाणी मी जोरात आघात करणार आहे.”

“मला वाटते, माझ्या सचिवाला पळवून”

बर्गर बोलला, “तू तिला यात आणलेस. ती गाडीत उडी मारून, लंकच्या घरी गेली, तू लंकला गुंतवून ठेवलेस. तिने फ्रॅकलीन शोअरला अंथरुणातून बाहेर काढले. त्याला सांगितले, की तुला बाहेर गेले पाहीजे आणि त्याला लपवण्याची तयारी केली.”

“मला वाटते, तू हे सगळे सिद्ध करू शकतोस.”

“मी प्रासंगिक पुराव्यानिशी हे सिद्ध करू शकतो. मेसन, तुला पक्के ठाऊक आहे, की पोलीस बोलण्यापूर्वी तुला फ्रँकलीन शोअरशी बोलायचे आहे. तू तुझ्या सचिवाला फ्रँकलीन शोअरला आणायला व लपवून ठेवायला बाहेर पाठवले आहेस.”

“तिने ते कबूल केले आहे का?”

‘नाही. तिने ते कबूल केलेच पाहीजे, असे काही नाही. आमच्याकडे ते सिद्ध करण्यासाठी पुरावा आहे.”

“तुम्ही सिद्ध करणे म्हणता, तेव्हा तुम्हाला काय अपेक्षित असते?”

“ज्युरींचे समाधान होणे मला अपेक्षित असते.”

“माझा यावर विश्वास नाही.”

बर्गर बोलला, “तो प्रासंगिक पुरावा आहे व तो आमच्याकडे आहे.”

मेसन अपमान करत म्हणाला, “म्हणजे तुमच्याकडे तो इच्छापूर्ती करणारा हिरा आहे.”

हॅमिल्टन बर्गरचे डोळे आनंदाने त्याच्या डोळयांशी मिळाले. “मेसन, तू मागे केलेल्या काही गोष्टींनी माझी सहानुभूती मिळवलीस. तुझ्या काम करण्याचा वेगाने व लगेच मिळणाऱ्या निकालाने, तू माझ्यातील उत्सुकता वाढवतोस. न्यायाची गोष्ट बघितली, तर यात फायद्यांपेक्षा निर्दयता जास्त असल्याचे माझ्या लक्षात आले. तर आता, मी तुझा पत्त्यांचा बंगला मोडून टाकणार आहे.”

“कसा?”

“खुनाच्या केसमध्ये तुझ्या सचिवाला खुद्द साक्षीदार पळवल्याबद्दल मी दोषी ठरवणार आहे. त्यानंतर तिचा साथीदार म्हणून तुझ्यावर खटला भरून मी तुला गुन्हेगार ठरवणार आहे. मग मी तुला वकिलीची प्रॅक्टीस करायला नालायक ठरवणार आहे. आता तू बहुधा तिला समक्ष हजर करण्यासंबंधीचा हेबिअस कॉर्पस अर्ज माझ्याविरुद्ध सादर करशील. खुशाल कर. मला तुझ्या सचिवाशी मुद्दम कडक वागायची इच्छा नाही. पण मी तिच्याविरुद्ध कारवाई करतो आहे, कारण फक्त त्या प्रकारेच मी तुला खाली खेचू शकतो. मिस डेलाला तुरुंगात टाकायचा माझा विचार नाही. त्याविरुद्ध हेबिअस कॉर्पस अर्ज स्वीकारायला मी तयार आहे.

“मी तिला जामिनावर सोडायला तयार आहे. पण तिच्यावर गुन्हेगार म्हणून आरोपपत्र तर सादर होणारच. जर तिला जामीनासाठी अर्ज करायचा असेल, तर ती करू शकते. त्यासाठी मी काही हरकत घेणार नाही. नंतर मी तुला गुन्ह्याबद्दल कोर्टात खेचणार आहे. मी तुला तुरुंगात पाठवणार नाही. मी तुला दंड होईल, असे बघेन. मग त्यावरून मी तुला वकील म्हणून काम करण्यासाठी नालायक ठरवेन.”

बर्गरने त्याची गोल फिरणारी खुर्ची थांबवली व तो उभा राहिला. “आणि आता तू बोलत असलेला शेवटचा शब्द --- अटक करण्यापूर्वी माझ्या टेबलावर तू फेकणार असलेल्या आरोपपत्राचा नाटकीपणा गळून पडणार आहे, नाही का, मेसन? कोर्टाचे आज्ञापत्र माझ्या टेबलावर फेकून देण्याचा नाटकी आविर्भाव तू आणला आहेस.”

मेसनदेखील उठून उभा राहीला आणि बाकापलीकडील जिल्ह्याच्या वकिलाकडे निरखून बघू लागला. “मी तुला म्हटले होते, की शेवटचा शब्द माझा असेल. आता मी ते खरे करून दाखवतो.”

बर्गर, तुझ्या बाबतीत काय त्रास आहे, तर तू पूर्णपणे सरकारी वकीलाच्या दृष्टीकोनाच्या संमोहनाखाली, असतोस. सरकारी वकीलांनी सर्वसामान्य लोकांना संघटित केले आहे व लोकांचा भावनाही संघटित केल्या आहेत. तुम्ही हळूहळू त्याना विश्वासात घेऊन शांत केले आहे. त्यांचा तुमच्यावर असा काही विश्वास बसला आहे, की तुम्ही निरागस माणसाला कधीच पकडून कोर्टात उभे करणार नाही, याची त्याना खात्री वाटते."

हॅमिल्टन बर्गर बोलला, "मेसन, तू ते कबूल करतोस, हे बघून मला आनंद झाला."

"तू आनंदी व्हायला नकोस. तुला दिलगिरी वाटायला हवी."

"का?"

"ही सामान्यजनांनी जागे होण्याची वेळ आहे. मनुष्य गुन्हेगार आहे, की निरपराध आहे, हा प्रश्न नाही आहे, तर त्याचे निपराधित्व सिद्ध करता येईल की नाही व त्याला सरकारने एक नागरिक म्हणून दिलेले कायद्याचे हक्क वापरता येतील की नाही, हा आहे."

चेहरा रागीट झालेला मेसन दारात थांबला. "अजून मी भरतवाक्य बोललेलो नाही. मी ते कोर्टात बोलेन."

एवढे बोलून त्याने त्याच्यामागे दार आपटले.

# प्रकरण २१

जज्ज लँकरशीम कुजबुजणाऱ्या लोकांच्या गर्दीच्या कोर्टात मध्यभागी असलेल्या बाकावर आले, तेव्हा हातोडा वाजला व गर्दी एकदम चिडीचूप झाली. जज्ज लँकरशीमने जाहीर केले, "कॅलिफोर्निया राज्याचे लोक विरुध्द डेला स्ट्रीट."

मेसन उभा राहिला. "जामिनावर सुटलेली आरोपी कोर्टात आहे. कागदपत्रे असे दाखवत आहेत, की ती सुनावणीसाठी कोर्टात हजर झालेली आहे."

जज्ज लँकरशीमने जाहीर केले, "कागदपत्रे असे दाखवत आहेत, की ती सुनावणीच्या वेळी ती त्याच ठिकाणी राहील. माझ्या माहितीप्रमाणे, सरकारपक्षाच्या विनंतीनुसार, घाईने होणाऱ्या सुनावणीसाठी, ही कारवाई होत आहे."

हॅमिल्टन बर्गर बोलला, "हे बरोबर आहे."

"मला नेमलेल्या वकिलाकडून, या केसबद्दल ऐकायला आवडेल."

बर्गर म्हणाला, "न्यायाधीश महाराज, मी ही केस थोडक्यात मांडतो.

तेव्हा चाणाक्षपणा व तीव्र बुद्धिमत्ता वापरून भयानक शस्त्राने केलेल्या गंभीर गुन्ह्याचा पोलीस माग काढत होते, तेव्हा त्याबद्दल आक्रमक विरोधाभास असलेली वेगवेगळी मते पडली.

बर्गर म्हणाला, "मी थोडक्यात प्राथमिक माहिती देतो, की जेव्हा पोलीस ऑफिसर्स अज्ञात व्यक्तीविरुद्ध जेरी टेम्पलर ह्या व्यक्तीवर प्राणघातक हल्ला केलेल्या गंभीर गुन्ह्याचा तपास करत होते तेव्हा ह्या खटल्यातील आरोपीने फ्रँकलीन शोअर ह्या महत्त्वाच्या साक्षीदाराला पळवून नेले. ह्या साक्षीदाराकडे असलेल्या माहितीच्या आधारे वरील गुन्ह्याची उकल करण्यात मदत झाली असती. आरोप

असा की आरोपीने या साक्षीदाराला पळवून नेले आणि अजूनही लपवून ठेवले आहे. आरोपी जामिनावर सुटलेली असून कोर्टात हजर आहे. तिने गुन्हा नाकबूल केला आहे.''

जज्ज लँकरशीमने त्याच्या चष्म्यातून, पेरी मेसनकडे पाहिले. ''तुम्ही ज्युरींकडून केसची सुनावणी व्हावी अशी मागणी करत आहात?''

मेसन म्हणाला, ''बरोबर. ज्युरींकडून केसची सुनावणी, हा राज्याचा नागरिकांना दिलेला हक्क आहे. आम्ही त्यांची मागणी करत आहोत. ज्युरींच्या चमूतील पुकारलेली पहिली बारा नावे आम्हाला मान्य आहेत.''

''मिस्टर सरकारी वकील, तुम्ही मेसनने केलेल्या पहिल्या बारा ज्युरींचे मंडळ बनवण्याच्या मागणीला मान्यता देत आहात का?''

ज्याला या केसची ही सुनावणी मान्य नव्हती, त्या हॅमिल्टन बर्गरने टेबलाच्या पार टोकाला बसलेल्या त्याच्या हाताखालच्या लोकांकडे बघत म्हटले, ''नाही, न्यायाधीश महाराज, आपण नेहमीप्रमाणे, ज्युरींची तपासणी करू.''

मेसन खुर्चीत मागे झाला व हसून बोलला, ''मला ज्युरींना कोणतेही प्रश्न विचारायचे नाहीत. मी माझे हक्क सोडून देतो.. मी असे समजतो, की जेव्हा पुरावा मांडला जाईल, तेव्हा हे बारा ज्युरी आरोपीला चांगल्या वागणुकीचा फायदा देतील आणि आरोपीला तेवढेच हवे आहे.''

बर्गर छद्मीपणे बोलला, ''कोर्टाच्या लक्षात येईल, की आरोपीचा वकील नाटकी विधाने करून,ज्युरींवर प्रभाव पाडायचा प्रयत्न करतो आहे --- ''

जज्ज लँकरशीम लगबगीने मध्येच बोलला, “कोर्टाला परीस्थिती समजते. ज्युरी कुठल्याही पक्षाच्या बेकार ताशेऱ्यांकडे लक्ष देणार नाहीत. चला, आपण केसचे कामकाज सुरु करू. मिस्टर बर्गर, या परीस्थितीत, ज्युरींना तपासून निवडायची जबाबदारी तुमची असेल.” बर्गरने कष्ट घेऊन ते काम केले.

हॅमिल्टन बर्गरने थोडक्यात ज्युरींसमोर साधे त्याला काय सिद्ध करायचे आहे, ते त्याचे म्हणणे मांडले. तो पुढे म्हणाला, “मी माझा पहिला साक्षीदार म्हणून हेलन केंडलला बोलावतो.” गर्दीच्या कोर्टातील लोकांच्या नजरेने कावरीबावरी होत, हेलन पुढे आली. आणि शपथ घेतली. तिने तिचे नाव व पत्ता दिला. हॅमिल्टन बर्गर आता काय प्रश्न विचारणार, म्हणून त्याच्याकडे बघितले.

“या महिन्याची तेरा तारीख आठवते का?”

“हो.”

“मी तुमचे लक्ष त्या दिवशीच्या संध्याकाळकडे वेधू इच्छितो. त्या वेळी काही वेगळे असे घडले का?”

“हो, सर.”

“काय?”

“प्रथम माझ्या मांजराच्या पिल्लाला घेरी येऊ लागली. मी त्याला ताबडतोब डॉक्टरकडे घेऊन गेले. तो म्हणाला --- “

बर्गरने त्याचा हात उचलला. “डॉक्टर काय म्हणाला, ते काही का असेना. ती अफवाही असू शकेल. तुम्हाला जे काही माहिती आहे, ते सांगा.”

“हो, सर.”

“आता पिल्लू जेव्हा आजारी पडले, तेव्हा इतर काही विशेष घडले का?”

“हो, मला माझ्या काकांकडून फोन आला.”

“माझ्या काकांकडून.”

“तुम्हाला दोन काका आहेत?”

“हो, सर, हा फोन फ्रँकलीन काकांकडून होता.”

“म्हणजे फ्रँकलीन बी शोअरचा?”

“हो, सर.”

“तुम्ही फ्रँकलीन शोअरला शेवटचे केव्हा पाहिले होते?”

“ते घरातून निघून जाण्यापूर्वी, म्हणजे सुमारे दहा वर्षांपूर्वी.”

तुमचे काका फ्रँकलीन शोअर दहा वर्षांपूर्वी घरातून चमत्कारीकपणे नाहीसे झाले होते?”

“हो, सर.”

हॅमिल्टन बर्गर कोर्टाला बोलला, “ज्याबद्दल काही वाद नाही, असे यासंबंधी काही महत्वाचे प्रश्न मी ज्युरींसमोर ठेवतो.”

मेसन बोलला, “काही हरकत नाही.”

“तुझ्या काकांनी तुला फोनवर काय सांगितले?”

मेसन बोलला, “याला माझी हरकत आहे. हा प्रश्न चुकीचा अयोग्य व विचारू नये असा आहे.”

बर्गरने जाहीर केले, “आरोपीने या वार्तालापात सांगितलेल्या काही गोष्टींमध्ये सुधारणा व्हावी म्हणून मी हे विचारत नाही आहे, तर फक्त त्या रात्रीच्या वेळेची परिस्थिती आणि काय काय घडले, हे जाणून घ्यावे म्हणून विचारतो आहे. निरनिराळ्या लोकांनी तेव्हा काय केले इत्यादी बाबी समजून घेणे हे काही कायद्याविरुद्ध नाही.”

जज्ज बोलले, “हरकत काढून घेतली आहे. पण नंतर ज्या कारणासाठी हा प्रश्न विचारला आहे, ते ज्युरींनी लक्षात घ्यावे.”

“तुमचे काका काय म्हणाले?”

“ते म्हणाले, मी कोण बोलतो आहे, ते तू ओळखलेस का? मी नाही असे सांगितले. मग त्यांनी मला त्यांचे नाव सांगितले आणि त्यांची ओळख स्पष्ट करू लागले.”

हॅमिल्टन बर्गर घाईने बोलला, “एकूण शेवटी काय घडले? ते काय म्हणाले? शेवटी निर्णय काय झाला, ते जाऊ दे, पण तो काय म्हणाला?”

“ठीक आहे. त्यांनी त्यांच्या व माझ्या बाबतीत घडलेल्या काही गोष्टींकडे माझे लक्ष वेधले.”

हॅमिल्टन बर्गर बोलले, “मी विशेषतः कशाच्या मागे आहे, तर त्याने तुला काय करायला सांगितले.”

“त्याने मला मिस्टर पेरी मेसनकडे जायला सांगितले व मग कॅसल गेट हॉटेलमध्ये जाऊन, मिस्टर हेन्री लीचबद्दल विचारायला सांगितले. तो तुम्हाला माझ्याकडे घेऊन येईल, असे त्यांनी मला सांगितले, की इतर कुणाला विश्वासात घेऊ नकोस. विशेषतः माटील्डाकाकूला याबद्दल काहीही माहिती होता कामा नये.”

“तुझी काकू, म्हणजे फ्रँकलीन शोअरची बायको?”

“हो.”

“आणि त्या संध्याकाळी मिस्टर मेसन यांच्याबरोबर तू मिस्टर लीच यांच्याशी काही संपर्क साधण्याचा प्रयत्न केलास का?”

“हो.”

“तू काय केलेस?”

“आम्ही कॅसल गेट हॉटेलमध्ये गेलो. आम्हाला असे समजले, की मिस्टर लीच तिथे नाही आहेत.आम्ही कुठे जावे, याबद्दल आम्हाला एक चिठ्ठी मिळाली.”

हॅमिल्टन बर्गर बोलला, “एक मिनिट. मी तुला एक चिठ्ठी दाखवतो. तू हीच ती आहे का, ते सांग.”

“हो.”

बर्गर म्हणाला, “सरकारपक्ष दाखवत असलेला हा पुरावा मी ज्युरींना वाचून दाखवतो.”

त्या कागदावर स्टँप व शिक्का होता. बर्गरने तो ज्युरींना वाचून दाखवला.

त्याने हेलनला विचारले, “तू त्याचे काय केलेस?” दुसऱ्या शब्दात, ती मिळाल्यावर, तू पुढे काय केलेस?”

“आम्ही पत्रात म्हटलेल्या ठिकाणी गेलो.”

“त्या पत्राबरोबर नकाशा होता?”

हो.”

“मी तुम्हाला एक नकाशा दाखवतो. तोच तो आहे का, हे मला सांगा.”

“हो, सर.”

मेसन बोलला, ‘याला माझी हरकत नाही.”

जज्ज लँकरशीमने जाहीर केले, “ठीक आहे. चालू दे.”

बर्गरने साक्षीदाराला विचारले, “आणि तुम्ही नकाशात दाखवल्याप्रमाणे, गेलात?”

“हो.”

“तुम्हाला तिकडे काय दिसले?”

“ते ठिकाण हॉलीवूडच्या मागील बाजूस, टेकड्यांमध्ये होते. तिथे एक तळे होते. त्याशेजारी एक गाडी थांबवलेली होती. त्यात एक मनुष्य बसलेला होता. तो गाडी चालवायच्या चाकावर थोडासा वाकलेला होता. तो मेला होता. त्याला मारण्यात आले होते.”

“त्या माणसाला तुम्ही ओळखत नव्हतात?”

“हो, ओळखत नव्हतो.”

“त्यावेळी तुमच्याबरोबर कोण होते?”

“माझे काका, जेराल्ड शोअर. मिस्टर पेरी मेसन आणि मिस स्ट्रीट.”

“मिस स्ट्रीट म्हणजे, डेला स्ट्रीट, या केसमधील आरोपी?”

“हो, सर.”

“पुढे काय झाले? त्यानंतर लगेच काय झाले?”

“आम्ही तिघे गाडीजवळ थांबलो आणि मिस्टर मेसन पोलिसांना फोन करायला गेले.”

“मग काय झाले?”

पोलिसांनी येऊन, आम्हाला प्रश्न विचारले. त्यानंतर जेराल्डकाकांनी आम्हाला घरी आणले. नंतर आम्ही माटील्डाकाकूला भेटायला हॉस्पिटलमध्ये गेलो.”

“घरी म्हणजे शोअरकुटुंबाच्या घरी?”

“हो, सर.”

“मग काय झाले?”

“त्यांनी मला घरी सोडले आणि इतरजण --- “

“इतरजण कुठे गेले, हे सांगायची गरज नाही. कारण तुम्हाला माहिती नाही पण ते गेले, नाही का?”

“हो.”

“मग काय झाले?”

“माझा एक मित्र तिथे आला.”

“त्याचे नाव काय होते?”

‘जेरी टेम्पलर.”

“तो तुमचा जवळचा मित्र होता का?”

“एक प्रकारे, होता.”

“त्यावेळी घरात कोण कोण होते?”

“कोमो नावाचा नोकर तळघरात झोपला होता. स्वयंपाकीण व घर राखणारी, मिसेस पार्कर गॅरेजवरील तिच्या खोलीत होती. मिस्टर टेम्पलर व मी हॉलमध्ये होतो.”

“मग काय झाले?”

“माटील्डाकाकूच्या झोपायच्या खोलीतून, आम्ही काहीतरी पडल्यासारखा, एक विशिष्ट आवाज ऐकला. मग आम्ही तिच्या लव्हबर्डसचा चिवचिवाट ऐकला. मग क्षणभराने माझी काकू चालत असल्यासारखा आवाज ऐकला.”

तिच्या चालण्याची काही विशिष्ट ढब होती का?”

काठीचा टकटक आवाज आणि पाय ओढत चालल्याचा आवाज अगदी ओळखू येण्यासारखे होते.”

“हो, सर. ती तिचा उजवा पाय ओढत चालत असे आणि काठी वापरत असे.

“म्हणजे ही चाल तुमच्या काकूची होती?”

“हो, सर.”

“मग काय झाले?”

“मला माहिती होते की काकू घरी नाही आहे. मी ते जेरीला सांगितले. तो लगेच पॅसेजने चालत गेला आणि झोपायच्या खोलीचे दार उघडले. जेरी नेहमीच इतका मोठा आणि बळकट होता, की मला वाटले, की तो नक्कीच कुणीही असले तरी त्याचा पाडाव करेल. मी त्याला संकटात टाकते आहे, असे मला वाटले नाही --- “

बर्गरने विचारले, “मग काय झाले?”

“खोलीतील कुणीतरी दोनदा बंदुकीचे नेम मारले. पहिली गोळी माझ्या अगदी डोक्याजवळून गेली. दुसरी जेरीला लागली.”

“त्यानंतर तुम्ही काय केले?”

“मला माहिती नाही. मी जेरीला दारापासून खेचले. मग तो शुद्धीवर आला. तो काही वेळ बेशुद्ध होता. किती वेळ, ते मला माहिती नाही. जेव्हा त्याने डोळे उघडले, तेव्हा मी त्याला म्हटले, की मला अँब्युलन्स व डॉक्टर आणायला हवे. तो म्हणाला, “त्यापेक्षा टॅक्सी लवकर मिळेल.” मग मी टॅक्सीसाठी फोन केला. आम्ही घाईने हॉस्पीटलला गेलो. नंतर एक दोन तासांनी डॉ रोझलीन आले आणि त्याचे ऑपरेशन केले.”

“तुम्ही तिथेच राहीलात?”

“हो, सर. ऑपरेशननंतर --- मला वाटले, तो ठीक होतो आहे.”

बर्गर जोराने ओरडला, “उलट तपासणी!”

मेसन म्हणाला “तुम्हाला माहिती नाही, की जेरी टेम्पलर किती वेळ बेशुद्ध होता?”

“नाही, हे सर्व मला एखाद्या स्वप्नासारखेच होते.”

“गोळी लागल्यापासून हॉस्पीटलला जाईपर्यंत मध्ये किती वेळ गेला?”

“नाही, सर. मी वेळ सांगू शकणार नाही.”

“आणि आम्ही तुला घरी सोडले, त्यानंतर किती वेळाने गोळीबार झाला?”

“अं --- मला वाटते, सुमारे एक तासाने असेल. अर्ध्या तासापेक्षा जास्त नाही. बहुधा अर्ध्या व एक तासाच्या मध्ये असावे.”

“त्याहून कमी वेळ नाही का?”

“नाही.”

“तुमचे काका घरातून निघून गेले तेव्हा तुम्ही चौदा वर्षांच्या होतात?”

“हो, सर.”

“मांजराचे पिल्लू प्रथम आजारी झाले --- ते तुम्हाला फ्रॅंकलीन काकांचा फोन आल्यानंतर किती वेळाने?”

“मी फोनवर बोलून, तो ठेवला, त्यानंतर लगेच.”

“तुम्हाला ते आजारी दिसले का?”

“त्याकडे माझे लक्ष प्रथम माझ्या काकूने वेधले.”

“म्हणजे ‘माटील्डा शोअर’ने का?”

“हो, सर.”

“मग तुम्ही पिल्लाचे काय केले?”

“मी त्याला डॉक्टरकडे नेले.”

बर्गर बोलला, “एक मिनिट थांबा. न्यायाधीश महाराज, एक महत्वाचा प्रश्न मी विचारायला विसरलो. मला हे सगळे लिखित स्वरूपात हवे आहे.”

मेसन दयाळूपणे म्हणाला, “माझी काही हरकत नाही.”

“त्या दिवशी रात्री जेवणानंतर, तुम्ही परत पिल्लाच्या डॉक्टरकडे गेलात का?”

“हो, सर.”

“त्या वेळी पिल्लाची परिस्थिती कशी होती?”

पिल्लू बरे दिसत होते, पण अशक्त झाले होते.”

“मग तुम्ही त्याला काय केले?”

“मी त्याला माझ्याबरोबर घेतले. डॉक्टरनेच तसे सुचवले.”

“डॉक्टरनेच तसे सुचवले, हे सांगायचे काही कारण नाही.”

मेसन मित्रत्वाने म्हणाला, “ओहो, पुढे विचारा. तिला ते सांगू दे. मला समजले, मिस केंडल, की डॉक्टरने असे सुचवले, की घरातील कुणी पिल्लाला विष देत असेल, तर त्याला तिथून लांब ठेवलेले बरे. त्यामुळे तुम्ही त्याला माळ्याकडे, थॉमस लंककडे, ठेवले, बरोबर?”

“हो, सर.”

“मेसन बोलला, “एवढेच.” आणि बर्गरने मान हलवली.

हॅमिल्टन बर्गरने लेफ्टनंट ट्रॅगला बोलावले. ट्रॅग पोलीस ऑफिसरच्या प्रभावी रुबाबात आला. त्याला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात अनेक वेळा उभे रहायची सवय होती. त्याने फोन येणे, हॉलीवूडच्या मागील बाजूस असलेल्या टेकड्यांशी जाणे, प्रेत सापडणे, प्रेताजवळ बांधून ठेवलेल्या रुमालातील वस्तूंची ओळख पटवणे इत्यादी गोष्टी केल्या व प्रेताचीही ओळख पटवली.

नंतर ट्रॅगने सकारात्मकतेने सांगितले, की त्याने मिस्टर मेसनला असा उपदेश केला, की जेव्हा तो त्याला फ्रॅंकलीन शोअर ह्या खटल्यातील साक्षीदार अपेक्षित आहे व त्याला ज्युरींसमोर पेश करावे.

मग ट्रॅगने शोअर घरी तो जेरी टेम्पलरवरील गोळीबाराची चौकशी करायला गेला होता, तेव्हाचे, त्या रात्रीचे, अनुभव सांगायला सुरवात केली.

त्याला काय सापडले ते सांगतांना तो बोलला, "जिथे कुलूप जोर लावून उघडले गेले, त्या लिहायच्या टेबलाकडे विशेष लक्ष देतांना, त्याला जेव्हा तो तिथे गेला त्या झोपायच्या खोलीची स्थिती दाखवणारे फोटो सापडले. त्याने ते पुरावा म्हणून दाखवले.

उलट तपासणीत, मेसनने चांगला दयाळू स्वभाव दाखवला.

त्या रुमालाबद्दल, मेसनने लेफ्टनंट ट्रॅगला असे विचारले प्रेताजवळ सापडलेल्या रुमालावर असलेल्या हातरुमालावरील लॉन्ड्रीच्या खुणेचा शोध घेण्याचा त्याने प्रयत्न केला का?

"अर्थात, हो."

"आणि तुला असे सापडले, बरोबर ना, की ती खूण मियामी, फ्लोरिडामध्ये फ्रॅकलीन शोअरसाठी केलेली होती आणि सहा वर्षे ती लॉन्ड्री बंद होती?"

"ते बरोबर आहे."

"तुला आठवत असेल, जेव्हा तू मला पहील्यांदा हॉलीवूडच्या मागील टेकड्या दाखवल्यास, तेव्हा मी तुझ्या लक्षात आणून दिले, की दर्शक खुणेप्रमाणे, खुनाच्या दिवशी घड्याळ साधारण साडेचारला बंद पडले असणार?"

"हो."

तू फौंटन पेन तपासले होतेस का?"

"हो."

“त्याची अवस्था कशी होती?”

ट्रॅग बोलला, “ते कोरडे पडले होते.”

“तुझ्या निरीक्षणाप्रमाणे, जेरी टेम्पलरवर झालेल्या गोळीबाराच्या वेळी त्या झोपायच्या खोलीत उत्तर दिशेला असलेल्या तळमजल्यावरील खिडकीतून खुनी शिरला होता. बरोबर?”

“हो.”

“आणि खोलीत शिरतांना, मिसेस शोअरच्या पलंगाच्या बाजूला असलेल्या छोट्या स्टुलावर आदळला का?”

“हो.”

“मग त्याने खोलीत असलेली काठी उचलली आणि मिसेस शोअरची नक्कल करत चालला?”

“मला वाटते, पुराव्यावरून काढलेले, हे चांगले अनुमान आहे. अर्थात, मला हे काही माहिती नाही.

“जिथून गोळीबार केला गेला, त्या कोपऱ्याजवळ ही काठी तुला पडलेली सापडली?”

“हो.”

“तसेही, लेफ्टनंट, मला वाटते, तू म्हणालास, थॉमस ट्रीमर या नावाने हॉटेलमध्ये रजिस्टर केलेल्या थॉमस लंकला तू ताब्यात घेतलेस?”

“हो.”

“त्याला पकडायला तू त्या हॉटेलमध्ये कसा गेलास?”

ट्रॅग हसला. “ते मी तुला सांगणार नाही.”

हॅमिल्टन बर्गरने हरकत घेतली. “साक्षीदार नक्कीच त्याला मिळालेली माहिती चोरून ठेवत आहे.”

मेसन म्हणाला, “मी हा प्रश्न मागे घेतो व त्याऐवजी दुसरा विचारतो. लेफ्टनंट, हे खरे नाही का, की तू हॉटेलमध्ये गेलास कारण तुला कुणाकडून एक तरी निनावी फोन आला व त्याने तुला लंक कुठे आहे, ते सांगितले, त्याने कुठल्या नावाने हॉटेलात रजिस्टर केले आहे व त्याचा खोली क्रमांक काय आहे, हे देखील सांगितले, बरोबर?”

बर्गर बोलला, “तीच हरकत आहे.”

जज्ज लँकरशीमने यावर विचार केला व मग मेसनला विचारले, “मिस्टर मेसन, हा प्रश्न विचारायचे काय कारण आहे?”

“हे फक्त काय घडले ते दाखवण्यासाठी होते. समजा, उदाहरणार्थ, मी लेफ्टनंट ट्रॅगला फोन केला असला, तर?”

जज्ज लँकरशीमने विचारले, “तू असे म्हणत नाही आहेस ना?”

“न्यायाधीश महाराज, आता म्हणत नाही आहे. पण आरोपीच्या दृष्टीने हे चांगले आहे, की साक्षीदाराने त्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.”

जज्ज लँकरशीमने म्हटले, “मला हे सर्व संशयास्पद वाटते आहे. पण मी उलट तपासणीतील विस्तृत लांबीच्या संरक्षणाचा फायदा देतो आहे. लेफ्टनंटने त्याला माहिती कुठून मिळाली, ते लपवू नये. त्याने प्रश्नाचे उत्तर द्यावे.”

ट्रॅगने काळजीपूर्वक शब्द उच्चारीत म्हटले, “मला निनावी फोन आला. त्यावरून मी अंदाज बांधला.”

मेसन हसला, “एवढेच.”

बर्गर बोलला, “मी माटील्डा शोअरला पुढील साक्षीदार म्हणून बोलावतो.”

कडेला बसलेली माटील्डा शोअर एका हातातील काठी टेकवत व एका हाताने पुढील खुर्चीचा आधार घेत उठली व साक्षीदाराच्या खुर्चीकडे गेली. तेथील कारकुनाने तिला शपथ दिली. ती चालत असतांना ज्युरींना व तिथे जमलेल्या लोकांना तिच्या चालण्याचा विशिष्ट आवाज ऐकण्याची संधी मिळाली.

जेव्हा तिने तिचे नाव व पत्ता सांगितला, तेव्हा मग बर्गरने मुद्द्यावर येण्यास अजिबात वेळलावला नाही.

“तुम्ही फ्रॅंकलीन शोअरची पत्नी आहात का?”

“हो, आहे.”

“आता मिस्टर शोअर कुठे आहेत?”

“मला माहिती नाही.”

“तुम्ही त्याला शेवटचे केव्हा पाहिले?”

“अंदाजे दहा वर्षांपूर्वी.”

“तुम्ही ती तारीख सांगू शकाल का?”

“२३ जानेवारी १९३२.”

आणि त्या तारखेला काय झाले?”

"तो नाहीसा झाला. अभ्यासिकेत पैसे मागणारा कुणीतरी त्याच्याशी बोलत होता. एकाएकी त्यांचे आवाज रागारागाने चढले. मग ते खाली आले. मी झोपायला गेले. मी माझ्या नवऱ्याला नंतर कधीही बघितले नाही. तो नाहीसा झाला. तरीही मला माहिती होते, की तो मेला नव्हता. मला माहिती होते, की एके दिवशी तो परत येईल."

बर्गर घाईघाईने बोलला, "तुला काही गोष्टी खऱ्या नसून तशा वाटल्या, ते जाऊ दे. जो उद्देश मनात ठेऊन एक माणूस तुझ्या घरी आला होता, तो पूर्ण होण्याआधीच त्याला अटकाव केला गेला. पण त्यामागे काय कारण होते, ते सांगून मी तुला आश्वस्त करू इच्छितो. तुमचा नवरा नाहीसा होण्यापूर्वी किंवा त्यानंतर काही चेक कुणाला देऊन त्याचे पैसे कॅश केले गेले होते का?

"हो."

"त्यातील एक चेक दहा हजार डॉलर्सचा होता का?"

"हो, सर."

"तो कुणाला दिला गेला होता?"

"रॉडने फ्रेंच नावाच्या माणसाला."

"असे अजूनही काही चेक होते का?"

"हो, सर."

"तुम्ही ते चेक शेवटचे पाहिलेत, तेव्हा ते कुठे होते?"

"ते माझ्या झोपायच्या खोलीत टेबलाच्या व भिंतीच्या मधील फटीत होते."

"ते टेबलाचा पृष्ठभाग फिरणारे टेबल होते का?"

“हो, सर.”

“जुने?”

“हो, सर. ते माझ्या नवऱ्याच्या अभ्यासिकेत होते. ते त्याचे टेबल होते.”

“त्याच्या नाहीसे होण्यापर्यंत, तो ते सतत वापरत होता?”

“हो, सर.”

“आणि या महिन्याच्या तेरा तारखेला तुम्हीही ते वापरत होतात?”

“बरोबर आहे.”

“आणि मी उल्लेख केलेले चेक तिथे होते?”

“हो, सर.”

एका पाकिटात बारा चेक होते. त्याच्या पलायनाच्या आधी काही भरले गेले, तर काहींचे त्याच्या पलायनानंतर लगेचच वटवले गेले.”

“अशा तऱ्हेने त्या चेक्सना अलग का ठेवले गेले?

“कारण मला वाटले की ते पुरावा म्हणून उपयोगी पडतील. मी ते पाकिटात घालून, या खणात ठेऊन दिले.”

तेरा तारखेला तुम्ही घरातून केव्हा बाहेर पडलात?”

“नक्की काय वेळ होती, ते मला माहिती नाही. मी झोपायच्या तयारीत होते. बहुधा दहाच्या आसपास वाजले असावेत. मी माझ्या रोजच्या पद्धतीप्रमाणे एक बाटली बिअर प्यायले. आणि लवकरच मला कसेसे होऊ लागून, मी आजारी पडले. मांजराच्या पिल्लाला विषबाधा झालेली मला माहिती होते. मी ओकारीचे औषध घेतले आणि लगेच हॉस्पिटलला गेले.”

“तेव्हा तुम्ही चेक कुठे ठेवलेत?”

“ते टेबलाच्या फटीतच होते.”

“तुम्हाला कसे माहिती?”

“मी काही वेळापूर्वीच त्यांच्याकडे बघत होते आणि पेला, बर्फ आणि बिअरची बाटली आणण्याशिवाय कुठेही गेले नाही.”

“नंतर तुम्ही तुमच्या झोपायच्या खोलीत कधी शिरलात?”

“दुसऱ्या दिवशी जेव्हा मला हॉस्पिटलमधून सोडले, तेव्हा साधारण सकाळी नऊच्या सुमारास.”

“तुमच्याबरोबर कुणी होते का?”

“हो.”

“कोण?”

“लेफ्टनंट ट्रॅग.”

“त्यांच्या सांगण्यावरून तुम्ही खोलीतून काही गेल्याचे तपासले का?”

‘हो.”

“काही नाहीसे झाल्याचे तुम्हाला दिसले का?”

“नाही.”

बर्गरने लीचच्या प्रेताजवळ सापडलेले फौंटन पेन व घड्याळ पेश केले. मिसेस शोअरने ठामपणे सांगितले, की या वस्तु तिच्या नवऱ्याच्या होत्या. ज्या रात्री तो

नाहीसा झाला, तेव्हा त्याच्याकडे या दोन्ही वस्तु होत्या आणि त्यानंतर पोलिसांनी दाखवेपर्यंत, तिने त्या कधी पाहिल्या नव्हत्या.

बर्गर बोलला, "उलट तपासणी."

मेसन - "हॉस्पिटलमधून परत आल्यावर, तुम्ही शोधले, तेव्हा तुम्हाला तुमच्या खोलीतून काही हरवल्याचे लक्षात आले नाही?"

मेसन म्हणाला, "एवढेच."

हॅमिल्टन बर्गरने संपूर्ण केसचा पाया सांगितला. त्याने सर्जन डॉ रोझलीन यांना बोलावून, जेरी टेम्पलरच्या व हेन्री लीचच्या शरीरातून काढलेल्या गोळ्या ओळखण्यास सांगितले. मग त्याने लेफ्टनंट ट्रॅगला बोलावले व शोअरघराच्या दाराच्या लाकडाच्या चौकटीत घुसलेल्या गोळीचे, गुन्हेगारी प्रयोगशाळेतील एकाच बंदुकीतून मारल्याचे आढळून आले.

जज्ज लँकरशीमने घड्याळाकडे पाहिले. तो बर्गरला म्हणाला, "तुम्हाला कळेल, की आपण आता खुनाच्या केसची सुनावणी करत नाही आहोत."

"हो, न्यायाधीश महाराज, पण आपण प्रत्यक्ष पुराव्याशिवायच्या या केसमधील परिस्थिती आणि जे जसे घडले ते, दाखवून देत आहोत. पोलिसांनी प्रयत्न करूनही ते या केसचा निकाल लावू शकले नाहीत, कारण त्याना ज्या अडचणी आल्या त्यांचा परामर्श घेत आहोत."

जज्ज लँकरशीमने मान डोलवली. या सर्व कार्यक्रमाच्या वेळी अगदी कमी रुची घेत असलेल्या मेसनकडे त्याने चौकस दृष्टीने पाहीले.

बर्गरने सुदृढ दृष्टीकोन घेत जाहीर केले, "आता मी थॉमस लंकला बोलावतो."

लंक पाय घसपटवत आला. उलट तपासणी घेतली जाण्यासाठी, तो नाराज दिसत होता आणि बर्गरला बहुतेक वेळा महत्वाचे प्रश्न विचारून, त्याची गोष्ट त्याच्याकडून काढून घ्यावी लागली.

लंकने आडमुठेपणा दाखवल्याने जज्ज लँकरशीमने प्रसंगापरत्वे उलट तपासणी करण्यास परवानगी दिली.

सरकारी वकीलाने बांधत आणलेल्या केसमधील, लंकची गोष्ट तुकडे जोडत का होईना, पण पटणारी, नाटकी व केसचे अत्युच्च टोक असलेली ठरली. त्याने सांगितले की कसा तो त्या रात्री कामावरून घरी गेला, कसे हेलनने सुरक्षिततेसाठी, मांजराच्या पिल्लाला त्याच्या घरी आणले, तो कसा रेडीओ ऐकत होता. मासिक वाचत होता आणि वाचतांना मध्येच दारावर थाप पडली आणि त्याने दार उघडल्यावर, आश्चर्याने मागे सरकला, कारण त्याने त्याच्या आधीच्या मालकाला ओळखले.

त्याने थोडक्यात सांगितले, ते दोघे काही वेळ बोलले आणि मग त्याने त्याच्या अधिक असलेल्या झोपायच्या खोलीत नेऊन, शोअरला झोपायला पलंग दिला. त्याला नक्की झोप लागल्याची खात्री करून पुढील दाराने हळूच बाहेर पडला. गाडीने शोअर घराजवळ आल्यावर गाडी लावली व घाईने घराच्या आत निघाला. आरोपीने त्याला अडथळा आणला. त्याला मिसेस शोअरना भेटायचे असल्याची खात्री पटल्यावर, नाईलाजाने गाडीत घेतले व पेरी मेसन येईपर्यंत बाहेर फेऱ्या मारत राहिला. नंतर ते हॉस्पिटलला गेले. मेसनने त्याला सांगितले, की ती पोलिसांच्या ताब्यात आहे व नंतर मेसन त्याला मॅपल लीफ हॉटेलमध्ये घेऊन गेला. त्याच्यासाठी थॉमस ट्रीमर या नावाने, एक खोली घेतली. तो खोलीत गेला. त्याने कपडे काढायला

सुरवात केल्यावर, दारावर टकटक झाले. वायरलेस पोलीस ऑफिसर्सनी त्याला पकडून नेले. त्यांनी त्याला कसे शोधून काढले, याची त्याला काही कल्पना नव्हती.

"तुम्ही घरातून निघालात, तेव्हा मिस्टर शोअर यांची कपड्यांची काय परिस्थिती होती?

"ते झोपलेले होते."

"कपडे काढून?"

"हो."

"आणि तुम्हाला वाटले, ते गाढ झोपले आहेत?"

मेसन बोलला, "साक्षीदाराला काय वाटले ते एवढे महत्वाचे नाही. त्याने काय पाहीले? व त्याने काय ऐकले?"

बर्गरने गरीब डौलाने चुकल्याचे कबूल करत, म्हटले, 'छान, मी प्रश्न बदलतो. त्याच्या दिसण्याकडे बघून वा काही ऐकून, तुम्हाला तो झोपला असल्याचे कळले का?"

लंकने कसेबसे कबूल केले. "तो घोरत होता."

"आणि त्यावेळी तुम्ही पूर्ण कपड्यात होतात? तुम्ही झोपला नव्हतात का?"

"नाही, सर."

"आणि तुम्ही घराबाहेर पडलात?"

"हो, सर."

"तुम्ही गुपचूप बाहेर पडायचा प्रयत्न केलात का?"

“हो, केला.”

“आणि तुम्ही गाड्यांच्या रांगेपर्यंत गेलात?”

“हो, सर.”

“किती लांब?”

“एखादा चौक.”

“तुम्हाला गाडीसाठी किती वेळ थांबावे लागले?”

“मी कोपऱ्यापर्यंत गेलो, तेव्हा एक गाडी येत होती. मी उडी मारून त्यात बसलो.”

या गाडीत तुम्ही किती वेळ होतात?”

“दहा मिनिटांपेक्षा जास्त नाही.”

“आणि तुम्हाला धीटपणे या केसमधील आरोपीने ओळखून, गाडीत घेतले, तेव्हा तुम्ही रस्त्याने किती वेळ चालत होतात?”

“ओहो, फार वेळ नाही.”

“तरी किती वेळ?

“मला माहिती नाही.”

“एक मिनिट, दोन मिनिटे, पाच मिनिटे की वीस मिनिटे?”

लंक बोलला, ‘ओहो, एक मिनिट.”

हॅमिल्टन बर्गर बोलला, “न्यायाधीश महाराज, माझे म्हणणे असे की जो मनुष्य अंथरुणात गाढ झोपला आहे, तो लगेच उठला, त्याला मिस्टर लंक घरात नसल्याचे

समजले, त्याने कपडे केले व घरातून निघून गेला असे मानणे बरोबर नाही. मला वाटते, ज्युरींनी यावरून योग्य तो निष्कर्ष काढावा की जेव्हा मिस डेलाने साक्षीदाराला गाडीत घेतले. तेव्हा मिस्टर शोअर त्या घरातील अंथरुणावर होते,"

मेसन बोलला, "सरकारपक्ष हे विधान ज्युरींना करू शकते. पण आता ते करण्याचा हक्क त्यांना नाही. जर त्याना आताच केसबद्दल बाजू मांडायची असेल, तर --- "

जज्ज लँकरशीमने त्याला थांबवले, व ज्युरींना ताकीद देत म्हटले, "आता ज्युरी सरकारपक्षाच्या विधानांकडे लक्ष देणार नाहीत. मिस्टर बर्गर, तुम्ही साक्षीदाराची तपासणी चालू ठेवा."

"या केसमधील आरोपीने तुम्हाला गाडीत घेतल्यावर, मिस्टर पेरी मेसन तुम्हाला भेटून, गाडीत बसले, बरोबर?"

"हो."

"आणि मग मिस्टर मेसन यांनी तुम्हाला या हॉटेलमध्ये आणले?"

"हो."

"आता आरोपी मिस डेला ही सर्व वेळ तुमच्याबरोबर होती का?"

"नाही."

"ती कधी गेली?'

"मला माहिती नाही."

"ती काय वेळ असावी?"

"माहिती नाही."

“तुम्हाला ती कुठे सोडून गेली?”

“मला आठवत नाही.”

“ती जागा हॉटेलसमोर होती का?”

“मला याचे उत्तर द्यायचे नाही.”

“पण कुठेतरी तिने टॅक्सी केली, बरोबर?”

“मला वाटते, तिथे टॅक्सी होती.”

“आणि मग काही वेळ मिस्टर मेसन तुमच्याबरोबर राहीले. फुले खरेदी करून, मिसेस शोअरला ती हॉस्पिटलमध्ये पाठवून, ते तुमच्या घरी तपासण्यासाठी जाणे व मग तुम्हाला या हॉटेलमध्ये सोडणे, हे सर्व असेच झाले ना?”

खूप वेळ आरोपी काही न बोलता तसाच गप्प राहीला. नंतर एका अक्षरात उत्तर दिले, “हो.”

बर्गर बोलला, “मिस्टर मेसन, तुम्ही उलट तपासणी घेऊ शकता.” हे बोलतांना त्याच्या आवाज विजयाचा वाटत होता.

मेसनने साक्षीदाराकडे पाहीले. “मिस्टर लंक, मला तुम्ही माझ्या प्रश्नांची उत्तर मोकळेपणे द्यायला हवी आहेत, कळले का?”

“हो.”

मिस डेला आपल्यातून गेल्यावर, आपण तुमच्या घरी गेलो, नाही का?”

“हो.”

“आपण तिथे साधारण चार ते साडेचारपर्यंत पोचलो, नाही का?”

“हो.”

“हवा गार होती?”

“हो.”

“घरात शेकोटी नव्हती ना?”

‘नव्हती.”

आपण तिथे पोचल्यावर तुम्ही गॅस हीटर लावलात?”

“हो.”

“जेव्हा तुम्ही पहिल्यांदा घर सोडले, तेव्हा तुम्ही पुढील झोपायची खोली आणि बाथरूम यामधील दार बंद केलेत?”

“हो.”

“आणि आपण जेव्हा तिथे पोचलो, तेव्हा दार उघडे होते?”

“हो.”

“आणि टेबलाचे खण उघडे होते व वस्तू आणि कपडे इकडेतिकडे विखुरलेले होते?

“बरोबर.”

“काही गोष्टी नाहीशा झाल्या होत्या का?”

“हो, माझ्या सर्वात चांगल्या सूटमध्ये मी लपवून ठेवलेले काही पैसे घेतले गेले होते.”

“सूट कपाटात टांगलेला होता?”

“हो, सर.”

“किती पैसे गेले?”

बर्गर बोलला, “मी याला हरकत घेतो. हा प्रश्न चुकीचा, कसब न दाखवणारा व अप्रस्तुत आहे. ही चुकीची उलट तपासणी आहे. या केसमधील गोष्टींशी याचे काहीच देणेघेणे नाही.”

जज्ज बोलले. ”हरकत काढून टाकली आहे. आरोपी त्यावेळची तेथील परिस्थिती विशद करू शकतो आणि फ्रॅंकलीन शोअरच्या जाण्यावर प्रकाश पडेल, असे काही सांगू शकतो.”

लंक बोलला, “साधारण तीनशे डॉलर्स नाहीसे झाले होते.”

“स्वयंपाकघरात उघडणारे दार बंद होते का?”

“हो, सर.”

“स्वयंपाक करतांना तू तेथील डब्यातील पीठ घेतलेस का?”

“हो, सर.”

“आणि त्यातील काही पीठ जमिनीवर सांडले का?”

“हो, सर.”

“जेव्हा आपण घरात आलो तेव्हा मांजराचे पिल्लू तिथे होते का?”

“हो, होते.”

“हेलनने तुझ्याकडे आणून सोडलेले, हेच ते पिल्लू होते का?”

“हो.”

आणि माझा विश्वास आहे की मी तुझे लक्ष या गोष्टीकडे वेधले होते, की ते पिल्लू त्या सांडलेल्या पिठात नाचले होते व मग स्वयंपाकघरातून मागील झोपायच्या खोलीच्या दारातून इकडे तिकडे धावले होते.”

“हे बरोबर आहे.”

“काय झाले, ते दाखवणाऱ्या खुणा तिथे दिसत होत्या का?”

“हो, मला वाटते, स्वयंपाकघरातून मागील झोपायच्या खोलीत जाणाऱ्या दारापासून त्या फार लांब नव्हत्या.”

“आणि मागील झोपायच्या खोलीच्या दारापासूनही फार तर चार पाच फूटांपर्यंत असतील?”

“आणि मागील झोपायच्या खोलीच्या दारापासूनही फार तर चार पाच फूटांपर्यंत

“हो.”

“आणि पलंगाच्या बाजूला मी तुझे लक्ष अशा जागेकडे वेधले होते, की जिथे पिल्लाच्या पंजाच्या खुणा ते पलंगावर नाचल्यासारख्या दिसत होत्या, बरोबर?”

“हो.”

“पिल्लू अंथरुणाच्या मध्यभागी असलेल्या लहानशा चेंडूसारख्या फुगीर भागावर, तो चुरगळत, धावले होते, हो ना?”

“हो.”

“पण तुला ठळकपणे आठवत आहे का, की स्वयंपाकघराचे दार बंद होते?

“हो.”

हॉलमधील, टेबलावर असलेल्या अ‍ॅश ट्रेमध्ये जॉर्ज अल्बरच्या नावाचे व्हीजीटींग कार्ड होते. त्यावर काही लिहिलेले होते आणि त्या अ‍ॅश ट्रेमध्ये सिगरेटची गार थोटके पडली होती?"

"हो. ती फ्रॅंकलीन शोअरने टाकली होती. मी बाहेर गेलो, तेव्हा मला दारावर ते कार्ड चिकटवलेले दिसले."

"तुम्ही बाहेर गेलात?"

"हो."

"तुम्ही तिथे असतांना दाराची घंटी वाजलेली वा टकटक केलेली ऐकली नाही का?"

"नाही. म्हणूनच मला कार्डाचे नवल वाटले. मी तिथे असतांना, अल्बरने दाराची घंटी वाजवलेली वा टकटक केलेले असणार. परंतु घंटी कधीकधी वाजत नाही."

सरकारी वकील मेसनला म्हणाला, "मी या साक्षीदाराला तात्पुरते मागे घेऊ शकतो का? कारण दोन साक्षीदार निघून जायला बघत आहेत. मग या साक्षीदाराला आपण परत बोलावू."

मेसन थंडपणे वाकून बोलला, "माझी काही हरकत नाही."

बर्गरने एकापाठोपाठ एक असे एका टॅक्सी चालकाला, ज्याने डेलाला लंकच्या घराजवळ सोडले, ती खूप वेळ आली नाही, आणि नंतर तिला तिच्या घरी सोडले त्याला बोलावले. नंतर त्याने ट्रॅगला पुन्हा बोलावले. त्याने मांजराचे पिल्लू डेलाच्या सदनिकेत असल्याची खात्री केली आणि हेलनकडून ते तेच विषबाधा

झालेले पिल्लू असल्याची व जे तिने थॉमस लंककडे तेरा तारखेच्या संध्याकाळी ठेवले, तेच ते असल्याची ग्वाही दिली.

मेसनने या इतर साक्षीदारांकडे जराही लक्ष दिले नाही. किंवा काही हरकत ही घेतली नाही. त्यांची उलटतपासणी घेण्याच्या त्याच्या हक्काकडेही काणाडोळा केला.

मग परत लंकला पुढील कारवाईसाठी बोलावण्यात आले. कोर्टातील सगळ्यांचे लक्ष तो काय बोलणार आहे, याकडे लागेपर्यंत, मेसनने साक्षीदाराला अनेक सेकंद न्याहाळले.

“तू स्वयंपाकघरातील तो पिठाचा डबा शेवटचा केव्हा उघडलास?”

“तेरा तारखेला सकाळी. त्याचे मी न्याहारीसाठी पॅनकेक बनवले.”

“मी तुझे लक्ष डब्यातून बाहेर सांडलेल्या बऱ्याच मोठ्या पिठाकडे वेधले, तेव्हा तू डब्याचे झाकण काढले नाहीस, बरोबर?”

“नाही, सर. तशी काही संधीच नव्हती. पोलिसांनी मला हॉटेलातून पकडून नेले आणि डांबून ठेवले.

हॅमिल्टन बर्गरने मध्येच स्पष्टीकरणाची घाई केली. “खराखुरा साक्षीदार,”

लंक सहजपणे रागावत, त्याच्याकडे वळला व बोलला, “तुम्ही हे का केले, याची मी पर्वा करत नाही, पण तुम्ही हे केले, हे नक्की!”

जज्ज लँकरशीमने बोलला, “उत्तरे देतांना, साक्षीदाराने स्वतःला आवरावे.”

मेसनने जज्ज लँकरशीमकडे पाहीले. “जर तुम्ही खटल्याची सुनावणी अर्धा तास थांबवली तर मला नाही वाटत, की अजून काही प्रश्न विचारायची गरज आहे.”

“अशी सुट्टी घेण्याची काय गरज आहे?”

आता मेसन हसत होता. न्यायाधीश महाराज, मी न्याहाळणे थांबवू शकत नाही. मी उलट तपासणीतील शेवटचा भाग सुरु केला, तेव्हा लेफ्टनंट ट्रॅग घाईघाईने कोर्टाबाहेर निघून गेला. मला वाटते, त्याला घराकडे पोचायला व पिठाचा डबा शोधून परत यायला, तीस मिनिटे वेळ पुरेसा आहे.”

जज्ज लँकरशीमने विचारले, “तेरा तारखेच्या संध्याकाळी किंवा चौदा तारखेच्या सकाळी केव्हातरी आरोपी, थॉमस लंक सोडून कुणाकडून तरी पिठाच्या डब्याचे झाकण निघाले, ही तुझी अटकळ आहे, नाही का?

मेसनचे हसू वाढले. “न्यायाधीश महाराज, मला वाटते, लेफ्टनंट ट्रॅग मोठा रुचीपूर्ण शोध लावणार आहे. न्यायाधीश महाराज, माझा हेतू जाणून घ्यावा. मला फक्त या आरोपीला निरपराध जाहीर करण्यात रस आहे. त्यामुळे, काहीही शोधून काढले गेले, तरी त्याला पुराव्याच्या दृष्टीने त्याला काही किंमत नाही आहे, असे विधान करायला मी कचरत नाही.”

जज्ज लँकरशीम बोलला, “ठीक आहे. आपण अर्ध्या तासाची सुट्टी घेऊ.” लोक कोर्टाबाहेर पडले व गर्दी करून, हॉलमध्ये जमले. जॉर्ज अल्बर गर्दीतून पुढे आला. त्याच्या चेहऱ्यावर ओशाळवाणे हसू होते.

तो म्हणाला, “त्या कार्डामुळे काही गोष्टींचा घोटाळा झाला असेल, तर मला माफ करा. मी सहजच लंकच्या घरावरून चाललो होतो. मी थांबून दिवे चालू आहेत का, ते बघायचे ठरवले. एक चालू होता, म्हणून मी जाऊन घंटी वाजवली. कुणीच काही प्रतिसाद दिला नाही. म्हणून मी कार्ड लावून ठेवले --- मला वाटले, हेलनला

कदाचित माझे पिल्लाबद्दलचे विचार आवडतील ---आणि मला थोडी काळजी वाटत होती.”

“खरे सांगायचे तर घंटी बिघडली असेल, असे मला वाटलेच नाही.”

मेसनने विचारले, “एक दिवा चालू होता?”

“हो, मला सावलीतून दिवा दिसत होता. मी टकटक केले नाही, कारण मला वाटले, की घंटी वाजते आहे.”

“ती काय वेळ होती?”

“ओहो, जवळजवळ मध्यरात्र झाली होती.”

मेसनने ओठ वाकडे करून नापसंती दाखवत विचारले, “तुम्ही हे सरकारी वकीलाला सांगाल का?.”

मी सांगितले. तो म्हणाला त्याला माहिती होते की घंटी मोडली आहे. त्यामुळे त्याला काही महत्व नव्हते.”

मेसन बोलला, “मला वाटते, महत्व होते.”

## प्रकरण २२

जेव्हा कोर्ट परत सुरु झाले, तेव्हा हॅमिल्टन बर्गरने हे अगदी स्पष्टपणे दाखवून दिले, की तो उद्दीपित होऊन खूप कष्ट घेत होता. तो म्हणाला, “फार आश्चर्यपूर्ण परिस्थिती या केसमध्ये तयार झाली आहे. जर कृपया कोर्टाने हे मान्य केले तर मी साक्षीदार लंकला मागे घेऊन लेफ्टनंट ट्रॅगला परत पुढे बोलावतो.”

मेसन बोलला, “माझी काही हरकत नाही.”

जज्ज लँकरशीम बोलला, “छान. लेफ्टनंट ट्रॅग परत एकदा साक्ष देण्यास येईल. लेफ्टनंट, तुम्ही खरे बोलायची शपथ यापूर्वीच घेतली आहे.”

ट्रॅगने मान डोलावली आही साक्षीदाराच्या पिंजऱ्याशी गेला.

बर्गरने विचारले, “तुम्ही अलीकडे साक्षीदार लंकच्या घरी गेला होतात का?”

“हो, सर.”

“गेल्या अर्ध्या तासात?”

“हो, सर.”

“तुम्ही तिथे काय केले?”

“मी स्वयंपाकघरात जाऊन, पिठाच्या डब्याचे झाकण काढले.”

“मग तुम्ही काय केले?”

“मी आतील पीठापर्यंत पोचलो.”

“तिथे तुम्ही काय शोधून काढले?”ट्रॅग उदास स्वरात भरभर सांगू लागला, “मला .३८ कॅलीबरचे दुहेरी क्रिया असलेले स्मिथ वेसन कंपनीचे पिस्तुल सापडले.”

“तुम्ही आम्हाला सांगू शकता, की पिस्तुल घेऊन, तुम्ही काय केले?”

“मी त्यावर बोटांचे ठसे आहेत का हे तपासायला ते घेऊन मी घाईने गुन्हेगारी प्रयोगशाळेत गेलो. मी पिस्तुलावर कोरलेला क्रमांक घेतला. पण अजून मी ते पिस्तुल विकणाऱ्या विक्रेत्याला साक्षीदार म्हणून इथे बोलावून त्याला तपासू शकलो नाही. मला वाटते, उद्या सकाळपर्यंत मी त्याला आणू शकेन.”

बर्गर बोलला, "उलट तपासणी घ्या."

मेसन आश्चर्याने बोलला, "पण लेफ्टनंट, तुमचे समाधान झाले आहे. आता ते कुणाला विकले होते, हे शोधून काय मिळणार?"

"मला ते हवे आहे. आपण अलीकडेच देशातील पिस्तुलाच्या विक्रीची आकडेवारी तयार केली आहे. गेल्या पंधरा वर्षांची आकडेवारी निश्चितपणे तपासता येईल".

मेसन बोलला, "लेफ्टनंट, मला समजते आहे, पोलिसांच्या उपयोगासाठी, ती मूळ विक्रीची प्रत दुकानदाराच्या रजिस्टरमधून घायला लागेल ना?"

"हो, सर."

मेसन बोलला, "वापर करण्यासाठी हा सर्वात चांगला पुरावा असेल, असे मी समजत नाही. मी तुम्हाला असे विचारतो, की कशावरून ते फ्रॅंकलीन शोअरने जानेवारी १९३२ पूर्वी विकत घेतले नसेल?"

ट्रॅगच्या डोळयांवरून असे दिसले, की मेसनच्या प्रश्नाने त्याला फार आश्चर्य वाटले. पण त्याने क्षणभराने उत्तर दिले, "हो, सर आमच्या माहितीप्रमाणे, ते पिस्तूल फ्रॅंकलीन शोअरने ऑक्टोबर १९३१ मध्ये विकत घेतले होते."

मेसनने विचारले, "लेफ्टनंट, या सर्व माहितीवरून तुम्ही काय निष्कर्ष काढाल?"

जज्ज लँकरशीमने नापसंतीदर्शक भुवई उंचावून मेसनकडे पाहीले. "तो प्रश्न मार्गदर्शक, आरोपीवर बंधनकारक असे काही सांगत नाही. अर्थात सरकारी वकिलांचा आक्षेप नसेल तरच."

विजयाने ज्युरीकडे बघत, बर्गर बोलला, "अजिबात नाही. लेफ्टनंट ट्रॅगने या प्रश्नाचे उत्तर दिले, तर त्याहून अधिक चांगले काहीच नाही."

ट्रॅग बोलला, "माझ्या मनात काही प्रश्न नाही पण लंक बाहेर गेल्यावर फ्रॅंकलीन शोअर झोपून उठला, स्वयंपाकघरात गेला आणि पिठाच्या डब्यात

पिस्तूल लपवले. मांजराचे पिल्लू त्याच्यामागोमाग स्वयंपाकघरात गेले आणि पिठात उडी मारली. फ्रॅंकलीन शोअरने त्याला बाहेर ढकलून दिले. त्यामुळे पिल्लू झोपायच्या खोलीत धावत गेले व आताच त्याने रिकाम्या केलेल्या अंथरुणावर उड्या मारू लागले. मी पुढे असे सांगू शकतो, की फ्रॅंकलीन शोअर हा किती महत्वाचा साक्षीदार होता आणि त्याला गुपचूप हाकलून देण्याचे प्रयत्न कुणी केले, हे उजेडात आले असते, तर त्याचे महत्व खूप होते."

मेसन हसला. "हे असे दाखवते, की फ्रॅंकलीन शोअर थोड्याच वेळात जेरी टेम्पलरला त्या पिस्तुलाने गोळी मारणार होता. जे चालवायला त्याला परवानगी नव्हती. तेच ते पिस्तुल होते. त्यानेच हेन्री लीचचा जीव घेतला, नाही का?"

बर्गर म्हणाला, "मी या प्रश्नाला हरकत घेतो. न्यायाधीश महाराज, ही उलट तपासणी वादातीत नसून, योग्य नाही."

जज्ज लॅंकरशीम म्हणाले "मी साक्षीदाराला ह्या व पुढील प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगतो."

ट्रॅग काळजीपूर्वक बोलला, "मला माहिती नाही, की याच पिस्तुलाने गुन्हे घडले का पण हे ते त्याच दर्जाचे व त्याच वर्णनाचे पिस्तूल आहे. त्यात तीन गोळ्या होत्या. आणि अजून तीन गोळ्या तशाच होत्या, ज्या जेरी टेम्पलरला, हेन्री लीचला आणि शोअर घराच्या दाराच्या चौकटीत मारल्या गेल्या."

मेसनने हॅमिल्टन बर्गरकडे पाहून डोळे उघडमिट केले. तो ज्युरींकडे बघून विजयाने हसला. तो साक्षीदाराला बोलला, “आणि आता लेफ्टनंट, मी तुला असे विचारतो, की हे शस्त्र खुनाचे शस्त्र म्हणून सिद्ध झाले तर फ्रॅंकलीनने ते लंकच्या घरात लपवणे आणि नंतर तिथून निघून जाणे जास्तच रोचक बनवते, नाही का?”

ट्रॅग बोलला, मला माहिती नाही. ही अर्थात शक्यता आहे.”

मेसन त्याच्या खुर्चीत मागे टेकून बसला व लेफ्टनंट ट्रॅगला म्हणाला, “तुला पिठात जेव्हा पिस्तुल सापडले, तेव्हा तू काहीसा उद्दीपित झालास, बरोबर?”

“अगदी तसेच नाही.”

“तू परत कोर्टात येण्याच्या आणि ते पिस्तुल पोलीस प्रयोगशाळेत देण्याच्या विचारात आणि घाईत होतास.”

“हो.”

मेसन बोलला, “तू परत कोर्टात येण्याच्या आणि ते पिस्तुल पोलीस प्रयोगशाळेत नेण्याच्या इतक्या घाईत होतास, की पिठात कदाचित इतर काही आहे का, ते तू शोधले नाहीस.”

ट्रॅगच्या चेहऱ्यावर अचानक काळजीचे भाव उमटले. त्याने उत्तर दिले, “मी --- मी पिठाच्या डब्यात अजून काही आहे का, ते शोधले नाही. पण तो डबा मी माझ्याबरोबर आणला आणि तो पोलीस प्रयोगशाळेत बोटांचे काही ठसे उमटले असल्यास, बघण्यास दिला.

कोर्टरूममध्ये मागे काही गोंधळ चालू होता. गुन्हेगारी पोलीस प्रयोगशाळेतील कडक स्कॉटीश माणूस दाराशी जमलेल्या गर्दीला ढकलत पुढे आला.

मेसन बोलला, “न्यायाधीश महाराज, मला वाटते, अँगस मॅकीन्टॉश ती माहिती सांगणार आहे. आम्ही सगळे लेफ्टनंट ट्रॅगला साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून मॅकीन्टॉशला त्याची जागा घेण्यास सांगतो.”

पायउतार होण्यास परवानगी देतो व ज्याने आधीच शपथ घेतली आहे, त्या अँगसला हॅमिल्टन बर्गर म्हणाला, “मला कळत नाही, यातून आरोपीच्या वकीलाला काय मिळणार आहे? जर कोर्टाने मला मिनिटभर बोलून दिले, तर मला मिस्टर मॅकीन्टॉशबरोबर बोलायला आवडेल.”

बर्गर घाईने उठला व प्रेक्षक व आरोपीच्या वकिलाचे टेबल यांच्यामध्ये असलेल्या कठड्याशी गेला. तो कुजबुजून अँगस मॅकीन्टॉशशी बोलू लागला. मग भुवई चढवत गोंधळून, पेरी मेसनकडे बघू लागला. नंतर एकदम जज्ज लँकरशीमला बोलला, “कोर्टाने कृपया उद्या सकाळपर्यंत सुट्टी द्यावी.”

जज्ज लँकरशीमने पेरी मेसनला विचारले, “तुमची काही हरकत आहे?”

“हो, न्यायाधीश महाराज. जर सरकारी वकिलाने अँगस मॅकीन्टॉशला सरकार पक्षाचा साक्षीदार म्हणून उभे केले नाही, तर मी त्याला संरक्षणासाठी असलेला साक्षीदार म्हणून बोलावेन.”

जज्ज लँकरशीम कडवटपणे बोलला, “मिस्टर मेसन, तुमची लेफ्टनंट ट्रॅगची उलट तपासणी चालू करा.”

मेसन बोलला, “न्यायाधीश महाराज, माझे अजून काही प्रश्न नाहीत.”

लेफ्टनंट ट्रॅगसाठी ज्याची उलट तपासणी मध्येच थांबवली गेली, त्या साक्षीदार लंक याच्यासाठी देखील अजून काही प्रश्न नाहीत.”

हॅमिल्टन बर्गर घाईने म्हणाला, “अशा परिस्थितीत, मला साक्षीदार लंकला आता पुन्हा बोलावल्यावर, अजून काही प्रश्न विचारायचे आहेत.”

जज्ज लँकरशीमचा आवाज त्यांची अधीरता दाखवत होता. “ठीक आहे.

लेफ्टनंट, तुम्ही पायउतार व्हा आणि तुमची जागा मिस्टर लंक घेतील. मिस्टर जिल्हा वकील, कृपया वेळ फुकट घालवू नका.”

जेव्हा लंक पुन्हा एकदा साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आला, तेव्हा हॅमिल्टन बर्गरने विचारले, “मिस्टर लंक, तेरा तारखेनंतर तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरातील पिठाचा डबा कधी उघडला का?”

मेसन बोलला, “मी हरकत घेतो, कारण हा प्रश्न विचारला गेलेला आहे व उत्तरही दिले गेलेले आहे. पण या परिस्थितीत मी तो परत विचारायला परवानगी देतो. जज्ज लँकरशीम म्हणाला, “साक्षीदार प्रश्नाचे उत्तर देईल.”

लंक बोलला, “नाही, मी तेरा तारखेला सकाळी पॅनकेक बनवल्यानंतर, मी पिठाचा डबा परत उघडला नाही.”

“तुम्ही तो डबा पिठाव्यतिरिक्त इतर काही ठेवण्यासाठी, कधी वापरता का?”

“नाही, सर.”

बर्गरने हो नाही करत, शेवटी विचारले, “माझे झाले.”

मेसन बोलला, “प्रश्न नाहीत?”

जज्ज लँकरशीमने घड्याळाकडे व नंतर जिल्हा वकीलाकडे पाहीले. “तुमचा पुढचा साक्षीदार बोलवा.”

हॅमिल्टन बर्गर थोड्या नाराजीने बोलला, “अँगस मॅकीन्टॉशने साक्षीदाराच्या पिंजऱ्यात यावे. त्याने शपथ आधीच घेतलेली आहे आणि त्याची पोलीस प्रयोगशाळेतील कसोटी आधीच घेतली आहे.”

अँगस मॅकीन्टॉश साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आला. हॅमिल्टन बर्गरने त्याला विचारले, “तुम्हाला काही वेळापूर्वी लेफ्टनंट ट्रॅगने पिठाचा डबा दिला का?

“हो, सर.”

“त्या पिठाच्या डब्याचे तुम्ही काय केले?”

“मला त्याचा फोटो काढायचा होता आणि त्यावरील बोटांचे ठसे तपासायचे होते. त्यामुळे मी पीठ बाहेर ओतले.”बर्गरने विचारले, “तुम्हाला काय सापडले?.”

“मला पन्नास व शंभरच्या एकूण २३,५५० डॉलर होतील एवढ्या नोटा सापडल्या.”

ज्युरींमधील उत्सुकता वाढली. “आता त्या नोटा कुठे आहेत?”

“पोलीस प्रयोगशाळेत.”

हॅमिल्टन बर्गरने फटकारले, “उलट तपासणी घ्या.”

मेसन लगेच म्हणाला, “प्रश्न नाहीत.” आणि मग जज्जकडे हसून बघत बोलला, “आणि आता न्यायाधीश महाराज, माझी काही हरकत नाही. सुनावणी चालू राहू दे.”

बर्गर थोडक्यात बोलला, “सरकारी वकिलाला आता ते नको आहे. त्याची कायदेशीर कारवाई संपली आहे.”

मेसन लगेच बोलला, “आरोपीच्या वकिलाचे बोलून संपले. आता साडेचार झाले आहेत. मी असे सुचवेन, की प्रत्येक बाजूला आपले म्हणणे मांडण्यासाठी, दहा मिनिटे द्यावीत.”

हॅमिल्टन बर्गर म्हणाला, “मी या घडीला केस चालवायला, किंवा इतक्या कमी वेळात चालवायला तयार नाही. ताज्या चक्रावून टाकणाऱ्या घडामोडी अशा

आहेत, की आता शोध लागलेल्या गोष्टींवर प्रकाश पाडण्यासाठी व परस्पर संबंध लावण्यासाठी मला जास्त वेळ पाहीजे.”

जज्ज लँकरशीमने विचारले, “मग जेव्हा बचाव पक्ष हे थांबवायचे सुचवत होता, तेव्हा तुम्ही हरकत का घेतली?”

बर्गर काही बोलला नाही.

जज्ज लँकरशीमने चालू ठेवले, “खरे तर बचाव पक्षाकडे काय पुरावा आहे, हे तुम्हाला बघायचेहोते. आरोपीच्या वकिलाने हे सुरु ठेवण्यास परवानगी दिली होती. पण तुम्ही ती नाकारलीत.”

हॅमिल्टन बर्गर अजीजीने म्हणाला, “पण न्यायाधीश महाराज, मला वाटते, बचाव पक्षाच्या साक्षीदाराची मी घेत असलेली उलट तपासणी चालू ठेवायला हवी होती. पण मी केससाठी बाजू मांडायची तयारी केली नव्हती.”

जज्ज लँकरशीमने त्याचे डोके हलवले. “कोर्ट पाच वाजता संपेल. आता तुम्ही तुमची मतमांडणी चालू ठेवा. दोन्ही पक्षांना त्यासाठी वीस वीस मिनिटे वेळ दिला जाईल.”

हॅमिल्टन बर्गरने कोर्टाचे म्हणणे मान्य केले. ज्युरींसमोर गेला आणि बोलला, “दिलेल्या वीस मिनिटे या वेळात व या केसमधील नवीन निर्माण झालेल्या बाबी बघता, मी काही नवीन विषयाला तोंड फोडत नाही. मी हा वेळ हा विषयाचा लांबलेला उपसंहार करण्यात घालवतो. तरीही, मी या केसमधील परिस्थितीजन्य पुरावे मांडेन. आरोपी व तिचा नोकरीतला बॉस, पेरी मेसन हे कसे प्रत्यक्ष

साक्षीदारांना पळवून लावणाऱ्या कारवाया करण्यात गुंतलेले होते, हे दाखवून देईन. साक्षीदार लंकबरोबर काय केले गेले, हे प्रत्यक्ष एकमताने, काही विरोध न होता, ऐकले गेले आहे. आरोपीची सुनावणी त्याकरता चाललेली नाही. पण साक्षीदाराला पळवून लावण्यात तिचा हात होता, त्याबद्दल सुरु आहे. त्या दोघांनी मिळून लंकला कसे पोलीसांपासून दूर लपवून ठेवले, हे आता उघड झाले आहे.”

“आता आम्ही आरोपीकडून पुराव्यानिशी त्याने तसे केल्याची खात्री मागतो आहोत. फ्रॅकलीन शोअरने काय केले असते, ते वेगळे, पण मला नाही वाटत, की ज्युरीतील कोणी व्यक्ती, चौदा तारखेच्या सकाळी, डेलाचा लंकच्या घरी जाण्याचा हेतू फ्रॅकलीन शोअरला तिथून घालवणे हाच होता, याबद्दल शंका घेईल. १३६ आणि १३६ V २ पिनल कोड या कलमांतर्गत, केलेल्या गुन्ह्याचा प्रयत्न यशस्वी झालाच पाहिजे, असे नाही. त्याला योग्य ती कायदेशीर कारवाई वा तपास करता येऊ नये, म्हणून साक्षीदाराला पळवून नेणे, हा गुन्हा ठरतो.

“आरोपीच्या वकिलाला असे सांगायचे असेल, की डेला तिथे येण्याच्या आधीच फ्रॅकलीन शोअरने लंकच्या घरातून सूंबाल्या केला होता, तर ही आरोपीच्या

वकिलाचे कर्तव्य असलेली जबाबदारी होती, की ती गोष्ट सिद्ध करणे. मी आता अधिक वेळ घेणार नाही. पण हा वेळ माझ्या निरोपाच्या भाषणासाठी राखून ठेवेन.”

बर्गरने मोठ्या विजयाने घड्याळाकडे पहात आणि हे जाणवून की त्याने त्याचे सुरवातीचे भाषण वेळेच्या आधी संपवून, पेरी मेसनवर कुरघोडी केली आहे. आणि ताज्या घडामोडींवर काही भाष्य न करता, वेळेच्या आधीच अंमलबजावणी व निरोपाचे भाषण संपवून, बर्गर त्याच्या खुर्चीकडे चालत जाऊन बसला.

मेसन सावकाश उठून उभा राहीला मुद्दाम गोंधळलेल्या ज्युरींच्या अंगावरून चालत गेला.

त्याने शांतपणे सुरु केले. जोपर्यंत आरोपी गुन्हेगार असल्याचे संशयातीतपणे सिद्ध होत नाही, तोपर्यंत गुन्हा सिद्ध करण्याच्या ओझ्याची अंमलबजावणी आरोपीच्या वकिलावर टाकता येणार नाही. सभ्य स्त्रीपुरुषहो, डेला जेव्हा लंकच्या घरी पोचली, तेव्हा तिथे फ्रॅकलीन शोअर नव्हता. मी यासाठी मी लिखित वा बोललेले काही पेश केले नाही, कारण खटल्यातील पुरावा ते ठळकपणे सिद्ध करतो आहे.”

“मी पुराव्यावर काही भाष्य करणार नाही. मी फक्त मांजराच्या पिल्लाच्या हालचालीवर बोलेन. कोणीतरी पिठाचा डबा उघडला. काही वस्तू त्यात ठेवली गेली, कदाचित पिस्तुल, कदाचित पैशांच्या नोटा, कदाचित दोन्ही. खेळकर, काही काळजी व भीती नसलेले पिल्लू डब्यावरील हातांच्या हालचालीने तिकडे आकर्षिले गेले. त्याने सांडलेल्या पिठात उडी मारली आणि लगेच बाहेर आले. त्यानंतर थोड्याशा उघड्या असलेल्या दारातून, फ्रॅकलीन झोपणे अपेक्षित होते त्या मागील झोपायच्या खोलीत जाऊन पलंगावर उडी मारली. हे उघड आहे, की

अंथरूण रिकामे होते आणि हे देखील उघड आहे, की अंथरूणाच्या दुसऱ्या बाजूने त्याने खाली उडी मारली आणि बाथरूममधून पुढील झोपायच्या खोलीतील पलंगावर गेले.''

''सभ्य स्त्रीपुरुषहो, मी सरकारी वकिलाला सांगेन की ही जास्त करून परिस्थितीजन्य पुराव्याची केस आहे. कायदा असा आहे, की जर सर्व संशयांपलीकडे पुरावा आरोपी दोषी नाही असा निर्देश करत असेल, व कुठल्याही तर्कनिष्ठ गृहितकाने गुन्ह्याचे स्पष्टीकरण देता येत नसेल, तर तुम्ही आरोपीला मोकळे केले पाहिजे.''

त्यामुळे, ''सभ्य स्त्रीपुरुषहो, त्यामुळे पिल्लू पिठात बुडून आल्यावर व फ्रॅंकलीन शोअरच्या अंथरुणावर उडी मारल्यावर, पुढील झोपायच्या खोलीच्या पलंगावर जाऊन का लोळले?

परिस्थितीजन्य पुराव्यावर अवलंबून, आता सरकारी वकिलाने हे सर्व काही स्पष्ट करायला हवे. त्यामुळे सकाळी त्याला त्या पिल्लाच्या हालचालींबद्दलच्या मी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊ देत. तुमच्यापैकी काहीजण मांजरांशी, त्यांच्या मानसशास्त्राशी, सवयींशी सुपरिचित असतील. त्यांच्याकडे नक्कीच या प्रश्नांची उत्तरे तयार असतील. आणि एवढे बोलून, सभ्य स्त्रीपुरुषहो, मी तुमची रजा घेतो.''

अनेक तरुण मंडली गोंधळलेली वाटत होती. पण दोन स्त्रिया मात्र मान हलवून, हसत होत्या, जसे काही त्यांना हॅमिल्टन बर्गरच्या रागाचे कारण आधीच समजलेले होते.

जज्ज लॅंकरशीमना स्वतःलाही मांजरांच्या पिल्लांचे काहीसे ज्ञान होते, कारण त्यांच्या ओठांच्या कोपऱ्यावर, स्मितहास्य खेळत होते व डोळ्यातही चमकत होते.

ते जणू ज्युरींना ताकीद देत होते, की या केसच्या गुणांबद्दल काही मत बनवू नका, त्या केसची आपापसात चर्चा करू नका किंवा त्यांच्या उपस्थितीत दुसऱ्यांकडून चर्चा होऊ देऊ नका. आणि असा शेरा मारत दुसऱ्या दिवशी दहा
पर्यंत कोर्ट स्थगित करा, कारण की आरोपी त्या वेळेपर्यंत जामिनावर सुटलेला असेल.''

## प्रकरण २३

कोर्ट संपून, जज्ज उठून गेल्यावर, हॅमिल्टन बर्गर गर्दीतून मेसनकडे आला.

''मेसन, याचा अर्थ काय?''

मेसन मित्रत्वाने हसला. ''बर्गर, माझी खात्री नाही, की मी सांगू शकेन. मी जे काही करतो आहे, ते मिस डेलावरील गुन्हेगारी शिक्का पुसला जावा म्हणून करतो आहे. मला वाटत नाही, की ज्युरी तिला दोषी ठरवतील, तुम्हाला काय वाटते?''

बर्गर बोलला, ''आपल्याला आपले कर्तव्य बजावावे लागते, गुन्हेगाराला पकडावे लागते, हे खड्ड्यात जावो. पण फ्रॅंकलीन शोअरने तो केला आहे का?''

''मी हे खात्रीपूर्वक सांगू शकत नाही.''

आरोपीच्या वकिलाचे टेबल व प्रेक्षक यांच्यामधून लंक आला व म्हणाला, ''मला जिल्हा वकीलाशी बोलायचे आहे.''

बर्गर त्याच्याकडे वळून म्हणाला, ''काय बोलायचे आहे?

लंक बोलला, “फ्रॅंकलीन शोअरने पिठाच्या डब्यात पिस्तूल ठेवले असेल, पण मला तसे वाटत नाही. आणि मला माहिती आहे, त्याने तिथे पैसे तर नक्कीच ठेवले नाहीत.”

मेसन बोलला, “हे तुला कसे माहिती?”

लंक बोलला, “कारण तो मला काही पैसे देऊ इच्छित होता.”

“तू हे केले नाहीस ना?”

“नाही.”

मेसनने विचारले, “का?”

“कारण मी मिसेस शोअरशी बोलेपर्यंत मला तो इथे रहायला हवा होता.”

मेसनने विचारले, “आणि तो पैसे घेऊन निघून जायला एवढा उत्सुक का होता? फ्रॅंकलीन शोअरने तुला नक्की काय सांगितले, हे तू मला कदाचित सांगणार आहेस असे म्हणाला होतास. ते सांग. आता तू खूप काळ काही दडवून ठेवले आहेस. मला वाटते आता तू सर्व खरे काय ते सांगून टाकावेस.”

लंक बोलला, “माझे माझ्याकडे असलेले बरे. शोअर माझ्याकडे आला. तो उदास होता. तो म्हणाला की त्याला एका माणसाचा त्रास आहे आणि त्याने त्याला मारले आहे. तो म्हणाला, की म्हणून त्याला घाईने जायला हवे, कारण एकजण त्याला मारायला टपला आहे, म्हणून त्याला मारायला हवे. पण पोलिसांना तो खून वाटेल, यासाठी तो घाबरत होता. तो एखाद्या लफड्यात अडकला, तर माटील्डाला ते हवेच होते. मला वाटत होते, की इथून जाण्यापूर्वी त्याने तिच्याशी बोलावे आणि त्याला ते नको होते. मी त्याला माझ्या घरात लपायची परवानगी दिली. पण दुसऱ्या

दिवशी मी मिसेस शोअरला भेटून माझ्या पगाराची काही आगाऊ रक्कम मागून त्याला देणार होतो, म्हणजे तो कुठेतरी निघून जाऊ शकला असता. मी त्याला हे सांगितल्यावर तो झोपायला गेला. तेव्हा मी मिसेस शोअरला भेटायला बाहेर पडलो. मला तिला तिचा नवरा मला भेटल्याचे सांगायचे होते. मला जाणून घ्यायचे होते, की ती त्याला पैशांची मदत करणार आहे की नाही.''

''मेसनने विचारले, ''जर ती नाही म्हणाली असती, तर तू तिला पोलीसात देणार होतास का?''

''मला माहिती नाही, मिस्टर मेसन. शोअरने माझ्याकडे येऊन, माझ्यावर विश्वास दाखवून, मला मान दिला होता. मी मुद्दाम होऊन मिसेस शोअरला काही सांगणार नव्हतो, की फ्रॅंकलीन माझ्याकडे रहातो आहे. मी तिला सांगणार होतो, की मी त्याला पाहीले आहे. मी त्या दोघांनाही चांगली वागणूक देणार होतो.''

मेसन बोलला, ''लंक, पुढे सांग. सरकारी वकिलाला सर्व खरे खरे सांग. तुला आता हे करायला पाहीजे. फ्रॅंकलीन कुठे होता, याबद्दल त्याने तुला जे सांगितले, ते त्याला सांग.''

''तो माझ्याशी फार बोलला नाही.''

मेसन बोलला, ''निदान एक सिगरेट शिलगावून संपेपर्यंत तरी. मिस्टर बर्गरला तो काय म्हणाला ते सांग.''

लंक हो नाही करू लागला व अचानक म्हणाला, ''तसेही, तो त्या बाईबरोबर पळून गेला.''

मेसनने विचारले, ''कुठे आणि का?''

"मी तुम्हाला सांगितले तसे, जेव्हा फ्रॅकलीन फ्लोरिडाला होता, तेव्हा लोक त्याला दुसरा [तोतया] माणूस समजू लागले. फ्रॅकलीनने त्याला शोधले. ते कदाचित जुळे भाऊ असतील. त्यामुळे त्यांच्यात विनोद चाले. ते फोटो घेत. फ्रॅकलीन त्या बाईला खेळकरपणे चिडवू लागला, की तो या माणसाला त्याच्या ओळखीच्या सर्व लोकांबद्दल सांगणार आहे आणि ब्रिज सामन्यांना स्वतःतर्फे त्याला हजेरी लावायला सांगणार आहे.

मग फ्रॅकलीन या तरुण बाईच्या प्रेमात पडला. त्यामुळे त्याला एक कल्पना सुचली, की तो इथून नाहीसा होऊन, या बाईला बरोबर घेऊन, तो फ्लोरिडाला जाऊ शकतो आणि तोतयाला प्रशिक्षण द्यायला सुरवात करून, त्याला धंद्यातील सर्व खाचाखोचा व त्याचे लोकांबरोबरचे असलेले व्यवहार वगैरेबद्दल सांगू शकतो."

"नंतर सहा महिन्यांनी, तो तोतया सर्व काही शिकला. आता फ्रॅकलीन तो माणूसच फ्रॅकलीन शोअर आहे असे दाखवू शकला असता. तर शोअरने असे केले. सर्व गोष्टी सुरळीत चालू होत्या. त्यामुळे फ्रॅकलीनने त्याच्या पुतणीला मियामीहून स्वतः चित्राचे पोस्टकार्ड पाठवले. आणि खरे तर त्याला असे वाटले की जरी तोतयाला अपघात होऊन तो मारला गेला असला व त्याला मानसिक धक्का बसला असला, तरी अजूनही तो त्यालाच फ्रॅकलीन शोअर समजत असल्याने, पोलीस त्याला पकडतील. स्वतःच्या मनाची पाटी कोरी झाली आहे, असे त्याने उठवले. वेळोवेळी त्याला थोडे थोडे आठवायचे. अर्थात धंद्यात कार्यतत्पर रहाण्यासाठी, तो फारच आजारी होता पण त्याने खूप पैसा केला. असे झाले, की तो तोतया फारच आजारी होता पण त्याने खूप पैसा केला, पण गुंतवणुकीतून तो खऱ्या फ्रॅकलीनला त्यातील काही वाटा देईना. खऱ्या फ्रॅकलीन शोअरने त्याचे नाव घेतले व त्या बाईशी

लग्न केले. सर्व काही ठीक चालले होते. ज्या रात्री खऱ्या फ्रॅंकलीन शोअरने त्याच्या पुतणीला चित्राचे पोस्टकार्ड पाठवले,

त्याच दिवशी मानसिक धक्का बसलेला तो तोतया रस्त्यावरील अपघातात मेला. त्यामुळे त्याने घेतलेले खऱ्या फ्रॅंकलीनचे सोंग निकालात निघाले.''

मेसनने विचारले, 'लीचचे काय?''

अलीकडे फ्रॅंकलीनला पैशांची गरज भासू लागली. म्हणून तो लीचकडे गेला. लीचने फ्रॅंकलीनचे मन खाण विकत घेण्यासाठी वळवले व फ्रॅंकलीन शोअरने लीचला काही रोख पैसे दिले. त्यामुळे खाणीच्या मालकाने त्याला खाणीत घालण्यासाठी काही रोख रक्कम दिली व सांगितले, की हे मी दिले नसून, फ्लोरिडाच्या माणसाने दिले आहेत --- आणि लीचला असे वाटले, की हा तोतया माणूस लोभी असून पैसे मारतो आहे. आणि काही वर्षांपूर्वी फ्रॅंकलीनला त्याची बायको सोडून गेल्याने [खरे तर तो बायकोला सोडून गेल्याने] तोदेखील कफल्लक झालेला होता. लीचला खाणीतून काहीही प्राप्ती होईना. अर्थात त्यामुळे फ्रॅंकलीनला लीचकडून पैसे मिळाले नाहीत.

अलीकडे फ्रॅंकलीनला पैशांची गरज भासू लागली होती. तो लीचकडे गेला. लीचने त्याला काही पैसे दिले पण या वेळेपर्यंत तो पुरता मोडून पडला होता --- त्यामुळे फ्रॅंकलीन परत आला. त्या बाईने त्याला काही वर्षांपूर्वीच सोडले होते आणि तो कफल्लक झाला होता. एवढे मला माहिती आहे. माझ्या गरीबाच्या झोपडीत येऊन, फ्रॅंकलीनने मला एवढी गोष्ट सांगितली.''

हॅमिल्टन बर्गर म्हणाला, ''हे अविश्वसनीय आहे! ही मी ऐकलेली सर्वात नवलाची गोष्ट आहे.''

लंक भावनारहीत, कुणाचीही खात्री न पटवणाऱ्या आवाजात बोलला, “मला ती ठीक वाटली. स्वतः मालकाच्या तोंडून ऐकल्याने, कदाचित ती जास्त विश्वासार्ह वाटली असेल. पण अशी गोष्ट त्याने मला सांगितली.”

मेसन जिल्हा वकिलाला म्हणाला, “बर्गर, समजा ही खरी आहे, असे धरले --- त्या तोतयाच्या अपघातापर्यंत तरी खरी आहे, असे धरले, तर मग खरा फ्रॅकलीन मेला असेल तर --- तर या तोतयाला फ्रॅकलीनची जागा घेण्याचे प्रशिक्षण दिलेले आहे. त्याला अगदी सर्व गोष्टी माहीती आहेत, कारण त्याला खऱ्या फ्रॅकलीननेच सांगितलेल्या आहेत आणि तोतयाने त्या लिहून काढून, पाठ केल्या आहेत. जर तो फ्रॅकलीन बनून आला, आणि ते सोंग खरेखुरे वठवले, तर इथे त्याचे नशीब उघडले असते.”

बर्गरने विचारले, “मग तो लगेचच का आला नाही?”

मेसन बोलला, “एका गोष्टीची शक्यता वाटते. ती म्हणजे मिसेस शोअरला तिच्या नवऱ्याने शोधून काढलेल्या या तोतयाबद्दल माहिती आहे. लक्षात ठेवा, फ्रॅकलीनने तो एक विनोद म्हणून सुरु केला आणि त्याच्या बायकोला हे सर्व माहिती आहे. पण जर मिसेस शोअर वारली, तर तोतया हरवलेला नवरा म्हणून प्रकट होऊ शकतो व सर्व इस्टेटीवर हक्क सांगू शकतो.”

बर्गरने हळूच शिट्टी वाजवली --- नंतर बोलला, “आणि मग विषाचा उलगडा होतो.”

मेसनने सिगरेट पेटवली.

लंक बोलला, “माझ्या घरी आलेला तोतया नव्हता. तो मालक होता.”

मेसनने विचारले, “तुला कसे माहिती?”

“कारण त्याने मला फक्त मालकालाच माहिती असलेल्या काही गोष्टी सांगितल्या.

मेसन हॅमिल्टन बर्गरकडे पाहून हसला.

लंकने रागाने भुवई उचलली व अचानक म्हणाला, “ठीक आहे, तो कुणी का असेना, तो मोडलेला होता. मी माझ्या कपड्यात ठेवलेले काही शे डॉलर्स त्याने का चोरावेत आणि पिठाच्या डब्यात त्याचे भविष्य का बंदिस्त करून ठेवावे?”

बर्गरने उत्तरासाठी मेसनकडे पाहिले.

मेसन हसत म्हणाला, “यावर काही भाष्य नाही.”

बर्गरने मेसनला विचारले, “लंककडे आलेला माणूस खरा फ्रॅकलीन होता की त्याचा तोतया होता?”

मेसन बोलला, “बर्गर, मला माहिती नाही. मी त्याला पाहीले नाही. शेवटी तू काय म्हणालास, तर मी माझे नाक मध्ये खुपसू नये. पोलीस काय तो खुनांचा छडा लावतील. जर तू त्या समस्येत लक्ष घातलेस तर?”

बर्गर उद्गारला, “ती जाऊ दे खड्ड्यात! ती काहीही असेल.”

मेसनला अजिबात रुची नसल्याचे दिसले. तो बोलला, “ठीक आहे. माझे दोन्ही अशील, डेला आणि जेराल्ड शोअर हे गुन्हेगार दिसत नाहीत.”

हॅमिल्टन बर्गरचा आवाज खूपच रागावलेला वाटत होता. “ही भिकार केस आहे!”

मेसनने शरीर ताणून, जांभई दिली. तो बोलला, “मला ती तशी वाटत नाही. तरीही मला इतर कसली नाही, पण डेला यातून सुखरूप बाहेर कशी पडेल, एवढीच

काळजी आहे.”

बर्गरने विचारले, “तू मांजराच्या पिल्लाच्या मानसशास्त्राबद्दल काय बोलतो आहेस? आणि त्याचा या केसशी काय संबंध आहे?”

मेसन बोलला, “बर्गर, जर मी तुला काही बोललो असेन, तर तू मला पोलिसांना बगल दिल्याबद्दल मला शिव्या घाल. मी तुझ्या कार्यालयात बसून त्यावर विचार करतो आहे. मला वाटते, तुझ्या बाजूने यावर बरेच बोलण्यासारखे आहे. तुला वाटते वकीलाने खुनाचा शोध घेण्याचे काही कारण नाही. त्याने फक्त त्याची प्रॅक्टीस चालवावी आणि मला याचा विचार करुन सहमत होणे भाग आहे. मी जेराल्ड शोअरचा वकील आहे आणि डेलाचा बॉस आहे. मला खुनाचे कोडे सोडवण्यात काही रुची नाही.”

“पण तुला जेराल्ड शोअरला यातून पूर्णतया बाहेर काढायचे आहे ना?”

“हो.”

“मग ते करण्यासाठी, तू आम्हाला कुणी खून केले, हे सांगणे हाच चांगला मार्ग आहे.”

मेसन बोलला, “नाही, तो कायदा नाही. बर्गर तू माझ्या पद्धतीला विरोध करत होतास. असे बघ, माझ्या अशीलाने काही गुन्हा केला आहे, हे दाखवून देणे तुझे काम आहे. जोपर्यंत मी माझ्या अशीलांच्या हिताचा विचार करतो आहे तोपर्यंत, मी सर्वसामान्यपणे चांगले कायद्याचे काम करतो आहे. मी ज्यावेळी त्याबाहेर जाऊन, तू म्हणतोस त्याप्रमाणे पोलिसांना अडथळा करू लागेन, तेव्हा माझी वर्तणूक, तुला चिरडीस आणणारी, वेगळ्या प्रकारची होईल.”

"डेला, चल, आपण लेफ्टनंट ट्रॅगला व जिल्हा वकीलाला भेटू व त्यांचे चित्राचे कोडे सोडवायला, त्यांना मदत करू. शेवटी, त्यामुळे आपले काही जात नाही."

बर्गर बोलला, "मेसन, इकडे बघ. तू ते करू शकत नाहीस. मला माहिती आहे, की या केसमध्ये माझ्यापेक्षा जास्त असे तू बरेच काही जाणतोस."

"नाही, असे काही नाही. मला जेवढे काही महत्वाचे माहिती आहे, तेवढेच तू देखील जाणतोस."

"पण आपल्या सर्वांना जे माहिती आहे, त्याचे उपयोजन तुझ्या फायद्यासाठी तू करू शकतोस."

"आभारी आहे, सरकारी वकीलसाहेब."

"ठीक आहे, तू काय निष्कर्षाला पोचलास, हे तू आम्हाला सांगायला हवेस."

मेसन बोलला, "बर्गर, मी तुला सांगतो, मी काय करणार आहे. मी तुला पण माझ्या बरोबरीच्या पायरीवर बसवतो. तुला माहिती नाही, अशी एक गोष्ट मला माहिती आहे. लंकने मला सांगितले, की त्याने घरचा हरकाम्या नोकर कोमो विषाचे प्रयोग करत होता. पहिल्यांदा त्याने ते दहावर्षांपूर्वी सुरु केले, म्हणजे फ्रॅंकलीन शोअरच्या पलायनाच्या थोडे आधी. लंकचा भाऊ मेला आणि लंकला नेहमीच असे वाटत आले, की कोमोने त्याला विष दिले."

बर्गरने लंकला विचारले, 'हे खरे आहे का?"

लंक बोलला, 'हो, खरे आहे. मला नाही वाटत की त्या मूर्ख जापने विशेष करून माझ्या भावाच्या बाबतीत असे काही केले असेल. पण मला वाटते --- तसे

केले.”

आताच त्यांच्यात येऊन सामील झालेला लेफ्टनंट ट्रॅग बोलला, “बर्फाच्या पेटीत बिअरच्या चार बाटल्या होत्या. त्यातील प्रत्येकात स्ट्रायचनीन नावाचे विष मिसळलेले होते. तुम्हाला असे वाटते का, की हे कोमोने केले?”

लंक ठासून म्हणाला, “मला खात्री आहे, की त्यानेच हे केले आहे.”

“तुला कसे माहीत?”

“असेच अंदाजाने, तुम्ही जसे तर्क करता, तसेच.”

बर्गर ट्रॅगला म्हणाला, “लेफ्टनंट, इथे नवा, चक्रावून टाकणारा पुरावा आहे. मला तुमच्याशी बोलायचे आहे.”

मेसन हसून बोलला, “लेफ्टनंट, लंक अगदी खात्रीपूर्वक म्हणतो आहे, की या विषप्रयोगांमागे कोमोच आहे. लेफ्टनंट, तुम्हाला आठवत असेल, तुम्ही मला सांगितले होते, की सर्व, तिन्ही गोळ्या एकाच पिस्तुलातून मारल्या गेल्या आहेत. आणि त्याचा अर्थ असा आहे, की एकाच माणसाने दोन्ही गुन्हे केले आहेत. आता यावरून तर्क करा. माटील्डा शोअरकडे दुसऱ्या गुन्ह्याच्या वेळी वेळी इतरत्र असल्याचा पुरेसा पुरावा आहे. खून झाला तेव्हा ती हॉस्पीटलमध्ये होती. जेराल्ड शोअरकडेही तसा पुरावा आहे. तुम्हाला बहुधा, तो माहिती आहे. पण तो सांगून, मी माझी मान अडकवून घेणार नाही. कारण मला साक्षीदार व्हायचे नाही. आणि तुम्ही हेलन व जेरी टेम्पलरला यातून वगळू शकता. याच पद्धतीने तीन चार लोक सोडून, बाकी सारे वगळले जातात. त्यातील संभाव्य गुन्हेगार तुम्ही ठरवा. पण तुमच्याजागी मी असतो, तर मी लंकच्या भावाच्या मरणाची चौकशी केली असती. आणि बघा, हे शक्य आहे का, की हे मरण नैसर्गिकपणे नाही तर विषबाधेने आलेले आहे.

“आणि आता मला आरोपीबरोबर जेवण घ्यायचे असल्याने, मी आपली रजा घेतो.”

## प्रकरण २४

नाचाचा वाद्यवृंद अगदी पाहिजे तसा होता. दिवे मंद होते आणि त्या जागी फक्त थोड्याच जोड्या नाचत असल्यामुळे, फार गर्दी नव्हती आणि फार ठळकपणे काही दिसत नव्हते. पेरी मेसन आणि डेला स्ट्रीट फार वेळ न बोलता, गाण्याच्या सुरांबरोबर वहात चालले होते. जेव्हा वाद्यवृंदाचा आवाज एकत्रित झाला, तेव्हा डेला गाण्याचे शब्द हळूवारपणे गुणगुणू लागली. अचानक अनैच्छिकपणे घसा दाटून येऊन, ती थांबली.

तो बोलला, ‘काय झाले? माशी गिळली गेली का? गाणे म्हणत रहा. मला ते आवडते आहे.”

तिने मान हलवली. “नाही तसे काही वाटत नाही. मी खाल्ले मी प्यायले. मी आनंदी आहे. मला वाटते, मी उद्यासाठी तयार आहे.”

त्याच वेळी गाण्याचा आवाज थांबला. मेसनचे हात अजूनही तिच्या कंबरेभोवती होते. तो तिला हळूवारपणे लांब झुलवत होता, जेणेकरून त्याला तिच्याकडे बघता यावे. क्षणभर त्याचे डोळे कोड्यात पडले. मग ते निवळले. “तू काय म्हणालीस, मला कळले नाही. उद्या तू मरणार? तू त्या मूर्ख केसबद्दल काळजी करते आहेस का?”

ती उदासीनतेने हसली. “मला वाटते, प्रत्येक चांगल्या मुलीला आज ना उद्या यातून जावेच लागते.”

“पण तू काही गुन्हा केलेला नाहीस.”

“मी असे धरून चालतो, की तू हॅमिल्टन बर्गरला भेटल्यावर, तुला त्याला काय सांगायचे आहे, ते आठवेल. त्याचा लहानसा गैरसमज घालवणे जरुरीचे आहे. नाही तर अनावस्था प्रसंग ओढवेल. तुला फक्त एवढेच सांगायचे आहे, “हॅम, अरे मोठ्या माणसा, ऐकून घे, “ओहो, ही लहानशी मुलगी रागावली आहे. आपण बसून बोलू.”

पेरी तिच्यामागे टेबलाशी गेला.

डेला म्हणाली, “जेव्हा तू मांजराचे पिल्लू माझ्याकडे आणलेस आणि फ्रॅंकलीन शोअर तिथे नव्हता, तेव्हा मला वाटले, तू काळजीत पडलास”

मेसनने कबूल केले, “ मी काळजीत होतो. जर मी माझे डोके वापरले असते, तर तसे करायची गरज नव्हती.”

ती सिगरेट पेटवत म्हणाली, “मला काही समजले नाही.”

“तू पिल्लाला ओळखत असलीस --- तर तुला समजायला पाहीजे.”

“म्हणजे पिठात उड्या मारणारे पिल्लू असे तुम्हाला म्हणायचे आहे का?”

“नाही, ते नाही --- ते काय आहे बर?” ती त्याच्या खांद्यावरून त्याच्याकडे रोखून बघत असल्याचे पाहून, त्याने विचारले.

“पॉल ड्रेक.

मेसनने भुवई वर चढवत विचारले, “त्याने आपल्याला इथे कसे काय शोधून

काढले?"

ड्रेक इतका जवळ आला होता, की त्याने मेसनचा तो शेरा ऐकला. त्याने एक खुर्ची ओढली व तो बसला. "तुम्हाला माहिती आहे, की मी कुणालाही कुठल्याही वेळी व कुठल्याही जागी शोधू शकतो. हे माझे कार्ड आहे. तुम्ही मला पेय देणार नाही का?"

"पोलीस आणि खासगी काम करणाऱ्यांनी काम करायच्या वेळी पिऊ नये."

पण मी ज्याच्यासाठी काम करतो, तो उदार मनाचा आहे. तो सुखासीन मनुष्य आहे. तो राजकुमार आहे. तुम्ही त्याला भेटलेच पाहीजे."

मेसनने वेटरला बोलावले. "तीन स्कॉचेस आणि सोडा."

ड्रेकने सुधारणा केली, "पाच स्कॉचेस, पण त्यातील तीन माझ्या पेल्यात. मला याहून जास्त पिणे सहन होत नाही."

वेटरने हो नाही केले पण लवकरच थांबला.

"पेरी, तुला माहिती आहे का, मी फक्त स्कॉच आणि सोडा यासाठी इथे आलो नाही. मला कसली तरी काळजी वाटते आहे."

डेला ओरडली, "तुलाही अटक झाली आहे, की काय?"

पॉलने तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत, वकीलाकडे एकटक नजर लावली. तो बोलला, "पेरी, उद्यासाठी तू टॉम लंकचा उपयोग करून,काही विशेष नाटकी धमाकेदार गोष्ट करायचे योजत होतास का?

"कदाचित हो, पण का?"

"पण आता तू ते करणार नाही आहेस."

“का?”

“लंक मेला आहे. त्याच्या घरापासून काही चौक अंतरावर गाडीने त्याला उडवले आहे. एका साक्षीदाराने ते घडतांना पाहीले आणि त्या गाडीचा सहा सात चौक पाठलाग केला. पण तो गाडी क्रमांक बघायला गाडीच्या जवळदेखील जाऊ शकला नाही. बसमधून उतरून घरी चाललेल्या लंकला गाडीने धक्का दिल्यामुळे लंक दूर फेकला गेला.”

मेसनने टेबलावर बोटांनी ठेका धरला. तो म्हणाला, “त्याला घरी सोडणारा बर्गर अत्यंत मूर्ख आहे.”

“मला वाटते, त्याना वाटले, की लंकने त्याला माहिती असलेले सर्व काही त्यांना सांगितले आणि मग त्याला जिवंत ठेवायचे काही कारण उरले नाही.”

मेसनने रागाने भुवई वर चढवली.

डेलाने विचारले, “तू टॉम लंकचा उपयोग करून,काय विशेष नाटकी धमाकेदार गोष्ट करायचे योजत होतास?”

“काही अगदी कमी गोष्टी. डेला, तुला याबद्दल कधी कुतूहल वाटले का, की लंकचे नाव थॉमस ट्रिमर असे हॉटेलमध्ये रजिस्टर करतांना, सगळी काळजी घेऊनही, पोलिसांनी त्याला इतक्या लगेच सहज कसे काय पकडले?”

ड्रेक बोलला, “कुणीतरी तुमच्या मागावर असणार.”

मेसनने डोके हलवले. “पॉल स्वतःला फसवू नकोस. मला जेव्हा कुणी माझा पाठलाग करायला नको असते, तेव्हा तो कुणी करत नाही.”

“मग पोलिसांना फोन कुणी केला? तो हॉटेलचा कारकून तर असू शकत नाही.”

मेसन बोलला, “नाही, आणि नावे वगळण्याची गोष्ट तू चालू ठेऊ शकतोस. हे करू शकणारा फक्त एकच माणूस आहे.”

“कोण?

“लंक.”

ड्रेक अविश्वसनीय दिसू लागला. तुला असे म्हणायचे आहे का, की त्याने पोलिसांना फोन केला?”

“हो.”

“पण असे करणे ही मूर्खपणाची, वेड्यासारखी गोष्ट होती. तो असे का करेल?”

मेसन बोलला, “ही बाब तुला या सर्व प्रकाराची किल्लीच हातात देते.”

डेलाने विचारले, “पण का?”

मेसन बोलला, “मी फक्त एकाचा कारणाचा विचार करू शकतो.”

“ते काय आहे?”

मेसन कोरडेपणे बोलला, “त्याला अटक करून घ्यायची होती.”

“म्हणजे त्याला तो धोक्यात आहे, असे वाटत असल्याचे तुला म्हणायचे आहे का?”

मेसनने त्याचे खांदे उडवले.

वेटरने पेये आणली. ड्रेकने त्याचा पेला उंचावून डेलाच्या पेल्याशी भिडवला. तो तोंडभर हसत म्हणाला, “तुझ्या तुरुंगवासासाठी. ठीक आहे, पेरी, आता तू काय करणार?”

मेसन बोलला, "काही नाही. अजिबात काही नाही. हॅमिल्टन बर्गरच या रहस्याचा उलगडा करेल. जोपर्यंत मांजरांबद्दल काही माहिती असलेल्या दोन स्त्रिया तिथे आहेत, तोपर्यंत ज्युरी डेलाला कधीच गुन्हेगार ठरवणार नाहीत."

डेलाने तिचा पेला ठामपणे खाली ठेवला. "जर तू याचे स्पष्टीकरण दिले नाहीस, तर मी गुन्हेगार ठरेन आणि आणि तो खून असेल."

ड्रेकने म्हटले, "या राज्यातील सरकारी वकील तुला पेरी मेसनला मारल्याबद्दल अटक करणार नाहीत. तुला बक्षीस मिळेल! पण पिल्लाने असे काय केले की ते खूप महत्त्वाचे आहे?"

मेसन तोंडभरून हसला. "त्या रात्री चांगली थंडी होती. कोणीतरी पिठात पिस्तुल लपवत होते, तेव्हा पिल्लाने त्यात उडी मारली. सहजच त्याला बाहेर काढले गेले. बहुधा कानाला जोरात धरून. आता पिल्लाला लाड करून घ्यायची सवय होती. हे धसमुसळे वर्तन त्याला आवडले नाही. ते स्वयंपाकघरातून मागील झोपायच्या खोलीत गेले व उडी मारून, पलंगावर चढून बसले. तिथून उडी मारून, दुसऱ्या पलंगावर गेले."

ड्रेक बोलला, "का?"

डेलाने त्याच्याकडे आश्चर्य वाटून पाहीले. ती ओरडली, "ओह! का ते मला कळले. जर क्षणभर थांबून विचार केला, तर ते कुणालाही कळेल."

ड्रेकने त्याचे डोके हलवले व तो उठला.

डेलाने विचारले, "तू कुठे चालला आहेस?"

"मी एक मांजर विकत घेणार आहे. म्हणजे मला त्याचा अभ्यास करता

येईल आणि आयुष्यातील काही महत्वाच्या गोष्टी मी शिकेन."

मेसन गंभीरपणे त्याला म्हणाला, "“तुला माहिती आहे का, तू नक्कीच शिकशील."

ड्रेक दुःखाने पुटपुटला, "शुभ रात्र."

पॉल ड्रेक गेल्यावर, मेसन डेलाकडे वळला. "डेला, तुला माहिती आहे का, याचा तुझ्यावर, मला वाटते आहे त्यापेक्षा जास्त ताण आहे. उद्या ज्युरींनी त्यांचा निकाल दिल्यावर, आपण वाळवंटात किंवा पाम स्प्रिंगला पोबारा करायचा का? आपण थोडी घोडदौड करू, सूर्याच्या उन्हात लोळू --- "

"पेरी, उद्या कदाचित मला शिक्षा होईल."

मेसन तोंडभर हसत बोलला, "तू मांजरांची माहिती असलेल्या ज्युरीतील त्या दोन बायकांना विसरते आहेस."

"तू ज्युरींना अजून काही स्पष्ट करणार नाही आहेस का?"

"जराही नाही."

"का?"

"कारण मी तसे केले, तर मी हॅमिल्टन बर्गरला ते कळेल. त्याला त्याने तापवलेल्या तेलात तळले जाऊ दे."

"लेफ्टनंट ट्रॅग काय करेल?"

मेसन बोलला, "बहुधा लेफ्टनंट ट्रॅग केस सोडवेल."

"पण सगळ्या गोष्टींचा आवाका येण्यासाठी ज्युरींना वेळ लागेल ना?"

मेसन बोलला, "आता ते खेळीमेळीने घेतलेल्या पैजेसारखे असेल. मी

तुझ्याशी पाच डॉलर्सची पैज लावतो, की त्यासाठी ज्युरी निदान तीन तास घेतील. पण त्यांचा निकाल 'दोषी नाही' असाच असेल. पण ते दिग्मूढ झालेले ज्युरी असतील. दोन विजयी स्त्रिया तुझ्याकडे बघून हसत असतील आणि पुरुष माणसांच्या चेहऱ्यावर रागीट भाव असतील. मग आपण बाहेर पडू आणि हॅमिल्टन बर्गर त्याच्या हाताखालील लोकांशी बोलून हे शोधून बघू, की पिल्लाने केस कशी काय सोडवली. मग तो माझ्याशी संपर्क साधू बघेल आणि आपण लांब वाळवंटात नाचत असू."

## प्रकरण २५

मखमली अंधारातून मोठी गाडी हळूवारपणे बाहेर पडली. अगदी डोक्यावर असावेत, तसे तारे क्षितीजावर ठळकपणे गोलाकारात पसरलेले दिसत होते.

मेसन अचानक बोलला, "डेला, आपण चिखलाच्या बाजूला गाडी लाऊन, तो शोषून घेऊ. ते अनाकलनीय दृष्य असेल. ते माणसातील विचित्रपणे खून करणाऱ्या पशुत्वाला विसरायला लावेल."

हे रुंद रस्त्याशी आले. मेसनने गाडी थांबवली, दिवे बंद केले व मऊ गादीवर रेलून बसला.

थोड्या वेळाने तो म्हणाला, "मला वाळवंट आवडते.

डेलाने जवळ येत म्हटले, "आपण ही सहल ठरवली होती का?"

"ऊं हुं. मी ते कागद माझ्याबरोबर आणले आहेत. आपण ते संपवल्या

शिवाय, कार्यालयात जायचे नाही.”

ती म्हणाली, ‘मी तुला पाच डॉलर्स देणे लागते. काटेकोरपणे वेळ सांगायची तर ज्युरींनी तीन तास दहा मिनिटे घेतली. बस, मला पिल्लाबद्दल माहिती आहे, पण बाकीचे काय झाले?”

मेसन बोलला, “ज्यावर फ्रँकलीन शोअर झोपला होता, त्या पलंगावर पिल्लाने उडी मारली. मग ते खाली उतरले व दुसऱ्या झोपायच्या खोलीत गेले आणि लंक न झोपलेल्या पलंगावर, गादीच्या मध्यभागी मुटकुळे करून झोपले. पिल्लाने सिद्ध केले की लंक खोटे बोलत होता. मागील झोपायच्या खोलीतील पलंगावर कुणी झोपले नव्हते. तो गार होता. पुढील झोपायच्या खोलीतील पलंगावर कुणी होते आणि तो उबदार होता.

डेला, तू याबद्दल कधी विचार केलास का मला माहिती नाही. पण माणसाला कुठली लपायची जागा हवी असली, तर तो साहजिकपणे तिथे सर्व काही लपवतो. काही वेळ लंकने त्याचे खेळासाठी साठवलेले पैसे पिठाच्या डब्यात ठेवले होते. ती एका चिडक्या, म्हाताऱ्या अविवाहित माणसासाठी नेहमीची जागा होती. नंतर त्याला घाईने पिस्तुल लपवण्याची वेळ आली, तेव्हा त्याने ते साहजिकच तिथे लपवले.

“त्याला पिस्तुल का लपवायचे होते?”

“कारण जेव्हा तो झोपायला गेला, तेव्हा मिसेस शोअरने त्याला हॉस्पीटलमधून फोन केला व सांगितले, की लवकर घराबाहेर पड व खिडकीतून माझ्या झोपायच्या खोलीत शिर. रांगत आत जाऊन, टेबलाच्या खणातून पिस्तुल बाहेर काढ. तिच्या अचानक लक्षात आले, की पोलीस घराची तपासणी करणार

आहेत. त्यांनी पहिल्यांदा तपासणी केली, तेव्हा त्यांना ते कसे मिळाले नाही कुणास ठाऊक! पण ट्रॅग विषासाठी औषधाच्या कपाटाची कसून तपासणी करत होता.

“मला वाटते, तू मला सर्व गोष्ट सांगावीस.”

मेसन बोलला, “कोणीतरी पिल्लाला विष घातले. ते आतले कृत्य होते. पिल्लू घराबाहेर गेलेले नव्हते. कदाचित कोमोने ते केले असेल. पण असे करण्याचे त्याला काही कारण नव्हते. लंकने सुचवलेले कारण तो विष देऊन बघत होता, म्हणजे ट्रायल घेत होता, हे काहीसे वेडेवाकडे वाटते, कारण डोस फार मोठा दिला गेला होता.

काय झाले असावे, हे तुम्ही तर्काने जाणू शकता. मिसेस शोअरला दुपारी फोन आला होता तेव्हा तिने खूप दिवस मनाशी योजलेल्या खुनाचा बेत काळजीपूर्वक आखला. तिला धमकावून ब्लॅकमेल करणाऱ्याला पैसे देऊन कंटाळा आला होता. तिला कित्येक दिवस हेलनला घराबाहेर हाकलून द्यायचे होते. हेलनला माहिती नव्हते, की ती घरापासून लांब आहे. तिला माहिती होते, की जर पिल्लाला विष दिले, तर हेलन वेड्यासारखी त्याला वाचवण्यासाठी हॉस्पीटलमध्ये धाव घेईल. पण अकल्पितपणे जेराल्ड आला. पण अर्थात तो हेलनबरोबर गेला. मग तिने कोमोला बिअर आणायला पाठवले. अशी सर्व खबरदारी घेऊन, तिने फ्रॅंकलीनचे जुने पिस्तूल घेतले गाडीत बसली व हॉलीवूडच्या तळ्याजवळ, जिथे लीच ठरल्याप्रमाणे हेलनची वाट बघत व ब्लॅकमेलचा पुढील हप्ता वसूल करण्यासाठी थांबलेला होता, तिथे गेली. तिने त्याला शेवटचा हप्ता व ०. ३८ कॅलिबरची गोळी मारली. परत घरी आली.

पिस्तुल टेबलाच्या खणात ठेवले. तिच्या लक्षात आले, की तिच्यावर संशय घेतला जाईल. तिने त्यामुळे तिने बर्फाच्या पेटीत बिअरच्या चारही बाटल्यात विष टाकले

व तिला विषबाधा झाल्याचे ढोंग केले. मग तिला घाईने हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. त्यामुळे सरळ फ्रॅकलीनवर आळ घेतला जायला मदत झाली. ट्रॅग जेव्हा म्हणाला, की तिच्या पूर्ण घराची झडती घेतली जाईल, तेव्हा तिच्या ते लक्षात आले. तिला कळले, की त्यांना पिस्तुल सापडेल. तिला पोलिसांनी हॉस्पिटलमध्ये अडकवून ठेवले. म्हणून तिने फोन करून लंकला सांगितले, की तिथून पिस्तुल हलव.

लंक तिचा गुन्ह्यातील साथीदार होता. तिने त्याला तसेच प्रशिक्षण देऊन त्याने काय करावे हे सांगून, काळजीपूर्वक वाढवले होते. तिला त्या दुपारी फक्त काय करावे लागले, तर लंकला फोन करून, ते काम सांगावे लागले.

डेला हरकत घेत बोलली, “पण मला वाटले, की फ्रॅकलीनने माटील्डा किंवा कुणालाच सांगितले नसावे की हेलन कोंडीत सापडून, अधीर झाली. तिची निराशा पळवून लावण्यासाठी, ती खूप रागावली.

मेसन हसला. लंकने फोनवर फ्रॅकलीन असल्याचे नाटक केले व हेलनला म्हणाला, की त्याने माटील्डाला काहीही सांगितलेले नाही.”

डेला म्हणाली, “ठीक आहे, मी --- म्हणजे लंक पिस्तुल नेण्यासाठी घरी आला होता तर --- आणि ते करतांना तो सापडू नये म्हणून त्याने गोळीबार केला.”

“हो, तो खिडकीतून रांगत आला , पलंगाजवळील स्टँडला धडकला आणि भरभर विचार करत, त्याने मिसेस शोअर सारखा आवाज करत, काठी टेकत, चालायचे नाटक केले. तो काही मूर्ख नव्हता. त्याने कशीबशी टेबलावर उडी मारली व खणातून पिस्तुल काढले आणि परत खिडकीतून बाहेर चाला होता, तेवढ्यात जेरी

टेम्पलरने दार उघडले व दिवा लाऊ लागला. त्यामुळे त्याने काही गोळया मारल्या. जेरीला खाली पाडले व त्याच्या कच्च्या घरात बहुधा गाडीने गेला.

लंक झोपायला गेला नसल्याची थाप मारत होता. माटील्डाने फोन केला, तेव्हा तो अंथरुणातच होता. जेव्हा तो पिस्तुल घेऊन घरी परतला, तेव्हा त्याने ते पिठाच्या डब्यात लपवले. नंतर मागील झोपायच्या खोलीतला पलंग त्याने वापरायचा ठरवले. त्यात चादर चुरगळत, बराच वेळ पडून राहीला. सिगरेटचे थोटूक ओढले. टेबलाच्या खणातून व कपाटातून, वस्तू बाहेर काढल्या. शोअर घरी परत जाण्यासाठी टॅक्सी केली. त्याला अशी आशा होती, की पोलीस त्याला पकडून प्रश्न विचारतील. त्याला तसे सांगायचे नसतांना, त्याने माटील्डाने बनवलेली फ्रॅंकलीन त्याच्या घरी आल्याची गोष्ट सांगितली. पोलीसंनी ते तिथल्या तिथे उडवून लावले असते आणि पुरावा गोळा केला असता, की शोअर तिथे होता व लंकच्या पैशांची चोरी करून पसार झाला. अर्थात ते पिठाचा डबा बघतील, असे लंकला वाटले नव्हते. ती त्याची खास अशी वस्तू लपवण्याची गुप्त जागा होती --- आणि त्यांनी ती शोधलीही नसती, पण मी नक्कीच शोधली असती.”

“तुला हे सर्व कसे माहित?”

पिल्लाच्या हालचालीमुळे सहज निष्कर्षाप्रत पोचता आले. पुढील झोपायच्या खोलीतील अंथरूण उबदार होते, मागील खोलीतील नव्हे. या सर्व प्रकारावर उजेड टाकणारा तो कळीचा मुद्दा होता. लंक अंथरुणातून उठला. अंथरुण

उबदार होते. पिल्लू त्या तिथे उडी मारून बसले. लंक पिस्तुल लपवायला घरी परत आला, तेव्हा पिल्लू पिठात नाचले. त्याला हाकल्यावर, ते मागील झोपायच्या

खोलीत गेले. पण तो पलंग गार असल्याने, त्याला आधीचा उबदार पलंग आठवला व ते तिथे जाऊन, मुटकुळे करून झोपले.

पोलिसांसाठी काळजीपूर्वक बनवलेली गोष्ट घेऊन, लंक शोअर घरी गेला. तिथे पोलीसांऐवजी तुम्हीच त्याला पकडले. तो आम्हाला ती गोष्ट सांगण्यास फार उत्सुक नव्हता. कारण त्याला ती पोलिसांना सांगायची होती. तरी तो असे ढोंग करत होता, की त्याला पोलिसांशी काही देणेघेणे नाही आहे. तो घाबरला होता. मी

इतक्या घाईने ते पोलिसांवर ढकलणार नाही. कारण ज्या मिनिटाला तो हे करायला मोकळा झाला, तेव्हा त्याने लेफ्टनंट ट्रॅगला फोनवर बिननावाने भरघोस माहिती दिली. त्यामुळे त्याला अटक झाली.

माटील्डाने लंकच्या मदतीने बऱ्याचजणांना मारायचा बेत आखला होता. .३८ पिस्तुल वापरून व असे भासवून, की ते तिचा नवरा जिवंत असून, हे त्याचे कृत्य आहे. तो खरोखरच जिवंत असल्याने --- आणि पोलीसांना सापडत नसल्याने --- जेराल्ड शोअर आणि हेलन यांनी इस्टेट हडप करायच्या आत, तिने हेलनला पैशांसाठी स्वतंत्र होऊ दिले नव्हते आणि चाळीस हजार डॉलर्स इच्छापत्राद्वारे सुरक्षित ठेवले होते.”

“पण तिने लंकला हेलनला फोन कसा करायला लावला?”

“तुला समजत नाही का? तो तर या सगळ्या प्रकाराचा खास भाग आहे. फ्रॅंकलीनचा आवाज माहिती नसलेली घरात एकच व्यक्ती होती, ती म्हणजे हेलन.

फ्रॅंकलीन घर सोडून गेला, तेव्हा ती फक्त चौदा वर्षांची होती. चौदा आणि

चोवीस यात खूप फरक आहे. लंक तिला फसवू शकत होता, जेराल्डला नव्हे.”

“लीचच्या प्रेताशेजारी गाडीत पडलेल्या फ्रॅकलीनच्या वस्तूंचे काय?”

माटील्डाने तिच्या नवऱ्याच्या काही जुन्या वस्तू त्याच्या रूमालात गुंडाळून, तिच्याबरोबर नेल्या. लाँड्रीची खूण त्याबरोबर गेली. फ्रॅकलीनने तो रुमाल गेल्या दहा वर्षात वापरला नव्हता. बरोबर नेला नव्हता. घड्याळ साडेचारला बंद पडले होते. म्हणजे माटील्डा जेव्हा लीचचा खून करायच्या मोहिमेवर निघाली, तेव्हा ते बंद पडले होते. लोक दुपारी चारला घड्याळाला किल्ली देत नाहीत. हे इतके सहज घडले व ते दुखावलेल्या अंगठ्यासारखे, त्या वेळेचे निदर्शक होते.

“डेला, तुला माहिती आहे का, की ते मांजराच्या पिल्लासाठी नसते, तर ती ते घेऊन गेली असती. गर्विष्ठपणे ते तसे केले गेले. पण तिने एक मूर्खासारखी गोष्ट केली.”

“काय?”

“तिने खून केल्यावर परततांना मेल केलेली, लीचने आम्हाला तळ्याजवळ आणण्यासाठी लिहिलेली चिठ्ठी! तिने ती कोमोला चुकीचे सांगून, गोंधळवून, चुकीच्या मार्गावर ओढण्यासाठी लिहावी, तशी लिहिली होती ती फार हुशार नव्हती.”

“पण लीच तिला ब्लॅकमेल का करत होता?”

“कारण त्याला खरे काय, ते समजले होते.”

“काय खरे?”

“फ्रॅकलीन घरातून निघून गेला, तेव्हा घरात कोण आहे ते ओळखू न आलेले एक प्रेत सापडले होते, आठवते का?’””

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की ते फ्रॅकलीनचे प्रेत होते? नाही. नाही, बॉस, ते अशक्य आहे --- “

“नाही, तो “फ्रॅकलीन शोअर नव्हता, तर तो फील लंक होता.”

डेला अवाक होत बोलली, “फील लंक?”

“तुला माहिती आहे, माटील्डाचे नवऱ्यावर प्रेम नव्हते. आणखी काय तर तिचे ज्याच्यावर प्रेम होते त्याला तो नष्ट करायला निघाला होता. जर माटील्डाच्या मार्गातून फ्रॅकलीन दूर झाला असता, तर त्याचे नशीब, म्हणजे संपत्ती तिला मिळाली असती व तिला लसलसती वासना असलेल्या सत्तेच्या जोरावर, स्टीफन अल्बरला आर्थिक दृष्ट्या वाचवू शकली असती. नंतर त्याच्याशी तिने लग्न केले असते. आपला लंक हा पहिल्यापासून, तिचा व्यक्तिगत/ खासगी माणूस होता. त्याचा भाऊ फार आजारी होता. फक्त काही दिवसांचा --- कदाचित काही तासांचा प्रश्न होता. ते मनात धरून माटील्डाने बेत आखला. जेव्हा तो मेला, तेव्हा टॉम लंकने फोन केल्यावर, जे डॉक्टर आले, त्यांनी मरणाचे प्रमाणपत्र दिले. पण प्रेत उचलणाऱ्या लोकांनी झटपट काम करणारे विष दिलेल्या फ्रॅकलीन शोअरला उचलले. त्याचे दफनासाठी तयार असलेले प्रेत बाहेर बहुधा लंकच्या गाडीत, ठेवले गेले. त्याच्या भावाचे अंतिम संस्कार पुरे केल्यावर, लंकने फ्रॅकलीन शोअरचे प्रेत खूप दिवस ठेवले. पूर्वेला त्याच्या भावाच्या दफनाच्या जागी नेऊन पुरले आणि मग वेळाच्या बाबतीत खोटे बोलला, की हे फ्रॅकलीन घरातून नाहीसा होण्यापूर्वी हे झाले.”

“पण त्याची आई पूर्वेकडे रहात होती. तिने हा भाऊ फील नाही, हे ओळखले नाही?”

मेसनने रुंद हास्य केले. “अजून तू लंकने सांगितलेल्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवते आहेस! मी तुझ्याकडून जिंकलेले ते पाच डॉलर्स, ट्रॅग जेव्हा शोधून काढेल, तेव्हा त्याला सापडेल, की जिथे दफनासाठी प्रेत नेले गेले, तिथे लंक कधीच रहात नव्हता. आता अजून एक वेगळा पुरावा आहे. जॉर्ज अल्बर लंकच्या झोपडीवजा घरात मध्यरात्री गेला, तेव्हा घरात दिवे चालू होते. पण आतून आवाज मात्र येत नव्हता. लंक म्हणतो, फ्रॅंकलीन त्याच्याकडे येण्यापूर्वी, तो रेडिओ ऐकत होता. जर ते खरे असेल, तर अल्बरने आवाज तरी ऐकले असते किंवा रेडिओ तरी ऐकला असता.”

“पण फ्लोरिडाहून आलेल्या त्या पोस्टकार्डाचे काय?”

मेसन म्हणाला,“ते पोस्टकार्ड मुद्दाम काही बेत करून नव्हे, तर मांजराच्या हालचालींप्रमाणे, असेच आपले पाठवले.”

“कसे काय?”

“तुला दिसत नाही का? कारण ते १९३१ च्या हिवाळ्यात लिहिले गेले होते, उन्हाळ्यात नव्हे.”

“कशावरून?”

मेसन बोलला, “तो म्हणाला की तो हिवाळा सोडून, फार थंडी नाही व फार उन्हाळा नाही, अशा छान हवेत, रहातो आहे. मग तो म्हणतो, विश्वास ठेवा अगर ठेऊ नका, पण तो पोहायचादेखील आनंद लुटतो आहे. तो खात्रीने असे म्हणाला नाही की. जर तो फ्लोरिडातील उन्हाळ्यात लिहित असता, तर तिथे, पोहण्याच्या आनंदावर विश्वास ठेवा अगर ठेऊ नका, असे म्हणाला नसता.”

“पण कार्ड तर जून १९३२ चा पोस्टाचा शिक्का असलेले होते.”

मेसन बोलला, “तसे ते होते. पण त्यावर तारीख नव्हती. लोक सहसा चित्राच्या पोस्टकार्डावर तारीख टाकतात, नाही का? त्याचे एकच स्पष्टीकरण असू शकते. हे कार्ड हेलनला लिहिले, तेव्हा तो आणि माटील्डा तिथे हिवाळयापूर्वी भेट द्यायला आले होते. त्याने ते बहुधा सुटाच्या खिशात ठेवले आणि पोस्टाच्या पेटीत टाकायला विसरला. त्याच्या घरातून निघून जाण्यानंतर माटील्डा त्याचे कपाट आवरत असतांना, तिला ते सापडले व तिने या केसला एक कलात्मक स्पर्श द्यायचे ठरवले. त्यामुळे “फ्रॅंकलीनच्या गमनानंतर सहा महिन्यांनी, माटील्डाने ते

पत्रपेटीत टाकले. पण ते तिने पत्रपेटीत कसे टाकले, ते मला माहिती नाही. पण हे अनेक प्रकारे करता आले असते. तिला ही गोष्ट अनेक मसाले घालून, गूढ अशा तोतयाला मध्ये आणून, चटकदार करता आली असती. त्यामुळे पोलिसांनाही चक्रावून टाकता आले असते. तिला फ्रॅंकलीन परत आल्याचे दाखवायचे होते आणि असे भासवायचे होते, की खरे तर फ्रॅंकलीनने लीचला मारले. मेसनने एक मोठी जांभई दिली. “मला झोप येते आहे.”

डेला म्हणाली, “मला माहिती असलेल्यांपैकी तू सर्वात अनाकलनीय व निराश व्यक्ती आहेस.”

“आता काय झाले?”

ती बोलली, “तू एकदा स्पष्ट केलेस, की हे सर्व पुरावे इतके सरळ आहेत, पण त्यामुळेच ते निराश करतात. ते खूपच सरळ आहेत. जर सर्व गोष्टी नीट एकापुढे एक मांडल्या, तर उत्तर अगदी स्पष्ट आहे. पण मला त्यांची नीट मांडणी करून, त्यातून योग्य तो अर्थ काढायला जमत नाही आहे.”

मेसन बोलला, “पण सर्व काही तिथे आहे. पिल्लू उबदार गादीवर उडी मारते आहे, जेव्हा सहसा माणसे घड्याळाला किल्ली देत नाहीत, तेव्हा उन्हाळयात साडेचारला बंद पडलेले घड्याळ, पाठवलेले, पण अर्थातच हिवाळयात लिहिलेले व उन्हाळयात पोस्ट केलेले पोस्टकार्ड --- “

“आणि तू हॅमिल्टन बर्गरला हे सर्व समजावून देणार आहेस?”

“मी काहीच सांगणार नाही आहे. त्याला तडफडत बसू दे.”

“तू तिचा हा त्रास पण असाच चालू ठेवणार आहेस का?”

मेसन बोलला, “ती त्यातून सुटणार नाही आहे. ते काय ते ट्रॅग बघेल. त्याला आधीच पिल्लाचा दृष्टीकोन सरळपणे मिळालेला आहे. तो फीलचे प्रेत खणत जाईल आणि त्याला ते खरे फ्रॅकलीन शोअरचे असल्याचे कळेल. टॉम लंकच्या गाडीला धक्का कुणी दिला, याचे तो आश्चर्य वाटून घेत बसेल आणि मग तर्क लढवेल, की तिच लीचला मारणारी व्यक्ती असणार व तिने जादा बकबक करणाऱ्या व्यक्तीचे तोंड बंद केले असणार. आणि सर्व काही लंकवर सोपवायला हवे. त्याची भूमिका महत्वाची आहे --- चतुर/हुशार साक्षीदाराची आहे. पण तो मूर्ख असल्याचे ढोंग करतो आहे. त्याचे फ्रॅकलीन शोअर त्याच्याकडे गेल्याचे सांगणे, म्हणजे खोटे बोलण्याचा कळसाध्याय आहे. पण अर्थात ती एक गोष्ट आहे, हे तपास करणाऱ्याने स्मरणात ठेवायला हवे. खुनी नैसर्गिकपणे खोटे बोलणार. पण शहाण्या माणसाने, हुशारीचा खुनाचा बेत असा असल्याचे ओळखावे.

माटील्डाने हुशारीचा बेत आखताना अर्थात त्याला मदत केली आहे .त्यांनी अगदी खोलात जाऊन हा बेत आखलेला आहे. पण तो पिल्लासाठी, नसेल, तर त्यांनी आपल्याला --- काही काळासाठी मूर्ख बनवले आहे.

माझ्यावर विश्वास ठेव. प्रिये, पुढील वेळी मी जेव्हा एखादी केस घेईन, तेव्हा ट्रॅग आणि हॅमिल्टन बर्गर मला सांगणार नाहीत, की माझ्यासाठी योग्य जागा माझे कार्यालय आहे. तिथे बसून, मी पुरावे कसे कसे समोर येतात, ते पहात बसावे, असे आहे. आता त्यांच्यासाठी ती फार महत्वाची, धोकादायक, पण खूपसे काही घडणारी जागा आहे आणि जेव्हा ते गुन्ह्याची उकल करतील, तेव्हा त्यांना समजेल, की माझ्याकडे सर्व उत्तरे होतीच."


डेलाने कबूल केले, "ठीक आहे, मी तुला एक गोष्ट सांगते. तू मला फार घाबरवले होतेस."

"तुझ्यावर गुन्हेगार म्हणून ठपका येणार, असे वाटून तू घाबरली होतीस का?"


"मला माहिती नाही --- जेव्हा परिस्थितीजन्य पुराव्याचे गठ्ठ्यावर गठ्ठे वाढत चालले होते, तेहा ते चित्र फार विलक्षण निराशादायक दिसत होते."


मेसनने तिच्या खांद्यावर टाकण्यासाठी, गाडी चालवायच्या चक्रावरील एक हात काढला. तो थंडपणे म्हणाला, "माझ्या लाडके, तुझा तुझ्या वकिलावर नेहमी विश्वास पाहीजे.

# The End.



सुखी जोडपे
व इतर कथा
सॉमरसेट मॉम
वृषाली जोशी


वृषाली जोशी
सॉमरसेट मॉम
आई व इतर कथा


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



सॉमरसेट मॉम
पॅसिफिकच्या बेटांवरील कथा
वृषाली जोशी


वृषाली जोशी यांची
पन्नास पुस्तके
































ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह



कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी



वृषाली जोशी
मार्क ट्वेन
मार्क ट्वेन च्या कथा


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov



वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


वृषाली जोशी
The
SOUND OF MUSIC
संगीताचा नाद



वृषाली जोशी
THE
SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष आहे.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे एकावन्नावे पुस्तक आहे.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे. अनुवादाचा तिनशे रुपये पर पेज हा रेट धरला तरी सुमारे तीस लाख रुपयांचे हे काम त्यांनी मराठी वाचकांसाठी विनामूल्य केले आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (११), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश

चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (४), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।